मेहता मराठी ग्रंथजगत

दीपावली २०१७ । ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१७ जोडअंक

पृष्ठे : १६० । किंमत : ₹ १००

माझ्या ६६ वर्षांच्या आयुष्यात एका वर्षातल्या एका महिन्यातल्या एका आठवड्यातला एकही दिवस असा नव्हता, ज्या दिवशी भीतीनं श्वास रोखला नाही.

- फ्रेडरिक फॉर्सिथ

आयुष्यातल्या अंधाऱ्या क्षणी लोक साथ सोडून जातात, तेव्हा काही मोजकी माणसं आपली सोबत करायला मागे उरतात. ती माणसं जिवाभावाची माणसं असतात.

- जेफ्री आर्चर

मी पस्तीस दिवसांत कोणतंही पुस्तक लिहून संपवतो. मला रफुकामातून बाहेर पडायचं असतं.

- ॲलिस्टर मॅक्लिन

मी स्वतःला अनेक धर्मांचा विद्यार्थी समजतो. जितकं अधिक समजतं, तितके प्रश्न वाढत जातात. माझ्यासाठी आत्मिक शोध आयुष्यभराची क्रिया आहे.

- डॅन ब्राऊन

सकाळ
पुणे, मंगळवार
१७ ऑक्टोबर २०१७

स्वागत दिवाळी अंकांचे

ग्रंथजगत

रहस्य कथेतील थरार आणि गूढ व भयकथेतील गोठवून टाकणारं भय, या दोन्ही गोष्टी वाचकांना आकर्षित करतात. रहस्यकथा वाचकाला गुन्हेगार आणि गुप्तहेर, पोलिस यांच्या जगात घेऊन जातात, तर भयकथा गूढकथा वाचकाला अतर्क्य घटनांद्वारे एका अज्ञात प्रदेशात घेऊन जातात. नियती, आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या माणसांच्या भावना- वावरणाऱ्या माणसांच्या भावना-वासना-इच्छा-आकांक्षा आणि आपलं स्वत:चं मन यावर नियंत्रण नसल्यामुळे माणूस अगतिक असतो. हे वास्तव गूढकथा, भयकथांमधून अधोरेखित होत राहतं. शेवटी मानवी भावभावनांचं सूक्ष्म चित्रण करणारे कथा अंकात आहेत. गावोगावच्या गोष्टी, खुनी घड्याळाचे रहस्य, मर्सी डेथ, सूड नावाची डिश, एक बँक दरोड्याचा तपास, गेस्ट हाऊस, असे विविध गूढकथा आहे. श्रीकांत काळे, समीर वेंगुर्लेकर, श्रीकांत पवार, सुरेश पाथरकर, डॉ. संजय ढोले, नीलेश मालवणकर, सुरेश देशपांडे यांच्या गूढकथा अंकात आहेत.

संपादक : सुनील मेहता, कार्यकारी संपादक : शंकर सारडा
(मूल्य : १०० रुपये, पृष्ठे: १६०)

सामना
पुणे 30-10-2017
http://epaper.saamana.com/

मेहता मराठी ग्रंथजगत

मेहता पब्लिशिंग हाउसचा यंदाचा दिवाळी अंक रहस्य, गूढ आणि भयकथांचा विशेषांक आहे. काळाच्या ओघात झोकाळत गेलेला हा एक साहित्यप्रकार या अंकाच्या निमित्ताने पुन्हा प्रकाशात आणण्याचा प्रकाशकांनी प्रयत्न केला आहे. ज्येष्ठ साहित्यिक गुरुनाथ नाईक, बाबूराव अर्नाळकर, रत्नाकर मतकरी, वर्षा वेलणकर, मनस्विनी प्रभुणे, लीना सोहोनी, सुश्रुत कुलकर्णी, डॉ. अनमोल कोठाडिया, श्रीकांत पवार, समीर वेंगुर्लेकर या दिग्गज लेखकांच्या लेखांचा या अंकामध्ये समावेश असल्याने अंक अधिक दर्जेदार झाला आहे. क्षणोक्षणी उत्कंठा, श्वासांची गती वाढवणारं रहस्य आणि शब्दांमध्ये दडलेलं भय अनेक लेखांमध्ये सामावलेलं आहे. सहस्यमय कथांबरोबरच या कथांना साजेशी अशी चित्रे अंकामध्ये रेखाटण्यात आल्याने रहस्याच्या भीती आणि गुढतेला अधिकच खोली मिळाल्याचे जाणवते; तसेच अनेक कथा चित्रांच्या स्वरूपामध्ये जिवंत होतात. रहस्यकथेतील थरार, गुढकथेतील आणि भयकथेतील गोठावून टाकणारं भय वाचकांना आकर्षित करते. रहस्यकथा वाचकाला गुन्हेगार, पोलीस आणि गुप्तहेर यांच्या जगात घेऊन जातात, तर भयकथा, गूढकथा वाचकाला अतर्क्य घटनांद्वारे एका अज्ञात प्रदेशात घेऊन जातात. मानवी भावनांचे सूक्ष्म चित्रण करणारे साहित्य हेसुद्धा महान असतं, हेच या दिवाळी अंकामधून दिसून येते.

■ संपादक - सुनील मेहता, पृष्ठे - १६०, मूल्य - १०० रु.

लोकप्रभा
१० नोव्हेंबर २०१७
बारा रुपये
पृष्ठसंख्या ७६

मेहता ग्रंथजगत

रहस्यकथा हा वाचकांचा आवडता साहित्यप्रकार. मेहता ग्रंथजगतने यंदाच्या दिवाळी अंकात रहस्यकथांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. सतीश भावसार यांनी केलेले अंकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. अंकाच्या आतलीही त्यांनी केलेली चित्रे उत्तम आहेत. अंकाच्या सुरुवातीलाच एडगर ॲलन पो याची द टेल टेल हार्ट ही सुश्रुत कुलकर्णी यांनी अनुवादित केलेली कथा आहे. दे रेड सिल्क स्कार्फ ही मॉरिस ब्लाँक यांची वर्षा वेलणकर यांनी अनुवादित केलेली लाल मखमली स्कार्फ ही कथा आहे. चेकमेट या जेफ्री आर्चरच्या कथेचा लीना सोहोनी यांनी केलेला अनुवाद वाचनीय आहे. जे. के. चेस्टरटन च्या द ब्ल्यू क्रॉस कथेचा अनुवाद शुचिता फडके यांनी केला आहे. मास्टरस्ट्रोक्स या सदरात मुकेश माचकर यांनी गूढकथांचे मतकरी मॉडेल हा रत्नाकर मतकरींवर लिहिलेला लेख चांगला आहे. मनस्विनी लता रवींद्र यांनी एका शिलेदाराची शोकांतिका या लेखात गुरुनाथ नाईक यांच्यावर लिहिलं आहे. वामन देशपांडे यांनी रहस्यकथांचे सम्राट बाबूराव अर्नाळकर यांच्या लिखाणाचा आढावा घेतला आहे. पडद्यावरचे रहस्य, गावोगावच्या गोष्टी हे विभाग वाचनीय आहेत.

▌*संपादक : सुनील मेहता, मूल्य : १०० रुपये*

response.lokprabha@expressindia.com

पुण्य नगरी

मेहता मराठी ग्रंथजगत

'रहस्यकथा' सध्या साहित्याच्या प्रांतात अडगळीत गेलेला विषय. कोणेएकेकाळी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाचकवर्ग असलेल्या या साहित्यप्रकाराचे वर्चस्व टिकून होते. कालांतराने ते कमी झाले. मात्र, मेहता मराठी ग्रंथजगतने पुन्हा या विषयाला आपल्या दिवाळी अंकात स्थान दिले आहे. या अंकात बाबुराव अर्नाळकर, गुरुनाथ नाईक यांनी रहस्यकथांसाठी दिलेले योगदान, रत्नाकर मतकरींच्या भयकथांना लाभलेले वाङ्मयीन मूल्य, रहस्यकथाकारांची लोकप्रियता, समीक्षकांनी रहस्यकथांविषयी दाखविलेली उदासीनता, मराठी साहित्यात रहस्यक थांना आणि रहस्यकथाकारांना मिळणारे दुय्यमस्थान या विषयांना दिवाळी अंकात स्थान दिले आहे. याशिवाय पुनर्जन्म, अंधश्रद्धा, माणसाचे अतर्क्य मनोव्यापार, सूडकथा, दरोड्याचा तपास, असे वैविध्यपूर्ण विषय हाताळण्यात आले आहेत. साता समुद्रापारची रहस्ये, मास्टर्स स्ट्रोक्स, पडद्यावरचे रहस्य, गावोगावच्या गोष्टी, यात रहस्य, गूढकथांची मांडणी करण्यात आली आहे.

युगंधर ताजणे

-संपादक- सुनील मेहता, पाने- १६०, किंमत- १००

सामना

मेहता मराठी ग्रंथजगत

मेहता पब्लिशिंग हाउसचा यंदाचा दिवाळी अंक रहस्य, गूढ आणि भयकथांचा विशेषांक आहे. काळाच्या ओघात झोकाळत गेलेला हा एक साहित्यप्रकार या अंकाच्या निमित्ताने पुन्हा प्रकाशात आणण्याचा प्रकाशकांनी प्रयत्न केला आहे. ज्येष्ठ साहित्यिक गुरुनाथ नाईक, बाबूराव अर्नाळकर, रत्नाकर मतकरी, वर्षा वेलणकर, मनस्विनी प्रभुणे, लीना सोहोनी, सुश्रुत कुलकर्णी, डॉ. अनमोल कोठाडिया, श्रीकांत पवार, समीर वेंगुर्लेकर या दिग्गज लेखकांच्या लेखांचा या अंकामध्ये समावेश असल्याने अंक अधिक दर्जेदार झाला आहे. क्षणोक्षणी उत्कंठा, श्वासांची गती वाढवणारं रहस्य आणि शब्दांमध्ये दडलेलं भय अनेक लेखांमध्ये सामावलेलं आहे. सहस्यमय कथांबरोबरच या कथांना साजेशी अशी चित्रे अंकामध्ये रेखाटण्यात आल्याने रहस्याच्या भीती आणि गुढतेला अधिकच खोली मिळाल्याचे जाणवते; तसेच अनेक कथा चित्रांच्या स्वरूपामध्ये जिवंत होतात. रहस्यकथेतील थरार, गुढकथेतील आणि भयकथेतील गोठावून टाकणारं भय वाचकांना आकर्षित करते. रहस्यकथा वाचकाला गुन्हेगार, पोलीस आणि गुप्तहेर यांच्या जगात घेऊन जातात, तर भयकथा, गूढकथा वाचकाला अतर्क्य घटनांद्वारे एका अज्ञात प्रदेशात घेऊन जातात. मानवी भावनांचे सूक्ष्म चित्रण करणारे साहित्य हेसुद्धा महान असतं, हेच या दिवाळी अंकामधून दिसून येते.

■ संपादक - सुनील मेहता, पृष्ठे - १६०, मूल्य - १०० रु.

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ गुरुवार, २६ ऑक्टोबर २०१७

मेहता मराठी ग्रंथजगत

'रहस्यकथा' हा काहीसा बाजूला पडलेला विषय या दिवाळी अंकातून समोर आला आहे. त्यामुळे या माध्यमातून रहस्यकथेच्या संदर्भातील विविध पैलू समोर आले आहेत. अनुवादित रहस्य कथा, मास्टर्स स्ट्रोक्स, पडद्यावरचे रहस्य, गावोगावच्या गोष्टी वाचनीय आहेत.

संपादक : सुनील मेहता, पृष्ठे : १६०, मूल्य : १०० रु.

प्रभात पुणे, शनिवार, दि. २८ ऑक्टोबर २०१७

मेहता मराठी ग्रंथजगत

प्रत्येक दिवाळी अंक हा एखादा विषय निवडत असतो.यंदा मेहता मराठी ग्रंथजगत यांनी रहस्थकथा हा विषय निवडला आहे,रहस्यकथेच्या संदर्भातील विविध पैलू या अंकात उलगडण्यात आले आहेत.इंग्रजी रहस्यकथांचा अनुवादित रहस्यकथा,बाबुराव अर्नाळकर आणि गुरुनाथ नाईक यांनी रहस्यकथांसाठी दिलेले योगदान,रत्नाकर मतकरींच्या भयकथांना लाभलेलं वाड ;मयीन मुल्य,विशिष्ट कालखंडात विशिष्ट वयोगटाला रहस्यकथेने घातलेली मोहिनी,रहस्य कथाकारांची विवक्षित कालखंडातील लोकप्रियता समीक्षकांनी रहस्यकथांविषयी दाखवलेली उदासिनता,मराठी साहित्यात रहस्यकथांना आणि रहस्य कथाकारांना मिळणारं दुय्यम स्थान असे विविध लेख या अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत.

संपादक: सुनील मेहता

मेहता मराठी ग्रंथजगत

दीपावली २०१७

ऑक्टोबर- नोव्हेंबर जोडअंक २०१७

वर्ष सतरावे

किंमत १००रु

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

मुखपृष्ठ व आतील रेखाचित्रे
सतीश भावसार

मांडणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड टेलिफोनभवनसमोर,
पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२

या अंकातील लेखांतील मते त्या त्या लेखकाची असून
संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

अंतरंग

संपादकीय / ६

सा|ता|स|मु|द्रा|पा|र|ची|र|ह|स्यं

दगाबाज
सुश्रुत कुलकर्णी / १०

लाल मखमली स्कार्फ
वर्षा वेलणकर / १४

चेकमेट
लीना सोहोनी / २८

द ब्ल्यू क्रॉस
शुचिता फडके / ३४

मा|स्ट|र्स|स्ट्रो|क्स

गूढकथांचे 'मतकरी' मॉडेल
मुकेश माचकर / ४४

एका 'शिलेदाराची' शोकांतिका
मनस्विनी प्रभुणे / ५०

दिवस रहस्यकथांचे
प्रकाश निलाखे / ५४

रहस्यकथांचे सम्राट : बाबूराव अर्नाळकर
वामन देशपांडे / ६०

प|ड|द्या|व|र|चे|र|ह|स्य

सस्पेन्स : एक चित्रपट विधा
डॉ. अनमोल कोठाडिया / ६६

गा|वो|गा|व|च्या|गो|ष्टी

घातचक्र
श्रीकांत काळे / ७६

खुनी घड्याळाचे रहस्य
समीर वेंगुर्लेकर / ८६

गिनिपिग व बुद्धाचा चेहरा
श्रीकांत पवार / ९८

मर्सी डेथ
सुरेश पाथरकर / १०२

गेस्टहाउस
डॉ. संजय ढोले / ११०

निद्रानाश
चैतन्य रासकर / ११६

वियोग
सरिता आठवले / १२०

सूड नावची डिश
निलेश मालवणकर / १२२

एका बँक दरोड्याचा तपास
सुरेश देशपांडे / १३०

आमच्या पुस्तकांतून...

डॉक्टर
जयश्री कुलकर्णी / १३८

भृगुसंहितेचा बळी
स्नेहल जोशी / १४४

संपादकीय

बहुतांश दिवाळी अंक हे विशिष्ट विषयाला वाहिलेले असतात; कारण एखादा विषय जेव्हा विशेषत्वाने चर्चेसाठी घेतला जातो, तेव्हा त्याचे विविध पैलू समोर येतात आणि त्या विषयावर विचारमंथन सुरू होतं. 'रहस्यकथा' हा काहीसा बाजूला पडलेला विषय आम्ही दिवाळी अंकासाठी निश्चित केला आणि रहस्यकथेच्या संदर्भातील विविध पैलू समोर आले.

जसे इंग्रजी रहस्यकथांचा 'फॉर्म' अर्थात अनुवादित रहस्यकथा.

बाबूराव अर्नाळकर आणि गुरुनाथ नाईक यांनी रहस्यकथांसाठी दिलेलं योगदान, रत्नाकर मतकरींच्या भयकथांना लाभलेलं वाङ्मयीन मूल्य, विशिष्ट कालखंडात विशिष्ट वयोगटाला रहस्यकथेने घातलेली मोहिनी, रहस्यकथाकारांची विवक्षित कालखंडातील लोकप्रियता, समीक्षकांनी रहस्यकथांविषयी दाखवलेली उदासीनता, इंग्रजी साहित्यात रहस्यकथा लेखकांना मिळणारं मानाचं स्थान आणि मराठी साहित्यात रहस्यकथांना आणि रहस्यकथाकारांना मिळणारं दुय्यम स्थान इत्यादी.

तसेच पडद्यावर साकारलेल्या रहस्यकथा अर्थात रहस्यमय चित्रपट.

आम्ही मागवलेल्या रहस्यकथांमध्येही पुनर्जन्म, अंधश्रद्धा, माणसाचे अतर्क्य मनोव्यापार, दयामरण, भूतयोनी, हलकंफुलकं रहस्य, विचित्र योगायोग, सूडकथा, दरोड्याचा तपास असे वैविध्यपूर्ण विषय हाताळले गेले आहेत. रहस्यकथा, भयकथा, गूढकथा यांची वैशिष्ट्ये आणि या कथांच्या संदर्भातील काही महत्त्वाची नावे यांची चर्चाही या निमित्ताने व्हावी असं वाटतं.

बाबूराव अर्नाळकर आणि गुरुनाथ नाईक यांची रहस्यकथांच्या (खरं तर या कथांसाठी गुप्तहेरकथा असा शब्द जास्त योग्य वाटतो.) संदर्भात विशेषत्वाने चर्चा झाली. बाबूराव अर्नाळकर यांचे काळापहाड, धनंजय-छोटू, झुंजार किंवा गुरुनाथ नाईक यांचा कॅप्टन दीप हे गुप्तहेर होते. शत्रूला वेगवेगळ्या मार्गांनी शह देण्याच्या कौशल्यामुळे ते लोकप्रिय झाले. या हिरोंचं हे अचाट साहस, शत्रूशी दोन हात करताना त्यांचं शत्रूला भिडणं, चातुर्य या गुणांमुळे त्या वेळच्या तरुण पिढीला त्यांची भुरळ पडली. वाईट शक्ती आणि त्यांना नामोहरम करणारे धाडसी हिरो हे समीकरण तरुणांना जास्त आकर्षित करणारं असतं; पण त्या काळातील प्रौढ किंवा वृद्ध पिढीने ही पुस्तकं वाचलीच नाहीत असं नाही. या संदर्भात 'दक्षता' या मासिकाचीही आठवण होते. दहशतवाद, टोळीयुद्ध, नक्षलवाद, आर्थिक घोटाळे इ. विषयांवरील गुन्हेगारी कथा या मासिकातून प्रसृत होत असतात. बहुतांश वेळा त्या सत्य घटनांवर आधारित असतात. त्यामुळे केवळ तरुण वाचकच नाही तर प्रौढ वाचकांकडूनही या मासिकाला चांगला प्रतिसाद मिळतो.

रहस्यकथांच्या संदर्भात व.कृ.जोशी यांचं नावही चांगल्या रीतीने स्मरणात आहे; कारण त्यांनी स्वत: पोलीस खात्यात इन्स्पेक्टर म्हणून सेवा बजावली. त्यामुळे त्यांच्या कथांना वास्तवाचं अधिष्ठान होतं. जवळ जवळ २५ रहस्यकथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यापैकी जवळ जवळ अकरा कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहेत. 'अभूतपूर्व हत्या', 'अमानुष संहार', 'हॅलो, मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय,' ही त्यातील काही उदाहरणं. 'शोध', 'हातकडी', 'अपराधी कोण' या त्यांच्या कथांवर आधारित दूरदर्शन मालिकाही गाजल्या. 'डिटेक्टिव्ह राजूच्या करामती'सारख्या कथासंग्रहातून बालसाहित्यही त्यांनी हाताळले. 'रहस्यमय एकांकिका' या संग्रहाद्वारे एकांकिका हा वाङ्मयप्रकारही त्यांनी हाताळला; मात्र त्यांचं सगळं साहित्य 'रहस्य'केंद्रित राहिलं. आकाशवाणीच्या विविध केंद्रांसाठी त्यांनी रहस्यप्रधान श्रुतिका लिहिल्या आणि त्यांनाही श्रोत्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

श्रीकांत सिनकर हे रहस्यकथांच्या संदर्भातील आणखी एक महत्त्वपूर्ण नाव. महत्त्वपूर्ण अशासाठी, की सिनकरांचा वावर जसा पोलिसांमध्ये होता, तसा अंडरवर्ल्ड, वेश्यावस्त्यांमध्येही होता. त्यामुळे त्यांच्या रहस्यकथाही वास्तवाच्या जवळपास जाणाऱ्या होत्या. 'सैली १३ सप्टेंबर', 'आरोपींच्या मागावर', 'मुंबई पोलिसांना आव्हान' ही त्यांची काही पुस्तकं.

सुहास शिरवळकरांनीही रहस्यकथा-कादंबऱ्यांचं दालन समृद्ध केलं; पण सुहास शिरवळकरांच्या रहस्यकथेला कुठेतरी मानवी भावभावनांचा स्पर्श होता. भावनांशी बांधिलकी होती. सरळ सरळ रहस्यकथांचा 'फॉर्म' न स्वीकारता भावनेच्या वाटेवरून ती रहस्यमय मार्गावर जात होती, असं म्हणण्यास वाव आहे. 'शॅली शॅली', 'गढूळ', 'कलंक' या त्यांच्या रहस्यप्रधान कादंबऱ्यांपैकी काही कादंबऱ्या.

'वीरधवल' ही नाथमाधवांची कादंबरी रहस्यमय धाटणीची होती, असं म्हणायला हरकत नाही.

रहस्यकथा आणि गूढकथा, भयकथा यातही फरक आहे. रहस्यकथा या पोलीस तपासाच्या, गुप्तहेरांनी एखाद्या गुन्ह्याच्या काढलेल्या मागाच्या कथा असतात. त्यामुळे थरारक घटनांचं चित्रण आणि त्या थरारक घटनांतून हिरोचं धाडस आणि चातुर्य अधोरेखित करणं असं या कथांचं स्वरूप असतं. त्यामुळे या कथांची वाङ्मयीनदृष्ट्या चर्चा झाली नसावी.

मराठीमध्ये गूढकथांच्या किंवा भयकथांच्या संदर्भात रत्नाकर मतकरी आणि नारायण धारप ही नावं प्रामुख्याने समोर येतात. या दोघांच्याही कथांमध्ये मृत्यू, मृत्यूपलीकडचं अतर्क्य विश्व, भूतयोनी यांच्या अस्तित्वातून भयनिर्मिती होत राहते; पण हे भय माणसाला अंतर्बाह्य हलवून सोडतं. धारपांच्या कथांतील वातावरण प्रचंड भीती वाटायला लावणारं असतं. अति गूढ असतं. त्यांची कथा त्या वातावरणात फिरत राहते. धारपांची भाषाही पकड घेणारी आहे.

रत्नाकर मतकरींची भयकथा माणसाचं लौकिक जीवन आणि मृत्युपश्चात अस्तित्व या दोन्हीतील कार्यकारण भाव दर्शवते. त्यामुळे त्यांच्या भयकथांतून मानवाच्या सुप्त मनातील भावभावना अधोरेखित होतात. भाषेच्या दृष्टीनेही त्यांची कथा वरच्या श्रेणीत होती. म्हणून त्यांच्या भयकथांची दखल समीक्षकांना घ्यावी लागली.

गूढ वातावरणातून आणि मानवी मनाच्या गुढातून भयनिर्मिती करणाऱ्या रत्नाकर मतकरींची 'निजधाम' ही गूढकथा उदाहरणादाखल घेऊ. एका अनाथ शाळकरी मुलाचा-मधूचा-त्याच्याच वयाचा असणारा सावकाराचा मुलगा सदू खून करतो. पारावर झोपणाऱ्या मधूचं एकच स्वप्न असतं स्वत:च्या घरात राहण्याचं; पण सदूने खून केल्यामुळे ते भंगतं. सदूने खून केल्यानंतर मधूचा आत्मा स्वत:च्या कलेवराकडे पाहत असतो. त्यावेळी मधूच्या आत्म्याला काय वाटतं याविषयी मतकरी लिहितात, 'माझे शरीर पाहता पाहता मला वाईट वाटू लागले. रडू येईलसे वाटू लागले. मोठमोठ्याने रडावे असे मला वाटत होते. माझ्या मनात कल्लोळ कल्लोळ झाला. त्या कल्लोळाला वाट करून देणे जरुरीचे होते. पण आता तशी सोयच राहिली नव्हती. तेव्हा तो कल्लोळ काही केल्या कमीच होईना. माझे शरीर!– किती स्वप्ने होती त्या शरीरातल्या जिवाची! पुढल्याच वर्षी मी मॅट्रिकच्या वर्गात जाणार होतो. नंतर मुंबईला... कॉलेजमध्ये... चांगली नोकरी... बायको... घर... संसार... स्वत:चे घर... मला मोठे व्हायचे होते... स्वत:चे घर करायचे होते... आणि मध्येच हे काय झाले? सगळे असे मध्येच एकाएकी कसे संपून गेले? अचानक तुटून गेले?– आता पुढे काही होणार नाही. किती भयंकर! काही म्हणजे काही आता व्हायचे नाही! सगळ्या बेतांचा, मनोरथांचा आता शेवट झाला. शेवट... घर... स्वत:चे घर...' मृत्यू हे अटळ वास्तव माणसाचं शरीर संपवतं; पण त्याच्या इच्छा-आकांक्षा संपवू शकत नाही, हे सत्य मनाला चुटपुट लावून जातं.

जन्म-मृत्यूच्या सीमेवर जगत असलेली माणसं भावनांच्या जंजाळात अडकलेली असतात आणि मृत्यूनंतरच्या जगातही ते जंजाळ माणसाच्या बरोबर गेलं तर काय होतं...याचं चित्रण मतकरींच्या भयकथांमधून प्राधान्याने आढळतं. वर्ण्य व्यक्तिरेखेची काही दुष्ट व्यक्तींमुळे होणारी घुसमट आणि मृत्यूनंतर प्राप्त झालेल्या गूढशक्तीचा फायदा घेऊन त्या व्यक्तीने घेतलेला सूड, असं मतकरींच्या बहुतांश कथांचं सूत्र असतं; पण भावनांचं ते जंजाळ, त्या व्यक्तीचा मृत्युपश्चात प्रवास या दोन्ही गोष्टी त्यांच्या प्रत्ययकारी लेखणीतून कलात्मकतेने उतरतात, म्हणूनही त्यांच्या भयकथांना वाङ्मयीन मूल्य प्राप्त झालं असावं. एकूणच सजगतेने त्यांनी या भयकथांची निर्मिती केली, असं म्हणण्यास हरकत नसावी.

गूढकथांच्या संदर्भात जी.ए. कुलकर्णी यांचं नाव घेतलं जातं असलं तरी जी. एं.ची कथा ही रूढार्थाने गूढकथा नव्हती. मानवी मनाचं गूढ अधारेखित करणाऱ्या जी. एं.नी 'गूढकथा' हा 'फॉर्म' स्वीकारला नव्हता. मानवी मनाच्या तळाशी जाताना ती गूढता त्यांच्या कथेत आपोआप निर्माण होते.

मेहता पब्लिशिंग हाऊसने इंग्रजीमधील अनेक 'बेस्ट सेलर' रहस्यमय कादंबऱ्या मराठीत आणल्या आहेत. डॅन ब्राऊन यांच्या 'एन्जल्स ॲन्ड डेमन्स','डिसेप्शन पॉईंट'. आयर्विंग वॅलेस यांच्या 'सेकंड लेडी','द सेव्हन्थ सिक्रेट', 'द गेस्ट ऑफ ऑनर'. 'रॉबिन कुक यांच्या 'टॉक्सिन', 'कोमा','सीज्र', ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या 'द गन्स ऑफ नॅव्हरॉन', 'द सटन बग'. फ्रेडरिक फॉर्सिथ यांची 'द अफगाण' ही कादंबरी आणि 'नो कम बॅक्स' हा कथासंग्रह ही त्याची काही उदाहरणं.

या कादंबऱ्यांचं वैशिष्ट्यं म्हणजे केवळ एखाद्या गुन्ह्याची पार्श्वभूमी या कादंबऱ्यांना लाभलेली नसते. तर अनेकपदरी कथासूत्र असतं. एका व्यापक कॅनव्हासवर धक्कादायक वळणांनी ही कथा अंतिम रहस्याकडे वाटचाल करत असते. त्यामुळे एकदा कादंबरी हातात घेतली की ती संपवूनच वाचक खाली ठेवतो. लेखकाची बहुश्रुतता आणि प्रतिभा यांचा अपूर्व संगम या कादंबऱ्यांमधून अनुभवाला येतो.

या रहस्यमय कादंबऱ्यांबरोबर रत्नाकर मतकरी यांचे 'स्वप्नातील चांदणे', 'खेकडा' यासह बारा गूढकथासंग्रह, जयश्री कुलकर्णी यांचे 'विषवल्ली' आणि 'मांजराची सावली' हे भयकथासंग्रह, शुभदा गोगटे यांचा 'घर' हा गूढकथासंग्रह यावरही मेहता पब्लिशिंग' हाऊसची नाममुद्रा उमटली आहे.

तेव्हा रहस्यकथेतील थरार आणि गूढकथेतील, भयकथेतील गोठवून टाकणारं भय या दोन्ही गोष्टी वाचकांना आकर्षित करतात. रहस्यकथा वाचकाला गुन्हेगार आणि गुप्तहेर, पोलीस यांच्या जगात घेऊन जातात, तर भयकथा, गूढकथा वाचकाला अतर्क्य घटनांद्वारे एका अज्ञात प्रदेशात घेऊन जातात. नियती, आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या माणसांच्या भावना-वासना-इच्छा-आकांक्षा आणि आपलं स्वत:चं मन यावर नियंत्रण नसल्यामुळे माणूस अगतिक असतो, हे वास्तव गूढकथा, भयकथांमधून अधोरेखित होत राहतं. शेवटी, मानवी भावभावनांचं सूक्ष्म चित्रण करणारं साहित्य वाङ्मयीनदृष्ट्या नेहमीच श्रेष्ठ ठरवलं जातं, ही बाब डोळ्यांआड करता येत नाही.

ही दीपावली आणि नूतन वर्ष
आपणा सर्वांना सुखसमृद्धीचे जावो, ही कामना!

पुरस्कार

मी झारा गहरमानी एक देशद्रोही

रेश्मा कुलकर्णी-पाठारे अनुवादित 'मी झारा गहरमानी एक देशद्रोही' या पुस्तकास अनुवादासाठीचा महाराष्ट्र साहित्य परिषदेचे 'स. ह. मोडक श्रेष्ठता पारितोषिक', सतीश भावसार यांना मुखपृष्ठासाठीचा (प्रौढ साहित्य)अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार'

संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची

डॉ.अनिल गांधी लिखित 'संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची' पुस्तकास 'महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था पुरस्कार २०१६' आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या वतीने 'उल्लेखनीय ग्रंथ पुरस्कार'



ज्ञानसूर्याची सावली

मंजुश्री गोखले लिखित 'ज्ञानसूर्याची सावली' या पुस्तकास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे 'कीर्तन संजीवनी पुष्पलता रानडे पारितोषिक'



मागील पानावरून... मागेच!

अरुण शौरी लिखित आणि अशोक पाध्ये अनुवादित 'मागील पानावरून मागेच' या पुस्तकास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे 'आर. बी. भिडे परितोषिक'

मी मलाला

मलाला युसूफजई लिखित, सुप्रिया वकील अनुवादित 'मी मलाला' या पुस्तकास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे 'राधाबाई हरीभाई देशपांडे पारितोषिक'



सा|ता | स|मु|द्रा|पा|र|ची | र|ह|स्यं



दगाबाज

मूळ कथा : द टेल टेल हार्ट

मूळ लेखक : एडगर ॲलन पो

अनुवाद : सुश्रुत कुलकर्णी

खरंच!... अस्वस्थ... मी अगदी खूप खूप अस्वस्थ झालेलो होतो; पण मी एक वेडा आहे असं तुम्ही का म्हणाल? या आजारामुळे माझ्या साऱ्या संवेदना अधिक तीक्ष्ण झालेल्या आहेत. त्या नष्ट झालेल्या नाहीत किंवा मंदही झालेल्या नाहीत. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे माझी ऐकण्याची क्षमता अगदी अचूकपणे शाबूत आहे. मला वाटतं याचं रहस्य त्याच्या डोळ्यांमध्ये असावं. होय, आणि तेच होतं! त्याचा एक डोळा एखाद्या गिधाडासारखा दिसायचा- एक फेकुटलेला निळ्या रंगाचा डोळा, त्यावर पुटं चढलेली होती. त्याच्या बुबुळावर एक आवरण चढलेलं होतं. जेव्हा कधी तो माझ्याकडे दृष्टिक्षेप टाके, तेव्हा माझा भीतीनं अगदी थरकाप उडे; मग हळूहळू ... अगदी हळूहळू मी त्या म्हाताऱ्या माणसाचं जीवन संपवून टाकण्याचा माझ्या मनामध्ये निश्चय केला. अखेर त्यामुळेच माझी त्या डोळ्यापासून कायमची सुटका झाली असती.

इथेच तर खरी गोम आहे. तुम्हाला मी वेडा वाटत असेन. वेड्या लोकांना काहीच कळत नाही; पण तुम्ही खरंतर मला पाहिलं पाहिजे. मी किती शहाणपणानं प्रत्येक गोष्ट केली, हे तुम्ही पाहिलं पाहिजे... अगदी काळजीपूर्वक... भविष्यावर नजर ठेवून... किती चांगल्या प्रकारे मी फसवणूक केलेली होती! त्या म्हाताऱ्या माणसाचा खून करण्याआधी आधीचा आठवडा मी त्याच्याशी आजवर वागलो त्यापेक्षा अधिक दयाळूपणे वागलो आणि दररोज रात्री, मध्यरात्रीच्या सुमाराला, मी दरवाजाचं लॅच फिरवून ते उघडत असे... अगदी हळुवारपणे! आणि मग मी माझं डोकं आत शिरेल एवढा दरवाजा उघडला, की मी आत एक काळ्या रंगाचा कंदील सरकवत असे. सगळं एकदम बंद. म्हणजे त्यामधून कुठलाच प्रकाश बाहेर येत नसे. मग माझं डोकं मी हळूच आत खुपसत असे. मी किती कावेबाजपणे आत शिरतो हे पाहून तुम्हाला हसूच आलं असतं! मी आत अगदी हळूहळू शिरत असे... अगदी म्हणजे अगदी हळू, जेणेकरून त्या म्हाताऱ्या माणसाची झोप मोडली नसती. मला त्या दरवाज्यातून माझं डोकं पूर्णपणे आत सरकवायला जवळ जवळ एक तास लागत असे. तेव्हा कुठे मला तो आपल्या बिछान्यावर झोपलेला दिसत असे.

हं!... कोणता वेडा माणूस इतका शहाणा असेल बरं? आणि जेव्हा माझं डोकं पूर्णपणे त्या खोलीमध्ये शिरायचं, तेव्हा मी हळूच कंदिलाच्या काचेचं झाकण हलकेच बाजूला करायचो. अगदी हलकेच... खूपच हलक्यानं (कारण त्या झाकणाच्या बिजागरीचा कुरकुर असा आवाज यायचा.) ... मी ते झाकण इतकंच उघडायचो, की एक अगदी छोटा प्रकाशाचा किरण त्या गिधाडाच्या डोळ्यांसारख्या डोळ्यावर पडेल. हे मी अगदी सात रात्री केलं. प्रत्येक रात्री बरोबर मध्यरात्री; पण दर वेळी मला तो डोळा बंदच असलेला दिसायचा आणि मला जे काम साधायचं होतं ते करणं अशक्य होतं. तो म्हातारा माणूस मला त्रास देत नव्हता खरा; पण तो दुष्ट डोळा मात्र देत होता. आणि दररोज सकाळी दिवस उगवला की मी त्या माणसाच्या खोलीत जाऊन धैर्यानं त्याच्याशी बोलत असे. अगदी प्रेमानं त्याचं नाव घेऊन कालची तुमची रात्र कशी गेली, अशी चौकशी करत असे. आता हे पाहा हं, तो एक अगदी हुशार वृद्ध माणूस होता; पण असं असलं तरी दररोज रात्री, बरोबर बारा वाजता मी तो झोपलेला असताना त्याचं निरीक्षण करत असे.

आठव्या रात्री मी दरवाजा उघडताना नेहमीपेक्षाही अधिक सावध

होतो. घड्याळाचा मिनिट काटा माझ्या हालचालींपेक्षाही वेगानं पुढं सरकत असावा. आधी कधीच वाटली नव्हती, तेवढी मला माझ्या शक्तीबद्दल खात्री जाणवू लागली... माझ्या गोष्टी जाणून घेण्याबद्दलच्या क्षमतांचं ज्ञान. माझ्या या विजयाबद्दलच्या भावना मला आटोक्यात ठेवणं मुष्कील झालं. मी तिथे होतो, तो दरवाजा हळूच... अगदी हळूहळू उघडत होतो आणि त्या माणसाला माझ्या या दुष्ट कृत्यांचा आणि विचारांचा पत्ताही नव्हता. त्यामुळे मला आनंद रोखणं अगदी अनावर झालं. कदाचित या कल्पनेनंच मी स्वतःशी खुदकन हसलो असेन आणि त्यानं तो आवाज ऐकला असेल; कारण अचानक तो बिछान्यात ताडकन उठून बसला. अगदी दचकल्यासारखा. आता तुम्हाला वाटलं असेल, की मी मागे हटलो असेन... पण नाही. त्याच्या खोलीमध्ये पूर्ण गडद काळोख होता. (खिडक्यांचे दरवाजे चोरांच्या भीतीमुळे अगदी घट्ट लावून घेतलेले होते.) त्यामुळे त्याने दरवाजा उघडलेला पाहिला नाही, हे मला चांगलं ठाऊक होतं. मी तिथेच शांतपणे स्थिर राहिलो. मी हळूहळू, अगदी हळूहळू आत सरकत राहिलो. मी माझं डोकं आतमध्ये सरकवलं आणि कंदिलाची झडप उघडणारच होतो, तेवढ्यात माझा अंगठा त्याच्या कडीवरून निसटला. तो म्हातारा माणूस बिछान्यात ताडकन उठून बसला आणि मोठ्यांदा ओरडला, 'कोण आहे रे?'

मी तसाच निश्चल उभा राहिलो आणि अवाक्षरही काढलं नाही. पुढचा एक तास मी शरीराची कोणतीही हालचाल केली नाही आणि दरम्यानच्या काळात त्याला पुन्हा बिछान्यात पडलेलंही ऐकलं नाही. तो हा सर्व वेळ बिछान्यात चाहूल घेत होता.

जसं मी करत होतो तसाच, प्रत्येक रात्री. भिंतीवरच्या घड्याळाची मृत्यूची टिकटिक ऐकू यावी तसा. (???) आता मी एक छोटासा गुरगुरण्याचा आवाज ऐकला. आणि मला माहीत होतं, की तो आवाज मृत्यूच्या भीतीचा होता. ते कुठल्या दुःखामुळे किंवा वेदनेमुळे कण्हणं नाही!...जेव्हा त्याला आश्चर्याचा धक्का बसतो, तेव्हा येणारा, तो अगदी आत्म्याच्या तळापासून घुसमटलेला अस्पष्ट आवाज होता. मला तो आवाज चांगलाच माहिती आहे. अनेकदा रात्री, अगदी बरोबर मध्यरात्री, जेव्हा सारं जग झोपलेलं असेल, हा आवाज माझ्या स्वतःच्या हृदयातून येत असे, अगदी खोलवरून आणि त्याच्या घाबरवून टाकणाऱ्या प्रतिध्वनीसह. त्यामुळे मी भीतीनं अगदी कंपित होऊन जात असे. मला त्यामुळे ते चांगलंच ठाऊक होतं. त्या वृद्ध माणसाला आता काय वाटतं आहे, ते मला समजत होतं आणि मला त्याची दयाही येत होती. तर दुसरीकडे मी मनातल्या मनात हसत होतो. मला ठाऊक होतं, की जेव्हा त्यानं कूस बदलली तेव्हा तो पहिला हलका आवाज ऐकल्यापासूनच तो बिछान्यात तळमळत पडलेला असेल. तेव्हापासूनच त्याच्यावरचं भीतीचं सावट अधिकाधिक गडद होतं आहे. ते निराधार आहे हे ठरवण्याचा त्यानं कितीही प्रयत्न केला असला, तरी ते त्याला शक्य झालेलं नाही. तो स्वतःशीच म्हणत असणार, 'हा काही नाही तर घरातल्या धुराड्यातून येणारा आवाज आहे' किंवा 'एखादा उंदीर फरशीवरून इकडून तिकडे जात असेल,' किंवा 'हा एखाद्या रातकिड्याने एक वेळा केलेला नुसताच आवाज असेल.' या सगळ्या भ्रामक कल्पनांतून तो स्वतःला आश्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे. पण हे सगळं व्यर्थ आहे हे त्याला आता समजलेलं आहे; कारण मृत्यू आता त्याच्याकडे येतो आहे. त्याची काळीशार सावली त्याच्यावर आता पडली आहे आणि आता आपल्या बळीला ती गिळंकृत करते आहे. त्या भीतिदायक, पटकन न समजणाऱ्या सावलीचा त्याला अजून सुगावादेखील लागला नाही... त्याला अजून काही दिसलेलं नाही किंवा त्यानं काही ऐकलेलं नाही. त्या खोलीतून माझं डोकावणारं मस्तक त्याला अजून जाणवलेलं नाही.

जेव्हा मी बराच काळ वाट पाहत होतो, अगदी शांतपणे वाट पाहत होता... त्यानं अंथरुणात पडण्याची चाहूल घेण्याआधी मी ठरवलं, की त्या कंदिलातून एक अगदी छोटी तिरीप येईल इतकं झाकण उघडायचं. मग मी ते उघडलं- ते किती हळू, किती आवाज न करता उघडलं याची तुम्हाला कल्पना येणार नाही. अगदी त्यातून एक फिकटसा प्रकाशाचा किरण पडेपर्यंत, एखाद्या कोळ्याच्या जाळ्याचा बारीकसा धागा असावा असा. तो त्या झाकणाच्या भोकातून पडलेला किरण थेट त्या गिधाडासारख्या डोळ्यावर पडला.

तो डोळा उघडा होता... सताड, अगदी सताड उघडा होता आणि मी त्याच्याकडे पाहिल्यावर माझा संताप वाढू लागला. मी अगदी बारकाईनं त्याच्याकडं पाहिलं... त्याची फिकट निळी छटा आणि त्याच्यावर असणारा तो घाणेरडा पडदा. त्यामुळे अगदी हाडाच्या आतपर्यंत मी गोठून जायचो; पण मला त्या म्हाताऱ्या माणसाच्या चेहऱ्याचा किंवा शरीराचा दुसरा कुठलाही भाग दिसत नव्हता. मी तो प्रकाशाचा किरण त्या घाणेरड्या ठिकाणी अगदी नेमकेपणानं आपोआपच पाडलेला होता.

आणि मी तुम्हाला अजून सांगितलं नाही, की तुम्ही एखाद्याची संवेदना जर वाजवीपेक्षा जास्त असेल, तर त्या वागण्याला वेडेपणा समजता. होय ना? आता मी तुम्हाला सांगतो, त्या वेळी माझ्या कानात एक अगदी दबका, पुसट आणि क्षणभर असणारा आवाज आला. अगदी कापसात गुंडाळलेल्या घड्याळाचा येतो तसा. मला तो आवाज चांगलाच ठाऊक होता. तो त्या म्हाताऱ्याच्या हृदयाच्या ठोक्यांचा आवाज होता. त्यामुळे माझ्या रागात आणखी भरच पडली. एखाद्या सैनिकाच्या अंगात रणवाद्यांमुळे स्फुरण चढावं तसं मला झालं.

पण तरीदेखील मी स्वतःला आवरलं आणि स्थिरपणे उभा राहिलो. अगदी जेमतेम श्वास घेत होतो. मी तो कंदील न हलवता हातात धरलेला होता. मी प्रकाशाची ती तिरीप डोळ्यावर कशी स्थिरपणे पाडता येईल याचा प्रयत्न करत होतो. दरम्यान, त्या हृदयाच्या ठोक्यांचा तो नरकयातना देणारा आवाज वाढला. तो अधिक जलद गतीनं ऐकू येऊ लागला. आणि प्रत्येक वेळी तो आणखी मोठामोठाच होत जात होता. त्या म्हाताऱ्याची मला वाटणारी भीती नक्कीच पराकोटीची असली पाहिजे! जसजसा तो आवाज मोठा होऊ लागला, म्हणजे अगदी दर क्षणाला तो मोठा होत होता! मी काय सांगतोय ते तुम्ही नीट ऐकलंत ना... मी तुम्हाला आधीच म्हणालो, की मी अस्वस्थ होतो. तर मी अस्वस्थ होतो आणि रात्रीच्या त्या प्रहरात त्या जुन्या घरातल्या भीतिदायक शांततेमध्ये त्या अशा विचित्र आवाजामुळे मी दहशतीनं अगदी थरारून गेलो. तरीदेखील पुढची काही मिनिटं मी स्वतःला आवरलं आणि स्थिरपणे उभा राहिलो. पण जसजसा तो ठोक्यांचा आवाज वाढत गेला... वाढत गेला, मला वाटू लागलं, त्या हृदयाचा आता स्फोट होणार. त्यामुळे माझ्या डोक्यात आणखी नवी चिंता सुरू झाली... तो आवाज आता शेजाऱ्यांना ऐकू जाणार! म्हाताऱ्याची मृत्युघटका आता येऊन ठेपली होती! मी

जोरानं आरोळी ठोकली आणि कंदिलाची झडप पूर्णपणे उघडली आणि खोलीत धाडकन प्रवेश केला. त्याला आश्चर्याचा धक्का बसला... एकदाच. एका क्षणातच मी त्याला जमिनीवर खाली खेचलं आणि जाड गादी त्याच्या अंगावर ओढली. मग मी आनंदानं स्मितहास्य केलं. आता काम पुरं झालेलं होतं; पण पुढची कितीतरी मिनिटं, त्याच्या हृदयाचे ठोके दबलेल्या आवाजात ऐकू येतच राहिले. अर्थात त्यामुळे मी चिंता करत नव्हतो; कारण ते भिंतीतून पलीकडे ऐकू जाणार नव्हते. अखेर कधीतरी ते थांबले. म्हातारा आता मेलेला होता. मी गादी उचलली आणि प्रेताची तपासणी केली. हो. तो अगदी एखाद्या दगडासारखा निश्चल मरून पडलेला होता. मी त्याच्या हृदयावर माझा हात ठेवला आणि कितीतरी मिनिटं तसाच राहू दिला. आता तिथे ठोके नव्हते. तो अगदी निश्चितपणे ठार झालेला होता. आता त्याचा तो डोळा मला पुढे त्रास देणार नव्हता.

जर तुम्हाला मी अजूनही वेडा वाटत असेन, तर मी घेतलेल्या सगळ्या शहाणपणाच्या काळज्या जेव्हा मी सांगेन, तेव्हा तुम्हाला तसं वाटणार नाही. मी आता प्रेत लपवायचं ठरवलं. जशीजशी रात्र संपायला लागली, मी माझ्या कामाचा वेग वाढवला; पण आवाज न करता. पहिल्यांदा मी प्रेताच्या सगळ्या शरीराचे भाग सुटे केले. मी त्याचं शिर आणि हात-पाय वेगळे केले.

मग मी त्या खोलीच्या फ्लोअरिंगमधल्या तीन फळ्या काढल्या आणि त्याखाली सगळे तुकडे दडवून टाकले. मग मी त्या तीन फळ्या इतक्या हुशारीनं लावल्या, इतक्या चाणाक्षपणे लावल्या की कोणत्याही माणसाच्या नजरेला अगदी काही बदल केला आहे याचा थांगपत्ताही लागला नसता. तिथं धुऊन स्वच्छ करण्यासारखं काहीही नव्हतं. कसलाही डाग नव्हता... कुठलाही रक्ताचा डाग किंवा असं काही. त्याबद्दल मी फारच जागरूक होतो. जर मी हे बाथटबमध्ये केलं असतं, तर हे नक्कीच लक्षात आलं असतं... हा हा!

जेव्हा मी माझं हे सगळं काम संपवलं, तेव्हा पहाटेचे चार वाजले होते. बाहेर अजून मध्यरात्रीइतकाच काळोख पसरलेला होता. घड्याळात चारचे टोले पडले, तेवढ्यात बाहेरच्या दरवाज्यावर कुणीतरी टकटक केलं. मी अगदी हलक्या मनानं घराचा दरवाजा उघडायला गेलो... आता मला कसली भीती होती? दरवाज्यातून तीन लोक आत आले. त्यांनी अगदी अस्खलितपणे आपण पोलीस अधिकारी आहोत असं सांगितलं. शेजाऱ्यांनी कसला तरी किंचाळायचा आवाज रात्री ऐकला असं त्यांना सांगितलं होतं; त्यामुळे संशयानं शेजाऱ्यांनी पोलीस ठाण्यामध्ये माहिती दिली होती. म्हणून त्या अधिकाऱ्यांना आमचं घर धुंडाळायला पाठवलेलं होतं.

मी हसलो. आता मला कसली भीती होती? मी त्या लोकांचं स्वागत केलं. ती किंचाळी... हो मी बहुतेक स्वप्नात असेन. आणि म्हातारा, तो तर देशाबाहेरच गेलेला होता. मी आलेल्या पाहुण्यांना सगळं घर फिरून दाखवलं. त्यांना मी शोधूही दिलं. नीटपणे. मी त्यांना त्याच्या खोलीमध्ये घेऊनही गेलो. मी त्यांना तिथल्या सगळ्या मौल्यवान वस्तू जशाच्या तशा धक्का न लागता सुरक्षित आहेत हे दाखवलं. या माझ्या आत्मविश्वासा-मुळे आलेल्या उत्साहाच्या भरात मी त्या खोलीमध्ये खुर्च्या आणल्या आणि थकवा जावा म्हणून त्यांना तिथे बसण्याची विनंती केली. त्या वेळी मी माझ्या या निष्कलंक विजयामुळे अगदी बिनधास्त होऊन माझी खुर्ची जिथं प्रेत ठेवलेलं होतं त्याच्यावरच ठेवली.

आलेले अधिकारी समाधानी दिसले. माझ्या वागण्यामुळे त्यांची खात्री पटली असेल. मी अगदी सहज होतो. ते बसलेले होते आणि मी त्यांना आनंदानं उत्तरं देत होतो. मग आम्ही इकडच्या तिकडच्या गोष्टींवर गप्पा मारल्या.

पण नंतर नंतर मला मी जरा फिका पडतो आहे, असं वाटलं आणि ते कधी एकदा जातात असं वाटू लागलं. माझं डोकं दुखू लागलं होतं आणि कानात कसला तरी घणघण आवाज ऐकू येत होता; पण ते बसून राहिले आणि गप्पा मारतच राहिले. आता कानात वाजणाऱ्या घंटेचा आवाज आणखीन वाढू लागला... तो सतत चालूच राहिला आणि आणखी मोठ्याने ऐकू येऊ लागला. त्याकडे दुर्लक्ष करण्यासाठी मी आणखी मुक्तपणे बोलत राहिलो; पण तो आवाज वाढत गेला आणि अखेर त्याकडे दुर्लक्ष करणं अशक्य झालं. तो आवाज माझ्या कानातून येत नव्हता हे माझ्या लक्षात आलं.

आता मी अगदी फिका पडलो होतो; पण मी अस्खलितपणे बोलत होतो आणि मोठ्या आवाजातही. तरीदेखील तो घंटेचा आवाज वाढतच होता आणि मी काय करू शकत होतो? तो एक दबलेला, हलका आणि क्षणार्धात संपणारा आवाज होता... अगदी कापसात गुंडाळून ठेवलेल्या घड्याळाचा यावा तसा तो आवाज होता. मी श्वास घ्यायला क्षणभर थांबलो आणि त्या पोलीस अधिकाऱ्यांनी तो अजून ऐकला नव्हता. मी अधिक वेगानं बोलू लागलो... अधिक ठासूनपणे बोलत राहिलो; पण तो गोंगाट हळूहळू वाढतच होता. मी उभा राहिलो आणि पुडिंग कसं बनवावं याबद्दल वाद घालू लागलो. मोठ्या आवाजात आणि अगदी जोरजोरानं हातवारे करून मी ते त्यांना सांगू लागलो; पण तो गोंगाट हळूहळू वाढतच होता. ते अजून इथेच का आहेत? मी आता तिथल्या फ्लोअरिंगवर वेगानं येरझाऱ्या घालू लागलो. आणि त्या लोकांच्या निरीक्षणामुळे मी उत्तेजित झालो आहे, असं मी दाखवत होतो; पण तो गोंगाट हळूहळू वाढतच होता. अरे देवा! आता मी काय करू शकतो? मी उत्तेजित झालो. मी मोठमोठ्याने बोलू लागलो. मी अगदी शपथादेखील घेतल्या. ज्या खुर्चीवर मी बसलो होतो, ती मी उचलून फेकून दिली आणि ती तिथल्या फळ्यांवर आपटली. तरीदेखील तो आवाज सगळीकडे येतच होता आणि वाढतच होता. तो मोठ्यानं येऊ लागला. मोठ्यानं... मोठ्यानं! आणि तरीदेखील ते लोक मजेत गप्पा मारतच होते आणि हसत होते. त्यांनी तो आवाज ऐकला अशी शक्यता होती का? परमेश्वरा! नाही, नाही! त्यांनी तो ऐकला होता... त्यांना संशय आला होता... त्यांना माहीत होतं... ते माझ्या भीतीची थट्टा करत होते... मी तसा विचार केला; पण या त्रासापेक्षा काहीही बरं होतं आणि त्यांच्या या क्रूर थट्टेपेक्षा दुसरं काहीही मला चाललं असतं! आता मी त्यांचं ते तुच्छतादर्शक हसू आणखी सहन करू शकत नव्हतो. मला आता जोरात किंचाळावंसं वाटत होतं किंवा मरावंसं वाटतं होतं! आणि आता पुन्हा... ऐका... तो आवाज... मोठ्यानं... मोठ्यानं...मोठ्यानं...मोठ्यानं!

'दुष्टांनो!' मी किंचाळलो, 'लपवाछपवी आता पुरे झाली! मी कबुली देतो! इथल्या फळ्या काढा! इथे, इथे! इथेच त्या घाणेरड्या हृदयाची धडधड ऐकू येत आहे.

sushrutkulkarni@gmail.com

❖

मूळ कथा : द रेड सिल्क स्कार्फ

मूळ लेखक : मॉरिस लब्लांक

अनुवाद : वर्षा वेलणकर

लाल मखमली स्कार्फ

ठरल्याप्रमाणे एके दिवशी सकाळी न्यायालयात जायला निघालेल्या मुख्य पोलीस निरीक्षक गनिमार्डची उत्सुकता लगतच्या रू परगोलेसवरून जाणाऱ्या त्या व्यक्तीच्या हालचाली पाहून जागृत झाली. डिसेंबरचा पहिला दिवस असूनही, या माणसाने स्ट्रॉ हॅट घातली होती आणि त्याचे कपडे अगदीच ओंगळ होते. शिवाय प्रत्येक तीस-चाळीस यार्डावर तो काही ना काही कारणाने थांबून, एकतर वाकून बुटाच्या लेस बांधत होता, किंवा काठी सावरीत होता. आणि असे करताना तो प्रत्येक वेळी खिशातून संत्र्याची साल काढून अगदी काळजीपूर्वक रस्त्याच्या कडेला ठेवत होता. यातून त्याचा विक्षिप्तपणा तेवढा प्रदर्शित होत होता किंवा बालिशपणा दाखवण्याचाही तो प्रयत्न होता, ज्याकडे कदाचित कुणी लक्षही दिलं नसतं; पण ज्याच्या नजरेस पडणारी कुठलीही गोष्ट साधारण असूच शकत नाही किंवा जे एखाद्या रहस्यमय भासणाऱ्या गोष्टीचा छडा लावल्याखेरीज समाधानी होऊ शकत नाही, अशा गनिमार्डसारख्या चाणाक्ष व चतुर इन्स्पेक्टरसाठी या दृश्याकडे दुर्लक्ष करणं शक्यच नव्हतं. त्यामुळेच तो त्या माणसाचा पाठलाग करू लागला.

आता, ती व्यक्ती ज्या क्षणी अव्हेन्यू द ल ग्रांदे-आर्मीच्या दिशेने उजवीकडे वळू लागली, तेव्हा एका बारा-तेरा वर्षांच्या मुलाशी खाणाखुणा करत बोलत असल्याचे इन्स्पेक्टरच्या लक्षात आले. रस्त्यालगतच्या घरांना लागून तो डाव्या बाजूने चालला होता. वीस यार्डांनंतर, अचानक ती व्यक्ती पुन्हा एकदा खाली झुकली आणि पॅन्टची खालची बाजू त्याने वर करून त्याला घडी घातली. त्या जागी लगेच मग संत्र्यांच्या सालीची खूण तयार झाली.

याच वेळी तो मुलगाही क्षणभर थबकला आणि खडूच्या तुकड्याने त्याने लगतच्या घराच्या भिंतीवर एक पांढरं क्रॉसचं चिन्ह काढून त्याला वर्तुळ काढलं. हे करून ते दोघेही पुढे चालू लागले. मिनिटभराने दोघांनी पुन्हा एकदा विश्रांती घेतली. त्या संशयास्पद व्यक्तीने वाकून रस्त्यावरून एक पिन उचलली आणि त्या जागी संत्र्याची साल टाकून खूण निर्माण केली. तिकडे त्या लहानग्याने पुन्हा जवळच्या घराच्या भिंतीवर क्रॉस काढून त्याभोवती एक वर्तुळ काढलं.

''अरे देवा,'' एक सुस्कारा टाकीत इन्स्पेक्टर उद्‌गारला, ''हे जरा अजबच दिसतंय... हे दोघं कसला कट रचत आहेत?''

ते दोघंही मग अव्हेन्यू फ्राईडलॅन्डहून पुढे रू द्यू फॅबोर्ग-सेंट-ऑनरेच्या दिशेने निघून गेले; मात्र वाटेत, ज्याचा उल्लेख व्हावा, असे काहीही महत्त्वपूर्ण घडले नाही. जे ते करत चालले होते, त्याची पुनरावृत्ती मात्र थोड्या थोड्या अंतरावर, अगदी यांत्रिकरीत्या होताना दिसत होती. हे मात्र निश्चित होतं, की एकीकडे तो संत्र्याच्या साली टाकणारा माणूस, ज्या घरावर खूण करायची आहे त्याकडे एक कटाक्ष टाकल्यावाचून आपले काम करत नव्हता आणि त्याच वेळी तो लहानगाही जिथे रस्त्यावर खूण केली जाणार ती जागा आणि त्याच्या साथीदाराची हालचाल हेरल्याशिवाय त्या विशिष्ट घरावर खूण करत नव्हता. त्या दोघांमध्ये एक करार झाला आहे, एवढे मात्र नक्की होते आणि म्हणूनच इन्स्पेक्टरच्या नजरेतील औत्सुक्य आता जास्त वाढले होते.

प्लेस ब्युव्हूला मात्र ती व्यक्ती थबकली. क्षणभराने विचार पक्का करीत, तो खाली वाकला आणि दोनदा त्याने पॅन्टची घडी करून ती पुन्हा सरळ केली. त्याच वेळी तो लहानगा, मिनिस्ट्री ऑफ द इंटेरियर बाहेर एका परेड करणाऱ्या सैनिकाला पाहत कडेला बसला आणि ध्वजस्तंभावर दोन क्रॉस, दोन वर्तुळांत त्याने काढले. हाच प्रकार, ते दोघेही एलिसीला पोचेपर्यंत चालला होता. फक्त राष्ट्राध्यक्षांचा शिपाई जिथे परेड करत होता त्या जागी मात्र दोनऐवजी तीन खुणा करण्यात आल्या.

''एक मिनिट!'' विचार करकरून आणि आश्चर्याने थकव्या आल्यागत हळुवार आवाजात गनिमार्ड स्वतःशीच उद्‌गारला. त्याच क्षणी त्याच्या कट्टर शत्रूचे ल्युपिनचे नावही त्याच्या डोक्यात आले; कारण अशा कुठल्याही रहस्यमय प्रसंगी त्याला ल्युपिनचे ध्यान मनात येई.

'या साऱ्याचा अर्थ तरी काय?'

तो आता त्या दोघांपासून अगदी काही अंतरावर होता आणि त्यांना गाठून प्रश्नांची सरबत्ती करण्यास त्याने सुरवातच केली असती; पण अशी मोठी चूक करण्याइतका तो बावळट नक्कीच नव्हता. आतापर्यंत त्या संत्र्याच्या सालीवाल्या माणसाने सिगारेट पेटवली होती आणि तो लहानगाही आपल्या ओठांमध्ये सिगारेट ठेवून, ती पेटवण्याच्या बहाण्याने त्या माणसाकडे झेपावला होता.

दोघंही काहीतरी बोलले. लगेच दुसऱ्या क्षणी त्या मुलाने आपल्या सहकाऱ्याला एक वस्तू दिली आणि ती पाहिल्यावर इन्स्पेक्टरची अगदी खात्री पटली, की ते पिस्तूल आहे. ते दोघेही त्या वस्तूवर झुकून त्याचे निरीक्षण करू लागले आणि नंतर ती मोठी व्यक्ती भिंतीकडे तोंड करून उभी असताना आपल्या खिशात हात घालून तिने सहा वेळा अशी काही हातांची हालचाल केली, की जणू तो पिस्तूल भरत होता.

ही सारी कृती झाल्यावर ते दोघेही लगबगीने रू दी स्युरेनकडे गेले आणि त्यांना कळणार नाही इतक्या अंतरावरून त्यांच्या मागावर असणाऱ्या इन्स्पेक्टरने त्यांना एका जुनाट घराच्या फाटकातून आत जाताना पाहिले. या घराची सर्व दारं-खिडक्या बंद होती. फक्त तिसऱ्या किंवा सर्वांत वरच्या मजल्याच्या खिडक्यांची तावदानं तेवढी याला अपवाद होती.

त्यांच्या पाठोपाठ तोही लगबगीने आत शिरला. गाडी जाणाऱ्या फाटकाच्या अगदी शेवटाला त्याला एक मोठं अंगण दिसलं, जिथे मागे रंगाऱ्याचा साइन बोर्ड होता आणि डाव्या बाजूला पायऱ्या दिसत होत्या. तो पायऱ्या चढून वर गेला आणि पहिल्या माळयावर पोचताच त्याने अक्षरशः धावायला सुरवात केली; कारण वरच्या मजल्यावरून आता मारामारीचे जोरदार आवाज यायला सुरवात झाली होती. शेवटच्या पायरीवर आला तेव्हा त्याला दार सताड उघडं असलेलं दिसलं. तो आत शिरला आणि क्षणभर त्यानं कानोसा घेतला. मारामारीचा आवाज ज्या दिशेनं येत होता, त्या खोलीकडे तो गेला आणि अगदी सावधगिरी बाळगत तो तिच्या कडेशी उभा राहिला. श्वास जणू थांबला होता त्याचा आणि तशाच क्षणी त्याने आत डोकावून पाहिले तर तो संत्र्याच्या सालीवाला माणूस व तो लहानगा हातातील खुर्च्यांनी जमीन ठोकत होते. अगदी त्याच क्षणी एक तिसरी व्यक्ती बाजूच्या खोलीतून बाहेर आली. साधारण अठ्ठावीस-तीस वर्षांचा तो एक तरुण होता, ज्याला मिश्या होत्या आणि कल्लेदेखील. त्याने चष्मा लावला होता आणि त्याच्या अंगावर फरची कॉलर असलेलं स्मोकिंग जाकीट होतं, ज्यामुळे तो कुणीतरी परदेशी, म्हणजे रशियन व्यक्तीसारखा दिसत होता.

''गुड मॉर्निंग गनिमार्ड,'' तो उद्‌गारला. मग त्या दोन सहकाऱ्यांकडे वळत म्हणाला, ''धन्यवाद मित्रांनो आणि अपेक्षित परिणाम साधल्याबद्दल अभिनंदन! ठरविल्याप्रमाणे हे घ्या तुमचं बक्षीस.'' त्यांच्या हातात एक शंभर फ्रँकची नोट कोंबत त्याने त्यांना अक्षरशः बाहेर ढकलले आणि दोन्ही दारे लावून घेतली.

''मला माफ कर मित्रा,'' गनिमार्डकडे वळत तो बोलला. ''मला तुझ्याशी बोलायचं होतं...म्हणजे अगदी बोलायचंच होतं.''

इन्स्पेक्टर अजूनही या साऱ्या धक्क्यातून सावरलेला नाही आणि त्याचा चेहरा रागाने थरथरतो आहे हे पाहून, हस्तांदोलनासाठी त्याच्यापुढे हात करत तो म्हणाला, ''तुला हे समजत का नाही! ... आणि आता तर हे अगदी स्पष्ट आहे... मला फक्त तुलाच भेटायचं होतं ... मग मी आणखी काय करू शकत होतो?'' आणि मग त्याच्या प्रतिवादाला उत्तर देण्याच्या आविर्भावात तो पुढे उद्‌गारला, ''नाही, नाही मित्रा. तू चुकतो आहेस. मी जर का तुला पत्र लिहिलं असतं किंवा तुला तार पाठवली असती तरी तू आला नसतास... किंवा तू आपला सगळा फौजफाटा घेऊन आला असतास; पण मला तुला एकट्याला भेटायचं होतं आणि मग मला जे सुचलं ते त्या दोन सभ्य व्यक्तींना तुझ्याकडे भेटायला पाठवायचं; माझ्यापर्यंत येणाऱ्या तुझ्या या मार्गावर काही संत्र्याच्या साली टाकायच्या आणि काही ठिकाणी विशिष्ट खुणा करायच्या... पण तू असा आश्चर्यचकित झाल्यागत का दिसतो आहेस! हे सारं काय आहे? कदाचित तू मला अजून ओळखलेलं नाहीस? ल्युपिन... आरसेन ल्युपिन ... जरा आपल्या स्मरणशक्तीवर जोर दे ... हे नाव ऐकून तुला काही आठवतं का बघ!''

''तू... नालायक माणसा!'' दात-ओठ खात गनिमार्ड ओरडला.

ल्युपिन अगदी शांत होता आणि मृदू आवाजात बोलला, ''तू संतापला आहेस का? हो, ते तर तुझ्या नजरेतच दिसतंय ... मला वाटतं त्या डगरायव्हल प्रकरणामुळे? मला तुझ्या येण्याची वाट पाहायला हवी होती, म्हणजे मग तू मला अटक करू शकला असतास; मात्र असा कुठलाही विचार माझ्या मनाला शिवलादेखील नाही! पण मी वचन देतो तुला, पुढल्या वेळी मी नक्की हा विचार करणार...''

''तू...हलकट माणसा...'' गनिमार्ड पुन्हा एकदा गुरगुरला.

''आणि मी इथे विचार करतोय, की मला तुला भेटायचंय आणि मी तुला भेटलोही! मी तर स्वतःलाच सांगत होतो जणू, 'तो आपला जुना मित्र गनिमार्ड! किती काळ झाला, आपली त्याची भेट नाही! तो तर अगदी मला पाहता क्षणी माझ्याकडे धाव घेईल!''

त्या क्षणापर्यंत गनिमार्डने आपले साधे बोटसुद्धा हलवले नव्हते; पण आता मात्र तो हळूहळू जागृत होऊ लागला. त्याने सभोवताली एक नजर

टाकली; एक कटाक्ष ल्युपिनकडे टाकला आणि आपण जर आता याच्यावर चाल करून गेलो तर आपल्याला जमेल की नाही, हा विचार करत त्याने स्वतःवर नियंत्रण मिळविले. सत्य परिस्थितीची जाणीव होऊन त्याने एका खुर्चीचा आधार घेतला आणि त्यात बसकण मारली. जणू काही आपल्या शत्रूचे म्हणणे ऐकून घेण्याची मनाची तयारीच त्याने केली होती.

''बोल,'' तो उद्‌गारला. ''आणि आणखी एक गोष्ट, काहीतरी मूर्खासारखं बरळून माझा वेळ अजिबात वाया घालवू नकोस. मी फार घाईत आहे.''

''अगदी ठरलं,'' ल्युपिन म्हणाला, ''चल, बोलायला सुरवात करू. आपल्या बोलण्यासाठी या ठिकाणाहून अधिक शांत जागेची तू कल्पनाही करू शकणार नाहीस. हे ठिकाण एखाद्या जुन्या हवेलीसारखं आहे आणि मुख्य गावापासून दूर आहे. ड्यूक द रोशेलॉर यांच्या मालकीचं आहे हे ठिकाण; पण ड्यूक कधी इथे वास्तव्यास नव्हते. त्यांनी ही जागा मला व बाहेरचं छोटेखानी आउटहाउस एका रंगारी व सजावटवाल्याला दिलंय. मी कायम अशा काही वास्तू माझ्या कामासाठी हेरून ठेवतो. योजनाबद्ध आहे असं करणं, नाही का? आणि मी जरी आता हा असा रशियन दिसत असलो तरी मुळात मी आहे माजी केंद्रीय मंत्री एम. डॉब्रॉईल... कळलं तुला? कुणाचंही लक्ष माझ्याकडे आकर्षित होऊ नये म्हणून मला काहीतरी अनोखं आणि महत्त्वाचं कार्यक्षेत्र निवडणं आवश्यक होतं.''

''तुला खरंच वाटतंय की तुझ्या या सगळ्या बरळण्याचं मला काही महत्त्व वाटतंय म्हणून?'' गनिमार्डनं त्याला बोलता बोलता थांबवलं.

''अगदी बरोबर, तू घाईत आहेस आणि मी बोलून वेळ वाया घालवतो आहे. माफ कर मला, आता आणखी वेळ नाही घेणार ... पाच मिनिटं आणि बस! आता सांगतोच एका झटक्यात. सिगार घेणार? नाही? छान! मी पण नाही घेणार.''

तोदेखील आता बसला आणि विचार करून बोलायला सुरवात करताना त्यानं बोटांनी टेबलावर ताल धरला.

''एका उबदार आणि चकचकीत शरदीय दिवशी म्हणजे १७ ऑक्टोबर, १५९९ ला... तुला कळतंय ना? ... पण आता पुन्हा एकदा विचार करताना मला वाटतं, की खरंच हेन्री चारच्या राज्यकाळाचा आढावा घेण्याची व पॉन्ट-नॉफची घडण कशी झाली, हे सांगण्याची गरज आहे? नाही, मला त्याची गरज वाटत नाही; कारण फ्रान्सच्या इतिहासाची तुला तरी नीट माहिती आहे आणि मी त्यात ढवळाढवळ करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे तुझ्यासाठी फक्त इतकं जाणून घेणं पुरेसं आहे, की काल मध्यरात्रीनंतर पहाटे सुमारे एक वाजता एक नावाडी नदीच्या डाव्या किनाऱ्याकडून, वर संदर्भ आलेल्या पॉन्ट-नॉफच्या शेवटच्या कमानीतून जात असताना त्याला कसलातरी आवाज आला. जणू काहीतरी धाडकन् येऊन त्याच्या बोटीच्या समोरच्या भागात पडलं. ती वस्तू पुलावरून सेईनच्या पाण्यात वाहून जावी, या उद्देशाने भिरकावण्यात आली होती. क्षणात त्या नावाड्याचा कुत्रा त्या दिशेनं झेपावला आणि भुंकू लागला. त्याच्या मागे मागे गेल्यावर नावाड्याला दिसलं की कुत्रा तोंडात एक वर्तमानपत्रांचं भेंडोळं घेऊन बसला आहे, ज्यात अनेक गोष्टी एकत्र गुंडाळण्यात आल्या आहेत. ज्या गोष्टी नदीत फेकल्या गेल्या नव्हत्या, अशा काही गोष्टी त्यानं गोळा केल्या आणि आपल्या बोटीच्या केबिनमध्ये जाऊन तो त्यांचं निरीक्षण करू लागला. याच त्या सगळया वस्तू,'' असं म्हणत त्यानं टेबलावर त्या पसरवलेल्या वस्तूंकडे बोट केलं. त्यात सर्वप्रथम एक फाटकंतुटकं वर्तमानपत्र होतं. मग काचेची एक दौत होती, जिच्या तोंडाला एक मोठी दोरी बांधली होती. शेवटी काही काचेचे तुकडे होते आणि एक लवचीक कार्डबोर्ड होता, ज्याचे आता कपटे झाले होते. आणि अगदी शेवटी तिथे पुरचुंडी केलेला लालचुटुक रंगाचा मलमली कापडाचा एक तुकडा होता.

''तर माझ्या जुन्या जिवलग मित्रा, पाहिल्यास तू या साऱ्या वस्तू?'' ल्युपिन म्हणाला. ''यात मला काहीही शंका नाही, की त्या कुत्र्याच्या उतावळेपणामुळे ज्या गोष्टी नदीत वाहून गेल्या त्या जर आता या क्षणी आपल्याकडे असत्या, तर हे प्रकरण जरा सहजच निकालात निघालं असतं; पण मला वाटतं की हातात असलेल्या या सगळ्यावरच जर काळजीपूर्वक आणि डोकं लढवून विचार केला तर आपण काहीतरी निष्कर्ष काढूच. आणि तेचं तर तुझं वैशिष्ट्य आहे. मग काय म्हणतोस तू? कसा वाटला माझा हा प्रस्ताव?''

गनिमार्ड स्तब्ध होता. एका झटक्यात ल्युपिनच्या त्या मस्करीला उत्तर देण्याची त्याची इच्छा होती; पण त्याची सभ्यता त्याला असे करण्यापासून रोखत होती. त्या सगळ्यावर एकही शब्द बोलण्याची किंवा साधी प्रतिक्रिया देण्याचीही त्याची इच्छा झाली नाही.

''मला वाटतं आपल्या दोघांचंही याबाबत एकमत झालं आहे,'' इन्स्पेक्टरच्या मौनाचा अर्थ लावत ल्युपिन उद्‌गारला. ''आणि आता आपल्या हाती असलेल्या पुराव्यांच्या आधारे मी या सगळ्या प्रकरणाचा अंत करतो. काल संध्याकाळा नऊ ते बाराच्या दरम्यान, एका झकास कपडे केलेल्या स्त्रीला सुऱ्याने जखमी करून आणि नंतर तिचा गळा दाबून एका सभ्य गृहस्थाने खून केला. त्या व्यक्तीने काचेचा चष्मा लावला होता आणि तो घोड्यांच्या शर्यतीत रुची असणारा होता. वर संदर्भ आलेली ती झकास कपडे केलेली स्त्री या सभ्य गृहस्थाबरोबर बसून, तीन मरॅन्ग आणि एक कॉफी एक्लेअर खात बसली होती.''

गनिमार्डची फिरकी घेत ल्युपिनने सिगारेट शिलगावली.

''ओह! हे सारं तुझ्या अपेक्षेच्या विरुद्ध आहे नाही का इन्स्पेक्टर! तुला वाटलं, की जे पोलिसी निष्कर्षांच्या अखत्यारीत येतं, ते हे असं अतुलनीय काही काम बाहेरच्या लोकांच्या हाती लागता कामा नये! चुकता आहात सर तुम्ही. एखाद्या कांदबरीतील हेरगिरीला साजेसे असे साऱ्या जगभरातील पुरावे आणि निष्कर्षांसोबत ल्युपिनचा खेळ कायम चाललेला असतो. माझ्याकडे असलेले पुरावे अत्यंत आकर्षक आणि अगदी सोपे आहेत.''

आणि स्वतःच्या वक्तव्याला दुजोरा देण्यासाठी त्याने समोर ठेवलेल्या सगळ्या वस्तूंकडे इशारा करत आपलं बोलणं पुढे नेलं,

''मी म्हणालो की काल रात्री नऊनंतर- हा जो रद्दी पेपर आहे त्यावर

कालची तारीख आहे आणि 'संध्याकालीन आवृत्ती' असं त्यावर नमूद केलेलं आहे. आता इथे तुला दिसेल की या पेपरवर इथं हे पिवळं वेष्टण आहे, यात फक्त ज्यानं पेपरची प्रत आरक्षित केली आहे, त्याला पेपर पाठवला जातो. आणि अशा विशिष्ट प्रती नवाच्या डाकेनंच येतात. म्हणजे घटना घडली ती नऊनंतर. त्यानंतर मी म्हणालो, एक नीटनेटके कपडे घातलेली व्यक्ती होती ती. आता कृपया या काचेच्या गोल तुकड्याकडे नीट निरखून पाहा. हा फक्त एका काचेच्या चष्म्याचा एक गोलाकार भाग आहे आणि असे फक्त एका काचेचे चष्मे हे उच्चभ्रू लोकांची निशाणी असतात. हा नीटनेटके कपडे केलेला, उच्चभ्रू दिसणारा माणूस एका पेस्ट्रीच्या दुकानात शिरला. हा पाहा हा कार्डबोर्डचा पातळ तुकडा, ज्याचा आकार डब्यासारखा आहे आणि यावर अजूनही मरॅन्ग व एक्लेअरचं थोडं क्रीम लागलेलं आहे. या दोन्ही वस्तू यात ठेवण्यात आल्या होत्या. हे पार्सल घेऊन ही एका काचेचा चष्मा लावलेली व्यक्ती एका तरुण व्यक्तीला भेटली, जिचं कपड्यांसंदर्भातील वागणं हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण होतं आणि ते या लाल मखमली स्कार्फवरून स्पष्ट होतं. तिला भेटल्यानंतर, का कुणास ठाऊक; पण त्यानं आधी तिला चाकूनं भोसकलं आणि नंतर याच स्कार्फचा वापर करून घुसमटून तिचा जीव घेतला. तुझं भिंग काढून बघ एकदा इन्स्पेक्टर, तुला त्या मलमली स्कार्फवर थोड्या गडद लाल रंगाचे डाग दिसतील, रक्ताने माखलेला चाकू पुसल्याचे. रक्ताळलेल्या हातानं हा स्कार्फ धरल्यामुळे ते त्यावर उमटले आहेत. एकदा खून केल्यानंतर, कुठलाही पुरावा तिथे शिल्लक न ठेवणं, हा त्याचा नंतरचा उद्देश होता. म्हणून त्यानं खिशातून प्रथम त्याची राखीव वर्तमानपत्राची ही प्रत काढली, ज्याच्या बातम्यांवर जर काळजीपूर्वक नजर टाकली तर घोड्यांच्या शर्यतींची माहिती पुरवणारं वर्तमानपत्र आहे ते आणि त्याचं नाव तू सहज ओळखू शकशील. दुसरं, ही दोरी आणि तिचंही नीट निरीक्षण केलं तर तिच्या लांबीवरून तो लगाम आहे, हे क्षणात कळेल. या दोन्ही पुराव्यांवरून सिद्ध होतं की या व्यक्तीला घोड्यांच्या शर्यतीत आणि स्वतः घोडा चालवण्यातही रस आहे. नंतर या झटापटीत ज्याची दोरी तुटली त्या चष्म्याच्या काचांचे तुकडे त्यानं गोळा केले. मग एक कात्री घेऊन त्यानं या स्कार्फचा डागाळलेला भाग कापून घेतला. हे पाहा, या इथे कापड कापल्याचं दिसत आहे. अर्थात खून झालेल्या व्यक्तीच्या मुठीत घट्ट धरला गेलेला भाग त्याला तसाच सोडावा लागला. बेकरीमधून मिळालेल्या डब्याचा भाग त्यानं गोळा केला. मग ज्या वस्तूंमुळे त्याला धोका संभवत होता, त्या सगळ्या त्यानं गोळा केल्या. जसे की तो चाकू, जो कदाचित इतर वस्तू सायेन नदीत फेकताना पाण्यात पडला असावा. या सगळया वस्तू वर्तमानपत्रात एकत्र गुंडाळून त्यानं त्या लगामानं बांधल्या आणि ही जी दौत आहे ना ती त्या पुडक्याला वजनदार करण्यासाठी त्याबरोबर बांधून टाकली. मग तो तिथून गायब झाला. थोड्या वेळानं हे पुडकं त्या नावाड्याच्या नावेत येऊन पडलं. ओह! काय जबरदस्त कामगिरी आहे ही, आहे की नाही? काय म्हणशील या सगळ्या प्रकरणाबाबत?''

आपल्या या सगळ्या कथाकथनाचा गनिमार्डवर काय परिणाम झाला, हे पाहण्यासाठी तो त्याला निरखू लागला; पण आपलं मौन गनिमार्डनं सोडलं नाही. आता ल्युपिननं हसायला सुरवात केली.

''सत्य सांगायचं तर तू संतापला आहेस आणि आश्चर्यचकितदेखील झाला आहेस, की हा कुटिल ल्युपिन आपल्या हातचं काम मला का देऊ करतोय? या प्रकरणात जर का लूट झाल्याची शक्यता असेल, तर त्या खुन्याचा स्वतः शोध घेऊन लूट आपल्या खिशात घालणं, हे हा स्वतः का करत नाहीए? तसा तुझा हा प्रश्न तार्किक आहे अगदी; पण त्यात एक 'पण' आहे. तू पाहतोच आहेस की माझ्याकडे वेळ नाही. या क्षणाला मला भरपूर काम आहे. लंडनमध्ये एक दरोडा आणि एक लौसान्नेमध्ये. शिवाय मार्सेलिसमध्ये मुलांची तस्करी आहेच. याव्यतिरिक्त मृत्यूच्या सावटाखाली जगणाऱ्या एका मुलीचा जीव मला वाचवायचा आहे. कधी असं थोडंथोडकं नसतंच माझ्या बाबतीत. इथे कामाचा म्हणजे धो धो पाऊसच असतो. म्हणून मग मी विचार केला, की जर माझं हे एक काम मी माझ्या प्रिय जुन्या मित्राला, गनिमार्डला, सोपवलं तर? तसंही अर्धं प्रकरण सोडवून झालंच आहे. उर्वरित गोष्टींचा छडा लावायला तो सक्षम आहेच! आणि असं करून मी त्याला किती मदत करणार! स्वतःला किती अप्रतिमरीत्या तो सिद्ध करू शकणार, नाही का? मग चांगल्या कामात देरी कशाला? मी अगदी सकाळी आठ वाजता लगेच ठरवलं आणि त्या दोन जोकर्सना संत्र्यांच्या साली घेऊन तुझ्याकडे पाठवलं. माझ्या चकव्यात तू अचूक फसलास आणि अगदी नवाच्या आत तू इथे पोचलास.'' आता ल्युपिन खुर्चीतून उठला आणि इन्स्पेक्टरकडे चालत गेला.

''बस्स्, इतकंच. आता तुला मी पूर्ण कहाणी सांगितली आहे. तुला त्या बळी पडलेल्या युवतीबद्दलही कळेल, की ती कदाचित एक बॅले डान्सर होती किंवा कुठल्याशा म्युझिक हॉलमध्ये गाणारी गायिका. तो जो खुनी आहे तो पॉन्ट-नॉफच्या जवळपास राहत असावा. कदाचित डाव्या किनाऱ्याकडे. हे घे, हे सगळे पुरावे मी तुला सोपवतो. तुला माझ्याकडून भेट समज. कामाला लाग. मी फक्त स्कार्फचा हा तुकडा तेवढा माझ्याकडे ठेवणार आहे. जर तुला हा तुकडा हवा असेल, तर मात्र तुला आधी माझ्यासाठी तो स्कार्फचा दुसरा भाग मिळवावा लागेल, जो त्या मृत स्त्रीच्या गळ्याभोवती आवळला गेल्याचं पोलिसांना आढळून येईल. तो मला आजच्या दिवसापासून येत्या चार आठवड्यांत, म्हणजे २९ डिसेंबरला सकाळी दहा वाजेपर्यंत आणून दे. मी तुला इथेच, या ठिकाणी भेटणार, एवढं नक्की. आणि हे बघ, अजिबात मनाची चलबिचल होऊ देऊ नकोस. हे जे काही आहे ते अगदी सगळं गंभीर प्रकरण आहे, मित्रा! अगदी शपथेवर सांगतो. कुठलीही लांडीलबाडी नाही की कुठला प्रतिष्ठेचा खेळ नाही. तू अगदी बिनधास्त कामाला लाग. आणि हो, तू जेव्हा त्या चष्मेवाल्याला अटक करशील ना तेव्हा जरा जपून बरं का. तो डावखुरा आहे. चल, गुड बाय दोस्ता! आणि तुला खूप शुभेच्छा!''

ल्युपिननं टाचेवर फिरत एक गिरकी घेतली आणि तो दाराकडे गेला व क्षणात नाहीसा झाला. गनिमार्डनं काही निर्णय घेऊन कृती करण्यापूर्वीच तो दिसेनासा झाला होता. इन्स्पेक्टरनं त्याच्याकडे धाव घेतली; पण कसे काय त्यालाही कळले नाही; पण त्या दाराचे बोल्ट

वाचकांशी उच्च भावनिक कलात्मक संवाद साधणारं

रणजित देसाई यांचं लेखन...

स्वामी

श्रीमान योगी

राधेय

पावनखिंड

राजा रवि वर्मा

अभोगी

लक्ष्यवेध

प्रपात

मोरपंखी सावल्या

बाबुलमोरा

गंधाली

माझा गाव

वैशाख

समिधा

सर्व पुस्तके eBooks स्वरूपात उपलब्ध

नवं कोरं

पुस्तकाच्या कॅनव्हासवर
गुलज़ार सिनेकथा...
१९ तरल भावस्पर्शी पटकथांचा
संमोहित करणारा साहित्यपट...

गुलज़ार पटकथा

गुलज़ार

अनुवाद
अंबरीश मिश्र
सविता दामले
वसंत पाटील

एकत्रित ६ पुस्तकांच्या
संचाची किंमत
रु.१४९५/-

Book Available













हुतूतू/लिबास/माचिस/मीरा/अंगूर/न्यू देहली टाइम्स/आँधी/अचानक/किताब/
मौसम/किनारा/नमकिन/लेकिन/मेरे अपने/परिचय/कोशिश/खुशबू/मासूम/इज़ाजत

उघडले नाहीत. त्याचे स्क्रू काढून ते दार व पुढच्या हॉलचे दार उघडण्यात प्रत्येकी दहा मिनिटं गेली. शिवाय तिसऱ्या मजल्यावरून खाली पोचेपर्यंत आरसेन ल्युपिनला गाठण्याच्या गनिमार्डच्या सर्व आशा मावळल्या होत्या. तो त्या क्षणी त्याचा विचारही करत नव्हता. ल्युपिननं त्याला एक प्रकारे प्रोत्साहित केलं होतं. एक अशी विचित्र जाणीव त्याच्या मनात रुजवली होती, ज्यात भय होतं, तिरस्कार होता, एक अनाहूत अशी प्रशंसा पण होती आणि आपण कितीही काही केले तरी आपल्या या हितशत्रूला आपण कधीच गाठू शकणार नाही, हा भावही होता. एक कर्तव्यदक्ष व्यक्ती म्हणून त्यानं त्याचा पाठलाग केला होता; पण त्याच्यासारख्या कारस्थानी माणसामुळे आपण पुन्हा एकदा तोंडघशी पडणार की काय, ही भीतीदेखील त्याच्या मनात होती. हे जे काही लाल मलमली स्कार्फचे प्रकरण होतं, ते त्याला सर्वाधिक संशयास्पद वाटू लागलं होतं.

विविध अंगांनी पाहिलं तरी हे प्रकरण खूप रोचक होतं, यात शंकाच नव्हती; पण त्यात विविध शक्यतांना खूप वाव होता आणि ल्युपिनचं तर्कशुद्ध स्पष्टीकरण असं होतं, की त्याला कुणी धारेवर धरू शकणार नव्हतं.

'काही नाही,' तो उद्‌गारला, 'हे सारं काही फसवं आहे. निव्वळ काही शक्यता आणि अंदाजांचं भेंडोळं आहे- जे काल्पनिक आहे. अशा जाळ्यात अडकणारा मी नाही.'

आज जे काही झालं ते घडलंच नाही, अशी आपल्या मनाची समजूत घालत तो ३६ क्वा द ऑर्फव्हरेस येथील पोलीस मुख्यालयात पोचला तो थेट गुन्हे अन्वेषण विभागातच गेला. तिथे गेल्या गेल्या त्याच्या सहकाऱ्यानं विचारलं,

''चीफना भेटलास का?''

''नाही.''

''ते आताच तुला विचारत होते.''

''ओह, खरंच?''

''तू लगेच त्यांना भेटायला जा.''

''कुठे?''

''रू दे बर्नीला...काल तिथे रात्री एक हत्या झाली आहे.''

''अरे, हो का! आणि मृतक कोण आहे?''

''मला निश्चित काही ठाऊक नाही... पण कुणी म्युझिक हॉलमध्ये गाणारी बाई आहे, बहुधा.''

''अरे देवा!'' गनिमार्ड फक्त पुटपुटला.

अगदी वीस मिनिटांतच तो भूमिगत रेल्वे स्टेशनमध्ये उतरला आणि रू दे बर्नीच्या दिशेनं चालू लागला.

हत्या झालेल्या स्त्रीला नाट्य क्षेत्रात तिच्या कला क्षेत्रातील नामाभिधानानं म्हणजे जेनी सॅफिर म्हणून ओळखलं जात होतं आणि एका घराच्या दुसऱ्या मजल्यावर एका फ्लॅटमध्ये ती वास्तव्यास होती. एका शिपायानं इन्स्पेक्टरला वर जाण्यासाठीचा मार्ग दाखवला. तिथं दोन बैठकीच्या खोल्या आणि एक बेडरूम होती. बेडरूममध्ये त्याला तपास यंत्रणा मुख्याधिकारी आणि विभागीय शल्यचिकित्सक यांच्यासह हेरगिरी विभागाचे मुख्य अधिकारी एम. डुडॉईस भेटले.

खोलीत शिरल्या शिरल्या गनिमार्डची नजर गोष्टी टिपू लागली. एका सोफ्यावर ती मृत स्त्री त्याला दिसली आणि तिच्या हातात त्या लाल मलमली स्कार्फचा तुकडा करकचून धरलेला होता. तिच्या एका खांद्यावरून घसरलेल्या तिच्या कपड्याच्या खाली दोन रक्त गोठलेले घाव दिसत होते. तिच्या वेड्यावाकड्या झालेल्या आणि काळवंडलेल्या चेहऱ्यावर अजूनही भीतीचं सावट होतं.

आपलं निरीक्षण संपवल्यानंतर विभागीय शल्यचिकित्सक बोलू लागले, ''माझे निष्कर्ष अगदी स्पष्ट आहेत. मृतावर आधी चाकूचे दोन वार करण्यात आले आणि नंतर तिचा गळा दाबून तिला मारण्यात आलं आहे. मृत्यू हा मुख्यतः घुसमटण्यानं झाला आहे.''

''अरे देवा!'' ल्युपिननं रंगवलेल्या चित्राचं वर्णन आठवून गनिमार्ड मनातल्या मनात उद्‌गारला.

पण वकिलांनी एक शंका उपस्थित केली- ''पण मानेवर आवळल्यानंतर होणाऱ्या खुणा नाहीत.''

''गळा कदाचित कुठल्यातरी नॅपकिन किंवा रुमालाने आवळला गेला असावा,'' डॉक्टर बोलले.

''कदाचित,'' मुख्य हेर बोलले, ''या मलमली स्कार्फनं जो तिनं अंगावर घेतला होता आणि त्याचा एक भाग अजूनही तिच्या दोन्ही हातांच्या मुठीत आहे- जणू स्वरक्षणासाठी तो तिनं घट्ट आवळून धरला होता.''

''पण मग हा एवढा एक तुकडाच कसा काय शिल्लक आहे?'' वकिलांनी प्रश्न उपस्थित केला. ''उर्वरित भाग कुठे आहे?''

''उर्वरित भागावर कदाचित रक्ताचे डाग पडले असावेत आणि म्हणून खुन्याने तो आपल्याबरोबर नेला असावा. कात्रीने घाईघाईने कापल्याचे हे निशाण इथे तुम्हाला ठळकपणे दिसेल.''

''अरे देवा!'' तिसऱ्यांदा गनिमार्ड तोंडातल्या तोंडात पुटपुटला. ''प्रत्यक्ष काहीही न पाहता त्या हरामखोर ल्युपिनला तर सारं काही ठाऊक आहे.''

''पण खुनाचं कारण काय असावं?'' वकिलानं विचारलं.

''कुलपं जबरदस्तीनं तोडण्यात आली आहेत आणि सगळ्या कपाटांची उलथापालथदेखील केली आहे. तुम्हाला आणखी काही सांगायचं आहे का एम. डुडॉएस?''

मुख्य हेर यावर उत्तरले, ''नोकराच्या उलट तपासणीच्या आधारावर मी कमीत कमी काही आडाखे बांधू शकतो. आपल्या गायन कलेपेक्षाही तिच्या देखणेपणामुळे मृत स्त्रीचा बराच रुतबा होता. ती दोन वर्षांपूर्वी रशियाला गेली होती व परतताना स्वतःबरोबर एक अत्यंत सुंदर नीलम घेऊन आली होती. तिथल्या कुठल्याशा न्यायालयाशी संबंधित महत्त्वाच्या व्यक्तीकडून तिला तो मिळाला होता. तेव्हापासून तिचं नावच जेनी सॅफिर म्हणून प्रसिद्ध झालं होतं आणि ती ते अत्यंत अभिमानानं मिरवित असे; पण सुरक्षिततेच्या हेतूनं तिनं तो नीलम कधी अंगावर घातला नाही. त्यामुळे मी अगदी ठामपणे म्हणू शकतो की हा खून त्या नीलममुळे झाला आहे, असा जर आपण निष्कर्ष काढला तर वावगं ठरणार नाही.''

''पण त्या मोलकरणीला ठाऊक होतं का, की तो दागिना कुठं ठेवलाय ते?''

''नाही, कुणालाच ठाऊक नाही. या खोलीची आणि सामानाची जी अवस्था करण्यात आली आहे, त्यावरून तर हेही सिद्ध होतं, की त्या खुन्यालाही त्या दागिन्याच्या ठिकाणाची माहिती नव्हती.''

''आपण त्या मोलकरणीची चौकशी करू या,'' वकील बोलले.

एम. डुडॉएस यांनी इन्स्पेक्टरला जरा बाजूला नेले आणि ते म्हणाले, ''तू जरा हरवल्यागत दिसतो आहेस, गनिमार्ड. काय झालंय? तुला काही वेगळे धागेदोरे गवसताहेत का?''

''नाही, काही नाही चीफ.''

''दुर्दैवी आहे मग हे. आपल्या विभागाला आता काहीतरी दिखाऊ काम करण्याची गरज आहे आणि हे प्रकरण आपण गेल्या काही दिवसांत सोडवू न शकलेल्या प्रकरणांमधील एक आहे. अजूनही आपण ज्याचा छडा लावू शकलेलो नाही; मात्र या वेळी आपल्याला अपराध्याला पकडणे आवश्यक आहे आणि तेही त्वरित!''

''जरा कठीण कामगिरी आहे चीफ.''

''पण ती पार पाडायलाच हवी. माझं नीट ऐक गनिमार्ड. त्या मोलकरणीनं जे काही सांगितलं त्यावरून कळतं की जेनी सॅफिरचं आयुष्य तसं सरळसोट होतं; पण गेल्या एक महिन्यापासून ती म्युझिक हॉलमधून परतल्यानंतर तिला भेटायला साधारण साडेदहाच्या सुमारास एक व्यक्ती येत असे, जी मध्यरात्रीपर्यंत इथे थांबत असे. ती एक सामाजिक व्यक्ती आहे आणि त्याला माझ्याशी लग्न करायचे आहे, असं जेनी सॅफिर सांगायची. आपल्याला कुणी ओळखू नये म्हणून ही व्यक्ती घरात येताना प्रचंड काळजी घेत असे. म्हणजे घरगड्यांच्या खोलीसमोरून येताना कधी कोटाची कॉलर वर घेऊन, तर कधी टोपी तिरकी तोंडावर आणून ती तिथून जात असे. आणि ती व्यक्ती येण्यापूर्वीच आपल्या मोलकरणीला जेनी सॅफिर घरी पाठवून देत असे. हाच तो माणूस आहे ज्याचा आपल्याला शोध घ्यायचा आहे.''

''त्याने काही पुरावे मागे सोडले आहेत का?''

''काहीही नाही. एका अत्यंत धूर्त आणि हुशार अपराध्याशी आपला सामना आहे, हे तर निश्चित; कारण त्यानं या सर्व गुन्ह्यांची अगदी व्यवस्थित पूर्वतयारी केली होती आणि यातून अगदी सहज सुटका कशी होईल, याची खबरदारीही घेतली होती. त्याची अटक ही आपल्यासाठी मानाचा तुरा खोवणारी ठरेल. तेव्हा मी तुझ्यावर भिस्त ठेवून आहे गनिमार्ड.''

''तुमची माझ्यावर भिस्त आहे चीफ?'' इन्स्पेक्टर उद्‌गारला. ''आपण काहीतरी करू... आपण नक्की काहीतरी करू ... मी नाही म्हणत नाहीए ... पण ...'' तो थोडासा निराश झाल्यागत झाला होता आणि त्याची ही अस्वस्थता डुडॉएसच्या लक्षात आली.

''फक्त,'' गनिमार्ड बोलत गेला, ''मी अगदी शपथेवर सांगतो ... तुम्ही ऐकता आहात ना चीफ? मी अगदी शपथेवर सांगतो...''

''काय शपथेवर सांगतो?''

''काही नाही ... आपण करू काहीतरी ... आपण पाहू ...''

एकटा बाहेर निघून येईपर्यंत गनिमार्डनं आपलं वाक्य पुरे केलं नाही. मग एक पाय जोरात आपटून अतिशय उद्वेगानं त्यानं मोठ्यांदा बोलत वाक्य पूर्ण केलं.

''मी अगदी शपथेवर सांगतो, की ही जी काही अटक होणार आहे ती मी फक्त आणि फक्त माझ्या बळावर करणार. त्या खलनायकानं पुरवलेल्या साक्षी पुराव्यावर आधारित एकही गोष्ट मी स्वीकारणार नाही. नाही ... नाही ... नाही.''

आपल्या कामात ढवळाढवळ करण्यासाठी ल्युपिनच्या नावानं बोटं मोडत आणि तरीही या प्रकरणाचा छडा लावण्याच्या मनीषेनं तो रस्त्यावर विनाकारण भटकत राहिला. चिडचिडीनं त्याचं डोकं भणाणलं होतं. त्या सगळ्या किचकट पुराव्यांतून, काही फुटकळ वर्णनातून, सगळ्यांच्या निरीक्षणातून आणि ल्युपिनच्या संशयाच्या घेऱ्यातून सुटलेलं काहीतरी आपल्याला गवसावं आणि त्यानं यशाकडे घेऊन जावं, असं काहीतरी शोधण्याचा तो प्रयत्न करत राहिला.

एके ठिकाणी अगदी घाईघाईनं त्यानं जेवण केलं आणि तो पुन्हा फेऱ्या मारू लागला; मात्र अचानक थांबला. भय, आश्चर्य आणि गोंधळ या भावना एकत्र अनुभवत होता तो. ज्या घरापर्यंत ल्युपिननं त्याला भुलवून आणलं होतं, त्या रू दे स्युरेनच्या फाटकाजवळच तो आता फेऱ्या मारत पोचला होता. त्याच्या मनाविरुद्धची एक अनामिक शक्ती त्याला पुन्हा तिथवर घेऊन आली होती. समस्येचं उत्तर या इथंच होतं. सगळं सत्य तिथं आणि फक्त तिथंच दडलं होतं जणू. ल्युपिनचं सारं काही अगदी मोजूनमापून होतं. त्याचे प्रत्येक आडाखे अचूक होते आणि त्यात कुठंही खोट काढायला जागा नव्हती. त्यामुळे या आपल्या शत्रूनं जिथं काम सोडलं, तिथून पुढे ते तसंच नेण्यावाचून त्याच्याकडे पर्याय नव्हता. मनातील सगळ्या गोंधळाला बाजूला सारून तो त्या घराचे तीन जिने भराभर चढला. दार सताड उघडं होतं. टेबलावर ठेवलेल्या वस्तूंना कुणीही हात लावलेला नव्हता. त्यानं त्या उचलून खिशात घातल्या आणि चालू लागला. त्यानंतर मात्र तो एका वेगळ्याच प्रभावाखाली वावरू लागला. स्वतः न निवडलेल्या, पण ज्याचा शब्द टाळूच शकत नाही, अशा व्यक्तीच्या आदेशानुसार जणू तो कृती करत होता. ज्या अज्ञात व्यक्तीचा तो शोध घेत होता, ती व्यक्ती पॉन्ट-नॉफच्या जवळपास राहते आणि त्याला शोधणं आता आवश्यक आहे, हे त्यानं अगदी मान्य केलं होतं. ती व्यक्ती पुल आणि रू दे बर्नीच्यामध्ये कुठेतरी असावी, या निष्कर्षाप्रत तो आला. रू दे बर्नी, जिथून केक विकत घेतले होते ती एक अव्वल नंबर बेकरी होती आणि ती संध्याकाळीच उघडणार होती. तिला शोधायला त्याला फार वेळ लागला नाही. गेर सेंट लझारजवळच्या पेस्ट्री बनवणाऱ्यानं गनिमार्डजवळ असलेल्या कार्डबोर्डच्या डब्यांसारखे दिसणारे डबे त्याला दाखवले. शिवाय दुकानातील एका मुलीला काल संध्याकाळी तिनं एका व्यक्तीला केक दिल्याचं आठवलं. त्यानं स्वतःचा चेहरा कोटाच्या कॉलरनं लपवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला होता; मात्र त्याचा तो एका काचेचा चष्मा का कुणास ठाऊक पण तिच्या लक्षात राहिला होता.

''हा एक पुरावा तर निश्चित झाला,'' इन्स्पेक्टरनं विचार केला, ''ही व्यक्ती चष्मा वापरते.''

त्यानंतर त्यानं त्याच्याजवळ असलेल्या वर्तमानपत्राचे तुकडे एका पेपर विकणाऱ्याला दाखवले आणि त्यानं ते वर्तमानपत्र लगेच ओळखलं. त्याचं नाव 'टर्फ इल्युस्त्रे' होतं. गनिमार्ड लगेचच इल्युस्त्रेच्या कार्यालयात जाऊन धडकला आणि त्यानं जे वर्तमानपत्र नियमित मागवतात, त्यांची यादीच मागितली. मुख्यतः पॉन्ट-नॉफच्या परिसरात राहणाऱ्या लोकांची नावं त्यानं त्या यादीतून काढून लिहून घ्यायला सुरवात केली; कारण ल्युपिन म्हणाला होता, की तो अपराधी नदीकाठाच्या डाव्या बाजूला राहणारा असावा.

यानंतर तो गुन्हे अन्वेषण विभागात परत आला आणि अर्धा डझन पोलिसांना त्यानं एकत्र केलं, त्यांना भरमसाट सूचना दिल्या. संध्याकाळी सात वाजता ही सर्व मंडळी कार्यालयात परत आली आणि अनेक चांगल्या बातम्या त्यांनी बरोबर आणल्या होत्या. टर्फ विकत घेणारे एक एम प्रिव्हेल्लास क्वा द ऑगस्टीन्सच्या तोंडाशी एका फ्लॅटमध्ये राहतात. आदल्या रात्री ते फर कोट घालून बाहेर निघाले होते आणि जाताना त्यांनी पहारेकऱ्याच्या बायकोकडून पत्र आणि टर्फ इल्युस्त्रे घेतला होता. शिवाय ते मध्यरात्री घरी परतले होते. हे एम प्रिव्हेल्लास एका काचेचा चष्मा घालतात, अशीही माहिती मिळाली होती. याव्यतिरिक्त त्यांना घोड्यांच्या शर्यतीत फार रुची आहे आणि काही घोडे त्यांच्या मालकीचेही आहेत, जे ते कधी कधी स्वतःच्या सवारीसाठी वापरतात किंवा मग शर्यतीसाठीही देतात.

सगळ्या चौकशीला अगदीच कमी वेळ लागला होता आणि ल्युपिननं बांधलेल्या आडाख्यांशी तंतोतंत जुळणारी सगळी माहिती हाती लागल्यामुळे गनिमार्ड त्याच्या माणसांनी आणलेली माहिती ऐकून जरा खट्टू झाला होता. पुन्हा एकदा ल्युपिनच्या चातुर्याबद्दल आणि त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या माहिती स्रोतांचा त्याला हेवा वाटला. त्याच्या उभ्या आयुष्यात त्यानं इतकी दूरदृष्टी असलेली व्यक्ती पाहिली नव्हती.

तो आता एम डुडॉएस यांना शोधू लागला.

''सारी तयारी झाली आहे, चीफ. आपलं अटक वॉरंट तयार आहे का?''

''आँ...?''

''मी म्हणालो, की अटक करण्यासाठीची सगळी तयारी झाली आहे, चीफ.''

''जेनी सॅफिरच्या खुन्याचं नाव तुला कळलं आहे?''

''हो.''

''कसं काय? आधी मला सारं काही सविस्तर सांग.''

तसं खोटं काही सांगणाऱ्यांपैकी गनिमार्ड नव्हता. त्यामुळे तो थोडा कचरला; मात्र त्यानं सांगायला सुरवात केली,

''अपघातानंच चीफ. ज्या पुराव्यांमुळे तो गोत्यात येऊ शकला असता अशा सगळया गोष्टी त्या खुन्यानं साइनमध्ये फेकून देण्याचा प्रयत्न केला. ते पुडकं आणि त्यातल्या काही वस्तू उचलल्या गेल्या आणि मला देण्यात आल्या.''

''कुणी दिल्या?'' ''आपलं नाव गुप्त ठेवण्याच्या अटीवर एका नावाड्यानं दिल्या. त्याला कुठल्याही लफड्यात पडायचं नव्हतं; पण मला ज्यांची गरज होती ते सगळे पुरावे हाती लागले आहेत. मला वाटलं होतं तितकं हे सारं काही कठीण नव्हतं.''

आणि मग त्यानं काय काय केलं ते सारं काही वर्णन केलं.

''आणि या साऱ्याला तू अपघात म्हणतो आहेस!'' एम डुडॉएस ओरडलेच. ''आणि हे सारं काही अजिबात कठीण नव्हतं, असं तुझं मत आहे! हे तुझं आतापर्यंतचं सर्वोत्कृष्ट काम आहे. तडीस लाव आता तूच ते गनिमार्ड आणि नीट पार पाड.''

गनिमार्डही हे सारं काही हातावेगळं करण्यासाठी उत्सुक होता. तो क्वा द ऑगस्टीन्सला गेला आणि आपल्या सहकाऱ्यांना त्या घराला घेरायचे आदेश त्यानं दिले. घरमालकाच्या बायकोवर प्रश्नांचा भडिमार करण्यात आला आणि तिनं सांगितलं, की तिचा हा भाडेकरू जेवण कायम बाहेरच करायचा; मात्र रात्रीच्या जेवणानंतर तो नियमानं घरी परतायचा.

नवाला काही मिनिटे शिल्लक असाताना तिनं खिडकीतून वाकून गनिमार्डला सावध केलं आणि त्यानं एक हलक्या आवाजात शिट्टी मारून आपल्या पोलिसांना इशारा दिला. साएनच्या दिशेनं फुटपाथवरून एक गृहस्थ उंच टोपी आणि फर कोट घालून त्यांच्या दिशेनं चालत येत होता. रस्ता ओलांडून तो त्या घराच्या दिशेनं आला. गनिमार्ड अचानक त्याच्या पुढ्यात उभा ठाकला.

''मला वाटतं तुम्ही एम प्रिव्हेल्लास आहात?''

''अगदी बरोबर; पण तुम्ही कोण आहात?''

''माझ्याकडे तुमच्यासाठी...''

पण त्याचे वाक्य पुरे करायला त्याला वेळ मिळाला नाही. सावल्यांमधून काही माणसे आपल्याकडे चालून येताहेत हे पाहून प्रिव्हेल्लास भिंतीकडे वळला आणि आपल्या विरोधकांकडे पाहत उभा राहिला. त्याच्या पाठीमागे एका दुकानाचं बंद दार होतं.

''मागे व्हा!'' तो ओरडला. ''मी तुम्हाला कुणालाही ओळखत नाही.'' त्याच्या उजव्या हातात एक काठी होती आणि डावा हात अचानक त्यानं मागे नेला, ज्यानं तो ते बंद दार उघडण्याचा प्रयत्न करत होता.

गनिमार्डला वाटलं, की तो त्या दाराआड असलेल्या एखाद्या भुयारी मार्गातून पळून जाण्याचा प्रयत्न करणार आहे.

''असा कुठलाही मूर्खपणा करण्याचा प्रयत्न करू नकोस,'' तो त्याच्याकडे जात बोलला. ''तू पकडला गेला आहेस ... त्यामुळे अगदी शांतपणे तू पुढे ये.''

आता तो अगदी पुढे जाऊन प्रिव्हेल्लासच्या काठीवर कब्जा मिळवणार, तेवढ्यात ल्युपिननं दिलेली सूचना त्याला विजेसारखी लख्खकन आठवली. प्रिव्हेल्लास हा डावखुरा होता आणि तो डाव्या हातानं आपलं पिस्तूल काढण्याचा प्रयत्न करत होता.

त्याच्या हाताची काहीतरी जलद हालचाल होताना पाहून गनिमार्डनं आपली मान अचानक दुसऱ्या दिशेला वळवली. दोन बार उडाले आणि दोन गोळ्या झाडल्या गेल्या. कुणालाही त्या लागल्या नाहीत. दुसऱ्या

क्षणी पिस्तुलाच्या दट्ट्याचा एक जबरदस्त दणका प्रिव्हेल्लासच्या हनुवटीखाली बसला आणि तो उभ्या जागीच खाली कोसळला. नऊ वाजून काही मिनिटांच्या आत त्याला ठाण्यात हजर करण्यात आलं होतं.

गनिमार्डचं तसंही खूप नाव होतं; मात्र या एका गुन्ह्याच्या तपासानं आणि या अत्यंत झटपट आटोपलेल्या चौकशी आणि अटकेमुळे त्याला अचानक प्रसिद्धीचं वलय प्राप्त झालं होतं. आतापर्यंत ज्या गुन्ह्यांचा छडा लागला नव्हता, त्याचीही जबाबदारी गनिमार्डवर टाकण्यात आली आणि सगळ्या वर्तमानपत्रांमध्ये त्याच्या सशक्ततेचं आणि चातुर्याचं वर्णन रकानेच्या रकाने भरून छापलं जाऊ लागलं.

सुरवातीच्या काही काळात या गुन्ह्याची सुनावणी अगदी लवकर लवकर होऊ लागली. प्रिव्हेल्लास, ज्याचं खरं नाव थॉमस डेरॉक होतं, तो आधीच संकटात सापडला आहे, असा निष्कर्ष समोर आला. शिवाय त्याच्या खोल्यांची झडती घेतल्यावर आणखी काही मोठे पुरावे सापडले नाहीत; पण लगामांचं एक बंडल सापडलं, ज्यातील एक त्यानं सारे पुरावे गोळा केलेल्या वर्तमानपत्राचं पुडकं बांधायला वापरला होता. शिवाय मृत महिलेच्या गळ्यावर त्यानं ज्या चाकूनं वार केले होते, तो चाकूही तिथे सापडला होता.

पण मग आठव्या दिवशी सारं चित्रच पालटलं. आतापर्यंत प्रिव्हेल्लासनं कुठल्याही प्रश्नाला उत्तर देण्यास नकार दिला होता; पण आता त्याच्या वकिलाच्या मदतीनं त्यानं परिस्थितिजन्य पुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि आपण खुनाच्या रात्री इथं नाही, तर फॉलिस-बर्गेरला होतो, असा दावा केला. त्याच्या जाकिटाच्या खिशात त्यानं काढलेल्या तिथल्या कार्यक्रमाच्या तिकिटाचा उर्वरित भागही सापडला, ज्यावर ती तारीख होती.

''गुन्हा घडण्यापूर्वीच तयार केलेला हा पुरावा आहे,'' उलट तपासणी करताना वकिलांनी आक्षेप नोंदवला.

''कसं ते सिद्ध करा,'' प्रिव्हेल्लासनं मागणी केली.

न्यायालयात सर्व साक्षीदारांपुढेही त्याला प्रस्तुत करण्यात आलं. बेकरीत काम करणाऱ्या मुलीनं, 'आपण कदाचित या व्यक्तीला ओळखतो,' असं विधान केलं. तसंच, 'ही व्यक्ती जेनी सॅफिरच्या कार्यक्रमांना यायची तेव्हा आपण याला कदाचित पाहिलं आहे,' असं म्युझिक हॉलवर काम करणाऱ्या मुलानंही सांगितलं; मात्र अगदी निश्चित असं विधान करण्याची कुणाची हिंमत झाली नाही. त्यामुळे सुनावणी कुठल्याही निश्चित दिशेनं जायची थांबली. इतक्या गंभीर आरोपांची पुष्टी करणारे कुठलेच पुरावे हाती लागले नव्हते. न्यायाधीशांनी गनिमार्डला बोलावणं पाठवलं आणि स्वतःची अडचण सांगितली.

''मी अशा परिस्थितीत ही सुनावणी आणखी पुढे नाही नेऊ शकत. आरोप सिद्ध करणारे पुरावेच नाहीत.''

''पण माननीय जज्ज साहेब, तुम्हाला स्वतःला खात्री पटली आहे. जर प्रिव्हेल्लास अपराधी नाही, तर त्यानं अटकेला विरोध केला नसता.''

''तो म्हणतो आहे, की त्याच्यावर हल्ला केला जात आहे, असा त्याचा समज झाला. शिवाय तो दावा करतो आहे, की त्याचा डोळा कधीच जेनी सॅफिरवर नव्हता आणि त्याचे हे विधान खोडून काढण्यासाठी कुठलाही सज्जड पुरावा आपल्याकडे नाही. परत आणखी एक बाब आहेच, की जर नीलम चोरीला गेला आहे तर तोही त्याच्या खोलीच्या झडतीत सापडला नाही.''

''इतर कुठेही तो सापडलेला नाही,'' गनिमार्ड म्हणाला.

''अगदी बरोबर आहे; पण हा काही पुरावा ठरत नाही त्याच्या विरोधात. आपल्याला निश्चित काय हवंय ते मी तुला आता सांगू का गनिमार्ड, आपल्याला अगदी लवकरात लवकर त्या लाल मलमली स्कार्फचा दुसरा भाग हवा आहे.''

''दुसरा भाग?''

''हो. हे तर अगदी स्वाभाविक आहे, की तो दुसरा भाग खुनी आपल्याबरोबर घेऊन गेला; कारण की त्यावर रक्ताचे डाग आणि त्याच्या रक्ताने माखलेल्या बोटांचे ठसे होते.''

गनिमार्ड स्तब्ध राहिला. त्याने काहीच उत्तर दिले नाही. हे सर्व प्रकरण या एकाच निष्कर्षाप्रत येत आहे याची त्याला जाणीव होऊ लागली होती. दुसऱ्या कुठल्याही पुराव्याची शक्यता मावळली होती.

कुठल्याही परिस्थितीत या मलमली स्कार्फमुळे प्रिव्हेल्लासचा गुन्हा सिद्ध होणार होता. आता प्रिव्हेल्लासवरील गुन्हा सिद्ध होणे हे गनिमार्डसाठी आवश्यक होऊन बसलं होतं. त्याच्या अटकेला तो कारणीभूत होता आणि त्यामुळे चहू बाजूंनी त्याचा उदोउदो होत होता. गुन्हेगारांचा कर्दनकाळ म्हणून त्याची तोंड फाटेस्तवर स्तुती झाली होती आणि अशा परिस्थितीत जर प्रिव्हेल्लासची सुटका झाली असती, तर तो तोंडघशी पडला असता. त्याला तारणारा तो एकुलता एक पुरावा मात्र दुर्दैवानं ल्युपिनच्या अखत्यारीत होता. कसा मिळवायचा तो पुरावा?

पुन्हा नव्यानं तपास करण्यास गनिमार्डनं सुरवात केली आणि स्वतःला त्यात पार बुडवून टाकलं. चौकशीच्या प्रत्येक टप्प्याची अथपासून इतिपर्यंत पुन्हा एकवार छाननी केली, त्यात रात्री जागवल्या, रू दे बर्नीच्या रहस्यासंदर्भात डोके उठेपर्यंत विचार केला, प्रिव्हेल्लासच्या आयुष्यासंदर्भातील माहितीची पारायणं केली आणि त्या हरवलेल्या नीलमच्या शोधासाठी आपला सगळा फौजफाटा लावला; पण सारे प्रयत्न वाया गेले.

न्यायालयाच्या आवारात, २८ डिसेंबरला, उलट तपासणी करणाऱ्या वकिलानं त्याला थांबवलं.

''अरे, एम. गनिमार्ड , काही नवीन बातमी?''

''नाही साहेब.''

''मग मला केस आता खारीज करावी लागेल.''

''फक्त आणखी एक दिवस वाट पाहा ना.''

''पण त्याचा उपयोग काय? आपल्याला त्या स्कार्फचा दुसरा भाग हवा आहे आणि तो मिळवलास का तू?''

''मला तो उद्यापर्यंत मिळेल.''

''उद्या?''

''हो; पण मला तुमच्या जवळ असलेला तो स्कार्फचा दुसरा तुकडा हवा आहे.''

''आणि तो मी तुला दिला तर?''

''तर मी तुम्हाला वचन देतो, की संपूर्ण स्कार्फ मी तुम्हाला सुपूर्त करीन.''

''फार छान. ते तर गृहीत धरलंच आहे मी.''

गनिमार्ड त्यांच्या मागे मागे खोलीपर्यंत गेला आणि परतताना स्कार्फचा तुकडा घेऊन बाहेर पडला.

''बास!'' तो उद्‌गारला. ''मी आता नक्की तो पुरावा मिळवणार म्हणजे मिळवणारच ... आणि हिंमत असेल तर तो ल्युपिन आपला शब्द पाळणार आणि येणार भेटायला ठरल्याप्रमाणे.''

खरं तर, ल्युपिन ठरल्याप्रमाणे येणार नाही, यात त्याला कणभरही शंका नव्हती आणि म्हणूनच तो आणखी चरफडत होता. या भेटीसाठी ल्युपिन इतका का उत्सुक होता? या सर्व परिस्थितीत त्याचा नेमका उद्देश तरी काय होता?

औत्सुक्य, संताप आणि द्वेषाने फणफणत गनिमार्डने या भेटीसाठी अगदी काळजीपूर्वक मोर्चेबांधणी करायचे ठरवले. या वेळी आपण त्याच्या सापळ्यात फसायचे नाही आणि या आपल्या शत्रूला मात्र आपल्या जाळ्यात ओढायचे, यासाठी त्यानं तयारी चालवली होती. मग आदल्या रात्री संपूर्ण रात्र त्यानं रू दे स्युरेनमधील त्या घराची कसून पाहणी केली आणि दुसऱ्या दिवशी म्हणजे २९ डिसेंबरला, ल्युपिनने ठरवलेल्या तारखेप्रमाणे, घरातून बाहेर पडण्यासाठी केवळ एकच दार आहे याची खात्री करून घेतल्यानंतर आपल्या माणसांना सांगितले, की तो एका जीवघेण्या कामगिरीवर निघाला आहे आणि त्यांना घेऊन तो घराजवळ पोचला. त्यांना त्याने बाजूच्या कॉफी शॉपजवळ तैनात केले आणि सर्व आवश्यक सूचना दिल्या, की जर तो तिसऱ्या मजल्याच्या खिडकीशी दिसला किंवा एक तास लोटल्यावरही जर परत आला नाही, तर साऱ्यांनी या घरावर हल्ला चढवायचा आणि जो कुणी हे घर सोडून जाताना दिसेल त्याला अटक करायची. इन्स्पेक्टरने आपले पिस्तूल पुन्हा एकदा तपासले आणि ते काम करते आहे अथवा नाही, हेही तपासले. शिवाय खिशातून ते सहज काढता येते की नाही, हेही त्याने पाहिले. मग तो वरच्या मजल्याकडे गेला. तिथे सारे काही जैसे थे होते. दारे उघडी होती आणि कुलपे तुटलेली होती, अगदी तो सोडून गेला होता त्याच स्थितीत ते घर होते. त्या मुख्य बैठक खोलीच्या खिडक्या व्यवस्थित बंद आहेत की नाही याची खात्री करून घेतल्यावर तो त्या घराच्या इतर तीन खोल्यांमध्येही फेरफटका मारून आला. आत कुणीही नव्हते.

''मास्टर ल्युपिन घाबरले वाटतं,'' एका विचित्र समाधानानं तो पुटपुटला.

''मूर्खासारखा बरळू नकोस,'' त्याच्या पाठीशी आवाज आला.

त्यानं झटकन वळून पाहिलं तर रंगाऱ्याच्या वेषात एक वृद्ध माणूस तिथं उभा होता.

''तुला जास्त डोकं खपवायची काही गरज नाही,'' ती व्यक्ती उद्‌गारली. ''हो, हा मी, ल्युपिन. आज सकाळपासून मी त्या रंगाऱ्याच्या दुकानात काम करतोय. आता न्याहारीची वेळ झाली आमची आणि मी ती संधी साधून वर आलो.''

त्यानं गनिमार्डकडे एक कटाक्ष टाकला आणि कुत्सित हास्य करीत तो मोठ्यांदा म्हणाला, ''माझे शब्द लक्षात घे. हा अत्यंत अविस्मरणीय क्षण आहे. मी तुझं देणं लागतो माझ्या मित्रा. तुझ्या आयुष्याच्या दहा वर्षांच्या बदल्यात मी ते मागणार नाही; पण तुला ठाऊक आहे, की माझं तुझ्यावर किती प्रेम आहे ते. मग काय म्हणतोस तू कलाकार मित्रा! होतं की नाही सारं काही विचारपूर्वक रचलेलं आणि पूर्वनियोजित? आणि मी सांगितलं होतं ना ते सारं काही जसंच्या तसं? अगदी अल्फा ते ओमेगापर्यंत सारं काही स्पष्ट बोललो होतो की नाही? कळतं की नाही मला आपल्या व्यवसायातील? मी स्कार्फच्या रहस्यासंदर्भात बरोबर अंदाज बांधला होता की नाही? मी हा अजिबात दावा करत नाही, की माझ्या निरीक्षणांमध्ये काहीच कमतरता नव्हती किंवा त्यात सगळेच धागे नीट गुंफले गेले होते... पण प्रखर बुद्धिमत्तेचा काय उत्तम नमुना होता तो, नाही! अगदी मास्टरपीस! सर्व घटनांची काय अप्रतिम रचना होती! सारं काही कसं दूरदृष्टीनं कळत गेलं, अगदी जे घडलं होतं ते, जे घडणार होतं ते आणि तुझ्या त्या इथे येण्यापर्यंत सारं काही कसं व्यवस्थित समजलं होतं. आणला आहेस तू तो स्कार्फ?''

''हो, अर्धा भाग. आणि तुझ्याकडे असलेला?''

''हा काय इथे. ये आपण जोडून पाहू.''

त्यांनी ते दोन मलमली तुकडे टेबलवर पसरले. कात्रीने कापलेले भाग आता तंतोतंत जुळून आले होते. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांचा रंग एक होता.

''पण मला वाटतं,'' ल्युपिन म्हणला, ''फक्त या एका गोष्टीसाठी तू माझ्याकडे इथवर आलेला नाहीस. तुला त्या तुकड्यावरील रक्ताचे डाग निरखून पाहायचे आहेत. ये, असा इकडे ये गनिमार्ड. तिथे फार अंधार आहे.''

ते दोघेही दुसऱ्या खोलीकडे गेले. घराच्या परसदाराकडे असूनही त्या खोलीत जरा जास्त उजेड होता. ल्युपिनने त्याच्या हातातील मलमलचा तुकडा खिडकीच्या तावदानाशी धरला.

''हे बघ,'' गनिमार्डला जवळ येण्यासाठी जागा करून देत तो उद्‌गारला.

इन्स्पेक्टरच्या चेहऱ्यावर हास्य फुललं. पाच बोटांचे आणि हाताचे ठसे अगदी स्पष्टपणे त्या कापडाच्या तुकड्यावर दिसत होते. हा पुरावा नाकारला जाणं अगदीच अशक्य होतं. खुन्यानं आपल्या रक्ताळलेल्या हातानं तो तुकडा अगदी व्यवस्थित पकडला होता आणि ज्या हातानं खून केला, अगदी त्याच हातात तो पकडून त्यानं जेनी सॅफिरचा गळाही आवळला होता.

''आणि हा डाव्या हाताचा छाप आहे,'' ल्युपिननं निरीक्षण करत सांगितलं. ''आणि म्हणून मी तुला सावधतेचा इशारा दिला होता. त्यात कुठलाही चमत्कार वगैरे काहीही नव्हता; पण तरीही तुला हे मान्य करावं लागेल की ते सारं काही विशेष होतं. तू मला तुझ्यापेक्षा जास्त हुशार मानत असलास तरी मला अशी जादूगारासारखी वागणूक देण्याची काही

एक गरज नाही.''

गनिमार्डनं लगेच तो मलमली कापडाचा तुकडा आपल्या खिशात घातला. ल्युपिननं मान हलवून त्याला सहमती दिली.

''अगदी काहीच हरकत नाही, मित्रा. ते तुझ्याचसाठी आहे. मला फार बरं वाटतंय की तुला आनंद झालाय. आणि आता तू बघतोच आहेस, की हा काही सापळाबिपळा नव्हता ... फक्त तुला मदत करण्याच्या हेतूनं हे सारं काही केलं होतं ... दोन मित्रांच्या मधील कामाची विभागणी ... आणि, मी कबूल करतो, थोडी उत्सुकतादेखील होती. हो, मला या स्कार्फचा दुसरा भाग पाहायचाच होता जो पोलिसांकडे होता ... घाबरू नकोस, मी तो तुला परत देणारच आहे ... फक्त एक सेकंदाकरिता पुन्हा दाखव...''

अगदी सहजतेनं ल्युपिननं त्या दुसऱ्या भागाच्या टोकाशी असलेला गोंडा हाताळायला सुरवात केली, जेव्हा गनिमार्ड, तो जे काही बोलत होता ते ऐकण्यात मग्न होता.

''या बायांच्या कलाकुसरीच्या कामात काय जादू असते नाही! तू तिच्या मोलकरणीचा कबुलीजबाब नीट तपासला नाहीस? ती म्हणाली होती, की जेनी सॅफिर ही कशिदाकारीच्या कामात अत्यंत निपुण होती आणि ती स्वतःचे कपडे आणि टोप्या स्वतःच तयार करायची. त्यामुळे यात काही शंकाच नाही की तिने हा स्कार्फदेखील स्वतःच तयार केला आहे. आणि ही गोष्ट माझ्या अगदी सुरवातीलाच लक्षात आली होती. तुला सांगितलं तसा मी कुतूहल असलेलाच व्यक्ती आहे आणि त्यामुळे आता तू जो खिशात ठेवलेला तुकडा आहे त्याचे नीट निरीक्षण करताना माझ्या असे लक्षात आले, की त्याच्या त्या गोंड्यामध्ये एक मेडल ठेवण्याएवढी जागा तयार केली आहे. चांगले नशीब आणि स्वरक्षणाच्या उद्देशशाने त्या गरीब बिचाऱ्या मुलीनं ते तिथं खोवलं असावं. किती हृदयस्पर्शी आहे ही गोष्ट, नाही का गनिमार्ड?''

इन्स्पेक्टर आता चकित झाला होता आणि त्यानं आपली नजर ल्युपिनवरून हटू दिली नाही. ल्युपिन बोलत राहिला.

''आणि मग मी स्वतःला म्हटलं, की जर स्कार्फचा दुसराही भाग आपल्याला नीट न्याहाळता आला तर काय बहार येईल! अर्थात तो पोलिसांना त्या युवतीच्या गळ्याभोवती आवळलेला आढळून येईल. माझ्या हातात आता हा जो दुसरा भाग आहे, त्यात जशी ही लपवण्याची जागा निर्माण केली गेली आहे, तशीच ती त्या पोलिसांकडे असलेल्या स्कार्फच्या तुकड्यात आहे का, हे जाणून घ्यायची उत्सुकता मला लागली होती. बघ ना मित्रा, किती चतुराईनं हे तयार केलं गेलं आहे, नाही! काय करायचं तर एक लाल रंगाचा धागा घेऊन तो असा काही गुंफायचा की त्यात एक छोटीशी डबी दडवून ठेवता येईल. अगदी छोटी जागा; पण तरीही थोडी अशी की ज्यात कुण्या देवी-देवतेचे छोटे लॉकेट ठेवता येईल ... किंवा मग आणखी दुसरी काहीतरी वस्तू ... म्हणजे जसे उदाहरणार्थ एखादा किमती माणिक-मोती ... जसा की एखादा नीलम ...''

आणि त्याच क्षणाला त्याने त्या गोंड्याचा धागा ओढायचे थांबवले आणि त्या मोकळ्या जागेतून त्याने चिमटीत पकडून एक अत्यंत देखणा नीलम बाहेर काढला.

''अहा! तर मी तुला काय सांगत होतो माझ्या मित्रा...''

त्यानं नजर उचलून समोर पाहिलं. इन्स्पेक्टरचा चेहरा आता संतापानं थरथरत होता आणि तो विस्फारलेल्या नजरेनं पाहत होता. आणि क्षणात त्याला आता सारं प्रकरण स्पष्ट दिसू लागलं.

''हलकट माणसा!'' तो ओरडला. दुसऱ्या वेळी त्याचा हा असा अपमान झाला होता. ''नालायक!''

आता ते दोघेही परस्परांविरोधात उभे ठाकले होते.

''दे ते माझ्याकडे,'' इन्स्पेक्टर म्हणाला.

ल्युपिननं तो मलमली स्कार्फचा तुकडा त्याच्यासमोर धरला.

''आणि तो नीलमसुद्धा,'' अधिकारवाणीनं गनिमार्ड बोलला.

''काहीतरी वेड्यासारखं बोलू नकोस.''

''मला ते परत दे, नाही तर ...''

''नाही तर काय, मूर्ख माणसा!'' ल्युपिन ओरडला. ''इकडे बघ, तुला काय वाटलं, की मी तुला या सगळ्यात समाविष्ट केलं ते उगाच?''

''मला ते सुपूर्त कर.''

''तुला खरंच कळलं नाही, की मी हे सर्व का करतो आहे? काय! चार आठवडे मी तुला एखाद्या हरणासारखं चकवत ठेवलं आणि आता तू म्हणतोस ... अरे, वेड्या गनिमार्ड, जरा सावर स्वतःला. तुला खरंच कसं लक्षात आलं नाही की एखाद्या आज्ञाधारक कुत्र्याप्रमाणे तू चार आठवडे माझे काम करत होतास? ... युलूलूलू रोव्हर ... जा ते घेऊन ये ... तो तिथे एक शुंदल नीला खडा पडलाय, आणि तो मास्टरला आणणे शक्य नाही ... जा, शोध घे त्याचा गनिमार्ड आणि आण तो तुझ्या मास्टरकडे ... तू तुझ्या मास्टरचा गुणी छोटा आक्कू आहेस किनई! ... बैस खाली... याचना कर. तुला पण काहीतरी हवंय की नाही, मग?''

मनातून उफाळून येणाऱ्या संतापाच्या लाटेवर नियंत्रण ठेवत गनिमार्डच्या डोक्यात आता एकच विचार आला आणि तो म्हणजे त्याच्या सहकाऱ्यांना इशारा करणं. त्यामुळे परसदाराकडे असलेल्या ज्या खोलीत तो उभा होता तिथून वळून जाऊन एकमेव उघड्या दाराकडे जाण्याचा विचार तो करू लागला. मग तो धावत खिडकीजवळ जाऊ शकला असता आणि त्याचे तावदान तोडण्याचा त्याचा विचार होता.

''आणि आता हेच बघ ना,'' ल्युपिननं बोलणं चालू ठेवलं. ''तू आणि तुझे सर्व सहकारी, काय बावळट आणि मूर्ख लोकांची सेना आहात तुम्ही! तुमच्याकडे तो स्कार्फचा तुकडा इतके दिवस होता आणि तुमच्यापैकी एकालाही वाटलं नाही, की तो चाचपून पाहावा आणि ती बिचारी मुलगी इतक्या अगतिकतेनं आणि आग्रहानं तो स्कार्फ का धरून होती, याची जराशीही शंका तुमच्या मनात उत्पन्न झाली नाही? तुमच्यापैकी एकालाही याची जाणीव झाली नाही! म्हणजे तुम्ही काहीतरी अर्धवट, दूरदृष्टी न ठेवता, विचार न करता काम करत राहिलात ...''

इन्स्पेक्टरचा उद्देश सफल झाला होता. जेव्हा काही क्षणांसाठी ल्युपिन त्याच्यापासून जरा दूर गेला, तेव्हा इन्स्पेक्टर अचानक वळला आणि त्यानं दाराकडे झेप घेतली. दाराचं हॅन्डल त्यानं पकडलं; पण क्षणात त्याचा भ्रमनिरास झाला; कारण ते अजिबात उघडत नव्हतं.

ल्युपिन अचानक जोरजोरानं हसू लागला.

''इतकंच नाही तर तुला हेही कसं कळलं नाही, की तू माझ्यासाठी सापळा रचलास आणि मला त्याची जरासुद्धा कल्पना येणार नाही, असं कसं बरं वाटलं तुला? आणि काही विशिष्ट कारणांनी मी तुला इथवर पुन्हा एकदा खेचून आणतो आहे, असं तुला क्षणभरही वाटलं नाही आणि या इथली सगळी कुलपं विशिष्ट पद्धतीनं बसवली आहेत, याची आठवणदेखील तुला राहिली नाही? काय हे! बोल एकदाचा स्पष्टपणे, की काय वाटलं काय तुला स्वतःबाबत?''

''स्वतःबाबत मी काय विचार करतो?'' प्रचंड संतापानं गनिमार्ड ओरडला. त्यानं आपली बंदूक काढली आणि थेट ल्युपिनच्या दिशेनं रोखली.

''हात वर कर!'' तो पुन्हा ओरडला. ''मला हे वाटतं.''

ल्युपिन थेट त्याच्या समोर उभा ठाकला आणि त्यानं खांद्यांना एक झटका दिला.

''फसलास पुन्हा एकदा,'' तो म्हणाला.

''मी म्हणतोय, हात वर कर!''

''आणि मी म्हणतोय फसलास तू पुन्हा एकदा. तुझं हे नामी हत्यार चालणारच नाही.''

''काय?''

''ती म्हातारी कॅथरीन, तुझी मोलकरीण आता सध्या माझ्या सेवेत आहे. तू आज सकाळी तुझी न्याहारी आणि कॉफी घेत असताना तिनं त्या पिस्तुलातील सगळ्या गोळ्या पाण्यात घातल्या होत्या.''

गनिमार्ड आता पुरता चिडला होता. त्यानं पिस्तूल खिशात घातलं आणि तो ल्युपिनवर चालून गेला.

''अरे वा!'' म्हणत ल्युपिननं एक जबरदस्त प्रहार त्याच्या पायावर करत त्याला अडवलं. आता ते एकमेकांना भिडले होते. गुद्द्यांची देवाण-घेवाण सुरू झाली होती आणि दोन शत्रूंमध्ये मारामारी चालली होती; पण ती काही अस्सल मारामारी नव्हती. आधीच्या त्यांच्या संघर्षाच्या आठवणी गनिमार्डच्या मनात तरळून गेल्या आणि प्रत्येक वेळी त्याला पत्करावी लागलेली हारही आठवली. काहीही करण्यासारखं शिल्लक नव्हतं, हे त्याला प्रकर्षानं जाणवलं. ल्युपिनकडे अनेक जोरकस क्लृप्त्या होत्या ज्याच्यापुढे कुठल्याही सामान्य व्यक्तीला काहीही करता येण्यासारखं शिल्लक राहत नसे.

''मला मान्य आहे,'' जणू काही गनिमार्डच्या मनात चाललेले विचार वाचल्याप्रमाणे ल्युपिन मित्रत्वाच्या स्वरात उद्‌गारला. ''हे सारं काही असंच राहू देण्यात तुझी भलाई आहे. आणि हो, माझ्या प्रिय मित्रा, या सगळ्या प्रकरणात तुला जे काही प्राप्त झालं आहे, त्याचा एकदा विचार कर. प्रसिद्धी, निश्चित मिळणारी बढती आणि त्यामुळे तुझा निश्चित सुखकर ठरणारा वृद्धापकाळ! त्यामुळे आता तुला नीलमचं काय झालं आणि त्यात आरसेन ल्युपिनची काय भूमिका होती, वगैरे गोष्टींचं काय करायचं आहे? शिवाय हा अन्याय आहे, की तुला आठवण करून देणे, की या बिचाऱ्या आरसेन ल्युपिननं तुझा जीवदेखील वाचवला. काय! कुणी तुला सावध केलं होतं, की तो मारेकरी प्रिव्हेल्लास हा डावखुरा आहे म्हणून? आणि तू माझ्या या उपकाराची अशी परतफेड करतो आहेस? हे अजिबात योग्य नाही गनिमार्ड. तू मला लाजवतो आहेस मित्रा!''

ही अशी बडबड चालू असताना आता ल्युपिननं गनिमार्डचा पवित्रा घेतला. तो बोलत बोलत दाराशी आला. गनिमार्डच्या अगदी लक्षात आलं, की आता आपला हा दुश्मन इथून फरार होणार आहे. सगळी ताकद पणाला लावून तो पुढे सरसावला आणि त्यानं त्याला दारात अडवण्याचा प्रयत्न केला; पण त्याच्या पोटात एक जबरदस्त प्रहार झाला आणि तो कोलमडून मागच्या भिंतीवर आदळला. ल्युपिननं एक स्प्रिंग फिरवली आणि दाराचं हॅन्डल उघडून तो निघून गेला. जाताना तो हास्याचा गडगडाट करत गेला.

बराच प्रयत्न करून जेव्हा गनिमार्ड वीस मिनिटांनी आपल्या सहकाऱ्यांपर्यंत कसाबसा पोचला, तेव्हा त्यातील एक पुढे येत बोलला, ''एक रंगारी आता इथून बाहेर पडला. त्याचे सगळे सहकारी न्याहारी करून परत येत होते तेव्हा त्यानं मला हे एक पत्र हातात दिलं आणि आपल्या गव्हर्नरला दे असं म्हणाला. कोण गर्व्हनर म्हणून मी विचारणा केली; मात्र तोवर तो निघून गेला होता. मला वाटतं हे तुम्हाला देण्यासाठीच आहे.''

''बघू.''

गनिमार्डने पत्र उघडले. खूप घाईघाईनं पेन्सिलनं त्यावर काहीतरी खरडलं होतं-

माझ्या प्रिय मित्रा,

सगळी निरागसता बाजूला ठेवून ऐक, की जेव्हा कुणी तुम्हाला सांगतं की तुमच्या पिस्तुलातील गोळ्या ओल्या आहेत तेव्हा त्या व्यक्तीवर कितीही विश्वास असला तरीही आणि त्याचं नाव आरसेन ल्युपिन असलं तरीही, स्वतःची अशी फजिती कधीच होऊ देऊ नये. आधी पिस्तूल चालवून पाहावं. जर ती व्यक्ती बचाव करण्यासाठी प्रयत्न करू लागली तर दोन गोष्टी तुम्हाला कळतात; एक म्हणजे तुमच्या पिस्तुलातील गोळ्या चांगल्या आहेत आणि वृद्ध कॅथरीन ही अत्यंत विश्वासू आणि आदरणीय सहकारी आहे. येत्या काही दिवसांत तिला माझ्या सेवेत आणण्याचा प्रयत्न मी करणार आहे. याशिवाय, माझ्या प्रिय मित्रा, माझ्यावर नेहमी प्रेमळ विश्वास ठेव.

तुझाच,
आरसेन ल्युपिन

varsha.welankar@gmail.com

❖

चेकमेट

मूळ कथा : चेकमेट

मूळ लेखक : जेफ्री आर्चर

अनुवाद : लीना सोहोनी

तिने खोलीत प्रवेश करताच सर्वांचे डोळे तिच्याकडे वळले.

एखाद्या सुंदर तरुणीकडे कौतुकाने बघत असताना सगळे पुरुष तिला नेहमी डोक्यापासून पायांपर्यंत निरखून बघतात. माझे मात्र तसे नाही. मी पायाच्या घोट्यांपासून माझी नजर वर फिरवत मस्तकापर्यंत जाऊन पोहोचतो.

तिने उंच टाचांचे काळ्या मखमलीचे बूट घातले होते. अंगात तंग बसणारा काळाभोर ड्रेस गुडघ्यांच्या वर कसाबसा पोहोचत होता. त्यातून तिचे सडपातळ, लांब, सौष्ठवपूर्ण पाय उठून दिसत होते. माझी नजर तिला न्याहाळत गुडघ्यांच्या वरती जाऊन पोहोचली. नाजूक कंबर आणि चपळ, सुदृढदेह; पण मला खरी भुरळ घातली, ती तिच्या बदामाकृती चेहऱ्याने. किंचित वर उचललेले रसरशीत, विलग झालेले ओठ आणि भले मोठ्ठे निळेशार डोळे. हे असे डोळे मी अजून कधी पाहिलेच नव्हते. तिचे घनदाट काळे केस आखूड कापलेले होते, दूरवरून चमकत होते. ती ज्या दिमाखात आत शिरली, तशी जर एखाद्या दूतावासात आयोजित केलेल्या औपचारिक मेजवानीच्या ठिकाणी, एखाद्या सोशल कॉकटेल पार्टीच्या ठिकाणी, चॅरिटी बॉल डान्सच्या ठिकाणी आली असती तर ते निदान समजून घेण्यासारखे तरी होते; पण आज या इथे, बुद्धिबळांचे सामने चालू असलेल्या जागी...

त्यानंतर तिच्या प्रत्येक हालचालीकडे माझे बारीक लक्ष होते. ही बुद्धिबळाच्या सामन्यात भाग घेणार असेल, ही गोष्ट काही माझे मन स्वीकारायला तयार नव्हते; पण सावकाश चालत क्लब सेक्रेटरीच्या टेबलापाशी जाऊन तिने नावनोंदणी केली. तिच्याबद्दलचा माझा आडाखा तिने साफ चुकवला. सामन्याला आता सुरुवात होणार होती. तिला ज्या स्पर्धकाविरुद्ध खेळायचे होते, त्याचा नंबर तिच्या हाती देण्यात आला. अजून काही स्पर्धकांच्या समोर खेळायला कुणीच येऊन बसले नव्हते. त्यामुळे ती आपल्या समोर खेळायला येऊन बसली तर बरे, असा विचार बऱ्याच मंडळींच्या मनात येऊन गेला असणार.

संचालकांनी तिच्या हातातील स्पर्धक क्रमांकाची चिठ्ठी पाहून तिला खोलीच्या लांबच्या कोपऱ्यात बसलेल्या एका वयस्कर माणसाच्या समोर नेऊन बसवले. तो माणूस एके काळचा या क्लबचा कॅप्टन होता; पण आता त्याची सद्दी संपली होती. तो बराच म्हातारा झाला होता.

आता क्लबचा नवा कॅप्टन मी होतो. या रॉबिन-मॅचेसचे (साखळी सामन्यांचे) आयोजन करण्याची जबाबदारी माझीच होती. आम्ही प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी हायस्ट्रीटवरील 'मेसन आर्म्स' क्लबच्या या हॉलमध्ये भेटतो. इथला मालक आमच्यासाठी तीस टेबले मांडून ठेवतो. खाण्या-पिण्याची सोय करतो. आमच्या ड्रिस्टिक्टमधले आणखी तीन-चार क्लब्ज आपापले डझनभर स्पर्धक पाठवतात. त्यांच्याशी आम्ही 'ब्लिट्झ गेम्स' (वेगवान सामने) खेळतो. एरवी या स्पर्धकांशी खेळण्याची संधी आम्हाला मिळत नाही, ती या निमित्ताने मिळते. या सामन्यांचे नियम अगदी साधे, सरळ असतात. प्रत्येक चाल खेळण्यासाठी प्रत्येक स्पर्धकाला घड्याळ लावून एका मिनिटाचा अवधी दिला जातो. त्यामुळे एक तासाहून जास्त वेळ सामना चालत नाही आणि जर तीस चालींमध्ये कुणी कुणाचे एकही प्यादे घेतले नाही, तर अर्थातच सामना 'ड्रॉ' झाला, असे घोषित करण्यात येते. दोन सामन्यांमध्ये चहा–कॉफीची छोटी सुटी असते. सामन्यात जो हरेल, तो चहा–कॉफीचे

पैसे भरतो. त्या संध्याकाळी प्रत्येकाला दोन स्पर्धकांशी खेळण्याची संधी मिळते.

गोल भिंगांचा चष्मा आणि गडद रंगाचा थ्रीपीस सूट घातलेला एक काटकुळा माणूस माझ्या दिशेने चालत आला. आम्ही हसून एकमेकांशी हस्तांदोलन केले. त्याच्याकडे पाहून तो वकील असावा, असा मी तर्क केला; पण तो तर्क चुकीचा निघाला. वोकिंग गावात एका स्टेशनरी सप्लायरकडे तो अकाउंटंट म्हणून कामाला होता.

माझा प्रतिस्पर्धी चांगला निष्णात होता; पण त्याच्या 'ओपनिंग मूव्ह'कडे माझे लक्षच नव्हते माझे लक्ष सारखे त्या काळ्या ड्रेसमधल्या तरुणीकडे जात होते एकदा आमची दोघांची नजरानजर झाली, तेव्हा तिने मंत्रमुग्ध करणारे हास्य माझ्या दिशेने फेकले. त्यानंतर पुन्हा एकदा मी तिच्याकडे पाहिले. परत एकदा त्या हास्याची उधळण होईल, या आशेने; पण तसे काही घडले नाही. खरे तर माझे मन काही खेळात लागेना. तरीही मी त्या अकाउंटंटला हरवले. त्याची चाल त्याच्यावरच सपशेल उलटवली.

त्यानंतर मधली सुटी जाहीर करण्यात आली; पण मी गर्दीतून बारपाशी जाऊन पोहोचायच्या आतच क्लबचे तीन सदस्य तिला ड्रिंक ऑफर करून मोकळे झाले होते. आता विश्रांतीनंतर मला दुसऱ्या स्पर्धकाच्या सोबत मॅच खेळायची होती; पण ती मॅच मला तिच्यासोबत खेळता आली नसती; कारण क्लबचा कॅप्टन या नात्याने मला दुसऱ्या एखाद्या क्लबच्या कॅप्टनबरोबरच खेळणे भाग होते. तसा रिवाजच होता. दुसरी फेरी सुरू झाली. मी ज्या अकाउंटंटला हरवले होते, तो तिच्याशी खेळायला बसला होता.

माझ्यासमोर आलेल्या दुसऱ्या प्रतिस्पर्ध्याला मी चाळीस मिनिटांच्या आतच चीतपट केले. इतर स्पर्धक अजूनही खेळतच होते. मग यजमान म्हणून मी सर्वांची विचारपूस करत हिंडू लागलो. मी गोलाकार फिरून मुद्दामच सर्वांत शेवटी तिच्या टेबलापाशी आलो. अकाउंटंटने खेळाचा ताबा घेतला होता. मी पोहोचल्यानंतर काही क्षणांतच ती सामना हरली.

मी स्वतःची ओळख करून देत तिचे हात हाती घेतले. ते हात हाती घेणे हा अत्यंत रोमांचकारी, सुखद अनुभव होता. मग आम्ही दोघे त्या टेबलांच्या गर्दीतून वाट काढत बारकडे निघालो. तिचे नाव अमांडा कर्झन होते, असे तिनेच मला सांगितले. तिलाच विचारून मी तिच्यासाठी तिच्या आवडीची रेड वाईन मागवली आणि स्वतःसाठी बिअर. मग ती हरल्याबद्दल मी सहानुभूती व्यक्त केली.

''पण तुम्ही त्याला कसं काय हरवलंत?'' ती म्हणाली.

''कसंबसं जमलं मला,'' मी म्हणालो. ''पण सोपं नव्हतं हं! तसा आमचा सामना खूप अटीतटीचा झाला. बरं, पण आमच्या जुन्या कॅप्टन साहेबांबरोबरची तुमची पहिली गेम कशी झाली?''

''स्टेलमेट सामना अनिर्णीत,'' अमांडा म्हणाली. ''पण मला वाटतं, तो त्यांचा चांगुलपणा असावा. मला वाईट वाटू नये, म्हणून मुद्दाम ते तसं खेळले असणार.''

''तसंच काही नाही,'' मी म्हणालो. ''गेल्या खेपेला मी त्यांच्याशी खेळलो होतो, तेव्हासुद्धा 'स्टेलमेट'च झाला होता.''

ती गोडसं हसली. ''कधीतरी आपण दोघांनी खेळायला हवं, नाही का?''

''हो, मलाही आवडेल ना तुझ्याबरोबर खेळायला,'' मी धिटाईने एकेरीवर आलो. तिने स्वतःचे ड्रिंक संपवले.

''वेल, मला आता निघायला हवं,'' ती अचानक उठत म्हणाली. ''हाऊन्स्लोची शेवटी ट्रेन पकडायची आहे.''

''मी सोडतो ना तुला,'' मी शूर वीराप्रमाणे म्हणालो. ''शेवटी मी आज इथला यजमान आहे. एवढं तर मला केलंच पाहिजे ना?''

''अरे, पण ते तुझ्या घरापासून कित्येक मैल लांब पडेल ना?'' ती आवाजात काळजी आणत म्हणाली.

''छे गं! तसं काहीच नाही,'' मी म्हणालो. मग हाऊन्स्लो माझ्या फ्लॅटपासून फक्त वीस मिनिटांच्या अंतरावर असल्याची मी थाप मारली. माझ्या ग्लासातली बिअर रिकामी करून मी उठलो आणि अमांडाचा कोट अंगात चढवायला तिला मदत केली. घरी जायला निघण्याआधी मी उत्तम सोय केल्याबद्दल व्यवस्थापकांचे आभार मानले.

मग आम्ही रमतगमत कार पार्कमध्ये आलो. मी माझ्या 'सिरोको' कारचा दरवाजा अमांडासाठी उघडून धरला.

''लंडनच्या ट्रेननं प्रवास करण्यापेक्षा बरं,'' ती आत बसत म्हणाली. मी ड्रायव्हरच्या सीटवर बसलो. मी हसून उत्तरेच्या दिशेने कार पिटाळली. मी आधी ज्या तंग आखूड काळ्या ड्रेसचं वर्णन केलं होतं, तो ड्रेस घालून जर एखादी मुलगी 'सिरोको' कारच्या सीटवर बसली, तर स्वाभाविकच आणखी वर जातो; पण त्यामुळे तिला काहीच फरक पडलेला नव्हता. ती लज्जित वगैरे मुळीच झालेली नव्हती.

आम्ही त्या संध्याकाळविषयी, क्लबविषयी आणि उगाच इतर विषयांवरून इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. त्यानंतर थोडा धीर करून मी म्हणालो, ''तसा अजून काही फार उशीर झालेला नाही. माझ्या घरी चल ना; एखादं ड्रिंक घेऊ या.''

''पण अगदी एकच ड्रिंक हं. मी जास्त वेळ नाही थांबू शकणार,'' ती घड्याळावर नजर टाकत म्हणाली. ''उद्या दिवसभर खूप गडबड आहे.''

''अर्थातच,'' मी हसून उगाच गप्पा मारत राहिलो. आपलं घर हाऊन्स्लोजवळ मुळीच नव्हतं, हे हिच्या लक्षात आलं नाही तर बरं, असं मी मनातल्या मनात म्हणत होतो.

''तू शहरात नोकरी करतेस का?'' मी म्हणालो.

''हो, बर्कली स्क्वेअरमध्ये एका इस्टेट एजंटच्या फर्ममध्ये मी रिसेप्शनिस्ट आहे.''

''तू मॉडेल कशी काय नाहीस, याचंच मला आश्चर्य वाटतं.''

''मी पूर्वी मॉडेल होते,'' एवढंच ती म्हणाली. तिने जास्त तपशील दिले नाहीत. मी कोणत्या रस्त्याने गाडी नेत होतो, याच्याशी तिला काहीही देणं-घेणं नव्हतं. ती सुटीला कुठे जाणार होती, काय करणार होती, याविषयीच मला सांगत होती. माझ्या घरी पोचल्यावर मी कार पार्क करून अमांडाला माझ्या फ्लॅटमध्ये घेऊन गेलो. घरात शिरताच तिच्या अंगातला कोट काढायला मी तिला मदत केली. तो हँगरला अडकवून ठेवून मी तिला पुढच्या खोलीत घेऊन गेलो.

''मग, कोणतं ड्रिंक आणू?'' मी म्हणालो.

''तुझ्याकडे वाईनची उघडलेली बाटली जर असेल, तर मग मी वाईनच घेईन,'' ती म्हणाली. तिने खोलीतच एक फेरफटका मारला. आज खोली नेहमीपेक्षा फारच लख्ख आवरलेली, नीटनेटकी होती.

''नक्कीच मातोश्री सकाळी चक्कर मारून गेलेल्या दिसतायंत,'' मी मनाशी म्हणालो. मी मनातल्या मनात सुटकेचा निःश्वास सोडला.

''ही माझी ब्रह्मचाऱ्याची मठी!'' मी मुद्दामच 'ब्रह्मचारी' शब्दावर जोर देत म्हणालो आणि किचनमध्ये गेलो. नशिबाने घरात न उघडलेली एक वाईनची बाटली होती. काही क्षणांत मी दोन ग्लास आणि ती बाटली घेऊन बाहेर आलो. ती माझ्या खोलीत मांडलेल्या बुद्धिबळाच्या पटाकडे आणि सोंगट्यांकडे निरखून पाहत होती. मी पोस्टाने बुद्धिबळाचा गेम खेळतो, त्यासाठीच मी तो पट आणि सोंगट्या तिथे मांडून ठेवल्या होत्या.

''किती सुंदर सेट आहे!,'' मी पुढे केलेला वाईनचा ग्लास हातात घेत ती म्हणाली. ''हा कुठून आणला?''

''मेक्सिकोहून,'' एवढेच मी तिला सांगितले. तिथे सुटीला गेलो असताना एका स्पर्धेत मी तो जिंकून आणला होता, याचा उल्लेख मी केला नाही. ''आपल्याला एक डाव टाकायला मिळत नाहीये, याचंच मला फार वाईट वाटतंय,'' मी म्हणालो.

त्यावर घड्याळाकडे नजर टाकत ती म्हणाली, ''तसा झटपट एखादा डाव खेळण्याइतका वेळ आहे.'' ती लगेच पांढऱ्या रंगाच्या सोंगट्या पुढ्यात घेऊन बसली. मी समोरच्या खुर्चीत बसलो. तिने समोरच पटावरचा काळा आणि पांढरा उंट घेऊन दोन्ही हातांनी स्वतःच्या पाठीमागे लपवून धरला. आधीच तिच्या अंगातला तो ड्रेस इतका तंग होता, तो आता अधिकच ताणला गेला. मग तिने दोन्ही हात पुढे घेऊन त्यांच्या बंद मुठी माझ्यासमोर धरल्या. मी तिच्या उजव्या हाताला स्पर्श करताच तिने ती मूठ उघडली. त्यातून पांढरा उंट निघाला.

''नुसतंच खेळायचं, का काही पणाला लावायचं?'' मी गमतीने हसून म्हणालो. तिने आपली पर्स उघडून एक नजर आत टाकली.

''माझ्याकडे जास्त पैसे नाहीयेत.''

''मग काहीही लावून खेळायची माझी तयारी आहे. कमीसुद्धा चालेल ना.'' ''तुझ्या मनात काय आहे?'' ती म्हणाली.

''तू मला काय देणार?''

''तुला काय आवडेल?''

''हे बघ, तू जर जिंकलीस, तर मी तुला दहा पौंड देईन.''

''आणि मी हरले तर?''

''मग तुझ्या अंगातलं काहीतरी काढून टाकायचं,'' मी पटकन बोलून गेलो. आता ती आपल्या श्रीमुखात भडकावून निघून जाणार, असे मला वाटत होते; पण ती सहजपणे म्हणाली, ''आपण फक्त एकच डाव खेळणार आहोत ना? मग फारसं काही बिघडत नाही.''

मी मान हलवून माझं लक्ष पटावर केंद्रित केलं. ती वाईट खेळत नव्हती. फक्त तिने जी पहिली चाल खेळली, ती अगदी परंपरागत होती. माझ्या प्रयत्नांमुळे आमचा डाव कसाबसा वीस मिनिटं तरी चालला. मी मुद्दामच माझी बरीच प्यादी मरू दिली; पण तिला संशय येणार नाही, याची काळजी घेतली. अखेर तिला हरवून मी विजयी मुद्रेनं म्हणालो, ''चेकमेट.'' त्यावर तिने पायातले बूट काढून जोरजोरात हसत लांब भिरकावले.

''अजून एखादं ड्रिंक घेणार का?'' मनातला आशाळभूतपणा आवाजात डोकावणार नाही, याची दक्षता घेत मी म्हणालो. ''अजून रात्रीचे अकरासुद्धा वाजलेले नाहीयेत.''

''ठीक आहे! पण अगदी छोटंसं हं आणि मग मी लगेच निघणार.''

मी किचनमध्ये जाऊन वाईनची बाटली घेऊन आलो. तिचा ग्लास पूर्ण भरला.

''हे काय? मला अर्धाच ग्लास हवा होता,'' ती कपाळावर आठी पाडत म्हणाली.

मी ते ऐकून न ऐकल्यासारखे करत म्हणालो, ''आता मी केवळ नशिबानं जिंकलो. तुझ्या उंटाने माझा घोडा घेतल्यावर खूप अवघड होतं हं जिंकणं.''

''कदाचित तसंही असेल,'' ती म्हणाली.

''अजून एक डाव टाकायचाय का?'' मी धीर करून म्हणालो.

ती जराशी घुटमळली.

''डबल ऑर क्विट्स?'' मी म्हणालो.

''म्हणजे? मला नाही कळलं,'' ती म्हणाली.

''वीस पाऊंड तरी, नाहीतर मग एक कपडा उतरवायचा.''

''आज रात्री आपण दोघंही फार जास्त हरणार नाही आहोत, हो ना?'' ती म्हणाली.

परत एकदा आम्ही डाव मांडून खेळायला बसलो.

दुसरा डाव जरा जास्त वेळ चालू राहिला; कारण मी सुरुवातीलाच एक घोडचूक केली आणि ती निस्तरायला बराच वेळ लागला; पण तरीही तीस मिनिटांच्या आतच मी हाही डाव संपवला आणि अमांडाचं लक्ष नसताना तिच्या ग्लासात वाईन ओतून तो काठोकाठ भरून ठेवला.

अमांडा माझ्याकडे पाहून हसली. तिने पायातले स्टॉकिंग्ज काढण्यासाठी तिचा ड्रेस बराच वर उचलला आणि हळुवारपणे पायातला एक-एक स्टॉकिंग काढून टेबलावर माझ्या बाजूला ठेवला.

''खरं म्हणजे या खेपेला मी तुझ्यावर जवळ जवळ मात करत आणली होती. थोडक्यात गेलं.''

''हो, खरंच. अगदीच थोडक्यात,'' मी लगेच मान्य केलं. ''मग काय? माझा पाडाव करण्याची एक संधी हवी आहे का तुला? आता या खेपेस आपण पन्नास पौंडांची बेट लावू.'' मी मुद्दामच मोठेपणाचा आव आणत म्हणालो.

''अरे बापरे! म्हणजे आपल्या दोघांनाही बरंच महाग पडणार तर हे प्रकरण,'' ती पटावर सोंगट्या परत नीट मांडत म्हणाली. 'तिच्या मनात नक्की काय चाललंय, कुणास ठाऊक,' असा विचार माझ्या मनात चमकून गेला. जे काय असेल ते असेल; पण डाव सुरू झाल्यावर अगदी थोड्याच वेळात तिने स्वतःचे दोन्ही हत्ती गमावले आणि अक्षरशः काही मिनिटांतच डाव संपला.

आता या खेपेस तिने आपला ड्रेस कमरेच्याही बराच वर केला. तिने काळा सस्पेंडर बेल्ट काढून माझ्या डोक्यावर धरला आणि हातातून टेबलावर पडू दिला. तो टेबलावरच्या स्टॉकिंग्जवर जाऊन विसावला.

''एकदा मी तो दुसरा हत्ती गमावल्यावर आता मी जिंकणं काही शक्य नाही, हे मला कळून चुकलंच होतं,'' ती म्हणाली.

''बरोबर आहे तुझं आणि म्हणूनच तुला जिंकण्याची अजून एक संधी द्यायला हवी,'' मी परत एकदा घाईघाईने पटावर सोंगट्या मांडत म्हणालो. ''आता जर तू जिंकलीस, तर तुला शंभर पौंड मिळतील.'' ती हसली.

तिने वजिराचे प्यादे दोन घरे पुढे सरकवले. ''खरंतर मला आता घरी जायला हवं,'' असं म्हणत तिने तिचे ते मोहक हास्य केले. मी त्यावर माझ्या उंटाचे प्यादे पुढे केले.

आजच्या दिवसभरात तिने जे काही डाव खेळले, त्यातला हा सर्वोत्कृष्टच म्हणावा लागेल. तिच्या कौशल्याने खेळलेल्या चालींमुळे अर्धा तास डाव चालू होता. काही वेळा तर तिचे डावपेच माझ्या लक्षात येत नव्हते. माझी गोंधळलेली अवस्था पाहून अमांडा गालातल्या गालात हसत होती; पण जरा वेळात मला एक कळून चुकलं. कार्पोव्हचा तो अत्यंत प्रसिद्ध सिसिलियन डिफेन्स तिला ठाऊक नव्हता. त्यामुळे माझे जिंकणे जवळपास अशक्य वाटत असताना मी चक्क जिंकलो.

''चेकमेट,'' मी अखेर म्हणालो.

तोंडातल्या तोंडात एक शिवी पुटपुटत ती उठून माझ्याकडे पाठ करून उभी राहिली. ''आता तुला माझी मदत करावी लागेल हं,'' ती म्हणाली.

मग मी वाकून अत्यंत सावकाश तिच्या ड्रेसची चेन हळुवार हातांनी खाली सरकवत आणली. तिच्या त्या गोऱ्यापान, मुलायम त्वचेला स्पर्श करण्याची मला अनिवार इच्छा झाली. चेन संपूर्णपणे उघडताच ती तोंड वळवून माझ्याकडे बघत उभी राहिली. नंतर तिने फक्त खांदे झटकून तो ड्रेस अंगावरून खाली घसरू दिला. तो अलगद तिच्या पावलापाशी थांबला. जणू काही एखाद्या पुतळ्याचंच अनावरण होत होतं. तिने पुढे वाकून माझ्या गालाला तिच्या हाताने अलगद स्पर्श केला. माझ्या संपूर्ण शरीरातून जणू विजेची लहर दौडत गेली. मी बाटलीमधली शिल्लक राहिलेली सर्व वाईन तिच्या ग्लासात ओतली. आतून स्वतःसाठी आणखी ड्रिंक आणण्याच्या निमित्ताने मी किचनमध्ये गेलो. मी परत आलो, तरी ती तशीच उभी होती. तिच्या अंगात लेसची काळी अंतर्वस्त्रं तेवढी शिल्लक होती. आता तीसुद्धा कधी उतरतील, असा विचार माझ्या मनात आला.

''आता अजून एक डाव टाकायचा नाहीये ना?'' मी म्हणालो. माझ्या मनातली अधीरता शब्दांत व्यक्त होऊ न देण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. ती जोरात खिदळत म्हणाली, ''मला घरी घेऊन चल ना! खूप उशीर झालाय.''

मी आणखी एकदा वाईनचा ग्लास भरून तिच्या हाती दिला. ''अजून एकच डाव खेळू यात ना,'' मी तिच्या विनवण्या करत म्हणालो. ''पण आता या खेपेला एकदम दोन्ही वस्त्रं हं.'' ती जोरात हसली. ''अजिबात नाही. आता हरणं मला परवडणार नाही.''

''अगं, आता शेवटचाच डाव,'' मी म्हणालो. ''पण दोनशे पौंडांची बेट आणि या वेळी तुझ्या राहिलेल्या दोन्ही वस्त्रांसाठी खेळायचं.''

एवढी मोठी रक्कम ऐकल्यावर तिला नक्की मोह पडेल, असा माझा अंदाज होता. ''आता या खेपेला तू जिंकण्याची फारच शक्यता आहे. अगं, या आधी तीनदा तू जवळ जवळ जिंकतच आली होतीस.''

तिने ग्लासातील वाईनचा एक घुटका घेत माझ्या प्रस्तावावर विचार केला. ''ठीक आहे. आता एक शेवटचा धक्का खाऊन पाहू या.''

आता या डावात जर ती हरली, तर त्याची परिणती पुढे कशात होणार, याविषयी आम्ही दोघांनीही बोलायचे टाळले.

परत एकदा बुद्धिबळाचा पट मांडताना माझे हात थरथरत होते. मी नीट विचार केला. 'आज रात्रभरात आपण फक्त एकच ग्लास वाईन पिऊन थांबलो आहोत, हे बहुधा हिच्या लक्षात आलेले दिसत नाही. आता हा डाव मात्र अगदी झटपट संपवायचा.'

मी वजिराचे प्यादे एक घर पुढे सरकवले. तिने त्यावर तिच्या राजाचे प्यादे एक घर पुढे सरकवले. आता पुढची चाल कोणती खेळायची, हे माझे अगदी पक्के ठरले होते. त्यानंतर बरोबर अकराव्या मिनिटाला डाव संपला असता.

माझ्या आयुष्यात बुद्धिबळाच्या खेळात इतका दारुण पराभव मला कधीच स्वीकारावा लागलेला नव्हता. आता माझ्याशी खेळत असलेली अमांडा काही वेगळीच होती. माझी पुढची चाल काय असेल, हे ती बिनचूक ओळखत होती. त्यावर तिच्या प्रतिचाली इतक्या जबरदस्त होत्या, की त्याबद्दल मी कधी कुठे वाचलेही नव्हते, की कुणाबरोबर खेळताना त्याचा अनुभवही घेतला नव्हता.

आता या खेपेस 'चेकमेट' म्हणण्याची पाळी तिची होती. तिचे नेहमीचे मोहक हास्य करतच तिने ते शब्द उच्चारले. ती असेही म्हणाली, ''नाहीतरी या खेपेला मी जिंकण्याची बरीच शक्यता आहे, असं तू म्हणालाच होतास.''

माझा अजूनही घडलेल्या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. मी मान खाली घातली. मी मान परत वर केली, तेव्हा तिने तो सुंदर काळा ड्रेस परत अंगात चढवला होता. आपले स्टॉकिंग्ज आणि सस्पेंडर्स ती आपल्या पर्समध्ये घालत होती. त्यानंतर तिने पायात बूट चढवले.

मी चेकबुक काढून 'अमांडा कर्झन' असं नाव लिहून दोनशे पौंडांचा चेक बनवला. त्यावर तारीख घालून सही केली. तोपर्यंत तिने माझा बुद्धिबळाचा पट परत होता तसा ठेवून त्यावर पूर्वीप्रमाणे सोंगट्या मांडून ठेवल्या. आम्ही खेळायला सुरुवात करण्यापूर्वी जी सोंगटी ज्या जागी होती, ती तशीच्या तशी तिने परत ठेवली.

तिने खाली वाकून माझ्या गालांवर अलगद ओठ टेकले. ''थँक यू,'' असे म्हणून तिने माझ्याकडून चेक घेऊन पर्समध्ये ठेवला. ''परत एकदा कधीतरी आपण खेळलं पाहिजे,'' ती म्हणाली. तिने अगदी हुबेहूब पहिल्यासारखा पट कसा काय मांडून ठेवला असेल, हे माझ्या ध्यानातच येत नव्हते. मी विस्फारित नजरेने, अविश्वासाने त्याकडे बघत होतो. एवढ्यात चटकन ती घराबाहेरसुद्धा पडली. तिने दार लावून घेतले.

''ए... थांब थांब,'' मी तिच्यामागे हाका मारत धावत सुटलो. ''अगं तू घरी कशी जाशील?'' मी कसाबसा धडपडत फ्लॅटच्या बाहेर आलो, तर ती जिन्यावरून वेगाने खाली पळत जात होती. रस्त्यावर एक आलिशान बी.एम.डब्ल्यू. कार तिचीच वाट बघत थांबली होती. तिचे दारसुद्धा उघडे होते. अमांडा गाडीत बसली. परत एकदा मला तिच्या घाटदार पायांचे दर्शन झाले. कारचे दार बंद करून घेत असताना तिच्या ओठांवर हसू होते.

अकाउंटंट अदबीने मागे फिरून ड्रायव्हरच्या बाजूला आला आणि आत शिरला. त्याने गाडी सुरू केली आणि त्या चॅम्पियन बाईसाहेबांना घरी घेऊन गेला.

(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या
'अ ट्विस्ट इन द टेल' या आगामी पुस्तकातून)

leena.n.sohoni@gmail.com

❖

बेस्ट सेलर्स

स्वामी

श्रीमान योगी

राधेय

पावनखिंड

ययाति

अमृतवेल

झोंबी

वपुर्झा

संभाजी

मृत्युंजय

छावा

युगंधर

रुचिरा भाग- १

रुचिरा भाग- २

डोंगरी ते दुबई

अदम्य जिद्द

टर्निंग पॉइंट्स

द मॅजिक ऑफ थिंकींग बिग

प्लेइंग इट माय वे

मी मलाला

द
क्लॅयू
क्रॉस

मूळ कथा : द ब्ल्यू क्रॉस
मूळ लेखक : जे. के. चेस्टरटन
अनुवाद : शुचिता फडके

छोटीशी काळी दाढी असलेला तो माणूस बोटीतून हार्विच बंदरावर उतरला. त्याच्या कोटाच्या खिशात बंदूक आहे हे लक्षात येत नव्हतं. युरोपमधल्या अत्यंत हुशार अशा काही माणसांपैकी तो आहे, हे समजण्यास वाव नव्हता. तो व्हॅलेंटिन होता; पॅरिस पोलीसचा मुख्य, जगातील सर्वाधिक प्रसिद्ध असा गुप्तहेर. ब्रुसेल्सहून लंडनला येण्यामागे त्याचा हेतू स्पष्ट होता. या शतकामधली सर्वांत महत्त्वाची अटक तो करणार होता. फ्लॅम्ब्यू इंग्लंडमध्ये येऊन पोहोचला होता. या कुप्रसिद्ध चोराला पकडण्यासाठी तीन देशांचे पोलीस प्रयत्नशील होते.

जगभरातून मोठ्या संख्येने पाद्री लंडनमध्ये संमेलनासाठी जमा झाले होते. या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर फ्लॅम्ब्यू नक्कीच काहीतरी कारनामे करेल असा व्हॅलेंटिनचा अंदाज होता. फ्लॅम्ब्यू अतिशय हुशार आणि निर्ढावलेला होता. शिवाय, त्याला इतरांची चेष्टामस्करी करायची विशेष आवड होती. एकदा तर एका पोलिसाला काखोटीला मारून तो 'रियू दि रिव्होली' मधून पळत सुटला होता.

पण फ्लॅम्ब्यूला शोधायचं कसं हा व्हॅलेंटिनसमोर मोठा प्रश्न होता. वेशभूषा करून स्वतःचं रूप पालटवण्यात फ्लॅम्ब्यूचा हातखंडा होता. एका गोष्टीत बदल करणं मात्र त्याला शक्य नव्हतं; दोन मीटरहून जास्त असलेली त्याची उंची. त्यामुळेच व्हॅलेंटिनची खात्री पटली होती की फ्लॅम्ब्यू त्याच्या बोटीवर नव्हता; अन्यथा त्याच्या उंचीमुळे तो नजरेत भरलाच असता.

त्याचप्रमाणे हार्विचहून लंडनला जाणाऱ्या ट्रेनमध्येदेखील फ्लॅम्ब्यू नव्हता, याबद्दलही व्हॅलेंटिनची खात्री पटली होती. पूर्ण प्रवासात जेमतेम सहा लोक गाडीत चढले. त्यापैकी एक बुटका धर्मगुरू होता. उरलेल्यांमध्ये बेताची उंची असलेले तीन शेतकरी, एक बुटकी स्त्री आणि एक अतिशय बुटका पाद्री होता. लंडनला जाण्यासाठी तो एसेक्सहून बसला होता.

त्याला पाहून आलेलं हसू व्हॅलेंटिननं मोठ्या कष्टांनी दाबलं होतं. त्या लहानखुऱ्या पाद्र्याचा चेहरा गोल होता. त्याच्या जवळ अनेक पार्सलं होती. शिवाय, त्याच्या हातात एक भली मोठी छत्रीदेखील होती, जी वारंवार खाली पडत होती. ते सगळं सांभाळणं त्याला कठीण झालं होतं. त्या विशिष्ट संमेलनासाठी अनेक पाद्री आपापल्या लहान-मोठ्या गावांमधून आणि शहरांमधून लंडनमध्ये जमणार होते हे नक्की. हा लहानखुरा पाद्री सगळ्यांना वारंवार सांगत होता, की त्याच्या अनेक पार्सलपैकी एकामध्ये निळी रत्नं जडवलेला खऱ्या चांदीचा दुर्मिळ असा क्रॉस होता, ज्याची अतिशय काळजी घेणं गरजेचं होतं.

लंडनच्या पूर्व भागातल्या स्ट्रॅटफोर्ड या स्टेशनवर उतरताना त्याची चांगलीच तारांबळ उडाली. सगळी पार्सलं सांभाळत कसाबसा तो उतरला खरा; परंतु छत्री राहिल्यामुळे त्याला पुन्हा डब्यात यावं लागलं. त्या वेळेस, आपल्या जवळ असलेल्या निळ्या रत्नांच्या चांदीच्या वस्तूबद्दल त्यानं कुणाला सांगू नये, अशी सूचना व्हॅलेंटिननं त्याला केली.

आपल्या या गुप्तहेराची नजर सगळीकडे भिरभिरत होती. किमान दोन मीटर उंचीची कोणी व्यक्ती आसपास दिसते आहे का, हे पाहण्यात

तो व्यस्त होता. मध्यवर्ती लंडनमध्ये ट्रेन आल्यावर व्हॅलेंटिन उतरला. तिथून त्यानं तडक लंडन पोलिसांना गाठलं आणि गरज पडल्यास मदत करायची विनंती केली. त्यानंतर तो फिरायला गेला.

एका शांत चौकात येताच तो अचानक थांबला. त्या चौकात रस्त्याच्या एका बाजूच्या काही इमारती इतर इमारतींपेक्षा चांगल्याच उंच होत्या. त्यांच्या मधोमध, रस्त्याला लागून एक लहानसं रेस्टॉरंट होतं. तिथे पोहोचायला काही पायऱ्या चढून जाव्या लागत होत्या. तिथेच उभं राहून सिगारेट ओढत व्हॅलेंटिन त्या रेस्टॉरंटचं निरीक्षण करू लागला. एखाद्या गुन्हेगाराच्या मागावर असताना हाती आलेल्या धाग्यादोऱ्यांनुसार व्हॅलेंटिन काम करत असे. काही सुगावाच लागला नसेल तर मात्र तो अंतःस्फूर्तीच्या आधारे पुढे काम करू लागे. कुठेतरी सुरुवात करणं गरजेचं असतं ना! हे छोटंसं, शांत रेस्टॉरंट पाहताच व्हॅलेंटिनला इथून तपासाला सुरुवात करावीशी वाटली. पायऱ्या चढून रेस्टॉरंटमध्ये प्रवेश करत त्यानं खिडकीजवळची खुर्ची पटकावली आणि कॉफी मागवली.

कॉफी आल्यावर त्यात साखर टाकून त्यानं कप तोंडाला लावला. 'अरेच्चा, साखरेऐवजी मी मीठ टाकलं वाटतं,' असं म्हणत त्यानं साखरेच्या वाटीकडे पाहिलं. ती तर साखरेचीच वाटी होती. या लोकांनी त्यात मीठ का ठेवलं असेल? शिवाय, त्याच्या टेबलवर दोन मिठाळं पण होती की! मग त्यात काय होतं? त्यानं चव घेऊन पाहिली. त्यात साखर होती.

त्यानं सभोवार नजर टाकली. तिथल्या पांढऱ्याशुभ्र भिंतीवर एक-दोन डाग पडलेले दिसत होते. ते ओले होते. नुकतेच पडले असावेत ते. त्याव्यतिरिक्त तिथे कुठलीही गोष्ट नजरेत भरण्यासारखी किंवा शंका घेण्यासारखी नव्हती. व्हॅलेंटिननं वेटरला बोलावून साखरेची चव घ्यायला सांगितली. अर्धवट झोपेत असलेला वेटर साखरेची चव घेताच खाडकन जागा झाला.

''सकाळी येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाची तुम्ही अशीच फजिती करता का?'' व्हॅलेंटिननं विचारलं.

त्यावर काय उत्तर द्यावं हे वेटरला सुचलं नाही. मग काहीतरी आठवून तो पटकन म्हणाला, ''नक्कीच ते दोन पाद्री असणार.''

''कोणते दोन पाद्री?'' व्हॅलेंटिननं विचारलं.

''ज्यांनी त्या भिंतीवर सूप फेकलं ते दोन पाद्री,'' वेटरनं उत्तर दिलं.

व्हॅलेंटिननं पुन्हा एकदा त्या ओलसर डागांकडे नजर वळवली.

''बऱ्याच वेळापूर्वी दोन पाद्री इथे येऊन सूप पिऊन गेले,'' वेटर सांगू लागला. ''त्या दोघांनी चकार शब्ददेखील उच्चारला नाही. त्यांपैकी एक जण बिल भरून तडक बाहेर पडला. दुसऱ्याला मात्र सगळ्या वस्तू गोळा करून बाहेर पडायला बराच वेळ लागला. त्यानं जेमतेम अर्धं सूप संपवलं होतं. इथून बाहेर पडण्याआधी अर्धा भरलेला सूपचा कप त्यानं चक्क भिंतीवर रिकामा केला. मी नेमका मागच्या खोलीत होतो. मी धावत इथे पोहोचेपर्यंत ते दोघंही निघून गेले होते. त्यांना गाठण्याचा बराच प्रयत्न मी केला; पण तोवर ते फार दूर गेले होते. कारस्टेअर्स स्ट्रीटच्या कोपऱ्याच्या पुढे ते जाऊन पोहोचले होते.''

हे ऐकताच गुप्तहेर झटक्यात उठून उभा राहिला. डोक्यावर हॅट ठेवून बिल देऊन पुढच्या क्षणी तो रेस्टॉरंटबाहेर पडला.

भरभर चालत तो पुढे निघाला. तो उत्तेजित झाला होता. घाईत होता. तरीदेखील त्याची नजर आजूबाजूचा सूक्ष्म वेध घेत होती. एका दुकानासमोर येताच तो झटक्यात थांबला. ते फळांचं दुकान होतं. दर्शनी भागात संत्री आणि सुका मेवा विकायला ठेवला होता. प्रत्येक वस्तूच्या बाजूला दरपत्रक लावलेलं होतं. सुका मेव्यामध्ये खोचलेल्या दरपत्रकावर लिहिलं होतं 'सर्वोत्तम संत्री, दोन पेनींना एक.' त्याचबरोबर, संत्र्यांमध्ये खोचलेल्या दरपत्रकावर लिहिलं होतं, 'सर्वोत्तम सुका मेवा, चार पेनींना एक पुडा.'

ती दरपत्रकं पाहून व्हॅलेंटिनच्या मनात आलं, की या पद्धतीचा जोक आपण आधी कुठेतरी अनुभवला आहे. दरपत्रकं उलटीसुलटी झाल्याचं त्यानं दुकानदाराच्या लक्षात आणून दिलं. त्यावर काही न बोलता दुकानदारानं ती दरपत्रकं पुन्हा नीट ठेवली. ''मी तुम्हाला एक प्रश्न विचारू शकतो का?'' व्हॅलेंटिन म्हणाला. ''जर एका दुकानातली दोन दरपत्रकं चुकीच्या जागी ठेवली असतील तर लंडनला सुट्टी घालवायला आलेल्या एखाद्या पाद्र्याच्या हॅटशी त्याचं काय नातं बरं? किंवा मग असं म्हणू यात, की सुक्या मेव्याला संत्री म्हटलं जातंय हे पाहून मला एका उंच आणि दुसऱ्या बुटक्या पाद्र्याच्या जोडीची आठवण का यावी बरं?''

हे ऐकताच दुकानदार चिडून म्हणाला, ''तुम्ही त्या दोघांचे मित्र आहात का? असाल तर त्यांना सांगा, की पुन्हा जर त्यांनी माझी सफरचंदं सांडवली तर मी त्यांची डोकी फोडेन!''

''काय? त्यांनी तुमची सफरचंदं सांडवली?'' गुप्तहेरानं विचारलं.

''हो, त्या दोघांपैकी एकानं सांडवली,'' दुकानदारानं उत्तर दिलं.

''कोणत्या रस्त्यानं गेले ते?'' व्हॅलेंटिननं विचारलं.

''डाव्या हाताचा तो पलीकडचा रस्ता दिसतोय ना, तिथून पुढे जाऊन त्यांनी मग तो चौक ओलांडला,'' दुकानदारानं म्हटलं.

''धन्यवाद,'' त्याचे आभार मानत व्हॅलेंटिन तिथून घाईघाईनं निघाला. दुसऱ्या चौकाच्या पलीकडे पोहोचल्यावर त्याला तिथे एक पोलीस दिसला. ''तुम्ही दोन पाद्र्यांना पाहिलंत का?''

त्यावर हसून पोलिसानं उत्तर दिलं, ''सर, पाहिलंय मी त्यांना. त्यांपैकी एकाच्या हातातल्या वस्तू सारख्या पडत होत्या.''

''कोणत्या दिशेनं गेले ते दोघं?'' व्हॅलेंटिननं विचारलं.

''पलीकडे त्या पिवळ्या बस दिसतायत ना, त्यातून गेले ते. त्या बस हॅम्पस्टीडला जातात,'' पोलिसानं तत्परतेनं माहिती पुरवली.

मग व्हॅलेंटिननं त्याला आपली ओळख करून देत म्हटलं, ''हे पहा, तुमच्या दोन सहकाऱ्यांना बोलवून घ्या आणि पटकन माझ्याबरोबर चला.''

अवघ्या दोन मिनिटांत एक इन्स्पेक्टर आणि एक गुप्तहेर तिथं येऊन पोहोचले. आल्या आल्या इन्स्पेक्टरनं विचारलं, ''सर, नेमकं काय झालं आहे?''

''हे पाहा, बसमध्ये बसल्यावर मी तुम्हाला सगळं सविस्तर

अलवार भाषा, शब्दांवरची हुकूमत आणि अर्थगर्भ आशयाचा महामेरु

वि. स. खांडेकरांचं शब्दधन...



ययाति



अमृतवेल

सुखाचा शोध



पहिले प्रेम



रिकामा देव्हारा

जळालेला मोहर

क्रौंचवध

अश्रू

दोन ध्रुव

चंदेरी स्वप्ने

हिरवा चाफा

पांढरे ढग

अश्रू आणि हास्य

अजून येतो वास फुलांना

गोकर्णीची फुले

वन्हि तो चेतवावा

दोन मने

सोनेरी स्वप्नं-भंगलेली

सर्व पुस्तके eBooks स्वरूपात उपलब्ध

नवं कोरं

थरथरत्या हातांमुळे पियानो नीट हाताळता येत नसलेला बाटलीबॉय...मेल्या मनातही माणूसपण जपणारी कोठ्यावरची थुल्ली...एकेका अनुभवाचं तरल, आशयघन चित्रण करणाऱ्या कथा

द मॅड तिबेटियन

गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!

लेखक : दीप्ती नवल

अनुवाद : सुनंदा अमरापूरकर

पृष्ठसंख्या : १३६ । किंमत : १५०/-



पृष्ठसंख्या : २१२ । किंमत : २२०/-

नवं कोरं

जीवघेण्या अपघातातल्या अपंगत्वाला आव्हान देत, तगून राहण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती लाभलेल्या लॉरेनची विलक्षण कहाणी.

एक लढा असाही...

लेखक : लॉरेन स्क्रग्ज

अनुवाद : प्रणव सखदेव

सांगतो,'' व्हॅलेंटिन म्हणाला.

बसच्या वरच्या मजल्यावरच्या आसनांवर बसल्यावर इन्स्पेक्टर म्हणाले, ''टॅक्सीनं लवकर पोहोचलो असतो आपण.''

''बरोबर आहे तुमचं म्हणणं,'' व्हॅलेंटिन म्हणाला. ''पण कसं आहे ना, आपल्याला कुठे जायचंय हेसुद्धा माहिती नाही. नेमकं काय करायचं आहे, हे आपण ठरवलेलं नाही. तूर्तास आपण नजरेला काही वेगळं किंवा विचित्र दिसतंय का तेवढंच शोधायचा प्रयत्न करू.''

''वेगळं किंवा विचित्र? म्हणजे नेमकं काय?'' इन्स्पेक्टरच्या या प्रश्नाला उत्तर देताना व्हॅलेंटिन म्हणाला,

''कुठलीही वेगळी किंवा विचित्र गोष्ट.''

शहराच्या उत्तर भागातील रस्त्यांवरून ती पिवळी बस संथ गतीनं जात होती. आपला फ्रेंच गुप्तहेर एक शब्दही न बोलता निरीक्षणात गढला होता. लंचटाईम झाला आणि संपला. ते लांब रस्ते अधिकच लांबलचक वाटू लागले. आता कोणीच काही बोलत नव्हतं. व्हॅलेंटिनची नजर सर्वदूर वेध घेत होती. एव्हाना दुसऱ्या दोघांना चक्क झोप लागली होती.

''ते पाहा!'' अचानक व्हॅलेंटिन ओरडल्यामुळे ते खडबडून जागे झाले. व्हॅलेंटिन बसमधून उतरला. त्याच्या पाठोपाठ ते दोघंही उतरले. काय चाललं आहे ते दोघांनाही कळेना. ''इथे एक खिडकी फुटली आहे.'' समोरच्या रेस्टॉरंटकडे बोटाने इशारा करत व्हॅलेंटिन म्हणाला. खरंच, एका मोठ्या खिडकीच्या काचेच्या तावदानाला मध्यभागी चांगलंच मोठं भोक पडलं होतं.

''पण या फुटलेल्या खिडकीचा त्या दोघांशी संबंध आहे हे आपण कशावरून ठरवणार?'' इन्स्पेक्टरनं विचारलं.

त्यावर व्हॅलेंटिन रागावून म्हणाला, ''कशावरून म्हणजे? आपल्याला समजणं शक्य नाही; पण तुमच्या लक्षात येत नाही का, की एकतर आपण प्रत्येक सुगाव्याचा मागोवा घेतला पाहिजे. नाहीतर चुपचाप घरी जाऊन झोपलेलं बरं.''

आता ते तिघंही समोरच्या रेस्टॉरंटमध्ये शिरले. तिथे जाऊन त्यांनी एक छोटं टेबल पटकावलं आणि जेवण मागवलं. फुटलेल्या खिडकीकडे व्हॅलेंटिनची नजर पुन्हा पुन्हा वळत होती; परंतु त्यातून त्याच्या ज्ञानात कुठलीही भर पडत नव्हती.

बिलाचे पैसे देताना तो वेटरला म्हणाला, ''खिडकीची काच फुटली आहे.''

''हो सर,'' वेटरनं उत्तर दिलं. ''मोठा विचित्र प्रकार घडला आज.''

''काय झालं ते सांग बरं मला.''

''हे पाहा, दोन पाद्री आत आले,'' वेटरनं सांगायला सुरुवात केली. ''सध्या इथे अनेक देशांतले पाद्री जमा झाले आहेत; त्यांपैकीच ते दोन असणार. आल्यावर त्यांनी अगदी स्वस्तातले पदार्थ मागवले. खाऊन झाल्यावर एकानं पैसे दिले आणि तो बाहेर पडला. दुसरासुद्धा त्याच्या पाठोपाठ जाऊ लागला. एवढ्यात माझ्या काहीतरी लक्षात आलं. पुढे होत त्या दुसऱ्याला थांबवून हातातलं बिल दाखवत मी म्हटलं, ''तुम्ही खूप जास्त पैसे दिले आहेत; पण खरं नवल पुढे आहे.''

''म्हणजे? मला नाही समजलं.'' व्हॅलेंटिन म्हणाला.

''जेमतेम चार शिलिंगच बिल झालं होतं; पण अचानक तिथे चारऐवजी चौदा शिलिंग ठेवलेले मला दिसले.'' वेटरनं पुढे सांगितलं.

''बरं, मग?''

''दारापाशी पोहोचलेल्या पाद्र्यानं वळून म्हटलं की, 'काचेचे पैसे वळते कर त्यातून.' त्याच्या बोलण्याचा अर्थ न कळल्यामुळे मी विचारलं, 'कुठली काच?' त्यावर तो म्हणाला, 'जी मी आता फोडणार आहे.' असं म्हणून हातातल्या छत्रीनं त्यानं ही काच फोडली. त्याला पकडायला मी त्याच्यामागे धावलो; पण तोवर ते दोघे जवळ जवळ नजरेआड झाले होते. ते इतक्या भराभर बुलक स्ट्रीटला पोहोचले, की मला त्यांना गाठता आलं नाही.''

''बुलक स्ट्रीट!'' असं म्हणत व्हॅलेंटिननं समोरच्या रस्त्याकडे धाव घेतली. तो पाद्र्यांच्या ज्या दुक्कलीचा मागोवा घेत होता ते दोघं त्याच दिशेनं गायब झाले होते. त्यांचा पुढचा प्रवास अरुंद अंधाऱ्या गल्लीतून सुरू झाला. 'आता आपण हॅम्प स्ट्रीटवर निघू.' इन्स्पेक्टरच्या मनात आलं. अचानक व्हॅलेंटिन एका छोट्याशा मिठाईच्या झगमगत्या दुकानापुढे थांबला. क्षणभर बाहेर थांबल्यावर आत शिरून त्यानं चॉकलेट विकत घेतलं. तिथल्या महिला विक्रेतीला तो काही प्रश्न विचारणार इतक्यात तिनंच आधी तोंड उघडलं.

त्याच्या मागे असलेल्या इन्स्पेक्टरला पाहून ती पटकन म्हणाली, ''तुम्ही जर पोलीस असाल तर तुम्ही नक्कीच त्या पार्सलसाठी आले असणार. मी ते आधीच परत दिलं आहे.''

''पार्सल!'' व्हॅलेंटिन म्हणाला.

''हो, त्या पाद्र्यानं जे पार्सल इथं ठेवून दिलं होतं,'' त्या स्त्रीनं स्पष्टीकरण दिलं.

''काय झालं ते पटकन आणि सविस्तर सांगा आम्हाला.''

''साधारणतः अर्ध्या तासापूर्वी ते इथं आले होते,'' तिनं सांगायला सुरुवात केली. त्यांनी थोडीशी मिठाई विकत घेतली आणि मग ते हीथच्या दिशेनं निघाले. त्यानंतर काही क्षणांतच त्या दोघांपैकी एक जण धावतपळत दुकानात आला. 'मी एखादं पार्सल विसरलो आहे का?' असं त्यानं मला विचारलं. मी इकडेतिकडे बघितलं; पण मला काही दिसलं नाही. त्यावर तो म्हणाला, 'असू दे, काही हरकत नाही; पण जर तुम्हाला ते पार्सल सापडलं तर कृपा करून या पत्त्यावर पाठवा,' असं म्हणून त्यानं तो पत्ता आणि एक शिलिंग माझ्या हातात ठेवला. तो गेल्यावर मी पुन्हा सगळीकडे नीट पाहिलं. त्या वेळेस मला ते पार्सल दिसलं. त्यानं दिलेल्या पत्त्यावर मी ते पाठवून दिलं. तो पत्ता काही मला आता आठवत नाही. वेस्टमिन्स्टरमधला कुठला तरी भाग होता तो.''

''हॅम्पस्टीड हीथ इथून जवळ आहे का?'' व्हॅलेंटिननं विचारलं.

''इथून सरळ चालत गेलात की पंधराव्या मिनिटाला पोहोचाल तिथे,'' त्या स्त्रीनं माहिती पुरवली.

त्यानंतर एक क्षणही न दवडता व्हॅलेंटिननं त्या रस्त्यावर झपाझप चालायला सुरुवात केली. बाकीचे देखील त्याच्यामागे निघाले.

संध्याकाळच्या सावल्या उतरू लागल्या होत्या. हीथपाशी पोहोचल्यावर व्हॅलेंटिनला दूर अंतरावर दोन जण दिसले. यांच्याच तर शोधात होता तो.

इतक्या दुरूनही व्हॅलेंटिनच्या लक्षात आलं, की त्यांच्यातला एक जण बुटका होता. दुसऱ्याची उंची नक्कीच दोन मीटरहून जास्त भरली असती. व्हॅलेंटिननं चालण्याची गती वाढवली. त्यांच्यातलं अंतर कमी होऊ लागलं. त्या बुटक्या माणसाला बघताच व्हॅलेंटिनला जरी थोडंसं आश्चर्य वाटलं तरी त्याला अंधूकशी कल्पना होती. त्याच्या अंदाजाप्रमाणे तो बुटका माणूस म्हणजे दुसरं तिसरं कोणी नसून त्याच्याबरोबर हार्विचच्या ट्रेनमधून उतरलेला पाद्री होता. हा तोच होता जो आपल्या पार्सलबद्दल सगळ्यांना भरमसाट माहिती देत सुटला होता.

त्या दिवशी सकाळीच व्हॅलेंटिनला समजलं होतं, की एसेक्सहून कोणी एक फादर ब्राऊन एक क्रॉस घेऊन येणार आहेत. हा क्रॉस अतिशय जुना, दुर्मिळ, चांदीचा आणि मौल्यवान रत्नं जडविलेला असल्यानं त्याचं मूल्य करणंदेखील अशक्य होतं. लंडनमध्ये येणाऱ्या काही परदेशी पाद्र्यांना फादर ब्राऊन तो क्रॉस दाखविणार होते. व्हॅलेंटिनला खात्री होती, की ज्याप्रमाणे त्याला या ब्ल्यू क्रॉसची माहिती मिळाली आहे त्याप्रमाणे ती फ्लॅम्ब्यूलादेखील मिळाली असणार. त्यामुळे फ्लॅम्ब्यू तो क्रॉस चोरण्याचा प्रयत्न नक्की करणार. म्हणूनच पाद्र्याच्या वेशभूषेतल्या फ्लॅम्ब्यूला पाहून व्हॅलेंटिनला आश्चर्य वाटलं नाही; मात्र त्या दोघांचा माग काढताना रस्ताभर विखुरलेल्या खुणांचा अर्थ त्याला लागत नव्हता. भिंतीवर उडालेलं सूप, सुका मेव्याची आणि संत्र्यांची झालेली अदलाबदल आणि ते फुटलेलं तावदान.

आता ते दोघं हीथच्या अंतर्भागात पोहोचले होते. व्हॅलेंटिन आणि त्याच्या सोबत्यांनी त्यांचा पाठलाग सुरू ठेवला. मध्येच काही क्षण ते दोघं दिसेनासे झाले. त्यानंतर ते एका बेंचवर एकमेकांशी गंभीर चर्चा करताना व्हॅलेंटिनच्या नजरेस पडले. चाहूल लागू न देता व्हॅलेंटिन आणि त्याचे सोबती तिथल्या झाडामागे लपून त्या दोघांचं बोलणं ऐकू लागले.

आपला संशय खरा आहे की नाही याबद्दल पहिल्यांदाच व्हॅलेंटिनच्या मनात शंका उत्पन्न झाली; कारण ते दोन्ही पाद्री अतिशय शांतपणे चर्चबद्दलच्या त्यांच्या कल्पनांची देवाणघेवाण करत होते. आपल्या सोबत आलेले दोन्ही हेर आपल्याला हसत असणार याची व्हॅलेंटिनला खात्री झाली. एवढी यातायात करून, इतकं अंतर तुडवून इथपर्यंत आल्यानंतर त्यांच्या हाती काय लागलं होतं तर एकमेकांशी गप्पा मारणारे दोन वयस्कर, प्रेमळ पाद्री!

फादर ब्राऊन म्हणाले, ''चांदण्या पाहिल्यात का? जणू आकाशात चमकणारी रत्नंच. मला नेहमी वाटतं, की पृथ्वीव्यतिरिक्त असलेल्या इतर जगांमध्येदेखील काही ना काही कारणमीमांसा आणि चांगुलपणा असणार.'' आपण आता इथून निघावं हे बरं, असा विचार व्हॅलेंटिनच्या मनात आला. तितक्यात उंच पाद्री बोलू लागला. त्याचे शब्द ऐकून व्हॅलेंटिन जागेवरच थांबला.

''चांदण्यांमागचं गूढकोणाला कळणार आहे?'' अतिशय शांत स्वरात तो पुढे म्हणाला, ''मुकाट्याने मला तो चांदीचा क्रॉस दे. आपल्या दोघांशिवाय इथे कुणीही नाही. मी तुझे तुकडे तुकडे केले तरी कुणाला कळणार नाही.''

यावर तो बुटका पाद्री काहीही न बोलता आकाशातल्या चांदण्यांवर नजर खिळवून बसला. एकतर त्याला उंच पाद्र्याचं बोलणं कळलं नसावं किंवा मग भीतीमुळे त्याला काही सुचत नसावं.

''कळलं नाही का?'' उंच पाद्री खर्जात म्हणाला. ''मी फ्लॅम्ब्यू आहे. चल, दे मला तो क्रॉस.''

''नाही,'' त्या बुटक्या पाद्र्यानं उत्तर दिलं.

अचानक फ्लॅम्ब्यू जोरात हसला. ''अरे बुटक्या पाद्र्या, मला माहिती आहे, की तू मला तो क्रॉस देऊ शकत नाहीस; कारण तो आधीच माझ्या खिशात आहे.''

त्याच्याकडे रोखून पाहत त्या बुटक्या पाद्र्यानं शांतपणे विचारलं, ''तशी तुझी खात्री आहे का?''

फ्लॅम्ब्यू पुन्हा हसला. ''अरे, मूर्ख माणसा, अगदी खात्री आहे. तुझ्याजवळच्या अनेक पार्सलपैकी ब्ल्यू क्रॉस कोणत्या पार्सलमध्ये आहे हे मला माहीत होतं आणि म्हणूनच मी त्या पार्सलची हुबेहूब नक्कल केली. त्यामुळे मित्रा, आत्ता तुझ्या ताब्यात जे पार्सल आहे ते नकली आहे. असली रत्नांचा क्रॉस असलेलं पार्सल माझ्याजवळ आहे. फादर ब्राऊन, मी अगदी हातोहात काम साधलं आहे. मला हवं ते पार्सल अगदी चुटकीसरशी मिळवलं आहे.''

हे ऐकूनही फादर ब्राऊनला काळजी वाटली नाही. ''बरोबर आहे तुझं. अगदी सहज जमलं असेल तुला. वर्षानुवर्षं अशा नकली पार्सलचा उपयोग करणाऱ्या एका इसमाची मला आठवण होते आहे. तुझ्याबद्दल मी विचार करू लागलो त्या क्षणी मला त्याची आठवण आली.''

''माझ्याबद्दल विचार?'' फ्लॅम्ब्यू म्हणाला. ''माझ्याबद्दल कधी विचार करायला लागलास तू? मी जेव्हा तुला हीथपर्यंत घेऊन आलो तेव्हा?''

''नाही, नाही,'' फादर ब्राऊन म्हणाले. ''आपण जेव्हा पहिल्यांदा भेटलो ना तेव्हा. तुझ्या कोटाच्या बाहीमध्ये जिथे तू नेहमी सुरा लपवतोस तिथे दडवलेला एक छोटा आकार माझ्या लक्षात आला.''

''तुला कसं कळलं ते?'' फ्लॅम्ब्यू आश्चर्यानं ओरडला.

''मी जेव्हा हार्टल्पूलमध्ये पाद्री होतो तेव्हा तिथे तीन माणसं यायची. ते नेहमी त्यांच्याजवळचे सुरे अशाच प्रकारे लपवायचे,'' फादर ब्राऊन सांगू लागले. ''मी तुझ्यावर लक्ष ठेवून होतो. तू पार्सल बदललेलं मी पाहिलं. त्यानंतर मी पुन्हा पार्सल बदललं. जे योग्य पार्सल होतं ते मी मागेच सोडून आलो.''

''मागे सोडून आलास?'' फ्लॅम्ब्यू अविश्वासानं म्हणाला.

''मी त्या मिठाईच्या दुकानात परत गेलो,'' फादर ब्राऊन समजावून सांगू लागले. ''माझं काही पार्सल राहिलं आहे का, असं मी त्या स्त्रीला विचारलं. ते पार्सल सापडलं तर कुठल्या पत्त्यावर पाठवायचं तेही तिला सांगितलं. मुळात मी कुठलंही पार्सल विसरलो नव्हतो; परंतु मी जेव्हा तिथं दुसऱ्यांदा गेलो तेव्हा मी मुद्दाम ते विशिष्ट पार्सल सोडून आलो. ते

तिनं वेस्टमिन्स्टरमधल्या माझ्या मित्राकडे पोस्टानं पाठवून दिलं आहे.'' फादर ब्राऊनचा स्वर आता जड झाला होता. ''ही युक्तीदेखील मी हार्टल्पूलमधल्या एका माणसाकडून शिकलो. तो रेल्वेस्टेशनवरच्या हॅन्डबॅग्ज चोरताना ही युक्ती वापरायचा; पण आता तो प्रामाणिकपणे जीवन जगतो आहे. तुला तर माहिती आहे ना की पाद्र्यासमोर सगळे जण मन मोकळं करतात.''

हे ऐकताच फ्लॅम्ब्यूनं रागारागानं आपल्या खिशातून पार्सल काढून ते उघडलं. त्यामध्ये केवळ कागद आणि दगड ठासून भरले होते. संताप असह्य होऊन तो ताडकन उठला आणि ओरडू लागला, ''हे बघ, माझा तुझ्यावर जराही विश्वास नाहीए. माझी खात्री आहे, की तो ब्ल्यू क्रॉस तुझ्याच जवळ आहे. काय वाट्टेल ते झालं तरी मी तो तुझ्याकडून काढून घेणार आहे.''

त्यावर जराही न घाबरता फादर ब्राऊन उठून उभे राहत म्हणाले, ''नाही. तू ते माझ्याकडून घेऊ शकत नाहीस. सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे ते पार्सल माझ्याकडे नाहीये. शिवाय, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे इथं आपण दोघंच नाही आहोत. दोन तगडे पोलीस आणि आजमितीला पृथ्वीतलावरचा सगळ्यात हुशार असा गुप्तहेर या झाडामागे लपला आहे. आता तू म्हणशील, की ते आले कसे आपल्या मागे? मग ऐक तर; मी सांगतो तुला. तू चोर आहेस याची मला शंभर टक्के खात्री होती. म्हणून मी काही छोट्या छोट्या गोष्टी करून पाहिल्या. कॉफीत साखरेच्या ऐवजी मीठ असल्यास कोणीही पटकन सांगतं. त्याऐवजी तो गप्प बसला तर समजावं इथं नक्की काहीतरी पाणी मुरतंय. मी साखर-मिठाची अदलाबदल केली तरी तू गप्प बसलास. समजा, हॉटेलमध्ये गेल्यावर बिल वाजवीपेक्षा जास्त आलं, की कुणीही तसं बोलून दाखवतं. तसं झालं नाही तर समजावं की काहीतरी गोम आहे. मी तुझ्या बिलाची रक्कम मुद्दाम वाढवली. तरीही तू ती भरलीस.''

काय बोलावं हे न सुचून फ्लॅम्ब्यू उभा राहिला. ''पोलीस आपल्या मागावर येत आहेत याबद्दल मला खात्री करून घ्यायची होती.'' फादर ब्राऊन पुढे सांगू लागले. ''म्हणूनच जिथे जिथे आपण गेलो त्या प्रत्येक ठिकाणी लोक आपल्याबद्दल बोलतील अशी एखादी कृती मी केली. हॉटेलच्या भिंतीवर सुपाचा डाग, सफरचंदं सांडवणं, फुटलेली खिडकी; तसं पाहिलं तर फार छोट्या छोट्या गोष्टी होत्या या सगळ्या; पण मी ब्ल्यू क्रॉस तुझ्यापासून वाचवला.''

''तुम्हाला हे सगळं कसं माहिती?'' फ्लॅम्ब्यूनं अविश्वासानं विचारलं.

त्या साध्यासुध्या दिसणाऱ्या वयस्कर पाद्र्याच्या वाटोळ्या चेहऱ्यावर हसू उमटलं. ''कसं आहे ना, मी आहे आपला साधासुधा पाद्री, म्हणून समजलं असेल कदाचित. अनेक गुन्हेगार माझ्यासमोर आपली पापं कबूल करतात. त्यातून काही ना काही शिकायला मिळणारच ना.''

झाडामागे लपून बसलेले ते तिघंही जण आता पुढे झाले.

आपला पराभव झाला आहे हे ओळखण्याइतका फ्लॅम्ब्यू चाणाक्ष होता. शिवाय, चोर असूनही तो नम्रपणाबद्दल प्रसिद्ध होता. व्हॅलेंटिनकडे बघत हसून त्यानं डोक्यावरची हॅट काढली.

''माझ्या मित्रा,'' व्हॅलेंटिन म्हणाला. ''माझ्यासाठी हॅट काढू नको. खरंतर आपण दोघांनी फादर ब्राऊनबद्दल आदर दाखविला पाहिजे.''

त्यानंतर त्या दोघांनीही फादर ब्राऊनकडे बघत डोक्यावरची हॅट काढली. एसेक्सचा तो लहानखुरा पाद्री मात्र आपली छत्री शोधण्यात दंग होता.

inhousework.phadke@gmail.com

❖

२ री आवृत्ती

अतिशय सहजपणे सांगितलेलं ... गुंतागुंतीचं कथानक...
निराश्रितांच्या दुनियेचा एक हृदय हेलावून टाकणारा शोध...

द स्ट्रीट लॉयर

लेखक : जॉन ग्रिशॅम । **अनुवाद :** शीला कारखानीस

पृष्ठसंख्या : ३७२ । किंमत : ४००/-



नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

मेहता मराठी ग्रंथजगत

'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकास मिळालेले पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषद अ.स. गोखले स्मृत्यर्थ **'रत्नाकर पुरस्कार' २००९,**
मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने **'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २००९, 'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २०११,**
रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्यनगर तर्फे
'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०१०, 'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०११,
नंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय **'नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार २०१०'**

३ वर्षांची वर्गणी ₹ ३५० **५ वर्षांची वर्गणी ₹ ५००**

३ वर्षांची वर्गणी ₹ ३०० 'मेहता मराठी ग्रंथजगत' डिजिटल अंक **५ वर्षांची वर्गणी ₹ ४००**

वर्गणीदारांना आमची सर्व पुस्तके सवलतीत मिळतील.

पोस्टखर्चासह रक्कम मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा पाठवावी.

लवकरच वर्गणीदार व्हा व सवलतीचा लाभ घ्या

तीन वर्षांना	आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत	पाच वर्षांना
२५%		३०%

मा|स्ट|र्स | स्ट्रो|क्स

गूढकथांचे 'मतकरी' मॉडेल

मुकेश माचकर

रत्नाकर मतकरी हे भाग्यवान लेखक आहेत.

ते गूढकथा, संदेहकथा, भयकथा लिहितात... त्या अतिशय लोकप्रिय होतात... तरीही त्यांना साहित्यिक म्हणून मान आहे... हा मान केवळ ते अग्रगण्य नाटककार, कथाकार, कादंबरीकार आहेत म्हणूनच नाही; तर त्यात त्यांच्या गूढकथा लेखनालाही मानाचं स्थान आहे, म्हणजे सुखद आश्चर्याची परमावधी.

मराठी साहित्यात तर हा चमत्कारच मानायला हवा.

अतीव लोकप्रिय आणि तरीही साहित्याच्या तथाकथित मुख्य प्रवाहाकडून कमालीचा दुर्लक्षित असा हा साहित्यप्रकार मतकरींना कसा काय 'लाभला,' हे एक कोडेच आहे.

कारण, तुम्ही मराठी गूढकथा, संदेहकथा, भयकथा, रहस्यकथा वाचता का, असा प्रश्न एखाद्या बऱ्यापैकी वाचन असलेल्या वाचकाला विचारला, तर त्याच्या विवाहबाह्य गर्लफ्रेंडचं नाव विचारल्यासारखा किंवा आपणच त्याला ते सांगितल्यासारखा तो चमकून बघेल, गोरामोरा होईल. पिवळी पुस्तके वाचता का, नेटवर पोर्नोग्राफी पाहता का, अशातला एखादा प्रश्न विचारला गेला असावा, अशा रीतीने लाजेने लालबुंद होऊन तो शरमेने खाली पाहू लागेल. आपल्या इतक्या वर्षांच्या वाचनतपस्येला हेच का फळ, अशी वैषम्ययुक्त भावना त्याच्या चेहऱ्यावर स्वच्छ दिसेल.

मराठी गूढकथा, रहस्यकथा किंवा भयकथांची व्याख्या करायची झाली तर सुजाण मराठी वाचकाला ज्यांच्या उल्लेखानेही भय वाटतं अशा कथा, अशी एक व्याख्या करायला हरकत नाही. आता या वर्णनावरून एखाद्याला वाटेल की अशा कथांचा मराठीतला प्रवाह फार क्षीण असावा आणि त्यांना वाचकपसंती बिलकूलच लाभत नसावा; तर तीही गत नाही. हा अतिशय वाचकप्रिय असाच लेखनप्रकार आहे. 'नवल', 'धनंजय' यांच्यासारखे, वर्षानुवर्षे निव्वळ याच प्रकारच्या साहित्याला वाहिलेले दर्जेदार दिवाळी अंक उत्तमपैकी खपतात. गूढकथा, रहस्यकथा, संदेहकथांच्या पुस्तकांना लायब्ऱ्यांमध्ये मोठा उठाव असतो. चटपटीत आणि रोचक वाचनासाठी, दोन घटकांच्या विरंगुळ्यासाठी आणि थरारक मनोरंजनासाठी वाचक ही पुस्तकं आवर्जून घेतात.

म्हणजे या प्रकारच्या लेखनाला हमखास लोकप्रियता मिळते.

मग अडचण काय आहे?

लोकप्रियता हीच ती अडचण आहे.

मराठीतच नव्हे, तर जगभरातल्या साहित्यात, लोकप्रियता आणि दर्जा यांचं प्रमाण व्यस्त आहे, असं मानलं जातं. ते काही अंशी खरेही आहे. एका अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये कोट्यवधी रुपयांची ग्रंथविक्री झाल्याच्या बातम्या आल्या होत्या. त्यात सर्वाधिक खपलेले पुस्तक होते-कुत्र्याची निगा कशी राखावी, या विषयावरचे. नाना देव-देवींची व्रते, मध्ययुगीन पोथ्या, पंचांगे, भविष्य सांगणारे किंवा पालटून देणारे चमत्कारी लेखक, वास्तुशास्त्र अशा स्वरूपाच्या उपयोजित विषयांवरच्या पुस्तकांचा खप तडाखेबंद

असतो. शिवाय, आजकाल मराठीजनांनी व्यावसायिक बनून खूप पैसा कमावण्याचे वगैरे मनावर घेतलेले आहे. व्यावसायिक बनणारा माणूस थेट धंदा करतो; धंदा कसा करावा याची पुस्तके वाचत नाही, हे त्याला कुणी सांगितलेले नाही. त्यामुळे, धंदा कसा करावा, हसावे कसे, मजेत कसे जगावे, शिव्या कशा द्याव्यात, कसे भांडावे, हे सगळे ज्यांना शिकावे लागते, असे लोक खूप आहेत आणि ते शिकवणारी पुस्तके खूप खपतात. अशा प्रकारचे कमअस्सल साहित्य खूप खपते. त्यामुळे वाचकसंख्येच्या बाबतीत तोळामासाच प्रकृती असलेल्या साहित्याच्या मुख्य प्रवाहाने त्याचा सोयीस्कर, सोपा व्यत्यास करून जे जे लोकप्रिय ते ते कमअस्सल मानायला सुरुवात केली. त्यात सुक्याबरोबर जळालेले ओले म्हणजे भयकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा, संदेहकथा, भूतपिशाच कथा, गुप्तहेर कथा आदी मुख्य प्रवाहाच्या गावकुसाबाहेरचे साहित्य.

नुकताच बाबूराव अर्नाळकरांच्या निवडक कादंबऱ्यांचे संकलन असलेला एक जाडजूड ग्रंथ प्रकाशित झाला. त्यात साहित्यातल्या आणि अन्य प्रांतांतल्या अनेक मान्यवरांनी अर्नाळकरांवर लेख लिहिलेले आहेत. आपण अर्नाळकर एका अबोध वगैरे वयात वाचले आणि 'बोध झाल्या'वर सोडून दिले, हे बहुतेकांनी अधोरेखित केले आहे. आता या बोध झालेल्या उत्तरवयातही गुरुनाथ नाईक किंवा अर्नाळकरांची एखादी पिवळ्या पडलेल्या पानांची कादंबरी हातात पडली, तर हातातला वैचारिक ग्रंथ घटकाभर बाजूला ठेवून आपण आधी एका दिवसात त्या कादंबरीचा फडशा पाडू, हे यांच्यातल्या कोणीही सांगितलेले नाही. माणसाचं आत्मिक, आंतरिक उन्नयन नावाची गोष्ट आपण साहित्यावर अशा प्रकारे लादली आहे, की मानवी मेंदूला निव्वळ हलक्याफुलक्या रंजनाचीही गरज असते आणि ते पुरवणारं साहित्य निव्वळ रंजक आहे म्हणून कसदार नाही असे मानणे चूक आहे, हे साहित्यिक शुचितावाद्यांना मान्य नाही; मग अशा साहित्य प्रकारांमधूनही उन्नयन घडू शकते, जीवनदर्शन घडू शकते, हे मान्य होणे तर फारच दूर राहिले.

खरेतर या प्रकारची पेपरबॅक पुस्तके इंग्रजीत सगळे आनंदाने वाचतात. ॲगाथा ख्रिस्ती, स्टीफन किंगपासून फ्रेडरिक फोरसिथ, जेफ्री आर्चर, जॉन ग्रिशॅम, डॅन ब्राऊनपर्यंत पल्पवाले इंग्रजीतले सगळ्या प्रकारचे लेखक कोणत्याही वयात अभिमानाने मिरवता येतात (त्यांची सखोलता आणि संदर्भसमृद्धता मराठीच्या मानाने अधिक आहे, यात शंकाच नाही. याचे एक कारण त्यांच्या देशांनी आपल्या देशापेक्षा खूपच जास्त उलथापालथी अनुभवलेल्या आहेत, हेही आहे.) या मंडळींना त्यांच्या त्यांच्या भाषांमध्ये आणि देशांमध्येही मानाचे स्थान आहे. त्यांचे साहित्य आवडते, असे सांगणे कुणाला कमीपणाचे वाटत नाही. पण, आपल्या देशी पल्पवाल्यांना मात्र वाचकांच्या, निदान जाहीर वाचनव्यवहारात तरी, शाळकरी वयाच्या पलीकडे स्थान मिळत नाही.

बऱ्यापैकी सिरिअस वाचन असलेल्या बहुतेक वाचकांचे या प्रकारच्या साहित्याबद्दलचे एक स्टॅन्डर्ड उत्तर ठरलेले आहे. लायब्ररीत किंवा घरात या लेखकांची पुस्तके असायची. लहान वयात ती हातात पडली. त्यांच्या कल्पनारम्यतेने आणि अद्‌भुतरम्यतेने झपाटून गेलो. जणू, वेगळ्याच जगात गेलो. पांढऱ्यावरच्या काळ्या अक्षरांचा, वाचनाचा नाद लागला. मग हळूहळू इतर पुस्तके हातात आली. वाचनाचा स्तर उंचावला. अधिक सखोल वाचन कशाला म्हणतात, सकस साहित्य काय असते, ते लक्षात आले. मग या लेखकांचं बोट सोडून आम्ही पुढे गेलो. मात्र, त्यांनी वाचनाची सवय लावून अलिबाबाची गुहा उघडून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. अहा, 'सांप भी मरे और लाठी भी न टूटे' म्हणतात, ते यालाच.

गूढकथा, संदेहकथा, भूतकथा, पिशाचकथा, रहस्यकथा आणि विज्ञानकथा या गावकुसाबाहेर फेकल्या गेलेल्या कथाप्रकारांमधून (या समुच्चयाला या मजकुरात आपण इथून पुढे 'गूढकथा' या एकाच नावाने संबोधू) कसलंच उन्नयन होत नाही, असा सरसकट निर्णय इतक्या सहजगत्या कसा दिला गेला? हीसुद्धा मोठी अंधश्रद्धाच नाही का? नारायण धारपांच्या अनेक कथा या साहित्यिक मूल्यांच्या संदर्भातही श्रेष्ठ होत्या. जी. ए. कुलकर्णींच्या अनेक श्रेष्ठ कथा या गूढकथाच म्हणता येतील. दिवाकर नेमाडे, यशवंत रांजणकर, सदानंद भिडे, अरुण ताम्हणकरांपासून बशीर मुजावरांपर्यंत अनेक कथाकारांच्या गूढकथांनी श्रेष्ठ कथांचे निकष पूर्ण केले असतील; पण त्यांच्या त्या कथांचं विश्लेषण कधी गंभीरपणे झालंच नाही. सुहास शिरवळकर, चिंतामणी लागू, बाबा कदम, कुसुम अभ्यंकर, कुमुदिनी रांगणेकर, श्रीकांत सिनकर यांच्यासारख्या तुफान लोकप्रिय लेखकांची लोकप्रियता नेमकी कशामुळे आहे, याचा शोध घेण्याचीही गरज मराठी साहित्य समीक्षेतल्या ढुढ्ढाचार्यांना वाटली नाही, हे दुर्दैव आहे. जागतिक पातळीवरच्या कथात्म अभिव्यक्ती-मधला एक सशक्त प्रकार, आपल्याकडे सशक्तपणे हाताळला जात असूनही आपण त्याला विवेचनाच्या, चिकित्सेच्या, चर्चेच्या आणि तथाकथित सन्मानाच्या परिघाबाहेर ठेवण्यात यशस्वी झालो- जे जे लोकप्रिय, ते ते उथळ, इतके उथळ तत्त्वज्ञान वापरून.

या सगळ्या पार्श्वभूमीवर रत्नाकर मतकरींचं यश देदीप्यमान मानायला हवं. त्यांच्या गूढकथांना वाचकांची मोठी पसंती लाभलेली आहेच, शिवाय ते साहित्यिक म्हणूनही मोठी मान्यता मिळवून आहेत. त्यांची विविध साहित्य प्रकारांमध्ये संचार करणारी चतुरस्र लेखणी हे त्याचं मुख्य कारण आहे. मतकरी हे बालरंगभूमीवरचे खंदे अध्वर्यू आणि व्यावसायिक रंगभूमीवरचे यशस्वी नाटककार आहेत. त्यांनी सामाजिक संदर्भ असलेले, गूढकथांच्या परिघाबाहेरचे लेखनही खूप मोठ्या प्रमाणात केले आहे. मात्र, मतकरींच्या गूढकथांनाही साहित्याच्या दरबारात मानाचे स्थान आहे. काही अंशी तशी थोडीशी मान्यता नारायण धारपांना लाभली होती. मतकरींच्या गूढकथांचे मात्र साहित्यिक स्वरूपाचे विश्लेषण तुरळक प्रमाणात का होईना, होऊ शकलं, ते सातत्याने होत गेले, हे विशेष.

याचे एक कारण म्हणजे खुद्द मतकरी यांनीच आपल्या गूढकथासंग्रहांच्या प्रस्तावनांमधून आणि मुलाखतींमधून गूढकथेचे गूढ उकलण्याचा, तिचं मर्म समजावून सांगण्याचा सजग प्रयत्न केला आहे. लेखकाने आपल्या लेखनाकडे तटस्थपणे पाहून त्या प्रकारात आपण

नेमके का लिहितो आहोत, याचं निरीक्षण करण्याचा हा विरळा प्रकार आहे. गूढकथांकडे पाहण्याची मुख्य प्रवाहाची कलुषित दृष्टी मतकरींना चांगलीच ठाऊक असल्यामुळे त्यांनी हा प्रकार साहित्यिक चर्चेच्या योग्यतेचा आहे हो, असं वारंवार ठासून सांगण्यासाठी प्रस्तावनांचा मार्ग निवडला आहे. अन्य मंडळींच्या कसदार गूढकथांनाही जी मान्यता लाभली नाही, ती मतकरींच्या कथांना का लाभली, याचा काहीसा उलगडाही या प्रस्तावनांमधून होतो. त्यांची गूढकथा ही निव्वळ एखाद्या गूढअनुभवाचं प्रत्ययकारी वर्णन अशा स्वरूपाची नाही. त्यांची दीर्घ चिंतनाची बैठक त्या कथांना लाभलेली आहे. एका प्रस्तावनेत ते लिहितात, 'गूढकथा म्हणजे काय... तर आयुष्याच्या एखाद्या मुलखावेगळ्या पैलूविषयी लिहिलेली कथा. हा मुलखावेगळेपणा मनुष्यस्वभावात, वातावरणात किंवा घटनांमध्ये आढळतो किंवा कातरवेळेस हुरहूर लावणारे डोहाजवळचे वातावरण किंवा केवळ योगायोगच घडू शकणारी एखादी घटना. आता ही ओढइतकी जबरदस्त का, हे वातावरण असे हुरहूर लावणारे का किंवा घटनांमध्ये अमुक एक संगती का, या प्रश्नांची उत्तरे नेहमीच तर्कशास्त्राप्रमाणे देता येत नाहीत. ती संदिग्धच राहतात, म्हणून त्यांना गूढम्हणायचे....'

मतकरींच्या 'खेकडा' या मराठी साहित्यात अजरामर होऊन बसलेल्या पहिल्या गाजलेल्या गूढकथेमध्ये त्यांच्या लेखनाची सगळी वैशिष्ट्यं जणू अर्कस्वरूपात संपृक्त होऊन आली आहेत. मतकरींच्या सगळ्या गूढकथालेखनाचं दिशादिग्दर्शन या कथेत दिसतं. प्रेयसीबरोबर लग्न करण्यात अडथळा ठरलेल्या आणि नकोशा झालेल्या लुळ्यापांगळ्या मुलाचा बळी स्वतः बापच घेतो. नंतर त्या प्रेयसीचा अतिशय गूढपद्धतीने मृत्यू होतो, मात्र, त्या गूढाचा वास्तवातला रहस्यभेदही वाचकापुरताच स्पष्ट होतो, अशी या कथेची रचना. एकतर या कथेमध्ये कुठेही भुताटकी, झपाटलेला वाडा, मांत्रिक, जारण-मारण वगैरे भानगडी नाहीत. सामान्य मध्यमवर्गीय वाचकाच्या भावविश्वात घडू शकेल, अशी एक साधीशी गोष्ट आहे. मतकरींनी अतींद्रिय अनुभवांचा आणि भूतपिशाचांशी संबंधित संकल्पनांचा वापर गूढकथांमध्ये केलेला आहेच; पण ते अतींद्रियात अडकत नाहीत. ते त्या अर्थाने सश्रद्ध किंवा अंधश्रद्ध नाहीत. ते वैज्ञानिक नियमांनी स्पष्ट न होणाऱ्या धूसर गोष्टींची कारणमीमांसा तंत्रमार्गी अध्यात्म किंवा बुवाबाजीच्या अंगाने करत नाहीत. विज्ञानाच्या परिघाबाहेरचं असं जगात काहीच नाही, अशीही त्यांची वैज्ञानिक अंधश्रद्धा नाही. तर्कशास्त्र हे माणसाने विश्वाच्या आकलनासाठी निर्माण केलेल्या मोजपट्टीसारखे आहे. त्याने सध्या मापला न जाणारा एक बराच मोठा अवकाश शिल्लक राहतो, याचे भान ते बाळगतात. मात्र, या अवकाशाचे पारंपरिक श्रद्धांमधून मिळणारे उत्तरही ते तंतोतंत स्वीकारत नाहीत. त्यामुळे अतर्क्याची अनुभूती देणाऱ्या त्यांच्या कथाही प्रश्न निर्माण करून संपतात; त्यांची स्वस्त, अंधश्रद्ध तात्पर्यं काढून समोर ठेवत नाहीत.

'खेकडा' या कथेतल्याप्रमाणे बहुतेक वेळा मतकरी सामान्य वातावरणातल्या, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमध्येच गूढाचा शोध घेतात. खरेतर ते त्यांना आपसूक 'दिसते' असे म्हणायला हवे. आपल्या आसपासच्या अनेक सुसंगत भासणाऱ्या घटनांमध्ये आंतरिक संगती नसते आणि परस्परसंबंधित नसलेल्या घटनांमध्ये विचित्र प्रकारची संगती असते. मात्र, जीवनव्यवहारातल्या या अंधाऱ्या बोळा-बळदांवर प्रकाश टाकू शकणारी दृष्टी सर्वसामान्य माणसाला लाभलेली नसते. ती मतकरींना लाभली आहे. त्यामुळे ते गूढकथेमध्ये निव्वळ भीतिदायकतेत अडकून पडत नाहीत.

'अंतर्बाह्य' या संग्रहाच्या प्रस्तावनेत ते लिहितात, 'गूढकथे-मध्ये, कधीतरी, अनपेक्षित म्हणून गूढ असलेल्या भीतीचा वापर अवश्य केला जातो; पण तिच्यात अशा इतर अनेक तत्त्वांचा समावेश होतो, जी अनोळखी, नेहमीच्या वास्तवापेक्षा वेगळी असल्यामुळे अतर्क्य आणि गूढ असतात. उदाहरणार्थ, मंत्रचळेपणा. कुलूप पक्के लावलेले आहे, हे माहीत असतानाही परत परत ओढून पाहणे, एक जिना उतरल्यावरही परत वर जाऊन पाहण्याचे कष्ट घेणे, हे नेहमीच्या सवयींपैकी दिसणारे आहे. माणूस असे का वागतो? - उत्तर नाही. ते गूढ आहे; पण ते भयप्रद नाही. जे समजण्याच्या पलीकडे आहे, अतर्क्य आहे, ते सारे गूढआहे. नेहमीच्या पाहण्यातले नाही, त्याची कदाचित भीती वाटू शकेल; पण ते मूलतः भीतिदायक नाही, ते गूढ आहे. ते वास्तव असू शकते. तरीही नव्या आणि वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिल्यामुळे ते वेगळे वाटते, अनाकलनीय वाटते, गूढ वाटते.'

मतकरींच्या यशाचे आणखी एक मर्म इथे उलगडते. आता घाबरवतोच वाचकाला, त्याची कढीच पातळ करून टाकतो, असा हिय्या करून मतकरी लिहायला बसत नाहीत. लहान मुले जशी दारामागे दडून, आत येणाऱ्याला बेसावध गाठून 'भ्भॉ' करून दचकवतात, तसा बालिश सोस काही गूढकथालेखकांना असतो. भयकथा आणि भूतकथांमध्ये तो जास्त पाहायला मिळतो. हॉररपटांमध्ये खुर्चीखालून आवाज काढून घाबरवणाऱ्या सिनेमांना दर्जेदार मानलं जात नाही; तो मान 'द ओमेन'सारख्या, कसल्याही क्लृप्त्या न वापरता भीतीचे सावट गहिरे करत नेणाऱ्या सिनेमांनाच लाभतो. त्या कुळीतली मतकरींची कथा आहे. मुळात मतकरींची रचनातंत्रावर प्रचंड हुकमत आहे आणि वाचकाला भयव्याकूळ करणे, हे त्यांच्या कथेचे उद्दिष्ट नाही. ते आशयाच्या अंगाने लेखन करतात; तंत्राच्या अंगाने नाही. एका मुलाखतीत त्यांनी म्हटले आहे, 'कथा, कादंबरी, गूढकथा, नाटक आणि बालनाट्य हे सगळेच आकृतिबंध मला आवडतात. आशयाला न्याय देणारा आकृतिबंध मी स्वीकारतो. आशयालाच त्याचा आकृतिबंध ठरवू द्यावा.' आपल्या आसपास, आपल्याच आयुष्यात कितीतरी गोष्टी घडत असतात. त्यांच्याकडे कधी असे डोळे उघडे ठेवून पाहता का असे जाणवून देणे, हेच अनेकदा त्यांच्या कथांचे काम असते. त्यामुळे पडके वाडे, पिशाचं, भुतं, अंधारात सरकत्या सावल्या, कर्णभेदक किंकाळ्या, गूढप्रकाश यांची रेलचेल न करताही ते वाचकाच्या मनात भीतीची कुंद भावना निर्माण करू शकतात... तीही आवश्यक असेल तिथेच. 'खेकडा'मध्ये प्रेयसीच्या मनातल्या भीतीचा वापर करून त्यांनी उत्कर्षबिंदूला वाचकाला हादरवून सोडले आहे. त्याच वेळी त्यांनी वाचकाला कडवट चवीचे का होईना, एक समाधान दिले आहे. सुडाचे किंवा न्यायाचे

समाधान. अनेकदा ही दोन्ही समाधाने एकच असतात, हा मानवी जीवनाचा अजब न्याय मतकरींच्या कथांमध्ये वारंवार भेटतो. प्रत्यक्ष आयुष्यात ज्यांना न्याय मिळाला नाही, अशा पीडितांना कल्पनाविश्वात तरी दैवगत न्याय किंवा काव्यगत न्याय मिळवून देणे आणि अत्याचाऱ्यांना त्या न्यायाचा धाक घालणे, हा एक उदात्त हेतू त्यांच्या लेखनात दिसतो... पण, तो संयतपणे.

लहान मुलांसाठी विपुल लेखन केलेल्या मतकरींनी केवळ याच कथेत नाही, तर 'शाळेचा रस्ता'सारख्या इतरही अनेक कथांमध्ये लहान मुलांचा प्रभावी वापर केला आहे. असहाय प्रोटॅगोनिस्ट म्हणून ही मुले समोर येतात. त्यांच्याशी मोठ्या माणसांचे जग जे क्रूर खेळ करते, ते दिसत राहते. वाचक इथे हतबल प्रेक्षक असतो. मनाच्या पडद्यावर समोर जे घडतेय त्यात हस्तक्षेप करण्याची त्याची इच्छा असते. पण, साहित्यकृतीच्या संदर्भात ते अशक्य असते. तो तडफडत राहतो आणि 'खेकडा'सारख्या कथेत मतकरी तो हस्तक्षेप वेगळ्या मार्गाने घडवून आणतात, 'न्याय' करतात. त्या, वरकरणी अतींद्रिय, अमानवी वाटणाऱ्या न्यायाचे मानवी सूत्रही उजागर करतात. मानवी जीवनाविषयीची ही अपरंपार करुणा इतक्या उलघालींमधून गेलेल्या वाचकाच्या दुखऱ्या मनावर फुंकर घालते.

गूढकथालेखनाची जवळपास सर्व प्रकारची मूलद्रव्ये मतकरींनी लेखनात वापरली आहेत. पावसातला पाहुणा, शाळेचा रस्ता, रंगांधळा, तारकर, बंध, चित्रातील चित्र, काळी बाहुली, कंदिलाची रात्र, काळ्या शाईची गोष्ट, आजचं युग, प्रॅक्टिकल जादू, दाम्पत्य, हक, पर्जन्य, नक्कल, शेवटचा टप्पा, मांजर, अतर्क्य, दुसऱ्याची दुनिया, बाकावरती, पुरावा, कम ऑन रॉकी, व्याधीमुक्त, तबकडी, ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री, घुबड, विक्षिप्त गोष्ट, चिठ्ठी, जीवनामृत, प्रचिती, शाळेचा रस्ता, प्रार्थना, पर्यायी, दुरुस्ती, गर्भ, व्हायरस, कुणास्तव कुणीतरी, अंतराय, कळकीचे बाळ, ती, मी आणि तो, निमाची निमा, आल्बम, तुमची गोष्ट, रणमर्द, शनचरी ही त्यांच्या कथांची काही मोजकी शीर्षकंही कमालीची उत्कंठावर्धक आहेत. यातल्या काही कथांमध्ये अतर्क्याचा वेध आहे. काही कथा मानसशास्त्रीय आधारांवर उभ्या आहेत. काहींमध्ये नियतीचे खेळ आहेत. ही नियती नेहमी क्रूर, विध्वंसक आणि भयावह नाही; ती कधी कधी दिलासाही देते. माणसाच्या मनातला खरा-खोटा अपराधबोधही ते अनेक कथांमध्ये वापरताना दिसतात. माण-सामाणसांमधल्या नातेसंबंधांतले उभे-आडवे, वेडेवाकडे आणि छुपे धागे हा तर त्यांच्या खास हुकमतीचा विषय. आसपास घडलेल्या सत्य घटनांमधूनही काही कथानके उभी राहिली आहेत. या सगळ्या कथा अव्वल गूढकथांची सगळी वैशिष्ट्ये घेऊन येतात. वाचकाला लेखकाने उभ्या केलेल्या तात्पुरत्या प्रतिसृष्टीत अल्लाद घेऊन जातात. त्याला गुंगवत नेतात. त्याच्या मनात सोडवणुकीच्या सगळ्या शक्यता निर्माण करतात आणि अखेरीस वेगळेच काहीतरी समोर आणून त्याला चमकवून सोडतात. मतकरींचे वैशिष्ट्य म्हणजे, हे वेगळेच काहीतरी कथानकाच्या बाहेरून आणून वाचकाला फसवत नाहीत. त्याची बीजं मूळ कथानकातच असतात. त्यावरचा अंतिम झोत मात्र मतकरींच्या इच्छेबरहुकूम हवा तेव्हा पडतो आणि वाचकाला स्तिमित करतो. वाचकाच्या मनात निव्वळ थराराची, भयाची, संदेहाची भावना उत्पन्न करणे, इतके कोते उद्दिष्ट त्यांच्या लेखनात नाही. सर्वसामान्य माणसाच्या आशाआकांक्षांचा विसर त्यांच्यातल्या लेखकाला कधीच पडत नाही. त्या सगळ्याकडे ते अतिशय समंजस आणि मानवी करुणेने भारलेल्या दृष्टीने पाहतात. त्यामुळे, ते वाचकाला साचेबंद गूढापेक्षा अधिक मोठे, व्यापक जीवनदर्शन घडवतात.

म्हणूनच, गूढकथा हा एक ठाशीव साहित्यप्रकार आहे, तो अन्य कोणत्याही तथाकथित 'गंभीर' लेखन प्रकारांप्रमाणेच मानवी जीवनाचे व्यामिश्र दर्शन घडवू शकतो, हे मतकरींनी वारंवार सांगितले आहे. ते निव्वळ घाबरवण्यासाठी घाबरवणारी भयकथा फारशी लिहीत नाहीत, त्याचे कारण उलगडून सांगताना एका मुलाखतीत ते म्हणतात, 'भयकथेमध्ये भयाला, तर गूढकथेमध्ये कथेला महत्त्व आहे. मानसशास्त्रीय दृष्टिकोन, मानवी संबंध, सामाजिक प्रश्न अशा वेगवेगळ्या पातळीवर गूढकथेच्या माध्यमातून आशय अभिव्यक्त करता येतो. गूढकथा आकृतिबंधाच्या या शक्यताच समीक्षकांच्या ध्यानात आल्या नाहीत. त्यामुळे गूढकथेचे महत्त्व मराठी साहित्याला समजलेच नाही.' काही कवी उत्तम गद्यलेखन करू शकतात. पण, तसे ते करीत नाहीत. त्याचप्रमाणे गूढकथा लिहिल्याने आपण दुय्यम दर्जाचे लेखक होऊ की काय, या भीतीपोटी अनेक जण गूढकथा लेखनासाठी धजावले नाहीत, याकडेही मतकरी यांनी याच मुलाखतीत लक्ष वेधले आहे.

माणसाचे लौकिक आयुष्य संपल्यानंतर, मृत्यूनंतर काय घडते, याचे जगात अनेक प्रकारे चिंतन घडत असते. सरधोपट धर्मशास्त्रे काळ्यापांढऱ्या रंगातल्या स्वर्ग-नरकाचे बालसुलभ कल्पनाचित्र रंगवून आणि त्याहीपलीकडच्या मोक्षाची कल्पना मांडून सोडवणूक करून घेतात. 'सगळं संपतं'वादी थोडक्यात सुटतात, 'आत्मा-परमात्मा'वादी मृत्यूपश्चातच्या आयुष्याच्या खुणा शोधत फिरतात. परामानसशास्त्र आणि बुद्धिगम्यतेच्या पलीकडचा अतर्काचा प्रदेश मृत्यूमध्ये एक विलक्षण मोहिनी भरतो. ती मतकरींना आकृष्ट करते. म्हणूनच, मानवी संज्ञेला आणि बुद्धीला ज्ञात जगापलीकडचे काहीतरी अनाकलनीय असं असतं, याची जाणीव करून देणाऱ्या अनेक कथा मतकरींनी लिहिल्या आहेत, त्यात मृत्यूविषयीच्या अपरंपार कुतूहलाचा मोठा वाटा आहे. जाणिवेपलीकडची नेणीव ते नाकारत नाहीत आणि त्या नेणिवेवर कसलीही आध्यात्मिक पुटे, होता होईतो चढवत नाहीत. लोकपरंपरेतून आलेल्या भूत-पिशाचांना, विदेही आत्म्यांना मतकरींची दारे बंद नाहीत. मात्र, या पारंपरिक संकल्पना वापरणारा लेखक आधुनिक, विज्ञानवादी दृष्टीचा आहे. तो त्या कथानकामध्ये जो 'हस्तक्षेप' करतो, त्याने कथा 'जमिनीवर' येते.

गूढकथा हा मूलतः रचनातंत्राचा खेळ आहे. समर्थ आशय घेऊन तिच्यात उतरणारे मतकरी ते तंत्रही प्रचंड ताकदीने वापरतात. सुरगाठी, निरगाठी मारत मारत, वाचकाशी बुद्धिबळ खेळत खेळत ते उलगड्यापाशी, चरमबिंदूपाशी येतात आणि न चुकता वाचकाला स्तिमित करतात, सुन्न करतात. वाचकाने तोवर बांधलेल्या अटकळी

खऱ्या ठरोत, वा खोट्या; त्याला बसणाऱ्या धक्क्याची तीव्रता काही कमी होत नाही.

मतकरी हे दृक्माध्यमांमध्ये उत्तम लौकिक प्राप्त केलेले लेखक आहेत. ते नाटककारही आहेत आणि राष्ट्रीय पुरस्कारविजेते चित्रपट दिग्दर्शकही. चित्रकलाही त्यांना वश आहे. त्यामुळे त्यांना कथा 'दिसते' आणि शब्दांच्या माध्यमातून ती वाचकाला 'दाखवता येते.' त्यांची कथारचना ही बहुतेक वेळा दृश्ये आणि संवादांमधून मनाच्या पडद्यावर उलगडत जाणाऱ्या सिनेमांसारखी असते. त्यात ते रंगांपासून छायाप्रकाशापर्यंत, रूपकांपासून प्रतिमा-प्रतीकांपर्यंत सगळ्या घटकांचा वापर करत कथा रंगवत नेतात. फापटपसारा त्यांच्या लेखनात औषधालाही सापडत नाही. त्यामुळे गोळीबंदपणा हा त्यांच्या कथांचा स्थायीभाव आहे. यशस्वी कथेच्या साच्यातून त्याच मोजमापाच्या जिलब्या पाडणे त्यांना मंजूर नाही. त्यांचा लेखकीय स्वभाव महत्त्वाकांक्षी आहे. त्यामुळे, आसपास सजगपणे पाहून ते पत्रकार, समाजशास्त्र संशोधक, लहान मुले, सामान्य नोकरदार, अभिनेते, पोलीस अशा विविधरंगी व्यक्तिरेखांच्या, त्यांच्या भावविश्वाच्या कथा साकारू शकतात. ते 'गूढाची गोष्ट'सारखी आपल्या गूढकथा लेखनाची वैशिष्ट्ये उलगडून सांगणारी आणि आपली खंत व्यक्त करणारी स्वतःवरच बेतलेली कथाही लिहू शकतात आणि वाचकाचे बखोटे धरून तुझ्याही बाबतीत घडू शकेल अशी गोष्ट सांगतो, असे म्हणून 'तुमची गोष्ट' सांगून त्याची विकेटही काढू शकतात.

मराठी साहित्यातच नव्हे, तर एकंदर साहित्यव्यवहारात अव्यभिचारी निष्ठेला फार महत्त्व दिले जाते. ही निष्ठा सहसा अंतर्मुख, विचारपरिप्लुत आणि वाचकाभिमुख नसलेल्या साहित्यातच शोधली जाते. लोकप्रियतेचा सोस सोडून काहीतरी करण्याचा सोस इथे दांडगा आहे. लोकप्रिय आणि कसदार लिहिण्यासाठीही अव्यभिचारी निष्ठा असावी लागते, हे मुख्य प्रवाहाला मान्य नसावे. मतकरी मात्र या प्रवाहाला पुरून उरले आहेत. मुख्य प्रवाहात न गणल्या जाणाऱ्या एका साहित्यप्रकाराची त्यांनी जवळपास साठ वर्षे निष्ठेने आराधना केली आहे, आणि त्यातल्या दर्जाचा मानदंड प्रस्थापित केला आहे. १९५५ मध्ये, सर्वस्वी वेगळ्या असलेल्या वातावरणात त्यांनी लिहिलेल्या कथेने झपाटून जाणारा आजचा एखादा तरुण वाचक त्यांना भेटतो, तेव्हा त्यांना या साहित्यप्रकाराच्या उपेक्षेची भरपाई झाल्यासारखे वाटत असेल. शेवटी जे वाचले जाते, जे वाचकासहित असते, तेच खरे साहित्य. मराठी साहित्याच्या तथाकथित मुख्य प्रवाहालाही आता अर्नाळकर, गुरुनाथ नाईक, सुहास शिरवळकर यांची दखल घ्यायची बुद्धी होऊ लागली आहे. हे सगळे निवडक कथा-कादंबऱ्यांच्या संग्रहरूपाने सन्मानाने पुन्हा अवतीर्ण होत आहेत. गूढकथा, संदेहकथा, भयकथा यांच्या लेखनाची गंभीरपणे दखल घेण्याची बुद्धी समीक्षकांनाही झाली आणि या साहित्यप्रकारांना त्यांच्या हक्काचा सन्मान मिळाला, तर त्यामागे रत्नाकर मतकरी यांची या प्रकारातली अविरत लेखनसाधना आणि त्यांनी आपल्या लेखनाच्या दर्जातून दिलेली प्रतिष्ठा यांचा मोठा वाटा असेल, यात शंका नाही.

mamanji@gmail.com

❖



२ वी आवृत्ती

द गेस्ट ऑफ ऑनर

लेखक : **आयर्विंग वॅलेस**
अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

पृष्ठसंख्या : २४० । किंमत : २५०/- Book Available

एका शिलेदाराची शोकांतिका

मनस्विनी प्रभुणे

दर महिन्याला सात कथांची सात पुस्तकं प्रकाशित करणं, त्यातील प्रत्येक कथा शंभर पानांची म्हणजे सातशे पानांचा मजकूर दर महिन्याला लिहून तो छापणं हे क्वचितच एखाद्या लेखकाला जमू शकतं. ऐकायला अजब वाटेल; पण ज्येष्ठ रहस्यकथाकार गुरुनाथ नाईक यांनी सत्तरच्या दशकात हे करून दाखवलं. आजच्या घडीला आधुनिक तंत्रज्ञान हाताशी असताना एक कादंबरी छापणं सोपी गोष्ट नाही; तर सत्तरच्या दशकात फारशा सोयी-सुविधा नसताना असा हा भव्य-दिव्य लेखनप्रपंच करणं मोठं धाडसाचं काम होतं. तो काळच तसा भारावून टाकणारा होता. बाबूराव अर्नाळकर यांचा धनंजय, भा. रा. भागवत यांचा फास्टर फेणे यांनी मुला-मुलींना वेड लावलं होतं. अर्नाळकर आणि भागवत यांच्या कथा मोठ्या उत्सुकतेनं वाचल्या जायच्या. रहस्यकथांनी सामान्य माणसांच्या मनावर पकड घेतली होती. दर महिन्याला प्रकाशित होणाऱ्या या कथामाला घ्यायला मोठी गर्दी व्हायची. याच काळात गुरुनाथ नाईक या नावानंदेखील संपूर्ण महाराष्ट्र-गोव्यातील वाचकांवर अशीच जादू केली होती.

आजच्या काळात इंटरनेटवर महागडे डिटेक्टिव्ह 'गेम' खेळणाऱ्या मुलांना त्या काळी या कथामालांच्या वाचनातून मिळणारा आनंद समजणार नाही. काळाच्या ओघात विस्मृतीत जाऊ लागलेल्या गुरुनाथ नाईक या ज्येष्ठ रहस्यकथाकाराला भेटायला त्यांच्या घरी गेले असता, तेच स्वतः रहस्यकथेतील एखाद्या गूढव्यक्तिरेखेसारखे वाटले. जनमानसात देदीप्यमान अशी प्रतिमा तयार झालेल्या त्यांच्यातील लेखकाला मी शोधत होते. अतिशय निर्विकार चेहऱ्याने ते माझ्यासमोर बसले. काही क्षण हीच ती व्यक्ती आहे का, असा प्रश्न पडला. पणजीत पाटो भागातील शासकीय वसाहतीत गुरुनाथ नाईक एखाद्या निर्वासितासारखे राहतात. आजूबाजूला झपाट्याने होणाऱ्या बदलांपासून स्वतःला अलिप्त ठेवून आयुष्याच्या सांध्यपर्वात स्वतःला एकटं ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. वयाच्या अशा टप्प्यावर ते आहेत, की आता शरीरही साथ देत नाही. विस्मृतीत गेलेल्या आठवणी आणि खंगलेलं शरीर बघून वाटलं, हाच का तो लेखक जो महिन्याला सात कथा लिहायचा? या कथा लिहिण्यासाठी तेव्हा एका वेळी सहा-सात लेखनिक त्यांच्यासमोर बसलेले असायचे. एका वेळी सात लेखनिकांना सात कथा सांगणाऱ्या लेखकाला आज आपल्याच कथांमधील बारकावे आठवत नाहीत. कथेतील नायकांची नावं आठवत नाहीत, यासारखी दुसरी शोकांतिका नाही. शरीराचा तोल सांभाळणाऱ्या त्यांच्या पत्नी आता त्यांच्या विस्मृतीत जाऊ लागलेल्या आठवणींचाही तोल सांभाळत आहेत.

गुरुनाथ नाईक यांच्या लेखनप्रवासाची सुरुवात काहीशी अपघातानंच झाली. नोकरीत मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारात आर्थिक ओढाताणच अधिक व्हायची. घरातल्या जबाबदाऱ्या वाढत होत्या. घर ते ऑफिस आणि ऑफिस ते घर अशा दिनचक्राचाही त्यांना कंटाळा आलेला. नोकरी असली तरी जीवनात थोडीशी अस्थिरता होती. एकदा मित्राबरोबर 'किस् द गर्ल अँड मेक देम डाय' नावाचा इंग्लिश सिनेमा बघायला ते गेले होते. हा रहस्यपट होता. सिनेमा बघून परतत असताना त्याच सिनेमाची प्रेरणा घेऊन त्यांना नवी कथा सुचली. तोवर त्यांनी अशा रहस्यकथा कधी लिहिल्या नव्हत्या. 'मृत्यूकडे नेणारे चुंबन' असं उत्सुकता वाटणारं नावदेखील त्यांना लगेच सुचलं. ही पहिलीच कथा खूप गाजली. कथेच्या

नावातून तयार झालेल्या उत्सुकतेपोटी अनेकांनी ती झपाट्याने वाचून काढली. या कथेमुळे गुरुनाथ नाईक यांना काहीतरी आवडीचं गवसल्यासारखं झालं. इतके दिवस सुरू असलेल्या दिशाहीन भटकंतीला पूर्णविराम मिळाला. एका कथेपाठोपाठ अनेक कथांची बीजं हळूहळू उमलू लागली. झपाटलेपणात अनेक कथा लिहून झाल्या. एका कथेतून पुढे अनेक कथामालिका जन्माला आल्या. लष्करावर आधारित 'शिलेदार' कथामालादेखील खूप गाजली. गुरुनाथ नाईक यांना रहस्यकथाकार म्हणून सगळीकडे मान्यता मिळू लागली होती. रहस्यकथा लिहिणं त्यांना मनापासून आनंद देऊ लागलं.

कथा लिहायच्या, प्रकाशकांना पाठवायच्या आणि मिळेल त्या मानधनावर खूश व्हायचं, असंच बरेच दिवस सुरू होतं. प्रकाशकांना कथा पाठवण्यापेक्षा त्या स्वतःच छापल्या तर प्रकाशकाला मिळणार नफा आपल्याला मिळू शकतो, हे लक्षात येताच 'शिलेदार' नावानं प्रकाशन व्यवसाय त्यांनी सुरू केला. शिलेदार ही त्यांची कथामाला खूप गाजली होती. तेच नाव प्रकाशन संस्थेला दिलं; पण फक्त एकच कथा छापून त्यावर फार मोठा आर्थिक फायदा होणार नव्हता. म्हणून त्यांनी एक अभिनव योजना आखली. दर महिन्याला सात कथा लिहायच्या. प्रत्येक कथा शंभर पानांची आणि यातल्या प्रत्येक कथेच्या हजार कॉपीज म्हणजे सात कथांच्या सात हजार कॉपीज काढायला सुरवात केली. महाराष्ट्रात आणि गोव्यात या सात हजार कॉपीज वितरित होऊ लागल्या आणि हे सारं नोकरी सांभाळून ते करत होते. कथेच्या मुखपृष्ठाला त्या कथेला शोभेल असं रंगीत चित्र तयार करून घ्यायचे. मुंबईत गिरगावात बागवेंकडे आणि पुण्यात संदेश एजन्सीकडे या कथांच्या कॉपीज पाठवल्या जायच्या. यामुळे झालं असं की संपूर्ण महाराष्ट्रात कथा पोहोचू लागल्या. लोकांची पत्रं येऊ लागली. कथांना खूप जोरदार प्रतिसाद मिळू लागला. मग गुरुनाथ नाईक यांनी आणखी एक धाडसी निर्णय घेतला. लेखन अधिक जलद गतीने व्हावं म्हणून त्यांनी चक्क सात लेखनिकांना कामावर ठेवलं. अफाट कल्पनाशक्तीच्या जोरावर एका वेळी सात कथांचा जन्म त्यांच्या डोक्यात होऊ लागला. एकाच वेळी सात लेखनिकांना ते सात वेगवेगळ्या कथा सांगायचे आणि त्यांच्याकडून कथा लिहून घ्यायचे. यावरून त्यांच्या प्रकाशन विश्वाच्या पसाऱ्याची व्याप्ती समजू शकते. हे जे काही त्यांना सुचलं होतं ते कल्पनेच्या पलीकडचं होतं.

रहस्यकथांबरोबर गुरुनाथ नाईक यांनी सामाजिक-पौराणिक कथा-देखील लिहिल्या. काही नाटकंही लिहिली. ऐंशीच्या दशकात त्यांनी अनेक मराठी मासिकांसाठी लेखन केलं; पण ते खरे रमले ते रहस्यकथांमध्येच. प्रकाशन व्यवसायही स्थिरावला, रहस्यकथाकार म्हणून गुरुनाथ नाईक नावारूपाला आले. आता आणखी काही वेगळं करायची ऊर्मी त्यांच्यामध्ये निर्माण झाली होती. बाबूराव अर्नाळकर यांचं १०९० रहस्यकथा लिहिल्याचं रेकॉर्ड होतं. हे रेकॉर्ड मोडण्याचं त्यांनी ठरवलं. बाबूराव अर्नाळकर एकमेव लेखक होते ज्यांनी हा रहस्यकथा लिहिण्याचा विक्रम रचला. अनेक पिढ्या त्यांच्या कथावाचनातून मोठ्या झाल्या. मराठी माणसावर मोठं गारूड त्यांनी घातलं होतं. अर्नाळकरांचा विक्रम मोडणं म्हणजे मोठा बहुमानच होता. २०१२ मध्ये हा योग जुळून आला. त्या वर्षी गुरुनाथ नाईक यांनी आपली १२००वी कथा लिहून काढली. गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद व्हावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले; पण ते नाही होऊ शकलं; मात्र लिम्का बुक रेकॉर्डमध्ये त्यांच्या या विक्रमाची नोंद झाली. एवढ्या मोठा संख्येने रहस्यकथा लिहिणारे ते पहिलेच भारतीय लेखक असावेत; पण त्यांच्या या विक्रमाची दखल कोणी घेतली नाही. अर्नाळकरांचा विक्रम मोडल्याच्या निमित्ताने या लेखकाचं कौतुक व्हायला हवं होतं, ते झालं नाही. ना महाराष्ट्रात कोणी दखल घेतली ना गोव्यात. इथूनच त्यांच्या वाट्याला उपेक्षा येऊ लागली.

आजूबाजूचा काळदेखील झपाट्यानं बदलत गेला. पुस्तकांची जागा मोबाइल, आयपॅड या गॅझेट्सनी घेतली. आताची पिढी किंडलवर पुस्तकं वाचणं पसंत करते. वाचनाचा प्रवाहदेखील बदलला. रहस्यकथा मोठ्या उत्कंठतेनं वाचल्या जायच्या. अचानक तो ओघ, ती ओढकमी झाली. नवनवीन व्हिडिओ गेम्सनी मुलांना काबीज केलं. डिटेक्टिव्ह व्हिडिओ गेम खेळायला मुलांना आवडतं; पण एखादी कथा वाचायला सांगितली तर ती बोअर वाटू लागते. गुरुनाथ नाईक यांच्या पिढीतल्या लेखकांपुढे, लिहायचं तर कोणासाठी, असा प्रश्न उभा राहिला. प्रकाशन व्यवसायानंही एकदम कात टाकली. या सगळ्या पार्श्वभूमीवर गुरुनाथ नाईक यांचं लेखन थांबलं. कदाचित आता पुढे मिळवण्यासारखंही काही राहिलं नसावं. रहस्यकथांमधील सगळ्यात उच्च नाव बाबूराव अर्नाळकरांचं होतं, तर त्यांचाही विक्रम मोडून झाला. त्यामुळेही कदाचित पुढे नवं काही लिहिण्याची, करण्याची ऊर्मी एकाएकी संपून गेली असावी. याच काळात शारीरिक व्याधींनी घेरलं. एक चालताबोलता, नवनवीन अजबगजब कल्पना लेखनात उतरवणारा लेखक एकदम शांत झाला. सदा गजबजलेलं त्यांचं ऑफिस ओस पडू लागलं. लिहिलेल्या सर्व रहस्यकथा हिंदीतून प्रकाशित करण्याचा मानस होता; पण ते कामही पुरं होऊ शकलं नाही. हिंदीत आणखी मोठा वाचक वर्ग या कथांना लाभला असता. आणखी नव्या वाचकांपर्यंत त्यांचं लेखन पोहोचलं असतं; पण ते झालं नाही.

आता तर ते या सगळ्यांपासून खूप दूर गेलेत. स्मरणशक्तीनं साथ दिली तर अधेमधे काही आठवतं. नाहीतर खूप प्रयत्न करूनही बऱ्याचदा आठवतही नाही. एवढं प्रचंड लिखाण करून झालंय,की आता त्याच्या निर्मितीच्या गोष्टी त्यांच्या लक्षात नाहीत. घरातल्या एका कपाटात आजही त्यांची सगळी पुस्तकं जपून ठेवली आहेत. ते कपाट उघडल्यावर मात्र त्यांच्या चेहऱ्यावर एक चमक येते. हाच माझा मौल्यवान खजिना आहे, असंही ते आपल्याला सांगतात. उपेक्षित जीवन, आर्थिक ओढाताण यात हा लेखक अडकलाय. गोवा शासनाच्या कला-संस्कृती खात्याकडून तुटपुंजी पेन्शन मिळते, त्यावरच गुजराण सुरू आहे. एका वेळी सात लेखनिकांना काम देणारा हाच तो लेखक आज स्वतः मात्र कफल्लक झालाय. एके काळी रहस्यकथांचं साम्राज्य उभं करणारा हा लेखक आता त्याच्याच एखाद्या रहस्यकथेतील गूढ व्यक्तिरेखेसारखा आज जगतो आहे. त्यांची ती शून्यातील नजर, भावनाहीन चेहरा आणि मध्येच विस्मृतीत जाणारं विचारचक्र त्यांच्या भोवतीची गूढता अधिक वाढवतं. त्यांच्या घराच्या पायऱ्या उतरत असताना त्यांच्या रहस्यकथांनी भरलेलं कपाट डोळ्यांसमोरून जात नव्हतं. काय होईल या पुस्तकांचं? या लेखकासारख्या त्याच्या या कथादेखील लोकांच्या विस्मृतीत जातील का?...पुढचा बराच वेळ हा प्रश्न मला सतावत राहिला.

❖

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनीअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

भवानी मंडपजवळ, कोल्हापूर

: (०२३१) २५४२९०१

स.९.३० ते रा. ८.०० (शनिवार बंद)

Email: mehtabooksellers@gmail.com

amazon dailyhunt GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

आमची सर्व eBooks **www.amazon.in**

play.google.com/store/books आणि dailyhunt - **tinyurl.com/gspp5a8** वर उपलब्ध

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा
नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर,
आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks

Online पुस्तके खरेदी करा
www.mehtapublishinghouse.com

दिवस रहस्यकथांचे

प्रकाश निलाखे

बाबूराव अर्नाळकरांची झुंजार कथा मला प्रथम वाचायला मिळाली १९६४मध्ये. असं काही साहित्य असतं हे मला तोपर्यंत माहीत नव्हतं. अर्थात, अठरा वर्षांच्या मुलाला त्याच्याआधी काय वाचायला मिळणार! म्हणजे वाचनाची सुरवातच मुळी डिटेक्टिव्ह कथावाचनानं झाली. इतरही साहित्य बाजारात नव्हतं, असं नाही; परंतु तरुण वयात भुरळ घालण्याचं सामर्थ्य हेरकथा, भयकथा, शौर्यकथा यांच्यामध्ये नक्कीच होतं. एकीकडे ना.सी.फडके, वि.स.खांडेकर यांच्या शहरी, नाजूक प्रेमकथांचा वाचक वर्गही तेवढाच होता. व्यंकटेश माडगूळकर, ग.दि.माडगूळकर यांचा साहित्याविष्कार वेगळा होता. या सर्वांमध्ये डिटेक्टिव्ह कथा हळूहळू अंकुरत होत्या. हेरकथा हा आकृतिबंध मुळात परदेशातला असला, विशेषत्वानं शेरलॉक होम्ससारख्या लेखकांनी रुजवलेला; तरी पण सर्वांत प्राचीन हेर हा भारतात नव्हे तर देवलोकात होऊन गेला. त्याचं नाव बृहस्पतिपुत्र कच. देव आणि दानवांचं युद्ध नेहमी होई. त्यात व्हायचं काय, की देवांच्या सैन्याची अपरिमित हानी व्हायची; परंतु राक्षस राजा वृषपर्वा याचे गुरू शुक्राचार्य हे मेलेलं राक्षससैन्य संजीवनी मंत्रानं पुन्हा जिवंत करायचे. देवसभा भरली. या विषयावर चर्चा झाली. काही करून संजीवनी मंत्र आपणाला मिळायलाच पाहिजे, यावर सर्वांचं एकमत झालं. मग आता काय करायचं? सर्वानुमते असं ठरलं, की आपणातील कुणीतरी तरुणानं शुक्राचार्यांच्या आश्रमात वेगळं रूप धारण करून जायचं. विद्यार्थी म्हणून आश्रमात प्रवेश मिळवायचा. प्रसंगी कपट करूनही संजीवनी मंत्र मिळवायचा. या कामगिरीवर देखण्या अशा कचाची नेमणूक झाली आणि कचानं शुक्राचार्यांची मुलगी देवयानी हिच्याबरोबर प्रेमाचं नाटक करून दोनदा मरून, पुन्हा जिवंत होऊन संजीवनी विद्या कशी हस्तगत केली, हे सर्वश्रुतच आहे. देवयानीच्या शापानं ती विद्या कचाच्या उपयोगी पडली नाही, हा भाग वेगळा; परंतु कचानं केलेल्या हेरगिरीला तोड नाही.

तसेच दुसरा भारतीय पौराणिक हेर रामभक्त हनुमानजी. लंकेमध्ये गुपचूप रावणाच्या गोटात जाताना असंख्य अडचणींना त्याला तोंड द्यावं लागलं. प्रसंगी गिळायला आलेल्या मगरीच्या पोटात जाऊन, नंतर तिचं पोट फाडून सुखरूपपणे बाहेर तर आलाच; पण त्या मगरीलाही ठार केलं. तसेच भुंग्याप्रमाणे लहान रूप धरून, तर कधी विक्राळ, भयानक रूप धारण करून, सीतामाईचा शोध घेतला. शेपूट पेटविल्यावर महाकाय धारण करून रावणाची दाढी जाळून लंकाच पेटवून दिली. लंकेमध्ये दाणादाण उडवून परत सुखरूप प्रभू रामचंद्राच्या वानरसैन्यामध्ये आले.

तसंच राम-रावण युद्ध सुरू असताना अहिरावण, महिरावण या पाताळातील राक्षसांनी राम-लक्ष्मणांना रात्रीच्या वेळी ते झोपलेले असताना पळवून नेलं. राहुटीबाहेर पहारा करणाऱ्या वानर सैनिकांना त्याचा पत्ताही नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी पाहतात तो काय, राम-लक्ष्मणच गायब! सगळीकडे हाहाकार माजला. हनुमानजींनी सगळ्यांना शांत केलं. ते म्हणाले, 'मी पाहतो श्रीराम कुठे आहेत ते.' राहुटीत येऊन त्यांनी पाहणी केली. जमिनीला भोक पडलं आहे हे लक्षात येताच त्यांनी भुंग्याप्रमाणे लहान रूप धारण केलं आणि त्या भुयारी मार्गानं पाताळात येऊन पोहोचले. पाताळ लोकात येऊन सगळीकडे शोध घेतल्यावर त्यांना असं दिसून आलं, की राम-लक्ष्मणांच्या गळ्यात लाल फुलांचा हार घालून

कपाळावर लालभडक कुंकवाचा मळवट भरून देवीपुढे त्यांचा बळी द्यायची तयारी सुरू आहे. हनुमानजींच्या भुवया वर चढल्या. डोळे विस्तवासारखे लाल झाले. शेपटीच्या तडाख्यानंच त्यांनी पूजासामान उधळून लावलं. वज्रमुठीचे प्रचंड आघात राक्षस पहारेकऱ्यांवर केले. लाथेच्या एका तडाख्यानंच ती देवीची उग्र मूर्ती उडवून लावली. एक एक हातानं अहिरावण व महिरावण यांची मुंडकी आवळून त्यांना यमसदनी धाडून दिलं. असंख्य राक्षसांना ठार केलं. पाताळ लोकांत प्रचंड नासधूस करून व श्रीराम-लक्ष्मणांना खांद्यावर घेऊन परत लंकेत आगमन केलं.

या सर्व साहसाचंच रामदास स्वामींनी त्यांच्या भाषेत 'पाताल देवता हंता भव्य सिंदुर लेपना', 'ध्वजाग्रे उचली बाहो, आवेशे लोटला पुढे । काळाग्नि काळरुद्राग्नि देखता कांपती भये। ब्रह्मांडे माइली नेणो आंवळे दंतपंगती। नेत्राग्नि चालिल्या ज्वाळा भृकुटी ताठिल्या बळे। ' असं रौद्र स्वरूपाचं वर्णन मारुती स्तोत्रात केलं आहे. हे झाले पौराणिक हेर.

अर्वाचीन काळात छत्रपती शिवरायांच्या राजवटीत बहिर्जी नाईक हा हेर होऊन गेला. कडक लक्ष्मी, वासुदेव अशी सोंगं घेऊन, जनमानसात फिरून शत्रूची बित्तंबातमी महाराजांना पुरविण्याचं मोलाचं कार्य या थोर हेरानं केलं. बहिर्जी नाईकांच्या या सर्व साहसकथा इतिहासात प्रसिद्ध आहेतच. याशिवाय आणखीही काही हेर छत्रपतींसाठी हेरगिरीचं काम करत होते. त्यांपैकी एक यमाजी भास्कर व दुसरा येसाजी कंक. यांनी बजावलेली एक कामगिरी मुद्दाम येथे देण्याचा मोह आवरत नाही म्हणून देत आहे; कारण ही कथा नक्कीच कोणाला माहीत नाही.

एकदा काय झालं, रामदास स्वामींच्या एका शिष्याला हेरगिरीच्या संशयावरून पकडून नेलं व राखेचे तोबरे भरून साखळदंडानी बांधून एका किल्ल्याच्या अंधार कोठडीत बंद करून ठेवलं. खरं तर तो संन्यासी भक्त निर्दोष होता. स्वामींचे 'मनाचे श्लोक' म्हणत भिक्षा मागत असताना अचानक चार-पाच मोगल सैनिक आले व त्याला मागे सांगितल्याप्रमाणे कैद करून घेऊन गेले. ही बातमी रामदास स्वामींच्या कानावर गेली. त्यांनी ही घटना शिवरायांच्या कानी घातली. शिवरायांना भलताच राग आला. स्वामींच्या शिष्याला कोण सोडवून आणेल, असा विचार करता महाराजांना यमाजी भास्कर व येसाजी कंक यांची आठवण झाली. त्यांनी माणूस पाठवून त्या दोघांना बोलावून घेतलं. दोघंही मुजरा करून अदबीनं महाराजांच्या समोर उभे राहिले. 'यमाजी, रामदास स्वामींच्या शिष्याला हेरगिरीच्या संशयावरून अटक करून, राखेचे तोबरे भरून किल्ल्याचे अंधार कोठडीत कैद करून ठेवले आहे. या येसाजीला बरोबर घ्या, कसलेही सोंग घ्या; कसेही करून त्या शिष्याची सुटका अंधार कोठडीतून करून दोन दिवसांत रामदास स्वामींचे पुढे हजर करा. कसे करायचे, काय करायचे मला माहीत नाही; पण कामगिरी फत्ते झाली पाहिजे. उशीर झाला तर ते त्या बिचाऱ्याला तोफेच्या तोंडी द्यायलाही मागे-पुढे पाहणार नाहीत. त्या गडाचा किल्लेदार फार खतरनाक आहे.'

यमाजी भास्कर व येसाजीनं महाराजांना मुजरा करून म्हटलं 'आज्ञा शिरसावंद्य आहे महाराज. आपण सांगितलेली कामगिरी फत्ते करूनच आपणापुढे मुजऱ्याला येऊ; अन्यथा आपणास आमची काळी तोंडे दाखवणार नाही.'

'शाब्बास यमाजी, येसाजी. कामगिरी फत्ते करून या. जगदंबा तुमच्या पाठीशी आहे,' महाराजांनी त्या दोघांना निरोप देत म्हटलं. यमाजी भास्कर आणि येसाजी कामगिरीवर रवाना झाले.

सूर्यास्त झाला. गडाच्या पायथ्यावरील चौकीजवळ गवताचे भारे डोईवर घेतलेले नवरा-बायको एकमेकांशी जोरजोरात भांडत होते. डोक्याला मुंडासं, अंगात कोपरी आणि कमरेला सुटायला आलेलं धोतर असा दाढीचे खुंट वाढलेला, किडकिडीत बांध्याचा जरा वयस्क असा नवरा व काळीसावळी, आडदांड अशी त्याची हिरवं लुगडं, खणाची चोळी, कपाळावर रुपायाच्या आकाराचं मेण लावून लावलेलं कुंकू, केस विस्कटलेले व चेहऱ्यावर जमा झालेले घर्मबिंदू... अशा अवताराची त्याची बायको. दोघे पायथ्याच्या चौकीपासून वीसएक फूट अंतरावर आली असतील तेवढ्यात वयस्क माणसानं डोईवरचा गवताचा भारा अलगद खाली टाकला आणि मटकन् तो खालीच बसला.

'का? काय झालं?' भिवया उंचावत त्रासिक चर्येनं बायकोनं म्हटलं.

कंबर चोळत नवऱ्यानं मऊ, अजिजीच्या स्वरात म्हटलं, 'मला वरच्या गंजखान्यापर्यंत यायला न्हाय जमायचं. '

'दिवसातून तीन बार गिळायला जमतंय का? चला उठा बिगी बिगी. कडुस पडायला आलंय. न्हायतर चौकीदार सोडणार न्हाईत वर.'

किल्ल्याला दोन गंजखाने होते. एक पायथ्याला, तर दुसरा अगदी वर बालेकिल्ल्यात. पायथ्याच्या गंजखान्यात भारा टाकला तर आठ आणे मिळत; पण वरच्या गंजखान्याला भारा टाकला तर एक रुपाया मिळत असे. एक रुपाया स्वतःच्या भाऱ्याचा तर अजून एक रुपाया नवऱ्याच्या भाऱ्याचा मिळावा, ही त्या बाईची अपेक्षा असावी, हे पाहणाऱ्याच्या लक्षात येत होतं.

'तुला जायचं तर जा रांडं. नुसतं राबराब राबवतीय मला. काय बाई हाय का अवदसा.' भांडणाची मजा बघायला आलेल्या पहारेकऱ्यांकडं पाहत म्हातारा हातवारे करत करवादला.

'तुला बसायचं तर इथंच बस भाड्या! ही बग मी चालले,' असं म्हणत तरातरा ती बाई बालेकिल्ल्याच्या दिशेनं निघाली; पण ते पाहून पायथा चौकीवरचे शिपाई धावत तिला आडवे आले. त्यांतला एक जण समोर उभा राहत म्हणाला, 'आता वक्त संपला आहे. वर जायचं नाही.'

हाताच्या कोपरानंच पुढे येणाऱ्याच्या छाताडावर दणके मारून त्या बाईनं आता शिपायांनाच शिव्या द्यायला सुरवात केली. 'आरं, दहा कच्चीबच्ची हाईत मला. त्यांना कोण खायला घालणार? ह्यो की तुजा 'बा'? जमिनीवर बसून मुंडाशानं चेहऱ्यावरचा घाम टिपणाऱ्या नवऱ्याकडं जळजळीत नजरेनं पाहत ती बाई फूत्कारली.

'कुछ भी हो! ऊपर नही जा सकती तुम। अभी अंधेरा हो जायेगा।'

'मुडदा बशिवला तुजा! होऽऽबाजूला.' त्या आडदांड बाईनं त्याला मागं ढकलून दिलं. दाणकन तो वीर जमिनीवर पडला आणि 'या अल्ला क्या नौबत है' म्हणत डोकं चोळीत बाजूला उभा राहिला. ते बघून चौकीवरच्या चार शिपायांनी बाईला गराडा घातला. दोन दोन शिपायांनी दोन बाजूंनी तिचे हात घट्ट पकडून ठेवले.

'स्त्री'रूप घेतलेल्या यमाजी भास्करनं हाताला हिसडा देऊन चारी शिपायांना उडवून लावलं व म्हटलं 'काय, आया, भयनी हाईत की नाय तुम्हाला? बाईमानसाच्या अंगाला हात लावताय!' हतबल झालेल्या त्या शिपायांना त्या बाईला वाट करून देणं भागच होतं. 'ऊपरवाले देखेंगे' असं मनातल्या मनात म्हणत शिपाई बाजूला झाले. अधिक शोभा होणं त्यांना नको होतं.

यमाजी भास्कर व येसाजी यांचा असा डाव होता, की यमाजीनं बालेकिल्ल्यात प्रवेश मिळवून वरचा गंजखाना पेटवून द्यायचा व ती आग दिसली की येसाजीनं खालचा गंजखाना पेटवायचा. किल्ल्याच्या अर्ध्या मार्गावरील शिपाई वरचा गंजखाना विझवायला धावतील व राहिलेले अर्धे सैनिक खालचा गंजखाना विझवायला पळतील, असा त्या दोघांचा कयास होता.

यमाजीनं थोड्याफार फरकानं शिव्या देत, तर कधी सैनिकांना 'उद्या भेटायला येते,' असे गोड आवाजात म्हणत, त्यांच्या गालावर टिचक्या मारत, तर कुणाचे प्रेमानं गालगुच्चे घेत सगळ्या चौक्या यशस्वीरीत्या पार केल्या व बालेकिल्ल्यात प्रवेश केला. बालेकिल्ल्यातील गंजखाना शोधायला फारसा वेळ लागला नाही आणि काही वेळातच अग्निकांडाला सुरवात झाली. उन्हाळ्याचे दिवस. आग भडकायला बिलकूल वेळ लागला नाही.

ते पाहून पायथ्याच्या गंजखान्यात प्रवेश केलेल्या चलाख येसाजीनं आगपेटी बाहेर काढली आणि खालचा गंजखाना पेटवून दिला. यमाजी भास्कर व येसाजीनं केलेल्या कयासाप्रमाणेच घडलं.

'आगऽऽआग लग गयी! आगऽऽलग गयी!' असा पुकारा सगळीकडे झाला. सगळीकडे अफरातफरी माजली. अंधारात एकमेकाला घाईगडबडीत सैनिक धडकत होते.

यमाजी अंधार कोठडीच्या प्रवेशद्वारावर आला. बाहेर कुणीही पहारेकरी नव्हता. अंधारकोठडीच्या लोखंडी गज लावलेल्या गजाच्या दरवाज्याचे गज हाताने वाकवून यमाजीनं अंधारकोठडीत प्रवेश केला. स्वामींचा शिष्य कण्हत कण्हत कसातरी उभा होता. हिसडे मारूनच यमाजीनं साखळदंड तोडून टाकले.

'मला शिवाजी राजांनी तुमची सुटका करायला पाठवलंय. आरडवरडा करू नका. गप गुमान पडून राव्हा,' असं म्हणत यमाजीनं लहान पोराला पोटाशी धरावं तसं स्वामी शिष्याला खांद्यावर टाकलं आणि गडाच्या ठरलेल्या आडवाटेनं तळ गाठला. आंब्याच्या झाडाखाली अरबी घोडे घेऊन महाराजांचा माणूस त्यांची वाट पाहत होता. रात्रीच्या रात्री तुफान वेगानं दौड करून यमाजी-येसाजींनी सज्जनगड गाठला. शिष्याला रामदास स्वामींच्या स्वाधीन करून स्वामींना दोघांनी दंडवत घातला. स्वामींना खूप आनंद झाला. दोघांना तुपातील परातभर शिरा खायला घालून स्वामींनी त्यांचं खूप कौतुक केलं.

इकडे शिवाजी महाराजांना बहिर्जी नाईकांनी यमाजी-येसाजींनी स्वामीशिष्याची यशस्वीरीत्या केलेल्या सुटकेची हकिगत कथन केली. श्री शिवाजी महाराज गालातल्या गालात फक्त खुदकन हसले. यमाजी-येसाजींनी स्वामीशिष्याची कशा प्रकारे सुटका केली असावी, हे महाराजांना न सांगताच कळून आले होते.

हे झाले शिवरायांच्या जासुसाविषयी; परंतु औरंगजेब बादशहाच्या कैदेतून श्री महाराजांनी काय काय क्लृप्त्या वापरून आपली व शंभूराजांची सुटका करून घेतली व बैराग्याच्या वेशात काही दिवसांत रायगडावर येऊन 'माँसाहेब आम्ही आलो' असा पुकारा केला होता. माँसाहेबांनी अश्रूंनी डबडबलेल्या नेत्रांनी आपल्या विश्वविजेत्या लेकराला मारलेली मिठी महाराष्ट्र विसरेल काय? अशा श्रीमान श्री छत्रपती शिवरायांना व त्यांच्या शूर मावळ्यांना माझे व उभ्या महाराष्ट्राचे कोटी कोटी मुजरे.

दुसऱ्या महायुद्धात इंग्लंड, अमेरिका, रशिया या बलाढ्य देशांमध्ये हेरगिरीची चुरस चालू होती. एकमेकांवर कुरघोड्या करण्याचे प्रयत्न केले जात असत. त्यामधूनच अनेक निष्णात हेरांचा जन्म झाला. युद्धसमाप्तीनंतर हेरांच्या, त्यांनी केलेल्या धाडसांच्या कथा बाहेर येऊ लागल्या व जग चकित होऊन गेलं. हेरांच्या सत्य कथानकावरच अनेक काल्पनिक कथा रचल्या गेल्या. खासगी गुप्तहेरांचंही कार्य परदेशात सुरू झालं. त्यावरून काही लेखकांना 'खासगी डिटेक्टिव्ह एजन्सी' ही कल्पना आवडली. बाबूरावनी अशीच स्फूर्ती घेऊन प्रथम धनंजय व त्यांचा सहायक छोटू ही पात्रे निर्माण केली. धनंजय हे चाळिशीच्या वयाचे, तर छोटू वीस-पंचवीस वर्षांचा असा मेळ होता. तर नंतर निर्माण केलेले हिरो झुंजार, काळा पहाड (चंद्रवदन) हे तरुण, चलाख, बुद्धिमान, हजरजबाबी असे होते. जनसामान्य तरुणांमध्ये ही इमेज खूपच लोकप्रिय झाली. एक वेगळी लेखनशैली बाबूरावनी वापरली. 'शोले' सिनेमात ' कितने आदमी थे' हा डॉयलॉग फेमस झाला होता; तसा झुंजार कथांतील डायलॉग आम्हा मित्रमंडळींच्या तोंडात बसले होते. 'मुलींनो आणि मुलांनो, आता तुम्ही भिंतीकडे तोंड करून उभे राहा.' 'तुझ्या हातातले ते खेळणे आता दूर फेकून दे' किंवा 'झुंजार, तुझा खेळ आता खलास झाला आहे. मुकाट्यानं माझ्या स्वाधीन हो,' असे ते डायलॉग असत. बाबूरावांची झुंजार, काळा पहाड ही डिटेक्टिव्ह पुस्तके लायब्ररीतून आम्ही आणत असू व एका दिवसात एक याप्रमाणे वाचून संपवत असू. काळापहाड वाचून आम्ही इतके प्रभावित झालो होतो, की काळे कपडे घालून आम्ही तीन मित्रांनी एका बगिच्यात रात्री बारानंतर शिरून तिथून केळीचा पिकायला आलेला घडच पळवून आणला होता.

नोकरी निमित्तानं पुण्याला येणं झालं, तरी बाबूरावांच्या डिटेक्टिव्ह कथा वाचण्याचा मोह काही सुटला नाही. नोकरीत जरा स्थिरस्थावर झालो होतो. चांगल्या कंपनीत नोकरी मिळाली होती. कासारवाडीला एक सिंगल रूम भाड्यानं घेऊन संसार थाटला होता. दिवस जात होते. १९७१ साल उजाडलं व माझं नशीबही उजाडलं. 'सकाळ'मध्ये सदानंद प्रकाशनाची जाहिरात रविवारच्या आवृत्तीत प्रसिद्ध झाली.

तुम्हाला हेरकथा, डिटेक्टिव्ह कथा लिहायला आवडेल काय, मग शंभर पानांचे हस्तलिखित घेऊन आम्हाला भेटा.

पत्ता : सदानंद खाडिलकर, १६८०, सदाशिव पेठ, चिमण्या गणपतीजवळ, पुणे ३०.

ती जाहिरात वाचली व लिहायची ऊर्मी दाटून आली. २०० पानी वही विकत आणली व रोज थोडं थोडं लिहायला लागलो. डोक्यात झुंजार, काळापहाड, बाबूराव अर्नाळकरांची लेखनशैली जाम बसलेली होतीच. मी एका मुहूर्तावर लिहायला सुरवात केली. सुरवातीला लेखनाला म्हणावा तसा स्पीड येईना. पहिलं हस्तलिखित तयार व्हायला सहा महिने लागले. ती हस्तलिखिताची वही घेऊन मी प्रकाशन कार्यालयात गेलो. स.म. खाडिलकरांची भेट झाली. मी त्यांना माझी ओळख करून दिली व हस्तलिखित त्यांच्या स्वाधीन करून घरी परत आलो.

पंधरा दिवसांनी खाडिलकरांचं पत्र आलं, 'तुमचं लिखाण पसंत नाही. ऑफिसमध्ये येऊन कृपया आपली गोष्ट परत घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.' माझे लिखाण पसंत पडेल ही माझीसुद्धा अपेक्षा नव्हती. 'ये अपने बसकी बात नही है लल्लू,' असा फिल्मी डायलॉग स्वतःशीच म्हणत मी फारसं वाईट वाटून घेतलं नाही. ऑफिसमध्ये गेलो. खालमानेनं

जिना उतरलो. खालच्या मजल्यावर गुरुनाथ नाईक, दिवाकर नेमाडे, सुभाष शहा यांच्या कादंबऱ्यांचे अक्षरजुळणीचे काम जोरात चालू होते. अनिमिष नेत्रांनी मी ते पाहत होतो. आपली कादंबरी जर पसंत पडली असती तर 'खैर कोई बात नही। जिएंगे तो और भी लडेंगे,' असे मनाचे समाधान करून मी बस पकडली. कासारवाडीला आलो.

पुन्हा कामाच्या व इतर व्यापामध्ये बुडून गेलो. बाजारात जाऊन गुरुनाथ नाईक, सुभाष शहा, दिवाकर नेमाडे यांच्या कथा घरी आणून वाचून काढल्या. गुरुनाथ नाईक यांच्या कॅप्टन दीप कथा खूप आवडल्या. मिलिटरी बाण्याचा कॅप्टन दीप झुंजार व काळापहाड यांचे मिश्रण असल्याचे जाणवले.

कॅप्टन दीपनं मनावर एवढा परिणाम केला, की पुढे १९७२मध्ये मला पहिले पुत्ररत्न झाले, त्याचे नाव मी दीपक असे ठेवले. गुरुनाथ नाईक यांचा लिखाणाचा झपाटा एवढा विलक्षण होता, की एकाच वेळी ते चार चार लेखनिकांना वेगवेगळ्या कथा सांगायचे व महिन्याच्या आत चार वेगवेगळ्या हिरोंच्या कथा प्रकाशनाला पुरवायचे. तसेच दिवाकर नेमाडे अफलातून कथालेखन करायचे. जादूटोणा, मांत्रिक भैरव भैरवी, शिवाय साहस कथा असा त्यांचा थाट असायचा. सुभाष शहांची लेखनशैली यांच्यापेक्षा वेगळीच होती. त्यांनी स्वतःचा असा एक वेगळा वाचक वर्ग निर्माण केला होता.

नारायण धारप या भयकथा लेखकाचं नुसतं नाव जरी वाचलं तरी कथा वाचायच्या आतच अंगाला कापरं भरायचं. त्याचा मासला 'बशीभर दूध' या कथेमध्ये वाचकांना जाणवेल. तसेच अशोक व्हटकर. विलक्षण सामर्थ्य यांच्या लेखणीत होते. त्यांच्या भयकथा त्या काळात दिवाळी अंक, मासिकांतून प्रसिद्ध होत व ते मी आवर्जून वाचत असे. द. चिं. सोमण हे माझे ज्येष्ठ मित्र व पट्टीचे भयकथा लेखक.

हेरकथा व साहसकथा लेखक. बरीच वर्षं आमचा पत्रव्यवहार सुरू होता. मी एकदा म्हटले, 'सोमण साहेब, आपण पत्राने एकमेकांना ओळखतो; परंतु आपण कसे दिसतो ते तुम्हालाही माहीत नाही व मलाही माहीत नाही. आपली कधी गाठ पडेल याचीही शक्यता नाही. तेव्हा आपण असे करू या, की तुम्ही मला तुमचा फोटो पाठवा. मी माझा फोटो तुम्हाला पाठवतो.' त्याप्रमाणे आम्ही केलंही.

अशा प्रकारे १९७० ते १९७५ या काळात वरील लेखकांनी डिटेक्टिव्ह कथा, साहस कथा लिहून बाबूराव अर्नाळकरांचा अशा प्रकारच्या लिखाणाचा वारसा कायम ठेवला. हंस प्रकाशनचे अनंत अंतरकर यांना विसरून चालणार नाही. त्यांनी नारायण धारप, द. चिं. सोमण, अशोक व्हटकर अशा विलक्षण लेखकांना दिवाळी अंकांतून संधी देऊन या साहित्याची शान वाढवली. आद्य डिटेक्टिव्ह लेखक बाबूराव अर्नाळकर, मधुकर अर्नाळकर आणि वर निर्देश केलेले माझे अनामिक मित्र, धाडसी प्रकाशक, पुण्या-मुंबईचे प्रकाशक ज्यांची काळाच्या ओघात नावंही विसरून गेलो, त्यांची क्षमा मागून व ज्या सर्वांनी रहस्यकथेवर मनापासून प्रेम केले त्या वाचक वर्गाची आठवण ठेवून, सर्वांना लाख लाख सलाम ठोकून माझी राहिलेली कथा पुरी करतो.

काही दिवस गेले. मला 'अमृत' मासिकांत दहा ओळींची राजा शिकंदराची एक गोष्ट वाचण्यास मिळाली आणि ती थीम घेऊन दोन महिन्यांत मी दिलीप कथा लिहिली. स. म. खाडिलकरांच्या भेटीला त्यांच्या ऑफिसात गेलो. तिथं कोणीही नव्हतं. 'शिकंदराचा खजिना' ही साहसकथा मी गुपचूप त्यांच्या मोकळ्या टेबलवर ठेवली आणि कोणालाही काही न सांगता तिथून पोबारा केला. का? तर न जाणो खाडिलकरांनी मला पाहूनच 'तुमची कथा नको' असे म्हणू नये म्हणून. पंधरा दिवसांनी खाडिलकरांचे पत्र आले, 'तुमची कथा आम्हाला आवडली आहे. सोमवारी आमच्या प्रकाशन संस्थेशी करार करण्यासाठी दहा वाजता यावे.' माझा आनंद गगनात मावेनासा झाला आणि गुरुनाथ नाईक, दिवाकर नेमाडे, सुभाष शहा, प्रकाश जोशी या सदानंद प्रकाशनच्या टीममध्ये अस्मादिकांचा प्रवेश झाला.

हवेत तरंगत मी घरी आलो. पत्नीला ती आनंदाची खबर सांगितली. तिचा आपल्या कानांवर विश्वास बसत नव्हता. आपला बावळट वाटणारा नवरा इतका 'हे' असेल हे तिला पटत नव्हतं. माझ्या जवळच्या मित्रांना छोटीशी पार्टी करून मी त्या दिवशीच आनंद साजरा केला.

एक आठ-पंधरा दिवस गेले असतील. एक मित्र धावत-पळत माझ्या घरी आला व म्हणाला, 'अरे प्रकाश, येड्या, तुझं नाव डेक्कन जिमखान्यावर झळकतंय आणि तू इथं काय करतोस?'

आता बेशुद्ध पडायची माझी वेळ होती. असं काही घडेल हे स्वप्नातदेखील मी अपेक्षिलं नव्हतं. आम्ही साधी माणसं. गाव-खेड्यातून पुण्याला आलेली. जंगली महाराज रोड, डेक्कन जिमखाना या परिसरावर अतोनात प्रेम असलेली. रविवारच्या सुट्टीत सकाळी आठ वाजल्यापासून जी भटकंती चालू व्हायची ती संध्याकाळी सहापर्यंत. आम्ही त्या परिसरातच 'पडे रहो' असे असायचो. असा डेक्कन जिमखाना पुण्याचं हार्ट, अशा ठिकाणी आम्हा लेखकांच्या नावाचा भला मोठ्ठा बोर्ड लागला आहे, हे ऐकून मी लगेच बस पकडली. थेट जिमखान्यावर आलो. अलकाकडून जिमखान्याकडे पुलावरून येताना उजव्या कोपऱ्यात उंच ठिकाणी तो सदानंद प्रकाशनचा दहा फूट बाय दहा फूट आकारमानाचा कापडी रंगीत बोर्ड लागला होता.

त्यावर लिहिले होते, सदानंद प्रकाशन, पुणे, आम्ही सादर करीत आहोत आमच्या प्रकाशनाची रहस्यकथा लेखक शिलेदार मंडळींची टीम

१ : गुरुनाथ नाईक
२ : दिवाकर नेमाडे
३ : सुभाष शहा
४ : प्रकाश जोशी
५ : प्रकाश निलाखे

डोळे भरून तो स्वतःच्या नावाचा व आमच्या लेखक मित्रांच्या नावाचा बोर्ड पाहिला. खूप समाधान झाले.

प्रकाशन संस्थेत गेलो. खाडिलकरांना भेटलो. म्हटले 'अरे बाप रे, खाडिलकर साहेब, काय हो तुमचं धाडस!' केवळ छानसं हसून ते म्हणाले, 'निलाखे, मैदानात उतरायचं तर सगळ्या तयारीनिशी उतरावं लागतं. बसा. मस्तपैकी चहा घेऊ.' जाईन तेव्हा, आलेल्या माणसाला चहा पाजायचा व स्वतःही प्यायचा, असा त्यांचा शिरस्ता असे. टेबलावर एका कोपऱ्यात चहा भरलेला थर्मास व कपबश्या ठेवलेल्या असत. बराच वेळ गप्पा मारल्यानंतर म्हटलं, 'जातो आता.' तेव्हा त्यांनी म्हटलं, 'निलाखे, दिवाकर नेमाडे आला आहे. भेटायचं का त्याला? फार जॉली मनुष्य आहे.' 'कुठं आहे?' मी उत्सुकतेन म्हटलं. 'वरच्या मजल्यावर एक खोली आहे. त्या खोलीतच त्याचा मुक्काम आहे. आम्हाला अर्जंट

कथा पाहिजे असेल तर आम्ही त्यांना वाशिमहून बोलावून घेतो. चार दिवसांत ते एक कथा लिहून परत जातात; पण त्याला प्यायला दारू लागते. त्याशिवाय त्याला लिहिता येत नाही.' हसत हसत खाडिलकरांनी म्हटलं. मीही हसलो.

मला घेऊन खाडिलकर त्या वरच्या लहानशा खोलीत आले. कंबरेला लुंगी. अंगात बनियन. केस विस्कटलेले, असं लक्ष्या बेर्डेसारखं व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तीचं दर्शन झालं. खाटेवर डेस्क घेऊन लिहिण्यात मग्न होते. आमची चाहूल लागताच आमच्याकडे त्यांनी मंदस्मित करून पाहिलं. खाडिलकरांनी आमची ओळख करून दिली,'नेमाडे, हे प्रकाश निलाखे.' हे ऐकताच नेमाडे उठून उभे राहिले. त्यांनी हस्तांदोलन केले. आम्हाला तेथे सोडून खाडिलकर आपल्या कामाला निघून गेले. फार दिवसांची ओळख असल्याप्रमाणे नेमाड्यांनी पोटभर गप्पा मारल्या. 'कथा तर १०० पानांची व्हायला हवी. विषय तर तेवढा लांबत नाही, तर मग काय करायचं माहीत आहे?' मी मानेनेच नाही म्हटले. 'असं लिहायचं असतं पाहा. बॅकग्राउंड समजा पोलीस स्टेशनची आहे. इन्स्पेक्टर आरोपीला विचारीत आहेत, ' तू दारू प्यायला आहेस का?'

'नाही.'

'नक्की?'

'हो!'

'देवाची शपथ घे!'

असे डायलॉग पानपूरके म्हणून वापरायचे.' आणि त्यांच्या लिखाणात अशा डायलॉगचा सर्रास वापर त्यांनी केला आहे, हे दिसून येत होते. मला मात्र अशा थिअरीचा सहसा वापर करावा लागला नाही; कारण माझ्याकडे इंधन भरपूर असे.

'निलाखे, आणखी एक गंमत सांगतो.

'काय रे ह्या तुमच्या पुण्याच्या बाया!'

'का? काय झाले?' मी अनभिज्ञपणे म्हटले.

'अरे, ती समोरची खिडकी दिसते का?' चौथ्या मजल्यावरील समोरील मजल्याच्या एका खिडकीकडे अंगुलीनिर्देश करून नेमाड्यांनी म्हटले,

'बरं मग?'

'एक बाई रात्री ११ वाजता त्या रूममध्ये अश्लील हावभाव करीत होती.'

'तुम्हाला ते कसे काय कळले?' मी भोळेपणाचा आव आणून विचारले.

'मला ती बाई दिसत होती; पण मी तिला पाहत आहे, हे तिला कळलंच नव्हतं,' मिस्कीलपणे हसत नेमाडे सांगत होते.

टाळ्या देऊन व पुन्हा भेटण्याचे वचन देऊन मी दिवाकर नेमाडे या वल्लीचा निरोप घेतला; मात्र आजतागायत माझ्या त्या हसतमुख मित्राची पुन्हा गाठ पडली नाही.

❖

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

पहिला मजला, कामत टॉवर,
आरपीडी कॉलेजसमोर, टिळकवाडी,
बेळगाव-५९०००६.
टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३.
टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल,
चिखलठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.
संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८०८

अधिक माहितीसाठी
www.wordpowerbookshop@gmail.com
येथे संपर्क साधा.

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

रहस्यकथांचे सम्राट बाबूराव अर्नाळकर

वामन देशपांडे

हे वैश्विक सत्य आहे की, रहस्यकथा आणि भयकथा जगभर वाचल्या जातात. तरुण वयात प्रवेश केला की, वाचण्याच्या आवडीला रहस्यकथा, गूढकथा आणि भयकथा प्रथम मोहिनी घालतात. केशवकुमार, म्हणजेच आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या 'आजीचे घड्याळ' या अत्यंत गाजलेल्या कवितेत एक कडवे असे आहे की,

आजीला बिलगून ऐकत बसूं जेव्हा भुतांच्या कथा,
जाई झोप उडून, रात्र किति हो ध्यानीं न ये ऐकतां!
''अर्धी रात्र किं रे'' म्हणे उलटली, '' गोष्टी पुरे! जा पडा''....
लागे तों धिडधांग पर्वतिवरी वाजावया चौघडा...

अगदी शालेय वयापासून, भीतीने थरथरायला लावणाऱ्या आणि तरीही रात्र रात्र ऐकत बसाव्यात अशा भुताखेतांच्या कथा ऐकण्यात माझे बालपण गेले. कथा अगदी समरसून ऐकण्याची ही गोडी मला शालेय वयातच लागली आणि त्याच शालेय वयात मला बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा वाचण्याचे जबरदस्त वेड लागले. केशवकुमार यांच्या आजीच्या घड्याळातल्या या गूढरम्य ओळींनी मला अक्षरशः मिठी मारलेली होती. १९५४-५५चा तो सुमार होता. मी तेव्हा चौथीत होतो. गिरगावात तेव्हा मी राहत होतो. आमच्या घराच्या मागे एक खूप मोठा पिंपळवृक्ष होता. त्या लहान वयात प्रथम माझ्या मनात भुताखेतांची, मनाचा थरकाप उडविणारी कल्पित वस्ती या सळसळणाऱ्या पिंपळाने निर्माण केली होती. याच पिंपळाच्या फांद्याफांद्यांवर भुते आहेत, असे माझ्या मनावर या वयात मोठ्या माणसांकडून बिंबवले गेले होते. संध्याकाळ झाली, की मन त्या भव्य पिंपळाभोवती घुटमळायला लागायचे. मनात भीती त्या पिंपळासारखी सळसळत राहायची. तरीही रात्रीची जेवणं झाली की, मोठ्या माणसांच्या घोळक्यात बसून मी त्या भयकथा ऐकण्यात गुंगून जायचो. वयाच्या दहाव्या वर्षी कथा ऐकण्याचा प्रथम छंद जडला आणि त्याची परिणती म्हणजे याच शालेय वयात गूढकथा वाचण्याचे जबरदस्त वेड लागले. मनात भीती जोपासतच मी त्या लहान वयात गूढकथा आणि भयकथा वाचत असे. त्याचा एक परिणाम असा झाला होता, की मध्यरात्री गाढझोपेत असताना खूप वेळेला मला भीतिदायक स्वप्ने पडायची. मी झोपेतच ओरडायला लागायचो. मला जागे करताना आईला खूप वेळेला त्रास व्हायचा; परंतु या भीतीने मला माझ्या भयकथा वाचण्याच्या वेडापासून दूर नेले नाही, तर माझे वाचन या भीतिग्रस्त अवस्थेने काहीसे वाढविलेच होते. माझे परम भाग्य असे, की गिरगावातल्याच मुगभाट लेनमध्ये एक वाचनालय होते, त्याची मला माहिती मिळाली. तिथे मला बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथांचा तर बाबूराव अर्नाळकरांच्या 'धनंजय-छोटू' 'काळा पहाड' आणि 'झुंजार' कथांच्या मला उपलब्ध झालेल्या सर्वच पुस्तकांचा मी अधाश्यासारखा फडशा पाडला. त्याची कहाणी विलक्षणच आहे.

शालेय आयुष्यात, म्हणजे किशोरवयाच्या उगमाशी, माझी वाचनमग्नता हलके हलके प्रकट होत असताना, रहस्यकथांचे सम्राटपद भूषवणारे श्रेष्ठ रहस्यकथा लेखक बाबूराव अर्नाळकर मला अवचितपणे भेटले, तेव्हा मी दहावीत होतो; परंतु १९६०मध्ये, मी दहावीत शिकत असताना, बाबूराव अर्नाळकर माझ्या वाचनवेड्या छंदात प्रथम डोकावले आणि पुढील दहा-बारा वर्षे, मी केवळ बाबूराव अर्नाळकरांचे समग्र वाङ्मय वाचण्यात गुंगून गेलो होतो. इतर रहस्यकथाकारांनीसुद्धा माझ्यावर त्या काळात मोहिनी घातली होती. रहस्यकथांमधल्या या



गूढरम्य वातावरणात मी माझे देहभान विसरून गेलो होतो. तेव्हा मी केवळ पंधरा-सोळा वर्षांचा होतो. बाबूराव अर्नाळकरांची 'रत्नजडित ऐरावत' ही काळापहाड कथा मी आयुष्यात प्रथम वाचली. या रहस्यमय कादंबरीने मला अक्षरशः भारावून टाकले होते. माझ्या थोरल्या भावाला रहस्यकथा वाचण्याचे जबरदस्त वेड होते. त्याच्याच आग्रहाने आणि प्रेरणेने मी रहस्यकथा वाचायला पहिल्यांदा सुरुवात केली आणि 'रत्नजडित ऐरावत' हाताशी पहिल्यांदा आली. त्या 'काळापहाड' कथेने मला अक्षरशः पछाडून टाकलं आणि बाबूराव अर्नाळकरांनी माझ्या वाचनवेड्या आयुष्यात पहिल्यांदा, पावलं न वाजवता प्रवेश केला. साने गुरुजी, य. गो. जोशी, महादेवशास्त्री जोशी यांच्या संस्कारक्षम अक्षरवाङ्मयावर मी मनापासून प्रेम करीत होतो. य. गो. जोशी यांचे अनेक कथासंग्रह मी माझ्या शालेय वयातच वाचून काढले होते. लक्ष्मणराव सरदेसाई यांची 'मोहोर', य. गो. जोशी यांची 'शेवग्याच्या शेंगा' यासारख्या कथांची माझ्यावर गारूडमोहिनी पडलेली होती. त्याच भावनाप्रधान वयात माझ्या आयुष्यात बाबूराव अर्नाळकरांच्या 'काळापहाड'ने जादूई प्रवेश केला आणि माझी ही संस्कारक्षम साहित्याच्या वाचनाची दिशा अचानकपणे बदलून टाकली. इतकी की, प्रथम मी 'काळापहाड'च्या मिळतील तितक्या कथा वाचून काढल्या. यानंतर 'धनंजय-छोटू' आणि 'झुंजार कथा' वाचल्या. वयाची पंचविशी ओलांडेपर्यंत, मी अर्नाळकरमय झालो होतो. बालसुलभ किशोरावस्थेतून तारुण्यावस्थेकडे वेगाने झेपावताना, जणू बाबूराव अर्नाळकरांच्या भयचकित करणाऱ्या रहस्यकथांनी माझा हात घट्ट धरला होता. यांच्या रहस्यकथांनीच माझे तारुण्य अक्षरश: जोजवले होते. या रहस्यकथांना मी मनाने भिडलो होतो. केवळ माझेच तारुण्य काही बाबूराव अर्नाळकरांनी जोजवले नव्हते, तर आज ज्या ज्या वाचकांनी आपला पन्नाशीचा उंबरठा ओलांडलेला आहे. त्या सर्वच सक्षम, साहित्यावर विलक्षण प्रेम करणाऱ्या वाचकांच्या तरल रसिकतेला, त्यांच्या आयुष्याच्या पूर्वार्धात बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथांनी भुरळ घातलेली आहे. 'काळापहाड', 'धनंजय-छोटू' ही जोडगोळी आणि 'झुंजार' यांना सतत उमलण्याचा वर बाबूराव अर्नाळकरांनी दिला आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या पात्रांना आणि आपल्या सर्वच रहस्यकथांना कोमेजण्याच्या शापातून कायमचं मुक्त केलं. अभिजात साहित्य वाचण्याचं वेड जपणाऱ्या प्रत्येक सश्रद्ध वाचकानं आपल्या वाचनाच्या पूर्वार्धात बाबूराव अर्नाळकर यांना मानाचा मुजरा करीतच, आपल्या वाचनवेडाचा 'श्री' गिरविलेला आहे, असं मला निश्चित वाटतं.

बाबूराव अर्नाळकर हे नाव रहस्यकथाकार म्हणून मराठी वाङ्मयाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरले. हे एकच नाव असे आहे की, ज्या नावाची 'गिनिज बुक ऑफ रेकॉर्ड्स' ने १९८५ मध्ये नोंद घेतली. 'गिनिज बुक' मध्ये असे नमूद केले गेले होते की, बाबूराव अर्नाळकर यांनी १९३६ ते १९८४ या जवळ जवळ पन्नास वर्षांत, १०९२ रहस्यकथा लिहिल्या आहेत. वास्तविक हा आकडा खूपच अधिक होता. ही मराठी साहित्यातली फार अभिमानास्पद अशी मोठी घटना होती. वैश्विक पातळीवर घेतल्या गेलेल्या या सर्वोत्तम वाङ्मयीन घटनेची, मराठी समीक्षाविश्वानं मात्र फारशी दखल घेतली नव्हती, हे वेदनामय सत्य होतं. आधुनिक म्हणजे अर्वाचीन साहित्यात रहस्यकथा हा अनोखा प्रकार बाबूराव अर्नाळकरांनी प्रथमच आणला होता. हा वाङ्मय प्रकार अत्यंत लोकप्रिय करणारे बाबूराव अर्नाळकर हे पहिले सर्वोत्तम लेखक होते. बाबूराव अर्नाळकर यांना जी लोकप्रियता लाभली, तशी आणि तेवढी अन्य मराठी लेखक अथवा कवीला फार क्वचितच लाभली असेल. बाबूराव अर्नाळकरांनी आपल्या ओघवत्या भाषेत जे गूढरम्य, रहस्याचा वेध घेणारं साहित्य प्रगट केलं, ती आकाशउंची त्यानंतर कुणालाच फारशी गाठता आली नाही. जसं 'फडके-खांडेकर' युग निर्माण झाले होतं तसंच, किंबहुना त्याहूनही अधिक रोमांचकारी युग अर्नाळकरांनी निर्माण केलं होतं. ना. सी. फडके (१८९४ ते १९७८), वि. स. खांडेकर (१८९८ ते १९७६) आणि बाबूराव अर्नाळकर (१९०७ ते १९९६) हे तीन मराठीतील अभिमानास्पद लेखक होते. हे तीनही महान लेखक विलक्षण लोकप्रिय होते आणि त्यांनी निर्माण केलेल्या अजरामर साहित्यावर मराठीतल्या काही पिढ्यांनी अपरंपार प्रेम केलं. परंतु आश्चर्य म्हणजे मराठीतल्या दिग्गज समीक्षकांनी खांडेकर-फडके यांच्या साहित्याला आपल्या समीक्षेच्या झुल्यावर खूप काळ झुलवलं. त्यांना मोठे पुरस्कार लाभले. मराठी भाषेला पहिल्यांदा 'ज्ञानपीठ पुरस्कार' 'ययाति' लिहिणाऱ्या खांडेकरांनी मिळवून दिला; परंतु मराठी समीक्षेनं 'रहस्यकथा' या साहित्यातील एका वाङ्मयीन प्रकाराला सतत दुय्यम स्थान दिलं आणि बाबूराव अर्नाळकर या श्रेष्ठ रहस्यकथाकाराला आपल्या समीक्षेपासून खूप दूर अंतरावर ठेवलं, हे कटू सत्य आहे. त्यांना प्रतिष्ठा लाभलीच नाही, याचं दुःख वाचकांना आजही होतं. १९४० मध्ये रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या २५व्या साहित्य संमलेनाचं अध्यक्षस्थान ना. सी. फडके यांना लाभलं. सोलापूर येथे १९४१मध्ये संपन्न झालेल्या साहित्य संमेलनाचं अध्यक्षस्थान वि. स. खांडेकर यांना लाभलं; परंतु 'फडके युग', 'खांडेकर युग' तसंच 'अर्नाळकर युग' निर्माण करणाऱ्या बाबूराव अर्नाळकरांना, हा श्रेष्ठ बहुमान लाभला नाही, याची खंत कित्येक साहित्यरसिकांना आजही होती. याचं सर्वांत महत्त्वाचं एकमेव कारण म्हणजे, मराठी वाङ्मयातच नव्हे, तर इतर सर्वच भाषांमध्ये रहस्यकथा, गूढकथा यांना फारसं महत्त्व दिलं गेलं नाही. केवळ मराठी वाङ्मयातच नव्हे, तर इतर सर्वच भाषांत रहस्यकथा, गूढकथा आणि भयकथा लिहिणाऱ्या आणि अगणित वाचक निर्माण करणाऱ्या बहुतांश लेखकांना सहसा दुय्यम स्थानच प्राप्त झालं आहे, याची जागतिक वाङ्मयाचा इतिहास साक्ष आहे. संपूर्ण विश्वाला वेड लावणाऱ्या 'पेरी मेसन'चा कर्ता अर्ल स्टॅनले गार्डनर यांनी पुस्तकांच्या खपाचे उच्चांक मोडले होते; परंतु केवळ याच लेखकाला नव्हे, तर रहस्यकथांची सम्राज्ञी म्हणून जागतिक पातळीवर ज्या लेखिकेची नोंद घेतली गेली, त्या 'ॲगाथा ख्रिस्ती' (इ.स. १८९० ते इ.स. १९७६), 'शेरलॉक होम्स'च्या रहस्यकथांचा बादशहा 'सर ऑर्थर कॉनन डायल' (इ.स. १८५९ ते इ.स. १९३०) यांच्यासारखे जागतिक कीर्ती मिळवणारे श्रेष्ठ रहस्यकथाकार अत्यंत लोकप्रिय ठरले होते, तरी त्यांची नोंद मूठभर समीक्षकांच्या उच्चभ्रू गटाने कधीच फारशी घेतली नव्हती, हे एक शल्य माझ्यासारख्या अनेक वाचकांच्या उरी आजही सलतं आहे. वाचकांच्या विश्वातला लोकप्रिय वाङ्मयप्रकार म्हणून जगभर मान्यता पावलेल्या त्या रहस्यकथांवर अनेक यशस्वी चित्रपट निघाले. या रहस्यपटांना जगभरातील प्रेक्षकांनी मान्यता दिली. अशा या रहस्यकथा आणि भयकथा यांचे लेखक मात्र काहीसे दुर्लक्षितच राहिले. बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा मराठी भाषेपुरत्या मर्यादित राहिल्या; परंतु त्या कथा इंग्रजीमधून भाषांतरित झाल्या असत्या, तर अनेक चित्रपट इंग्रजी भाषेमधून जगभर पसरले असते आणि 'शेरलॉक होम्स' सारखे 'काळापहाड' आणि 'धनंजय-छोटू' तसाच 'झुंजार' जागतिक पातळीवर गाजले असते. वाईट इतकेच वाटते की, निदान मराठी वाङ्मयातल्या दिग्गजांनी तरी बाबूराव अर्नाळकर या श्रेष्ठ

रहस्यकथांच्या बादशहाला मानाचे स्थान देऊन, त्यांच्या उत्कंठा वाढवणाऱ्या, रहस्य ताणत नेणाऱ्या कथांना आपल्या समीक्षेच्या तराजूत ठेवून, त्यांचं स्थान निश्चित करायला हवं होतं. वाचकांचं मनमुराद रंजन करणाऱ्या रहस्यकथांना न्याय द्यायला हवा होता. नाही म्हणायला ज्येष्ठ नाट्य आणि वाङ्मय समीक्षक माधव मनोहर यांनी 'बाबूराव अर्नाळकर हे एडगर वॉलेसपेक्षा श्रेष्ठ रहस्यकथा लेखक आहेत,' असे गौरवोद्गार काढले होते. ना. वि. काकतकरांच्या 'रहस्यरंजन' मासिकातून बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा आणि रहस्यप्रधान कादंबऱ्या प्रसिद्ध व्हायच्या. म्हणून 'रहस्यरंजन' मासिक त्या काळात खूपच वाचकप्रिय झालं होतं, ते केवळ बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्य-उत्कंठा वाढवणाऱ्या कथांमुळे आणि कांदबऱ्यांमुळे... बाबूराव अर्नाळकर यांचं मूळ नाव होतं चंद्रकांत सखाराम चव्हाण. शाळेत नाव घालताना त्यांच्या मामांनी, बाबूराव अर्नाळकर यांची जन्मतारीख ९ जून १९०६ अशी लिहिली.

या तारखेनुसार त्यांची जन्मकुंडली तयार झाली. काहींच्या मते १९०७ हे साल आहे आणि काहींच्या मते १९०९....थोडक्यात सांगायचं झालं, तर त्यांना जवळ जवळ नव्वद वर्षांचं आयुष्य लाभलं होतं. फेब्रुवारी १९४२मध्ये त्यांनी 'चौकटची राणी' ही पहिली रहस्यमय कादंबरी लिहिली. त्यानंतर ही जादूई लेखणी आयुष्यभर लिहितीच राहिली. या श्रेष्ठ रहस्यकथाकारानं आयुष्यभर व्रतस्थपणे रहस्यमय लेखनच केलं. लेखन हे त्यांचं जणू व्रत होतं. लाखो वाचक निर्माण करणारा हा श्रेष्ठ रहस्यकथाकार, हे मराठी वाङ्मयातलं एक फार मोठं आश्चर्यच होतं.

ज्येष्ठ आणि श्रेष्ठ असे कथा-कादंबरी-एकांकिका-नाटक या चारही वाङ्मय प्रकारांत आपलं स्थान ध्रुवताऱ्यासारखं अढळ करणारे 'भयकथा'कार रत्नाकर मतकरी यांनी बाबूराव अर्नाळकर यांच्यावर भाष्य करताना म्हटलं होतं की, ''जे मोठ्या जनसमुदायाला आवडते, त्याचे बुद्धिमंतांना नेहमीच आव्हान असते. जगभरात 'रहस्यकथा', 'डिटेक्टिव्ह स्टोरी' हा 'जॉनर' अत्यंत शिष्टसंमत असताना आणि ॲगाथा ख्रिस्तीपासून अर्ल स्टॅनले गार्डनरपर्यंत लेखकांच्या रहस्यकथेचे अनेक प्रकार, कादंबरीपासून ते तिच्यावर आधारित नाटक-चित्रपटांपर्यंत अत्यंत प्रेमानं व आदरानं स्वीकारले जात असताना, आपल्याकडच्या मर्यादित विचारशक्ती असलेल्या साहित्यिक समीक्षकांनी रहस्यकथेकडे पूर्णपणे पाठ फिरवली. अशा परिस्थितीत आपल्याकडे 'रहस्यकथा' हा शब्द रुजवण्यापासून ते वाचकाच्या जीवनानुभवात भर टाकणारे योगदान देईपर्यंत सर्व श्रेय निःसंशय ज्या एकाच लेखकाकडे जाते, तो म्हणजे बाबूराव अर्नाळकर.''

सुमारे पन्नास-पंचावन्न वर्षांच्या कालमर्यादेत बाबूराव अर्नाळकरांनी एकूण १३७८ रहस्यप्रधान कादंबऱ्या लिहिल्या. 'रात्रकथा' हे त्यांचं अखेरचं वाङ्मयीन अपत्य. श्री नित्यानंद महाराजांचे चरित्र लिहिले. 'अभिनव भारत' ही स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर चरित्रवजा स्वतंत्र कादंबरी लिहिली. आश्चर्य म्हणजे रहस्यकथेत रममाण असणाऱ्या बाबूराव अर्नाळकर यांनी 'मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास' लिहिला आणि 'नीलिमा' हा त्यांचा कथासंग्रहसुद्धा प्रसिद्ध झाला होता. एवढं प्रचंड लेखन करूनही, वाङ्मयीन महात्मतेच्या फूटपट्टीत बाबूरावांच्या कादंबऱ्यांना कधीच स्थान मिळालं नाही आणि याची बाबूरावांना कधी खंत वाटली नाही. खाली मान घालून त्यांनी आयुष्यभर फक्त रहस्यप्रधान साहित्यच लिहिलं. त्यांच्यावर आघात होईल अशा प्रतिक्रिया देणारी माणसं आजूबाजूला वावरत असताना, वा त्यांच्या एकूणच समृद्ध रहस्यकथांची नोंद घेण्याची चुकूनही तसदी न घेणाऱ्या उच्चभ्रू साहित्य विश्वानं, त्यांना जाणीवपूर्वक गावकुसाबाहेर ठेवूनसुद्धा बाबूराव अर्नाळकरांच्या लेखनावर वा मानसिकतेवर चुकूनही परिणाम झाला नाही, हेच त्यांच्या यशाचं गमक आहे. 'धनंजय' नावाचा एक सिनेमा ज्येष्ठ संगीतकार सी. रामचंद्र यांनी निर्माण करून 'धनंजय'ची भूमिकासुद्धा त्यांनीच केली होती.

९ जून १९०६ ते ४ जुलै १९९६ एवढा प्रदीर्घ आयुष्यप्रवास यशस्वीपणे करून लाखो वाचकांना साठ-सत्तर वर्षं अपार वाङ्मयीन आनंद दिला. ही शांत, तृप्त अशी वाङ्मयीन प्रकाश आसमंतात विखरून देणारी नंदादीपातली वात शांतपणे काळाच्या पडद्याआड अस्तंगत झाली.

'अर्नाळकरी युग' निर्माण करणारा, संपूर्ण विसाव्या शतकावर आपल्या रहस्यकथांच्या सोबतीनं अधिराज्य गाजवणारा अर्नाळकर यांच्यासारखा रहस्यकथाकार पुन्हा होणार नाही, हे मात्र निश्चित.

मो. ९३२४६१५०७७

❖

दुसऱ्या जागतिक महायुद्धादरम्यान सैनिकांकडून अनेकवेळा
बलात्कार झालेल्या स्त्रीची आठवणगाथा

फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स

लेखक : जॅन रफ्-ओ'हर्न । **अनुवाद :** नीला चांदोकर

पृष्ठसंख्या : २२८ । किंमत : २७०/-

नवं कोरं

पौगंडावस्थेतील वयात येतानाची भावोत्कटताआणि सामाजिक संकेतांची जाणीव उलगडतानाचा अंतर्मुख करणारा प्रवास...

चिकन सूप फॉर द टीनएज सोल

भाग २ व ३

संपादन आणि संकलन
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन
किम्बर्ली किर्बर्जर
अनुवाद : अवंती महाजन

पृष्ठसंख्या : १६८ । किंमत : १८०/-

पृष्ठसंख्या : १६० । किंमत : १८०/-

नवं कोरं

वेदनेला विराम देऊन चेहऱ्यावर
हसू फुलवणाऱ्या सकारात्मक गोष्टींची प्रेरणादायी पुस्तकं...

चिकन सूप फॉर द सोल टफ टाइम्स, टफ पीपल

भाग १ व २

संपादन आणि संकलन
ॲमी न्यूमार्क
जॅक कॅनफिल्ड
मार्क व्हिक्टर हॅन्सन
अनुवाद : श्यामला रा. पेंडसे

पृष्ठसंख्या : २४० । किंमत : २२०/-

पृष्ठसंख्या : १८४ । किंमत : २२०/-

पडद्यावरचे रहस्य

डॉ. अनमोल कोठाडिया

एक चित्रपट विधा



'अत्यंत कठीण काळात कदाचित भित्री मंडळीदेखील टिकू शकतात; मात्र सस्पेन्समध्ये केवळ जिगरबाजच तग धरू शकतात.'

- (मिग्रॉन मॅकलॉगलीन)

रहस्य वा संदेह ... केवळ कलाकृतीतील नव्हे तर जगण्यातीलही घटक आहेत. जीवन एक रहस्य वा सौंदर्याचे रहस्य अशाही अर्थाने रहस्य हा शब्द वापरला जातो. बहुतांश वेळा प्रत्येक चांगल्या फिक्शनमध्येही रहस्य वा संदेह काही ना काही प्रमाणात असतोच, असे म्हटले जाते; मात्र येथील रहस्य वा संदेह हे शब्द रहस्यपट वा संदेहपट (सस्पेन्स) विधेपेक्षा वेगळ्या आणि ढोबळ अर्थाने वापरलेला असतो, याची नोंद घ्यावी. जेव्हा रहस्य वा संदेह हे घटक प्रामुख्याने आणि विशिष्ट संकेतबद्धतेने कलाकृतीमध्ये आढळतात, तेव्हा ती कलाकृती सस्पेन्स या विधेतील आहे, असे आपण म्हणतो.

विधा म्हणजे काय?

अगदी ढोबळपणे सांगायचे तर कलाकृतीचा प्रकार होय. आशय, कथानक, प्रतिमा, भाषा, विशिष्ट संस्कृतीतील / समूहातील सामूहिक धारणा यानुसार एका विशिष्ट पद्धतीत बांधल्या गेलेल्या कलाकृतीचा प्रकार म्हणजे विधा (Genere / जॉनर) होय. विधा ही संकल्पना साहित्य, कला प्रकारात अगदी ग्रीक काळापासून दाखवता येत असली तरी चित्रपट या माध्यमामध्ये ती अवतरली हॉलिवूडची देणगी म्हणून, व्यावसायिक उपयोजन म्हणून. कालांतराने चित्रपट उद्योगातील या निव्वळ व्यावसायिक विधांचाही गंभीरपणे वापर आणि अभ्यास सुरू झाल्यावर माध्यम जाणिवासमृद्धीत चांगलीच भरही पडली.

एखादा चित्रपट व्यवसायबारीवर यशस्वी ठरला, की त्यातील कारणीभूत घटक रिपिट करता करता तो एक व्यावसायिक चित्रपट प्रकार म्हणून रूढहोऊ लागतो. उदा. कॉमेडी, वेस्टर्न, गुन्हेगारीपट, म्युझिकल, थ्रिलर ... भारतीय चित्रपटांमध्ये तर बहुतांशपणे विधांची सरमिसळ असते. त्यामुळे आपल्याकडे सस्पेन्स हा म्युझिकलही असू शकतो. सस्पेन्स असणारे 'तीसरी मंजिल', 'गुमनाम', 'वो कौन थी' सारखे चित्रपट म्युझिकल म्हणूनच लक्षात राहतात आणि गंमत म्हणजे ते धड म्युझिकलही नसतात. वेस्टर्न विधेत सहजसात्म्य होईल अशा मूळ जपानी 'सेव्हन सामुराई' वर आधारित 'मॅग्निफिसिएंट सेव्हन' या हॉलिवूडपटावरून प्रेरित 'शोले' मसालेदार वेस्टर्न आविर्भाव धारण करून येतो. आणि मग ती निव्वळ सूडकथा न उरता प्रेमकथा, म्युझिकल, कॉमेडी असे रुचिवैविध्य पटावर सादर करते. यात गैर काही आहे असे नाही, फक्त जागतिक चित्रपटांप्रमाणे आपल्याकडे विधेस अनुसरून बहुतांश चित्रपट बनत नाहीत, एवढेच स्पष्ट करायचे होते. अर्थात एका विधेतील चित्रपटात दुसरे घटक नसतातच असे नाही. प्रत्येक विधेचे काही संकेत ठरलेले असतात. उदा. म्युझिकलमध्ये संवादही गेय असतात, वेस्टर्नमधील काऊबॉय व्यक्तिरेखा, न्वार (Noir) विधेतील काळ्या रंगाचा मानवी प्रवृत्तीतील गुन्हेगारी काळी बाजू म्हणून वापर.

सस्पेन्स

तुम्हास एखादे कोडे टाकले आणि त्याचा लगेचच उलगडा केला तर काय होईल? ते कोडे, कोडेच उरणार नाही. त्यातील गंमतही उलगडणार नाही. ही गंमतच सस्पेन्स विधेमध्ये उलगडायची असते. कथानकात काही पार्श्वभूमीवर रहस्य वा संदेह निर्माण करायचा, हा ताण ताटकळत ठेवायचा, आणि शेवटी तो काही सरप्राईझसह मोकळा करायचा. थोडक्यात, सस्पेन्सची उकल करायची. मग ते खून प्रकरण असेल, चोरी असेल, वा एखाद्या संदर्भाचा शोध असेल. म्हणजेच उलगड्याइतकेच ताटकळत ठेवण्यालाही, किंबहुना त्यालाच अधिक महत्त्व असते; कारण सस्पेन्स उलगडण्याचा जो धक्का आनंद प्रेक्षकांना मिळतो, तो तत्कालीन काही क्षणांसाठीचा असतो; मात्र संदेह प्रेक्षकांना खूप वेळ गुंतवून ठेवतो. फक्त कशाची प्रतीक्षा करायची, हे प्रेक्षकांच्या मनामध्ये दिग्दर्शकाने पेरायचे असते. एकदा प्रेक्षकांचीही पूर्वतयारी झाली की सस्पेन्सची प्रक्रिया आणि परिणाम प्रेक्षकांच्या मनात सुरू झालेला असतो.

'सस्पेन्स' व 'थ्रिलर' समानार्थी नव्हेत

सस्पेन्स व उत्कंठावर्धक/थरारक (थ्रिलर) या संज्ञा अनेकदा एकत्र वापरल्या जातात, हे ठीक; पण काही वेळा समानार्थी म्हणूनही वापरतात. त्याची काही कारणे असली तरी ते समानार्थी शब्द नाहीत. याशिवाय गूढ(मिस्टरी) वा भय (हॉरर) बरोबरही याची गल्लत केली जाते. अनेकदा सस्पेन्स ही थ्रिलरची उपविधा असाही उल्लेख आढळतो. वरकरणी निरीक्षणातून ते तसे वाटले तरी तसे ते नाही. या संज्ञा एका ढोबळ उदाहरणासह स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. खुनी कोण आहे हे कदाचित 'गूढ' मध्ये समजणारही नाही. ते कदाचित धूसर, अज्ञातच राहील. थ्रिलरमध्ये खुनी कोण आहे हे कदाचित सुरुवातीपासून माहीत असेल वा दरम्यान माहीतही होईल; पण त्यात पाठलागासारखी ॲक्शन महत्त्वाची ठरेल आणि मोक्याच्या क्षणी काही कारणाने इप्सितापसून पुन्हापुन्हा निसटत राहील. त्यातून उत्कंठा निर्माण होईल. रहस्यामध्ये खुनी कोण आहे, हे कदाचित सुरुवातीपासून माहीत असेल वा नसेल; पण धोक्याचे सावट सतत रेंगाळलेले असेल. ॲक्शन तुलनेने कमी असेल.

सस्पेन्स आणि थ्रिलर अनेकदा एकत्रितपणे अवतरतातदेखील. उदा. बहुसंख्य हिचकॉकपट; पण 'हकल' (जॉर्ज पालथी) सारख्या हंगेरीच्या विलक्षण कलाकृतीमध्ये रहस्य हा घटक असला तरीही तो थ्रिलर बिलकूल नाही. एका हंगेरियन खेड्यातील दिनक्रम अगदी संवादविरहित निरीक्षणात्मक माहितीपटाच्या थाटात संथपणे दाखविला जातो. अगदी अर्ध्या तासानंतर एक पोलीस व्यक्तिरेखाही प्रवेशते. तेथून पुढेही त्याच शैलीत चित्रपट सुरू राहून संपतो. दरम्यान, आपण एक प्रेत, तपासाची काही अंडरटोन संदर्भ दृश्ये, गुन्हेगार सापडलाय हे सूचकतेने दाखविले जाते. यात थ्रिलरचा मागमूसही नाही. चित्रपट वरवर पाहिला असेल तर हा सस्पेन्स होता, हेही कळणार नाही. त्या अर्थाने हा सस्पेन्स समजायचा

की नाही, असाही वाद निर्माण होऊ शकतो; कारण त्या त्या विधेच्या संकेतपालनाची अट येथे पाळलेली नाही. याउलट अनेकदा थ्रिलर सस्पेन्स नसेलही. उदा. ॲपोकॅलिप्टो (मेल गिब्सन). एखादे पर्वत शिखर चढून जाण्यासंबंधीचा चित्रपट थ्रिलर असेल; पण सस्पेन्स असेलच असे नाही.

सस्पेन्सचे संकेत

सस्पेन्सचा विचार करताना उदा. खुनी कोण? का? कसा? अशा पद्धतीचा कथानकानुसारी विचार लागू पडत असेल असे वाटण्याची शक्यता आहे. यात तथ्यांश जरी असला तरी हे संपूर्ण तथ्य नव्हे. किंबहुना, अनेकदा मला केवळ खुनी कोण याचा उलगडा करू पाहणारा चित्रपट सामान्य सस्पेन्स वाटतो. तर तुलनेत का व कसा हा भाग हाताळणारा चित्रपट दर्जेदार सस्पेन्स वाटतो. अर्थात हा काही नियम नाही. म्हणून तर दुधात मिठाचा खडा टाकणाऱ्यांकडून जरी सस्पेन्स फुटला, तरी चांगला सस्पेन्सपट हा खिळवून ठेवतोच; कारण सस्पेन्स हा कथानक व घटनाक्रमाच्याही पुढे जाऊन ॲक्ट होत असतो. म्हणून तर हिचकॉकचे वा अन्य चांगले सस्पेन्सपट पुन्हा पुन्हा पाहतानाही खिळवून ठेवतात.

सस्पेन्स ही एक पद्धती असते... हे लक्षात घ्यावे लागते. उदा. हिचकॉकचेच सुप्रसिद्ध उदाहरण- दोघे जण बोलत बसलेत, त्या ठिकाणी अचानक बॉम्बस्फोट झाला तर ते सरप्राईझ ठरेल, शॉक ठरेल. सस्पेन्स नाही. हाच प्रसंग घडण्यापूर्वी त्या टेबलाखाली बॉम्ब ठेवलाय, हे प्रेक्षकांना सूचित करून दिले असेल तर तो बॉम्ब उडणार का.. ते तेथून उठून जाणार का... वाचणार का मरणार... असा सस्पेन्स तयार होतो. घटना तीच, पण कथन पद्धतीत बदल. या संदर्भात हिचकॉकचीच एक उक्ती - 'रजतपटावरचा सेक्सदेखील सस्पेन्समय असायला हवा, जर तो खूपच उघडपणे दाखविला तर त्यातील गंमत निघून जाईल.' अर्थात हा फक्त तपशिलातील बदल नसतो तर चित्रपट भाषेतील ट्रीटमेंटमध्येही ही सस्पेन्सपोषक पद्धती दिसून येते. 'रिअर विंडो'सारख्या हिचकॉकपटातून तो प्रेक्षकांना त्यातील मध्यवर्ती व्यक्तिरेखेशी रिलेट करतो, पॉइंट ऑफ व्ह्यू शॉट्समधून तो त्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातूनच कथानक घडवतो. पायाला प्लॅस्टर असणारा फोटोग्राफर नायक खुर्चीला खिळून घरातच अडकलाय. खिडकीतून बघत असताना त्याला समोरील फ्लॅटमध्ये घडणाऱ्या एका खुनाची शंका येते. प्रेक्षक संपूर्ण चित्रपट / कथानक या नायकाच्या घरातून, नायकाच्या दृष्टिकोनातूनच पाहतात. अशा प्रकारे दृष्टिकोनीय दृश्यांचा विशिष्ट वापर हादेखील येथे संकेतच बनतो. एरवी चमत्कृतीपूर्ण ॲंगल्सचा वापरही आढळून येतो, तो यामुळेच; पण केवळ ते म्हणजे सस्पेन्स नव्हे, हे आपल्याकडच्या 'कौन' मंडळींना कळत नाही.

लो की लायटिंग - बहुतांश सस्पेन्सपट अंधारात वा अंधूक वातावरणात घडतात. यासाठी लो की लायटिंग हा कळीचा मुद्दा ठरतो. प्रकाशयोजनेचे हाय व लो की लायटिंग असे दोन मूळ प्रकार पडतात. अंधारामुळे अर्थातच दृश्य तपशिलाबद्दल नेमकी माहिती प्रेक्षकांपर्यंत न पोचल्यापुळे कथावास्तूविषयी असणाऱ्या संदेहात अजून वाढहोते.

संदिग्ध अवकाशाचा, तसेच ऑफस्क्रीन अवकाशाचा वापर - सर्वसाधारपणे चित्रपटांमधून कथानक / आशय पोचविताना नेमकेपणाने अर्थ व भाव पोचावा या दृष्टीने दिग्दर्शकाचा प्रयत्न असतो. तेव्हा तो दृश्याबाबत ते अधिकाधिक निःसंदिग्धपणे प्रेक्षकांपर्यंत पोचविताना दृश्यातून ओरिएन्टेशन नेमकेपणे व्हावे यासाठी तो साधारणतः मुक्त आणि बंदिस्त अवकाशाचा अधिकाधिक वापर करतो; मात्र सस्पेन्समध्ये संदिग्ध तसेच ऑफ स्क्रीन अवकाशाचा वापरही जाणीवपूर्वक काही वेळा केला जातो. ऑफ स्क्रीन अवकाश म्हणजे प्रसंगाचा परिसर; पण जो फ्रेमबाहेर राहिलेला आहे. संदिग्ध अवकाश म्हणजे फ्रेममधील कोणत्याही ऑब्जेक्टशी रिलेट न करता येणे.

अर्थात विधेत काम करत असताना, संकेतबद्धतेने काम करत असताना काही वेळा संकेत तोडलेही जातात, तर काही वेळा नवीन संकेत निर्माणही केले जातात.

संकेत ही काही पोलादी चौकट नव्हे. शुद्धपणे सस्पेन्स विधा असे घडणे मुश्कील असते. अशा वेळी सस्पेन्स-थ्रिलर, सस्पेन्स-हॉरर, सस्पेन्स-न्वार, सायकॉलॉजिकल सस्पेन्स असा संकरही घडतो. त्या वेळी अशा विधा-संकरानुसारही काही वेगवेगळे संकेत निर्माण होतात. सस्पेन्स-न्वारमध्ये हिंसाचार तुलनेने अधिक असेल. सस्पेन्स-थ्रिलरमध्ये ॲक्शन तुलनेने जास्त असेल. अर्थात, या तारतम्याने लक्षात येण्यासारख्या गोष्टी आहेत.

सस्पेन्सचे फुसके बार

आपल्याकडे सस्पेन्सच्या नावाखाली केवळ खुनी कोण यावरच फोकस राहतो. या असतात हुडनीट्स फिल्म्स. या असायला हरकत नाही; पण त्याची उकलसुद्धा अनेकदा प्रेक्षकांची फसवणूक केल्यासारखी होते. सुरुवातीपासून शेवटपर्यंत कथानक एका वेगळ्याच परिघात फिरवले जाते. दरम्यान, एक अत्यंत बिगरमहत्त्वाची व्यक्तिरेखा कधीतरी फुटकळ पद्धतीने येऊन जाते. त्याचा कथानकात सोडलेल्या कथासूत्रांशी काहीच संबंध येत नाही. शेवटी अचानक तोच खुनी म्हणून दाखविला जातो. त्याचे कारण काही भलतेच निघते, वा अशाच पद्धतीने अचानक संबंधित व्यक्तिरेखेचा डबल रोल असणे, वा फिल्मी वास्तववादी पद्धतीने सारे कथन झाल्यावर 'तलाश' सुरू असताना अचानक एखादी व्यक्तिरेखा भूत वगैरे असणे, असेही असायला हरकत नाही. (मनोज श्यामलनचा 'द सिक्स्थ सेन्स' हे एक चांगले उदाहरण;) पण मग हे सरप्राइझ मिळाल्यानंतर प्रेक्षकांनाही वाटायला हवे की, अरे, याचे काही सूत्र दिग्दर्शकाने दरम्यान दाखविले होते, ते आपल्या लक्षात कसे आले नाही? नायकच खुनी असताना त्याने स्वतःच शोध घेतोय असे दाखविणे, त्याचे हे शोध घेणे हे इतर व्यक्तिरेखा समोर असताना समजून घेता येते; पण तो एकटा असतानाही 'खोज' करत असेल तर ही प्रेक्षकांची फसवणूक आहे, हे मान्य करावे लागेल; मात्र अशा फुसक्या सस्पेन्सनाही अनेकदा व्यवसायबारीवर यश मिळते तेव्हा आश्चर्य वाटते. मी याबाबत काही प्रेक्षकांशी संवाद साधला तेव्हा सस्पेन्समध्ये असा चकवा असणारच ना, असे तेच सांगतात. इतका समजूतदारपणा असल्यावर आणि हादेखील एक संकेत मानल्यास, सस्पेन्सची फुसके सस्पेन्स अशी एक उपविधा मानायला हरकत नाही. अशा चित्रपटांची उदाहरणादाखल दखल देखील मला अदखलपात्र वाटते. शिवाय आपल्याकडचे बहुतांश सस्पेन्सपट हे श्रेय-निर्देश न करता झालेले

हॉलिवूडचे रिमेक आहेत. अर्थात, हे वेगळे सांगायची गरजही नाही.

चित्रपटाच्या फ्रेमांतर्गतदेखील अतार्किक असणारी कलाटणी, विनाकारणच धक्के देत राहण्याचे क्लिशेज यातून सस्पेन्स नव्हे, तर बिस्पेन्स-इनोदी चित्रपटांची पैदास होते. माझा एक मित्र तर 'आपल्याकडे कशालातरी झाकतात आणि त्यालाच सस्पेन्स सस्पेन्स म्हणून गाजवतात,' अशी व्याख्या करतो. अर्थात, येथे चित्रपटबाह्य तार्किकतेची अतिरेकी अपेक्षा लादण्याचीही गरज नाही; मात्र ती बाजूला सारताना, एकूण परिणाम साधताना विषयवस्तूबाबत गोंधळ उडणार नाही, याकडे दिग्दर्शकाला लक्ष द्यावे लागते.

'कानून' (बी. आर. चोप्रा) सारखा भारतीय मुख्य प्रवाहातील दुसरा गीतविरहित चित्रपट असो वा 'खामोश' (विधू विनोद चोप्रा) सारखे काही चांगले सस्पेन्स चित्रपट आपल्याकडेही बनतात. अगदी अलीकडच्या काळातील 'अ वेन्सडे' (नीरज पांडे), कहानी (सुजोय घोष), दृश्यम् (जितू जोसेफ/ मल्याळम्) सारखे चांगले सस्पेन्सपट वानगीदाखल सांगता येतील. यात आणखीही खूप नावे निश्चितपणे जोडता येतील; पण बहुतांशपणे आपल्याकडे बनतात ते फुसके सस्पेन्स.

सस्पेन्सच्या पलीकडे

सस्पेन्स ते सरप्राइझ हा अनुभव सर्वसामान्यपणे एखाद्या सस्पेन्सपटाने चांगल्या पद्धतीने दिल्यानंतरही खूप चित्रपट केवळ सस्पेन्सपटच उरतात; मात्र काही सस्पेन्सपट हे केवळ सस्पेन्सच्या पलीकडे जात एक व्यापक जाणीवही देतात. उदा. हिचकॉकपटांमधील मनोविश्लेषण. अन्य चित्रपटांचीदेखील नावे सांगता येतील. 'सिटीझन केन' (ऑर्सन वेल्स) या कलाकृतीत केन या माध्यम सम्राटाच्या मृत्यूनंतर त्याने अगदी शेवटी उच्चारलेल्या 'रोझबड' या शब्दाचे रहस्य उकलण्याचा प्रयत्न होतो. हा शोध घेणाऱ्या माहितीपट चमूस वा पडद्यावरील कोणाही व्यक्तिरेखेस हा छडा लागत नाही.

त्यामुळे काही ठिकाणी हा गूढपट म्हणून ओळखला जातो; मात्र मला तसे वाटत नाही. जरी व्यक्तिरेखांना हा शोध लागला नाही तरी ज्यांच्यासाठी ही कलाकृती घडवली जाते, त्या प्रेक्षकांना रोझबड या शब्दाचा उलगडा अखेरीस होतोच. त्यामुळे यात अनेक विधा येत असल्या तरी ही प्रामुख्याने सस्पेन्सच आहे. अर्थात 'सिटीझन केन'चा आशयावकाश व हाताळणीदेखील या कलाकृतीस निव्वळ सस्पेन्सच्या पलीकडे घेऊन जातो. कथानक व परिणाम पातळीवर सस्पेन्सचा अनुभव घेतल्यानंतर त्याच्याही पलीकडे जात सामाजिक, राजकीय, मानसशास्त्रीय, पर्यावरणीय, मानवीय असे काही व्यापक भान मिळू लागल्यास (अर्थात ही बंधनकारक अट नव्हे) ती कलाकृती एका नव्या उत्तुंग पातळीला पोचते; पण त्यासाठी आपण प्रथम फुसक्या सस्पेन्समधून तरी बाहेर पडायला हवे ...

cineanmol@yahoo.co.in

नवं कोरं

बदलत्या सहस्त्रकात राजकीय, आर्थिक, पर्यावरणीय परिस्थितीचे पडसाद व समाजात उमटणाऱ्या पडसादांचा अभ्यासपूर्ण धांडोळा घेणारा कोश.

भारतीय समाजविज्ञान कोश

संपादक
स. मा. गर्गे

Book Available

पृष्ठसंख्या : ५१२ । किंमत : ७५०/-

पृष्ठसंख्या : ७४४ । किंमत : १२००/-

टी बुक क्लब

या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

चालू बुक क्लबचे सभासदत्व **५० रु.** भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा ८ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५. इतर पुस्तकांवर २०% सवलत मिळवा.

टी बुक क्लब २६ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

द सिन्स ऑफ द फादर	जेफ्री आर्चर	अनु. लीना सोहोनी	४००
अ टाइम टू किल	जॉन ग्रिशॅम	अनु. बाळ भागवत	६००
द गन्स ऑफ नॅव्हरॉन	ॲलिस्टर मॅक्लीन	अनु. अशोक पाध्ये	३५०
बॅड ट्रॅफिक	सायमन लुईस	अनु. प्रसाददत्त गाडगीळ	३५०
इन्फर्नो	डॅन ब्राऊन	अनु. अशोक पाध्ये	६००
बेस्ट केप्ट सिक्रेट	जेफ्री आर्चर	अनु. लीना सोहोनी	५००

टी बुक क्लब २७ मधून प्रकाशित झालेले पुस्तक

बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर	जेफ्री आर्चर	अनु. लीना सोहोनी	५००

टी बुक क्लब २७ मधून प्रकाशित होणारी पुस्तके

इंटरव्हेन्शन	रॉबिन कुक	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर
ब्लॅकलिस्ट	ब्रॅड थॉर	अनु. बाळ भागवत
द ओडिसा फाइल	फ्रेडरिक फॉर्सिथ	अनु. अशोक पाथरकर
द ब्रोकर	जॉन ग्रिशॅम	अनु. अशोक पाध्ये
बेअरआयलंड	ॲलिस्टर मॅक्लीन	अनु. अशोक पाध्ये

सभासद फी ५०रु. सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा!

झुंजार लेखणी... आशयघन विषय...
लक्ष्यवेधी मांडणी...
विश्वास पाटील यांची साहित्यसंपदा...

औरंगजेबासारख्या कळिकाळाशी जीवमरणाची
झुंज दिलेल्या शिवपुत्राची अनोखी चित्तथरारक संघर्ष गाथा!

संभाजी



साहित्य, इतिहास, नाट्य, संगीत, सिनेमा यांवर आधारित लेखांमधून
महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवणारा अस्सल छापाचा...

बंदा रुपाया!

१९४२ मध्ये ब्रिटिशांची झोप उडवणाऱ्या
क्रांतिसिंह नाना पाटील यांची समरगाथा!

क्रांतिसूर्य

हॉलिवूड-बॉलिवूडच्या चित्रपटांचा,त्यांच्या निर्मितीप्रक्रियेपासून
घेतलेला अभ्यासपूर्ण मागोवा!

नॉट गॉन विथ द विंड

नवं कोरं

पोटच्या पोरींना सक्षमपणे उभं राहण्याचं बाळकडू देणाऱ्या, महावीर सिंग फोगाट यांची कहाणी...
'दंगल' सिनेमाचे प्रेरणास्थान...

आखाडा

महावीर सिंग फोगाट यांचे जीवनचरित्र

लेखक : सौरभ दुग्गल

अनुवाद : लीना सोहोनी



पृष्ठसंख्या : २०८ । किंमत : २२०/-



नवं कोरं

पाखरांची बोली टिपणारा..स्वराज्यनिष्ठेचा प्रेरक..
आणि प्रखर योद्धा 'बाजिंद'..
रसिक वाचकांवर मोहिनी घालणारी
रहस्यमयी प्रेमकथा..

बाजिंद

पै. गणेश मानुगडे

पृष्ठसंख्या : १६० । किंमत : १८०/-

२ री आवृत्ती

उत्कांतीवादाला धक्का देणारी रहस्यमय कादंबरी

क्रोमोझोम्-6

लेखक : डॉ. रॉबिन कुक

अनुवाद : वैशाली जोशी

पृष्ठसंख्या : ५१२ । किंमत : ४९५/-



७ वी आवृत्ती

कोमा केसेसचा छडा लावण्यासाठी मेडिकलच्या
एका विद्यार्थिनीने लावलेली जिवाची बाजी;
आणि मेंदूला झिणझिण्या आणणारे त्यामागील रहस्य....

कोमा

लेखक : **रॉबिन कुक**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

पृष्ठसंख्या : १४० । किंमत : १२०/-

नवं कोरं

जेफ्री आर्चरच्या 'क्लिफ्टन क्रॉनिकल्स'चा औत्सुक्यपूर्ण आणि विलक्षण थरारक भाग

अनुवाद : **लीना सोहोनी**

TBC सभासदांना निम्म्या किमतीत

लंडनमधील एका नामवंत
कुटुंबाच्या आयुष्यातील थरारनाट्य..

बेस्ट केप्ट सीक्रेट

खंड ३

Book Available

पृष्ठसंख्या : ४१६ । किंमत : ५००/-

वाचकाला क्षणाक्षणाला रोमांचित करून
त्याच्या मनावरचा ताण वाढवत नेणारी,
त्याला जागच्या जागी खिळवून
टाकणारी कादंबरी...

बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर

खंड ४

Book Available

पृष्ठसंख्या : ४१२ । किंमत : ५००/-

नवं कोरं

जेन वाँगच्या हातून चौतीस वर्षांपूर्वी घडलेल्या मैत्रिणीच्या
चुकीमुळं झालेलं उद्ध्वस्त आयुष्य...
ती चूक सुधारण्यासाठी जेनची पुन्हा चीन भेट...
या भेटीवर चीनच्या राजवटीत होणारं परिवर्तन...

बीजिंगचे गुपित

लेखक : जेन वाँग । **अनुवाद :** मोहन गोखले

पृष्ठसंख्या : ३३२ । किंमत : ३५०/-

गावोगावच्या गोष्टी

धारवळ

श्रीकांत काळे

सुमन

त्या दिवशी निघता निघता सासूबाई म्हणाल्या होत्या, ''आज अमावस्या आहे, तेव्हा जपून जा.'' त्यावर श्यामकांतांनी त्यांचं म्हणणं उडवून लावलं होतं; पण का कुणास ठाऊक, तो विचार माझ्या मनात सलून बसला.

आम्ही जमशेदपूरला ह्यांच्या काकांकडे निघालो होतो. तिथे जायला 'गीतांजली'सारखी सोईची गाडी नाही. अगदी पहाटे ६ वाजता निघते. आमची थर्ड एसीची तिकिटे होती आणि तो डबा अगदी प्लॅटफॉर्मच्या टोकाला इंजिनच्या जवळ असतो.

श्यामकांत रिझर्व्हेशन चार्ट बघत होते. मी गर्दीपासून जरा लांब उभी होते. तेवढ्यात जोशी दिसला. कॉलेजमध्ये दोन वर्षं आम्ही एकत्रच होतो. आईला घेऊन तो नागपूरला निघाला होता. उपचार म्हणून त्याने आईशी ओळख करून दिली आणि माय-लेक पुढे सटकले. श्यामकांतनी येता येता त्यांना बघितलं आणि सहजच विचारलं, ''कोण होता?'' मी पण सांगितलं, ''जोशी! आमच्या वर्गात होता. मराठी वाङ्मय मंडळाचा सेक्रेटरी होता. मी हस्तलिखितात लिहीत होते.'' डब्याकडे निघता निघता मी माहिती दिली.

गाडीत वाचायला म्हणून मी एक फिल्मी मासिक घेतलं होतं. त्यांना असली मासिकं वाचायची आवड नाही. तास न् तास खिडकीबाहेर बघत असतात. भुसावळनंतर पांगिरा का कोणतंतरी स्टेशन येतं. त्या स्टेशनानंतर पाच-सात मिनिटांनी डावीकडे एक छोटीशी टेकडी येते. त्या टेकडीवर एक जुनं मंदिर आहे. नागपूरला जाताना श्यामकांत त्या मंदिराची अगोदरपासूनच वाट पाहत असतात, ते अगदी ते मंदिर दृष्टिआड होईपर्यंत. ''एवढं काय आहे त्या मंदिरात?'' मी एकदा त्यांना विचारलं होतं.

''ते मला माहीत नाही; पण मला ते मंदिर एकदा आतून पाहायचं आहे. केव्हातरी खास ट्रिप काढली पाहिजे फक्त त्या मंदिरासाठी. तसं खास नसेलही काही; पण मला मात्र फार कुतूहल वाटतं. अशा निर्जन जागी कोणी येतही नसेल,'' ह्यांनी सांगितलं होतं. हे असंच काहीसं संभाषण प्रत्येक ट्रिपच्या वेळी होत असे. आतासुद्धा मी त्यांना गमतीनं म्हटलं होतं, ''काका इतके दिवस बोलावताहेत, मग आत्ताच तडकाफडकी का ठरवलंत? का मंदिराची आठवण झाली? वेळ असेल तर आत्ताच वाटेत उतरून मंदिर पाहून घेऊ आणि पुढे जाऊ.'' श्यामकांत काही बोलले नाहीत. त्यांना ती चेष्टा आवडली नसावी; पण नुसतं हसून त्यांनी तो विषय बंद केला होता.

'गीतांजली' वेळेवर सुटली. सुरुवातीला परिचित स्टेशनं, नंतर घाट, ब्रेकफास्ट यात नाशिकपर्यंतचा वेळ चांगला जातो. मग सगळा रखरखाट. मैलो न् मैल माळरानं. मध्येच एखादं गाव आणि स्टेशन. एसीमुळे रखरखाट जाणवत नव्हता एवढंच. नाशिकनंतर मासिक वाचायला काढलं. चाळता चाळता एका फोटोवर नजर स्थिरावली. नाव वाचून खात्री करून घेतली. ती ज्यूली परेराच होती. कुठेतरी, केव्हातरी एका पार्टीच्यावेळी कानावर आलं होतं... ३१ डिसेंबरची पार्टी, सगळ्यांचीच विमानं आकाशात तरंगत असतात. त्यातलं खरं किती, खोटं किती, देव जाणे! पण कानावर आलेली गोष्ट अशी होती-

ज्यूली परेरा पूर्वी श्यामकांतांच्याच ऑफिसात त्यांची स्टेनो होती. त्यांचे संबंध पण खूप जवळपर्यंत आलेले होते. सगळ्यांची खात्रीच होती, की श्यामकांत व ज्यूली विवाहबद्ध होणार म्हणून; पण नंतर काय झालं कुणास ठाऊक! ज्यूलीनं ती नोकरी सोडली आणि सिनेमा-नाटकांतून कामं करायला सुरुवात केली. नुकतीच सी टीव्हीवर एक सिरियल पाहिली होती. पूर्वजन्माची गोष्ट होती. त्यातील नायिकेचं काम तिनं केलं होतं. मागच्या जन्मात अपुरी राहिलेली इच्छा पुरी करून घेणार होती. नायकाभोवती ती जाळे पसरत होती; पण नायक मात्र त्याच्या पूर्वजन्माबद्दल अनभिज्ञ होता.

श्यामकांतांना ही असली गूढकथानकं फार आवडतात. मला मात्र वाटतं, असले कार्यक्रम बंद केले पाहिजेत. उगाचच अंधश्रद्धा पसरवत असतात. ह्यांचं म्हणणं, 'तसं नाही. डिस्कव्हरीवर एक कार्यक्रम 'स्मृती'बद्दल होता. त्यात गर्भाला पण स्मृती असते, हे सिद्ध केलेलं होतं; परंतु ही स्मृती किती जुनी असू शकते, याबद्दल संशोधन चालू असल्याचं सांगितलं होतं. जी गोष्ट सिद्ध करता येत नाही, ती अस्तित्वातच नाही असं म्हणणं चुकीचं आहे.'

थोड्या वेळानं वाचायचा पण कंटाळा आला होता. श्यामकांतांना बोलतं करावं म्हणून त्यांना तो फोटो दाखवला आणि विचारलं, ''ही बघा तुमची ज्यूली परेरा. मस्त दिसते नाही? अगदी भारतसुंदरी पण झाली असती; पण त्या वयात नोकरी करत बसली ना! तुमच्याच ऑफिसात होती म्हणे!'' श्यामकांत आणि ज्यूली यांच्या संबंधांबद्दल मला माहीत असल्याचं मी त्यांना कधीच जाणवू दिलं नव्हतं. आमच्या दोघांत तो विषय कधीच निघाला नव्हता. मेली मढी उकरून काढून सुखी संसारात वादळ उठवायची माझी इच्छा नव्हती. त्या पार्टीतलं बोलणं श्यामकांतांच्या कानी पडलं असेलच असं नाही किंवा ही गोष्ट मला माहीत आहे, हे पण त्यांच्या लक्षात आलं असेल. हा विषय आमच्या बोलण्यात कधीच आला नव्हता; पण त्या बेसावध क्षणी मी तो विषय कसा काढला कोणास ठाऊक! पण श्यामकांतांची प्रतिक्रिया तिखट होती.

''हो! होती. माझ्याच ऑफिसात होती. एवढंच नव्हे तर ती माझी

स्टेनो पण होती. आताच्या फोटोत दिसते त्यापेक्षा खूपच सुंदर दिसत होती. आणखी काही? तिथे लिहिला का आमच्या ऑफिसचा पत्ता?'' श्यामकांतांचा स्वर अकारण चढला होता.

''अहो, मी नुसतं विचारलं तर त्यात एवढं चिडायला काय झालं. ती तुमची स्टेनो असेल की आणखी काही असेल; मला काय त्याचं? तुम्ही तिच्या सिरियल्स आवडीने बघता. मला वाटलं ती तुम्हाला आवडत असेल म्हणून दाखवला फोटो.'' माझा आवाजपण जरा चढला होता.

''गूढसिरियल्स मला आवडतात. त्यात ज्यूलीबरोबर इतर अनेक जण आहेत आणि समजा ज्यूली माझ्या ऑफिसात असली तरी त्याचा माझ्याशी काय संबंध? पत्रकारासारखं उगाचच काहीतरी उकरून काढू नकोस. पत्रकारांचा तो धंदाच आहे. ती जरी माझी स्टेनो होती तरी ती ऑफिसात. त्यापलीकडे आमचा संबंध नव्हता, कळलं? तो मघाशी भेटलेला जोशी का कोण तो? तो वाङ्मय मंडळाचा सेक्रेटरी आणि तू त्याची स्टेनो म्हणजे तुझी आणि त्याची भानगड होती का, असं विचारू?'' श्यामकांत आता खरोखरच चिडले होते.

''हे बघा! उगीचच वाकड्यात शिरू नका. तो जोशी आमच्या म्हणजे कॉलेजच्या वाङ्मय मंडळाचा सेक्रेटरी होता. जर त्याने ओळख दाखविली तर नको का त्याच्याशी चार शब्द बोलायला? भानगड म्हणे! आम्ही कधी एकत्र फिरायला गेलो होतो का, कधी सिनेमला गेलो होतो? ऑफिसात लोक स्टेनोबरोबर काय काय चाळे करतात ना त्याला भानगडी म्हणतात. मी कधी कुणाची स्टेनो म्हणून काम केलेलं नाही. ज्यांनी केलं असेल त्यांनाच तसल्या भानगडी आणि लफडी करायला जमतात आणि पुरुष नंतर नामानिराळे राहतात. मला उगाच बोलायला लावू नका. खाई त्याला खवखवे. मी एका शब्दाने तरी तुमचे आणि तिचे संबंध होते असं म्हटलं होतं का? आता ती ज्यूली असो वा फिली असो, आपण तिला विसरून जाऊ. वटपौर्णिमेला मी पुढच्या जन्मी तरी तुम्हाला ज्यूलीच मिळो अशी प्रार्थना करीन. झालं?'' मी समारोप केला.

''खरं? बघू तुझी प्रार्थना फळाला येते का?'' श्यामकांत उपहासाने म्हणाले. मला पण विषय वाढवायचा नव्हता. नंतर बराच वेळ आम्ही गप्प होतो. श्यामकांत मात्र अस्वस्थ होते.

दुपारच्या चहानंतर मीच बोलायला सुरवात केली, ''आता ते तुमचं मंदिर येईल. आपल्याला जायचंय ना ते मंदिर पाहायला?'' आमच्या सीट्स उजवीकडे होत्या. ती टेकडी व मंदिर डाव्या बाजूला आहे. त्यांच्या मनात काय आलं कुणास ठाऊक. ''मी दरवाज्याजवळ जाऊन उभा राहतो,'' म्हणाले आणि उठले; पण एसीमध्ये काळ्या खिडक्यांमुळे सकाळ-दुपार फारशी जाणवत नाही आणि आवाजही ऐकू येत नाहीत. त्यामुळे गाडी थांबली की स्टेशन आलं असं समजायचं. इतर डब्यांतून फेरीवाल्यांचा आरडाओरडा ऐकू येतो. खिडक्यांमधून पैशांची व पदार्थांची देवाण-घेवाण होत असते. एसीमध्ये सगळं शांत. जणू जगापासून दुसरं अलिप्त जगच. मी परत मासिक वाचू लागले.

बराच वेळ झाला तरी श्यामकांत परत आले नाहीत. म्हणून बाहेर जाऊन टॉयलेट्स बघून आले. अटेंडंटजवळ चौकशी केली तेव्हा तो म्हणाला, ''हाँ, वो साब! यहाँ दरवाजेपे खडे रहकर बाहर देखते थे! लेकिन उसको एक घंटा हुआ! वहाँ गाडी रुकी थी, पाच मिनिट के लियेही होंगी! सामने एक मंदिर दिखाई पडा तो उन्होने पूछा भी कि कौनसा मंदिर है? मैने कहा मुझे क्या मालूम कौनसा है? बस! इतनीही बात हुई और मैं अपने कामपर चला गया!''

म्हणजे मंदिराजवळ गाडी थांबली होती आणि श्यामकांत त्याची चौकशीही करत होते. त्या मंदिराबद्दलचं कुतूहल त्यांना तिकडे खेचून नेत होतं. हळूहळू ती बातमी पसरत चालली. आजूबाजूच्या कोणत्याच डब्यात श्यामकांतचा पत्ता नव्हता. एका चहावाल्यानं सांगितलं, की त्या मंदिराजवळ गाडी उभी असताना एक माणूस टेकडीवरच्या मंदिराकडे जाताना त्यानं पाहिला होता. तो माणूस पोशाखावरून शहरी वाटत होता. संधिप्रकाशात नीट दिसलं नाही; गाडी पण सुटलेली होती. बेसिनवर ग्लास विसळायला का कशाला तरी तो उभा होता. एवढं होईपर्यंत आणखी एक तास तरी गेला होता. अकोला पण मागे पडलं होतं. गाडी थांबवून मागे फिरणं शक्यच नव्हतं.

मला तर रडूच फुटलं. सहप्रवासी मला धीर देत होते, की नागपूरला गेल्यावर पोलीस कंप्लेंट नोंदवू. पोलीस त्यांचा नक्की शोध घेतील. जमेची बाजू म्हणजे श्यामकांत पडले नव्हते. सुखरूप होते. अति साहस किंवा फाजील आत्मविश्वासाने ते गाडीतून उतरले होते आणि मग गाडीने वेग घेतल्याने गाडी चुकली होती. मला मात्र मनोमन जाणवत होतं, की ज्यूलीचा विषय काढायला नको होता, वाढवायला नको होता. श्यामकांत कधीतरी त्या मंदिराकडे जाणारच होते; पण अशा सांजवेळेला आणि अमावस्येच्या रात्रीच तिथे का उतरले? त्यांना तिथे उतरायला मी कारणीभूत झाले का? का ज्यूलीचा काही संबंध आहे?

श्यामकांत

मुंबईहून जमशेदपूरला जाण्यासाठी 'गीतांजली'सारखी दुसरी सोईस्कर गाडी नाही. कलकत्ता मेल किंवा हावडा एक्स्प्रेसनं गेलं, की पूर्ण दोन रात्रींचा प्रवास होतो. थोडक्यात, मुंबईहून दिवसभराची कामं आटपून रात्री निघायचं आणि पोहोचायचंही मध्यरात्रीच. म्हणजे जरा विश्रांती घेतली की लगेचच कामाला लागायचं. याउलट 'गीतांजली' मुंबईहून सुटतेच सकाळी ६वाजता आणि जमशेदपूरला पोहोचते दुसऱ्या दिवशी १०च्या सुमारास. मध्ये फक्त एक रात्र. वेळेवर गाडी पकडायची म्हणजे ३॥ ते ४ वाजता उठावं लागतं. परत टॅक्सी पकडून ए.ए.ऊ.ला पोहोचायचं म्हणजे टेन्शनच असतं; पण टाटानगरला दिवसाउजेडी पोहोचल्यानं रिक्षा वगैरे मिळायला अडचण येत नाही.

मला आगगाडीचा प्रवास खूप आवडायचा. आता पण आवडतो; पण पूर्वीइतका नाही. हल्लीहल्लीपर्यंत वाफेची इंजिनं वापरात होती. त्या इंजिनांना झूऽऽक झूऽऽक असा लयबद्ध आवाज होता. त्याचबरोबर रुळांचा. त्यांच्या सांध्यांचा पण ताल. असं शांत पडून ऐकत राहावं. ऐकता ऐकता कधी झोप लागे कळतही नसे. मध्येच जाग आली तरी सोबतीला तो ताल असेच. ऐकत पडून राहावं. बरं, गाडी थांबलेली असली तर स्टेशनवर उतरून गरम चहाचे घुटके घेत पाय मोकळे करणं. थंडीच्या दिवसात तर हमखास इंजिनापर्यंत जात असे. तेथे फायरमन व इतर एक-दोघं काहीतरी खुडबूड करीत असत. पाणी भरत असत. कोणीतरी त्या वाफेवर किटली गरम करत असे. थंडीमुळे बाकी सर्व

प्लॅटफॉर्म रिकामाच असे. मुद्दाम कोण थंडीत उतरतो. बरं, ड्रायव्हर व फायरमन इंजिनमध्ये चढले की आरामात परत येऊन डब्यामध्ये चढावं. ही इलेक्ट्रिकची इंजिन्स आली आणि ती सगळी मजाच गेली. इतक्या पटकन वेग घेतात, की जर तुम्ही जवळपास नसाल तर गाडी जाईल निघून आणि तुम्ही राहाल मधल्या स्टेशनवरच. दुसरं असं की पूर्वी प्रत्येक डब्यासाठी एक स्वतंत्र अटेंडंट असे. आता सगळाच आनंद आहे. अगदी स्लीपरचा रिझर्व्ह डबा असला तरी खाली जमिनीवर इतके प्रवासी झोपलेले असतात, की अगदी बाथरूमला जरी जायचं झालं तरी त्यांच्या अंथरुणावर पाय देतच चालावं लागतं. परत सामान चोरीला जाण्याची भीती असतेच. म्हणून हल्ली मी प्रवास टाळतोच. सुमन पण म्हणते, ''का हो! लग्न झाल्यापासून प्रवास आवडत नाहीसा झाला वाटतं? कुठे जायचं म्हटलं की टाळत असता.'' झालं आहे खरं तसं. म्हणजे लग्नामुळे नाही; पण मघाशी म्हटल्याप्रमाणे पूर्वीच्या इंजिनची आणि सुरक्षित प्रवासाची आता मजाच गेली आहे. स्लीपरमध्ये गाद्या आल्या. त्यामुळे बेडिंग नाही. गाडीमध्ये जेवणखाण सगळं मिळतं; त्यामुळे जेवणाचे डबे, पाण्याचे तांबे वगैरे लवाजमा नाही. सुटसुटीत प्रवास; पण त्या गर्दीमुळे तो स्लीपरक्लास नको वाटतो. जरा जास्त पैसे पडले तरी आता एसी स्लीपरनेच प्रवास करतो. एक आहे, एसीमधले प्रवासी तसे शिष्टच वाटतात. दिवसभर मासिक तरी वाचत बसतील किंवा झोपून तरी जातील.

माझे काका जमशेदपूरला असतात. वर्षभरात निवृत्त होणार आहेत. त्यापूर्वी एकदा जाऊन यावं म्हणून निघालो होतो. जास्त नाही-आठवड्याभराचा मुक्काम होता. डिसेंबरपूर्वी रजा पण संपवायला हवी होती. थ.ऊ.. घ्यायचा म्हणजे १५ दिवसांची रजा हवीच. प्रवासास दोन-दोन दिवस असा हिशोब होता. म्हणून घाईघाईने बेत ठरवून 'गीतांजली'ची तिकिटं काढली होती. परतीच्या प्रवासाची तिकिटं पण काढल्याचा काकांचा फोन आला होता. म्हणजे प्रवास नक्की झाला होता; पण मध्येच माशी शिंकली. आईनं भिंतीवरचं कॅलेंडर बघितलं आणि म्हणाली, ''अरे श्यामकांत, तिकीट काढण्याअगोदर जरा बघायचं तरी, भिंतीवर कॅलेंडर लावलं आहे ते काय शोभेसाठी? तुम्ही निघताय त्या दिवशी अमावस्या आहे. एक-दोन दिवस मागे-पुढे गेला असतात तर नसतं का चाललं? तिकडे कुठला मुहूर्त गाठायचा आहे?''

आता आईला काय सांगणार? हल्ली ते पंचांग फारसं कुणी पाहत नाही. कॅलेंडरचा मुख्य उपयोग रविवार आणि सुट्ट्या पाहण्यासाठीच असतो. बारीक अक्षरांत काय लिहिलेलं आहे ते कोण वाचतंय? आणि वाचलंच तरी त्याचा अर्थ कुणाला कळतो? आपली राष्ट्रीय अस्मिता (?) जागृत आहे म्हणून गुढीपाडव्याला आम्ही सुट्टी घेतो; पण व्यवहारात मात्र ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी साजरी करतो. दुसरं म्हणजे ए.ए.ण.चं पंचांग. संजू माझा भाऊ दहावीला आहे. म्हणजे त्याची प्रिलीम-फायनल वगैरे सांभाळायला पाहिजे. शिवाय ऑफिसमध्ये रजा सगळ्यांनाच असतात. म्हणून प्रत्येकाने विचारविनिमय करूनच आपापल्या रजा व कार्यक्रम पक्के केलेले असतात. त्यात ऐन वेळी बदल करणं शक्य होत नाही. परत डिसेंबर म्हणजे ख्रिसमसची सुट्टी. त्यामुळे पाहिजे त्या दिवसाचं एसी तिकीट मिळणं कठीणच. तेव्हा आईला एवढंच म्हणालो, ''एवढे हजारो लोक आमच्याबरोबर आहेत. काय व्हायचं ते सगळ्यांचंच होईल आणि आता तर जमशेदरपूरची परतीची तिकिटं निघालेली आहेत; ती पण बदलता येणार नाहीत. पुढं जायचं म्हटलं तर संजूची पण परीक्षा आहे. तेव्हा जे होईल ते होईल.'' मला वाटलं होतं तो विषय तेवढ्यावरच थांबेल.

पण निघताना आई परत म्हणाली, ''निघा बरं! इकडची काळजी करू नका. प्रवासात जपून राहा. सारखा खाली उतरू नकोस. आता बायको बरोबर आहे. आज अमावस्या आहे म्हणून सांगते. काळजी घे.'' मी होऽहोऽ करत खाली उतरलो. नशिबानं टॅक्सी लवकर मिळाली. ण.ए.ऊ.ला बऱ्याच आधी येऊन पोहोचलो. सुमनला सामानाशी उभं करून रिझर्व्हेशन चार्ट बघायला गेलो. सुमन कोणाजवळ तरी बोलत होती. एक तरुण होता आणि एक वृद्धा होती. मी येईपर्यंत ते निघून गेले होते. ''कोण होती ती दोघं?'' मी सुमनला विचारलं. ''तो जोशी आणि त्याची आई नागपूरला जात आहेत. आमच्या कॉलेजच्या वाङ्मय मंडळाचा सेक्रेटरी होता.'' जाता जाता सुमन सांगत होती. मी मनात म्हटलं, ''त्याची आई अमावस्येला प्रवासास निघाली आहे आणि माझी आई मात्र घाबरते आहे.'' मी जरी म्हटलं तरी मनात सारखं येत होतं. खरंच, आजच निघायला हवं होतं का? दोन दिवस मागे-पुढे झालं असतं तर काय मोठंसं बिघडणार होतं? परत तर ठरलेल्या दिवशीच येणार होतो; पण विधिलिखित टळणार नव्हतं. आमच्या प्यूननं तिकिटं देताना सांगितलं होतं, ''साहेब, लकी आहात. फक्त आजच्याच दिवसाची दोनच तिकिटं शिल्लक होती. बाकी मागचा-पुढचा आठवडा फुल्ल होता. जणू आपल्यासाठीच ठेवलेली होती.'' होय! ते विधिलिखितच होतं.

गाडी वेळेवर सुटली होती. नाशिकपर्यंतचा वेळ तसा भरभर जातो. ब्रेकफास्ट, घाट, सहप्रवाशांच्या ओळखी वगैरे; पण नंतर कंटाळा यायला लागतो. सुमनचं आपलं बरं आहे. कुठलंतरी फिल्मी मासिक घेतलं होतं, ते वाचत बसली होती. मला तर कंटाळा आला होता. मी वरच्या बर्थवर चढून झोपायच्या विचारात होतो. तेवढ्यात सुमननं मासिकातला एक फोटो दाखवला आणि म्हणाली, ''ही बघा तुमची ज्यूली परेरा. मस्त दिसते नाही? भारतसुंदरी झाली असती; पण नोकरी करत बसली ना! तुमच्याच ऑफिसात होती म्हणे?''

''हो होती, माझ्याच ऑफिसमध्ये होती. एवढंच नव्हे तर माझी स्टेनो पण होती.'' हे असंच आणखी खूप बोललो. माझ्या बोलण्यात चीड स्पष्ट दिसत होती. खरं म्हणजे सुमन सहजच म्हणाली असेल; पण माझा स्वर तिखट झाला होता.

ज्यूली परेरा माझ्याच ऑफिसमध्ये होती. माझी पी.ए. कम् स्टेनो पण होती. नाही म्हटलं तरी पी.ए.शी इतरांपेक्षा जास्त संबंध येतो. बऱ्याच वेळा घरी फोन करून निरोप सांगणं किंवा घरून आलेले निरोप याच्यामुळेसुद्धा त्यांना आपल्या बॉसच्या कुटुंबाची जास्त माहिती असते. आपली कौटुंबिक सुख-दुःखं, त्यांच्या आवडी-निवडी नकळत का होईना आपण त्यांच्याशी बोलत असतो. कोणाला काय सांगायचं आणि काय लपवायचं हे आपण त्यांना शिकवत असतो. त्यातून पी.ए. ही मुळातच हुशार जमात. 'ता'वरून 'ताकभात' ओळखणारी असते. किंबहुना अशा

व्यक्ती लवकर वर चढतात. देखणेपणा, आकर्षक राहणी, चटपटीतपणा हे गुण ज्यूलीमध्ये पण होते. (त्या वेळी माझं लग्न झालेलं नव्हतं.) त्या मानानं बायको फारच गबाळी वाटते नाही का? अर्थात, त्याला कारण आहे. रोजच्या घरकामात पावडर, लिपस्टिक लावून बसता येत नाही. सकाळी अंथरुणातून बाहेर पडणारी बायको त्या विस्कटलेल्या केसांत व वेशातही आषर्कक दिसते, असं वाटतंच ना? पण त्यानंतर चहापाणी, स्वयंपाक यामध्ये गुंतलेली बायको 'त्या' वेळेपेक्षा जास्त नीटनेटकी असली तरीसुद्धा गबाळीच वाटते. थोडक्यात, वेळेचा आणि मूडचा संबंध आहे; पण या पी.ए. ऑफिसमध्ये येतात त्या नटूनथटून. त्या दिवसभर चेहऱ्यावर पावडर-लिपस्टिकचे हात फिरवत असतात. मग का नाही आकर्षक दिसणार? ज्यूली तर खरोखरच देखणी होती. टापटिपीनं राहत होती. मी तर तिला म्हणालोही होतो, ''ज्यूली, तुझी वागणूक एखाद्या संस्थानाच्या राणीसारखी आहे. पूर्वीच्या जन्मी एखाद्या संस्थानिकाची राणीबिणी होतीस की काय?''

त्यावर ज्यूली हसून म्हणाली होती, ''ते मला माहीत नाही; पण मला विचारलं तर मला राणी होण्यापेक्षा साधी गृहिणी होणं आवडेल. आता संस्थानं नाहीत आणि असती तरी मी राणी झाले नसते. एखादा राजपुत्रही माझ्या हृदयाचा राजा होऊ शकला असता; पण ते माझ्या नशिबातच नाही आणि त्या सरदारपुत्राच्याही नशिबात नाही. जाऊ दे! या जन्मी नाही तरी पुढच्या जन्मी तरी गाठ पडेलच.''

तुम्हाला या संभाषणाचा अर्थ कळला नसेल; पण मी सांगतो. दोन वर्षांपूर्वी ज्यूली स्टेनो म्हणून लागली. मग माझी पी.ए. झाली. अर्जावर तिचा फोटो पाहिला आणि मी तिची निवड करून टाकली होती. सुरुवातीपासूनच आमचं चांगलं जमलं होतं. आम्ही फिरायला जात होतो; पण आमचे संबंध तेवढ्यापुरतेच मर्यादित होते. बहुधा ती माझ्या पुढाकाराची वाट बघत होती. मी पुढाकार घेऊन विचारलं असतं तर ती नक्कीच हो म्हणाली असती; पण का कुणास ठाऊक, आम्ही एकत्र येऊ शकणार नाही हे दोघांनाही मनोमन वाटत होतं. म्हणून ती पुढच्या जन्माचा वायदा करत होती. आमची फक्त मैत्रीच होती हे मात्र शंभर टक्के सत्य आहे.

एके दिवशी तिच्या भावानं आम्हाला बहुधा एकत्र पाहिलं असावं. त्यानं घरी काय सांगितलं माहीत नाही. पण तिच्या बाहेर राहण्यावर मर्यादा पडल्या होत्या. ऑफिसमध्ये ती अजूनही कामाला येत होती. एक दिवस तिनं अचानक मला मलबार हिलवर संध्याकाळी भेटायला बोलावलं; पण ती आली नाही. त्यानंतर ती ऑफिसला पण आली नाही. आला तो पोस्टानं तिचा राजीनामा. तिच्या हिशोबाचे पैसे न्यायलाही तिचा भाऊच आला होता. मी एक प्रयत्न करून पाहिला, की तिनं स्वतःच येऊन चेक न्यावा; पण भावानं ॲथॉरिटी लेटर आणलं होतं. जाताना मला भेटून गेला. फक्त एवढंच सांगण्यासाठी ''तुम्ही ज्यूलीला विसरून जा. त्यातच तुमचं 'भलं' आहे.''

त्यानंतर ज्यूलीची आणि माझी भेट झाली नाही. नंतर माझं लग्न पण झालं. सुमनबरोबरचा माझा संसार सुरू झाला. ज्यूलीचा विषय आमच्यात कधीच निघाला नाही. पुढे ज्यूली नाटकात काम करू लागली. टीव्ही सिरियल्समध्ये पण दिसायची. तरी तिला पाहून मी कधी अस्वस्थ झालो नाही. जणू काही 'ज्यूली' हे नाव माझ्या आठवणीतून पार पुसलं गेलं होतं. मग आजच गाडीत सुमन का चिडली? तिला माझ्या आणि ज्यूलीच्या संबंधांबाबत काय माहिती आहे? ती वेळ खुलासा करण्याची नव्हती. बोलण्यानं बोलणं वाढलं असतं, म्हणून मीच गप्प बसलो होतो. थोड्या वेळानं सुमननं मंदिराचा विषय काढला. ती सबब पकडून, मी उठून दरवाज्याजवळ जाऊन उभा राहिलो. सूर्य मावळतीला निघाला होता. गाडी हळूहळू होत थांबली. समोर ती टेकडी व ते मंदिर दिसत होतं. अगदी हाकेच्या अंतरावर होतं. त्या मंदिरातील घंटा वाजलेली पण मी ऐकली. मी गाडीतून उतरलो. (की मला उतरायला भाग पाडलं?) आणि मी तसाच टेकडीच्या दिशेनं चालू लागलो. मी जेव्हा टेकडी चढून मंदिराजवळ पाहोचलो, तेव्हा सूर्यबिंब क्षितिजाला टेकलं होतं. ते पाहत मी क्षणभरच थांबलो असेन. तेवढ्यात मंदिराच्या आतून हाक आली,

''श्यामकांत, आत ये. मी तुझीच वाट पाहत होते.''

धुनीबाबा

आज मार्गशीर्ष अमावस्या आहे. सहाशे वर्षांनंतर असे ग्रहयोग परत येत आहेत. आजची संधी गेली तर आणखी सहाशे वर्षं थांबावं लागेल. 'गीतांजली' थांबली आणि निघाली पण, म्हणजे आणखी दहा-पंधरा मिनिटांत तो इथं यायला हवा. सूर्यास्तापूर्वीच त्यानं मंदिराच्या आवारात यायला हवं. ''श्यामकांत आत ये. मी तुझीच वाट बघत होतो.'' दरवाज्याजवळ घुटमळणाऱ्या श्यामकांतला मी आत बोलावलं. तो दबकतच आत आला. ''बैस,'' समोरच्या मृगाजिनाकडे बोट दाखवत त्याला म्हणालो. एका बैराग्याला पाहून तो नक्कीच गोंधळला होता. त्याला धीर देणं आवश्यक होतं.

''श्यामकांत, तुझा गोंधळ उडणं स्वाभाविकच आहे. मी कोण, तुला कसा ओळखतो आणि तुझीच वाट का पाहत होतो, हे प्रश्न तुला पडले असतील; पण धीर धर. माझ्यावर विश्वास ठेव. ही हकिगत खूप मोठी आहे. एका मोठ्या दुष्टचक्रात आपण गुरफटलो गेलो आहोत. तू, मी, आणखी काही जण आहेत. आजची अमावस्या टळली तर आणखी सहाशे वर्षं तरी आपल्याला बाहेर पडता येणार नाही. फक्त तूच मला या बाबतीत मदत करू शकतोस, तेव्हा मला समजून घे आणि प्रश्न न विचारता मी सांगतो तसं कर. सगळा खुलासा मी नंतर करीन.

''तू इथे येणार हे मला माहीत होतं. या मंदिराची ओढतुला वाटत आहे, हेही मला ठाऊक आहे आणि ज्यूली परेराचा विषय तुला डाचत आहे, हे पण मी तुला सांगतो. मला वाटतं एवढं सांगितल्यावर तरी तुझा माझ्यावर विश्वास बसेल. मी सांगतो त्यावर विश्वास ठेव. त्यातच तुझं, माझं आणि सर्वांचं हित आहे.

या देवळाच्या आवारातच एक विहीर आहे. तेव्हा तिथं जाऊन प्रथम स्नान करून ये.''

एवढं सांगितल्यावर त्याचा माझ्यावर विश्वास बसला नसता तरच नवल होतं. दिलेले कपडे घेऊन तो विहिरीवर जाऊन स्नान करून आला. आल्यावर मी त्याला एका वनस्पतीचा रस प्यायला दिला आणि एका वर्तुळात बसायला सांगितलं.

''श्यामकांत, आता मी सांगतो ते लक्षपूर्वक ऐक. तू, मी, आणखी

काही व्यक्ती सहाशे वर्षांपूर्वी घडलेल्या एका घटनेनं बांधलेले आहोत. खरं म्हणजे तू निर्दोष आहेस; पण घटनेचा केंद्रबिंदू तूच आहेस. अनेकांच्या वासनांचा केंद्रबिंदू पण तूच आहेस. त्यामुळे तुझी उपस्थिती अनिवार्य आहे. तुझ्यामुळेच त्या घटनेशी संबंधित व्यक्ती किंवा आत्मे म्हणा, येथे येणार आहेत. त्यांच्या वासनांचं केंद्र तूच असल्यामुळे त्या वासना किंवा आत्मे तुझ्यावर प्रभाव टाकायचा प्रयत्न करतील. म्हणूनच तुला या भारलेल्या वर्तुळात ठेवलं आहे. हा रस काही काळ तरी हालचाल करण्यापासून रोखेल. तुझ्या सर्व जाणिवा शाबूत राहतील; पण तोंडून शब्दही फुटणार नाही. अवतीर्ण होणाऱ्या व्यक्तींना तू ओळखशील, पाहिलेल्या घटनांनी प्रक्षुब्ध पण होशील; पण हालचाल करू नकोस. कोणत्याही कारणाने तू बाहेर येणं म्हणजे सर्व खेळ बिघडवणंच आहे. हे मला नको आहे.''

श्यामकांत खरोखरच उमद्या स्वभावाचा आहे. दुसरा कोणी असता तर त्यानं कदाचित त्रास दिला असता. बारा वाजण्यापूर्वी मला पण स्नान करून होमाची तयारी करायला हवी. दोन तासांनी चंद्रलेखेचा आत्मा इथे येईल. एकदा का चंद्रलेखा आणि भद्रपालाचा विवाह झाला, की मगच हे दुष्टचक्र थांबेल.

सुमन

नागपूरला गाडीतून सामानासकटच उतरले. तोपर्यंत गाडीत ही बातमी पोहोचली होती. मला मदत करण्यासाठी नागपूरचे काही प्रवासीही बरोबर होते. नशिबाने नागपूरला गाडीचा ड्रायव्हर, गार्ड बदलतात. कंपार्टमेंट, अटेन्डन्ट आणि कंडक्टर पण माझ्याबरोबर आले. रीतसर पोलीस कम्प्लेंट नोंदवली. गाडी जास्त वेळ थांबवण्यात अर्थ नव्हता. 'गीतांजली' तिच्या वेळेवर पुढे गेली.

इन्स्पेक्टर मुत्तेवार खरोखरच कुशल तपास अधिकारी होते. त्यांनी प्रथम एकही प्रश्न न विचारता माझी सर्व हकिकत ऐकून घेतली. सह-प्रवाशांनी पण दुजोरा दिला. एव्हाना मी पण सावरले होते. त्यामुळे सर्व हकिकत (ज्यूली प्रकरण सोडून) व्यवस्थित सांगू शकले होते. आमचं भांडण वगैरे झालं नव्हतं; पण श्यामकांतांना त्या वाटेतल्या मंदिराबाबत फारच कुतूहल होतं. योगायोगाने गाडी तिथेच थांबली होती. कुतूहलाने ते गाडीतून उतरले असावेत आणि गाडी सुटली असावी. अशी सर्वसाधारण पटणारी हकिकत सांगितली. ड्रायव्हर आणि गार्डने पण त्या जागी गाडी थांबली असल्याचं मान्य केलं. चेन खेचल्यानं गाडी थांबली होती; पण ती आमच्या डब्यातून खेचली गेली नव्हती. कोणतंही खास कारण न दिसल्याने गाडी परत चालू झाली होती. मी वाचनात दंग असल्याने ते मला जाणवलं नव्हतं. ड्रायव्हर व गार्डनी गाडी थांबलेल्या ठिकाणाच्या खांबाचा नंबर टिपून ठेवला होता. म्हणजे श्यामकांत उतरले होते ते ठिकाण पक्कं झालं होतं. इन्स्पेक्टर मुत्तेवारांनी भराभर फोन फिरवून पांगिराच्या पोलिसांना निरोप पोहोचविण्याची व्यवस्था केली आणि रात्री ८-८.३०च्या सुमारास आमची जीप नागपूरहून निघालीसुद्धा इ. मुत्तेवार आणि एक हवालदार बरोबर होता.

वाटेत इ.मुत्तेवार खूप बोलत होते. माझ्या मनावरचा ताण कमी करण्याचा प्रयत्न करत होते. तसेच अधिक माहिती आणि विसंगती वा कच्चे दुवे शोधण्याचा पण प्रयत्न होता. मी काहीतरी लपवित असावे, असा त्यांना संशय होता; कारण अशा प्रकरणात नवरा-बायकोच्या भांडणाला दुसरी एखादी स्त्री कारणीभूत असते, असा त्यांचा अनुभव होता. माझा थंडपणा किंवा अलिप्तपणा त्यांना खटकत असावा.

पांगिरा पोलीस स्टेशनवर आमचा निरोप पोहोचला होता. तेथील हवालदार आमची वाट पाहत होता. तेथील सब-इ. पाटील जिल्ह्याच्या रुग्णालयात गेले होते. एका मारुती गाडीला अपघात झाला होता. गाडी एक स्त्री चालवत होती. रात्रीच्या वेळी अंदाज चुकला असेल किंवा इतर काही कारण असेल. गाडी रस्ता सोडून कडेच्या झाडावर आदळली होती. त्या स्त्रीला बेशुद्धावस्थेतच रुग्णालयात हलवलं होतं. तिचं नाव ज्यूली परेरा. कोणत्यातरी सिरिअलचं शूटिंग जवळपास चालू होतं. शूटिंग संपल्यावर आजूबाजूचा परिसर पाहण्यासाठी ती एकटीच निघाली होती. युनिटच्या इतरांनी तिने रात्री एकटं जाऊ नये असं सांगून पाहिलं होतं; पण तिने ते मानलं नव्हतं. युनिटचे लोकही सध्या रुग्णालयातच होते.

ज्यूलीचं नाव ऐकताच सूक्ष्म असूयेची एक लहर माझ्या मनात दाटून गेली. हीच ती बया, जी आजच्या या सर्व प्रकाराला कारणीभूत आहे. मरू दे तिला हॉस्पिटलमध्ये, आमच्या मागची पीडा तरी कायमची टळेल; पण लगेच मनात दुसरा विचार आला, की खरोखरच ज्यूलीचा श्यामकांतांच्या उतरण्याशी काय संबंध आहे? गाडी थांबली तेव्हा ज्यूली कितीतरी लांब होती. लग्न झाल्यापासून श्यामकांतांनी ज्यूलीचा विषय एकदाही काढला नव्हता. उलट मीच कारण नसताना तो विषय काढला होता. खरी अपराधी मीच आहे. दुसरे असेही कुतूहल होते, की पाहावी तरी ही ज्यूली प्रत्यक्षात कशी दिसते. श्यामकांतांना भुरळ घालणारी ज्यूली पाहण्याची मला ओढहोती. इन्स्पेक्टर मुत्तेवार विचारात पडले होते, तेव्हा मीच त्यांना म्हटलं, ''मला वाटतं आपण पहिल्यानं हॉस्पिटलमध्ये जाऊ. मला पण बाथरूमला जायचं आहे.'' आणि जीप हॉस्पिटलकडे वळली.

हॉस्पिटलमध्ये ज्यूली कॉटवर बेशुद्धावस्थेत होती. हाताला सलाईन लावलं होतं. त्या हातावर एक सर्पाकृती गोंदलेली होती. सर्पाच्या तोंडाजवळच सुई खुपसलेली होती. डॉक्टरांची धावपळ चालू होती. ज्यूलीची नाडी मंद होत होती. रक्ताची गरज भासत होती. बी पॉझिटिव्ह हा रक्तगट तसा दुर्मिळच आहे. त्या आड ठिकाणी त्या ग्रुपच्या किती बाटल्या असणार? माझ्या मनाची चलबिचल चालू होती. रक्ताअभावी ती मेली तर? मला जन्मभर टोचणी लागून राहिली असती; कारण माझा ब्लडग्रुपही बी पॉझिटिव्हच आहे. ज्यूलीच्या जागी मी असते तर कोण देणार होतं मला रक्त? शेवटी मीच पुढे झाले आणि म्हणाले, ''डॉक्टर, माझा ब्लडग्रुप पण तोच आहे. मी देते तिला रक्त.''

इन्स्पेक्टर मुत्तेवार जरासे चमकलेच. या बाईला नवरा हरवल्याचं काहीच कसं टेन्शन नाही? का खरोखरच बाई धीराची आहे? त्यांना पण बहुधा विश्रांती हवीच असावी. पाटलांशी पण सविस्तर बोलता आलं असतं. रात्रीचे दोन वाजायला आले होते. अशा मध्यरात्री जाणार तरी कुठे? डॉक्टरांनी माझं रक्त घेतलं. नुसती चहा, बिस्किटंच नाही तर पोटभर जेवायलाही वाढलं आणि मला म्हणाले, ''आता उजाडेपर्यंत विश्रांती घ्या. इथे इकडच्या खोलीत शांत झोपा. सकाळी सिस्टर तुम्हाला उठवतील.''

मलाही शारीरिक आणि मानसिक थकवा होताच. पडल्या पडल्या मला लगेच झोप लागली. झोपेतच मी स्वप्नात शिरले होते. जरी मी स्वप्नात असले तरी जागृतावस्थेतील जाणिवा शाबूत होत्या.

स्वप्नात आम्ही मुलेमुले खेळत होतो. बहुधा लपंडावासारखा खेळ होता. जागा संपूर्णपणे अपरिचित वाटत होती. निदान मला तरी त्या जागी कधी गेल्याचं आठवत नव्हतं. एखादी बाग किंवा उपवन वाटत होतं. पलीकडे एक मुलगा लपून बसलेला होता. तशी मी पण लपलेलीच होते. मला तो त्याच्याजवळ यायला खुणावत होता. मला हलक्या आवाजात हाक मारून सांगत होता, ''विलासिनी इकडे ये.'' मीही इकडे-तिकडे पाहून पटकन त्याच्याकडे गेले. सगळं स्वप्नातच होत होतं.

पण मघाशी म्हटल्याप्रमाणे माझ्या जागृतावस्थेच्या जाणिवा जागृत होत्या. म्हणून मी पटकन म्हणाले, ''मी विलासिनी नाही. सुमन आहे.'' मला नक्की कळत नव्हतं, की मी जागी आहे की स्वप्नात आहे. स्वप्नातला तो मुलगा, त्याचं नाव विलासराज आहे, हे मला नंतर कळलं. मला विलासिनी म्हणून हाका मारीत होता. मी त्या नावाला प्रतिसाद दिला होता, म्हणजे माझं नाव दोघांनाही माहीत होतं आणि मंजूरही होतं; पण माझं जागृतावस्थेतील मन मात्र ते नाकारत होतं. मानसशास्त्रज्ञ सांगतात, 'झोपेमध्ये बाह्यमन निष्क्रिय असतं. याउलट सदासर्वकाळ अंतर्मन स्वप्नांचे खेळ दाखवत असतं. जागृत मनाच्या अभावामुळेच अंतर्मनाने दाखवलेली दृष्यं माणसाला इतकी खरीखुरी वाटतात, की त्याच्या शरीराचा आणि मनाचा ताबा घेतात. मग बाह्यमनाच्या तावडीतून सुटलेलं मन व शरीर त्या अंतर्मनाच्या आदेशानुसार वागतं. त्यामुळे माणूस तोंडाने नको ते बोलतो, हातवारे करतो, हसतो. एवढंच नव्हे तर प्राणभयानं हृदयाची धडधड पण वाढते, घाम सुटतो; पण इथे तर माझी दोन्ही मनं समांतर कामं करत होती. स्वप्नात मी विलासिनी म्हणून वावरत होते, तर बाह्यमन सांगत होतं, 'मी विलासिनी नाहीये. मी सुमन आहे.' आणखी थोडा वेळ गेला असता तर नक्कीच जागी झाले असते; पण तेवढ्यात आवाज आला,

''होय, तू सुमनच आहेस.''

आवाजाच्या दिशेने पाहिलं- तिथे कोणीच नव्हतं; पण क्षणभरात दृष्टीसमोर टेकडीवरील मंदिर दिसू लागलं. त्यापाठोपाठ त्या मंदिराचा आतला देखावा दिसू लागला. तिथे जमिनीवर काढलेल्या वतुर्ळामध्ये श्यामकांत बसलेले होते. अगदी पुतळ्यासारखे. जिवंतपणाची कोणतीही खूण त्यांच्यात दिसत नव्हती. दृष्टी स्थिर आणि एकटक होती. त्यांना मी पण दिसले असावे; कारण नजरेत एका क्षणी ओळख दिसली. जिवंतपणाची तेवढीच खूण. श्यामकांतांना तशा अवस्थेत बघून मला भीती वाटली, की ते सुखरूप आहेत ते बघून बरं वाटलं, ते नक्की सांगणं कठीण आहे. समोरच एक साधू बसलेला होता. कसल्यातरी होमाची तयारी करत होता. ती थांबवून तो माझ्याकडे बघत म्हणाला,

''तू सुमनच आहेस. जर सगळं सुरक्षित पार पडलं तर तुझी-माझी भेट उद्या सकाळी होईलच. ज्यूलीला रक्त देऊन तू तिचे प्राण वाचवले आहेस. आता सकाळपर्यंत शांत झोप. जे काही दिसतं आहे ते शांतपणे बघ. उद्या सकाळी सर्व खुलासा करीन, तोपर्यंत धीर धर. आता स्वप्नात तरी तू विलासिनीच आहेस.''

त्यानं स्थिर नजरेनं माझ्याकडे पाहिलं. त्याचे डोळे मी कधीच विसरणार नव्हते. जागी झाल्यावरही त्याची नजर मला आठवत होती; पण त्या वेळी त्याच्या आज्ञेप्रमाणे मी विसरून गेले, की मी सुमन आहे. मला कळलं, की मीच विलासिनी आहे आणि आमचा लपंडावाचा खेळ सुरू झाला.

विलासिनी

मी विलासराजला म्हटलंसुद्धा, ''चंद्रलेखा आता रडकुंडीला आली आहे. कुणीतरी सापडायला हवं.'' त्यावर विलासराज म्हणाला, ''तो भद्रपाल आहे ना तिची बाजू घ्यायला. तोच सापडेल बघ आता.'' खरोखरच थोड्याच वेळात 'सुट्यो' असा आवाज आला. भद्रपालने राज्य घेतले होते. असे नेहमीच व्हायचे. मला वाटायचे एकदातरी चंद्रकांत किंवा विलासराजने तिला मदत करावी.

राजकुमार चंद्रकांत आणि राजकुमारी चंद्रलेखा ही राजघराण्यातील मुले होती. मी आणि विलासराज मुख्य प्रधानांची मुले होतो. भद्रपाल हा उग्रसेनाचा मुलगा होता. त्यामुळे तो आम्हाला बरोबरीचा वाटत नसे.

मी त्या वेळी एक-दोन वर्षांची असेन. एका हातघाईच्या लढाईत उग्रसेनांनी महाराजांच्या अंगावरचे घाव आपल्या अंगावर झेलले होते. एवढेच नव्हे, तर पराक्रमाची शर्थ करून महाराजांना सुरक्षित स्थळी पण पोहोचवले होते. महाराजांच्या स्मरणात तो प्रसंग कायमचा राहिला होता. त्या वेळी उग्रसेन साधा नायक होता. महाराजांनी लढाईनंतर त्याचा यथोचित सत्कार केला होताच; पण त्याच्या प्रगतीवर बारकाईने लक्ष पण ठेवले होते. वेळोवेळी बढती पण दिली होती. उग्रसेनांचे वाड्यावरचे जाणे-येणे वाढले होते. दसरा किंवा तत्सम प्रसंगी उग्रसेनांबरोबर भद्रपालही वाड्यावर येत असे. दरबारी उपचार आटोपल्यावर आम्ही मुले आत किंवा बाहेर बागेत खेळत असू. सेवक बोलवायला आला म्हणजे आमचा खेळ आटपे. त्या सुरुवातीच्या काळात उग्रसेन जरी दरबारी मंडळीत मोडत नसले तरी महाराजांच्या खास मर्जीतील म्हणून वाड्यावर उग्रसेनांना मुक्तद्वार असे. उग्रसेनही ते जाणून असत आणि योग्य मर्यादा राखूनच वाड्यात वावरत असत. भद्रपालही ते जाणून होता.

खेळता खेळता बालपण कधी संपले ते कळलेच नाही. आता उग्रसेन महाराजांचे सरसेनापती झाले आहेत. त्या वेळी बावळट वाटणारा आणि दबून राहणारा भद्रपाल आता रुबाबात आणि आत्मविश्वासाने वावरतो आहे. कसून केलेल्या मेहनतीमुळे त्याचे मूळचे भरदार शरीर त्याच्या देखणेपणात भरच घालते. मर्दानी खेळ असो वा राजकारण, चंद्रकांत किंवा विलासराजपेक्षा भद्रपाल खूपच वरचढठरतो; कारण चंद्रकांत आणि विलासराज यांना एक अहंगंड आहे. त्यांचे वडील त्यांच्या जन्मापासूनच श्रेष्ठ होते. भद्रपालाचे तसे नाही. उग्रसेन आता जरी सेनापती झाले असले तरी पूर्वी एक साधे शिपाई होते, हे भद्रपाल विसरला नाही. यातच त्याच्या मनाचा साधेपणा व उमदेपणा दिसून येतो. भद्रपाल हा खरोखरच एकमेव आहे. उग्रसेनानंतर भद्रपालच सरसेनापती होणार. सेनापतीच काय तो राजा होण्याच्या पण योग्यतेचा आहे. राजा नुसताच शूर असून चालत नाही, की त्याचे सैन्य मोठे असूनही भागत नाही. त्या सैन्याला वळण लावण्याची, ते वापरण्याची कुवतही राजाच्या अंगी असावी लागते.

चंद्रकांतकडे ती कुवत नाही. म्हणूनच मला वाटते भद्रपालच राजा व्हायला योग्य आहे. असे असले तरी ते त्याच्या मनातही येणार नाही. ते काम मलाच केले पाहिजे; कारण मला भद्रपालसारख्या सामर्थ्यवान राजाची राणी व्हायचे आहे. चंद्रकांतसारख्या बुळ्या माणसाची राणी नाही व्हायचे.

होय, आमच्या वडिलांच्या मनात विलासराजचा विवाह राजकन्या चंद्रलेखेशी करायचा आहे आणि माझा राजकुमार चंद्रकांतबरोबर. माझ्या सौंदर्याची भुरळ चंद्रकांतना पडली आहे. या ना त्या कारणानी मला भेटायचा प्रयत्न करत असतो. मी त्याला एकदा स्पष्ट सांगितले, ''हे बघा चंद्रकांत, आपण माझ्यामागे वेळ घालवता, त्यापेक्षा जरा राज्यकारभारात लक्ष द्या. पुढे-मागे त्याचाच फायदा होईल. न पेक्षा राज्य मिळाले, पण ते टिकवता आले नाही अशी गत होईल.'' पण चंद्रकांत खरोखरच बुळ्या आहे. ही गोष्ट त्याने हसून सोडून दिली. मला चंद्रकांत नको आहे; मला हवा आहे भद्रपाल. विलासराजला पण माझी मते माहीत आहेत; पण त्याला ती पसंत नाहीत; कारण त्याला भद्रपाल आवडत नाही. त्याला राजकुमारी चंद्रलेखा हवी आहे आणि चंद्रलेखा तर विलासराजला धूप घालत नाही. ती घोटाळत असते भद्रपालाभोवती. माझ्या आणि भद्रपालमध्ये चंद्रलेखा हा एक अडथळा आहे.

लहानपणी दोन भावंडं घरी एकमेकांबरोबर खेळतात; पण मित्रांबरोबर खेळताना नेहमीच भांडत असतात. त्यामुळे लहानपणी आम्ही खेळताना चंद्रकांत आणि विलासराज एका बाजूला तर मी व चंद्रलेखा दुसऱ्या बाजूला असू. दोन्ही बाजूंचा तोल सांभाळण्यासाठी भद्रपालही आमच्या बाजूला असे. त्या वेळच्या खेळात मला नेहमी वाटायचं, की भद्रपाल चंद्रलेखेची बाजू घेतो; पण तसं नव्हतं. लहानपणापासूनच तो समजूतदार होता. आम्हा दोघींबरोबरचीच का, सगळ्यांबरोबरची त्याची वागणूक समानच होती. अहंगंड होता तो आम्हा तिघांना. महाराजांनी सांगितलं असेल किंवा इतरही काही कारण असेल; पण चंद्रलेखा भद्रपालाबरोबर आपुलकीनंच वागत असे. मी जर त्या वेळी शहाणपणा शिकले असते तर? मी चंद्रलेखापेक्षा खूपच सुंदर आहे; पण आता खूपच उशीर झाला आहे.

माणसाला संधी कुठून व केव्हा मिळेल सांगता येत नाही. त्या दिवशी चंद्रलेखाने तिचे मन माझ्याकडे उघडे केले. महाराजांनी आपला विचार स्पष्टपणे चंद्रलेखेला सांगितलेला होता. भीतीमुळे वा मर्यादेमुळे चंद्रलेखा महाराजांना आपल्या निवडीबद्दल बोलू शकली नव्हती. तिला विलासराज पती म्हणून नको होता, तिला भद्रपाल हवा होता. जर तिला भद्रपाल मिळाला नसता तर ती प्राणत्याग करणार होती. महाराजांकडे मी किंवा दुसऱ्या कुणीतरी रदबदली करावी, अशी तिने मला गळ घातली. संधी माझ्याकडे चालून आली होती. कालांतराने ती सावरली पण असती; पण मला ते नको होते. माझ्या आणि भद्रपालच्या मार्गातील काटा दूर करायला हवा होता. मी चंद्रलेखासमोर काळाकुट्ट भविष्यकाळ चितारला. तिच्या सुटकेचा एकच मार्ग होता. तो तर तिनेच सुचवला होता. मी तिला एक छोटीशी पुडी दिली. ती पुडी तिला या जन्मापासून मुक्ती देणार होती. मला आठवते ती मार्गशीर्ष अमावस्येची रात्र. चंद्रलेखा ती पुडी खाऊन झोपली ती पुन्हा न उठण्यासाठीच.

सुमन

मी आणि विलासिनी एकच आहोत. जागृतावस्थेत सुमन आणि स्वप्नात विलासिनी.

विलासिनी स्वभावाने दुष्ट असेल; पण मी तशी नाहीये. कुणाचा खून करण्याइतकी तर खासच नाहीये. लोकांच्या मते जरी चंद्रलेखेने आत्महत्या केली तरी एका अर्थी विलासिनीने केलेला तो एक खूनच होता. तिने तिला आत्महत्येपासून परावृत्त करण्याऐवजी आत्महत्येच्या दिशेने जायला मदत केली होती; पण त्या परिस्थितीत विलासिनी तरी काय करू शकणार होती?

महाराजांनी चंद्रलेखेचा हट्ट पुरवला नसता तर ती आत्महत्या करणारच होती. भद्रपालाचा विचार स्पष्ट होता. सेनापती झालाशिवाय तो लग्न करणार नव्हता. त्याची वाट पाहायची तयारी होती. काही झालं तरी विलासराज प्रधानपुत्र होता. भद्रपालाचे तसे नव्हते. चंद्रलेखेच्या विलासराजबरोबरच्या विवाहाने विलासिनीचा मार्ग मोकळा झाला असता हे खरे; पण त्यानंतरही चंद्रलेखेसमोर भद्रपाल सतत वावरणार होता. असे असताना चंद्रलेखा विलासराजबरोबर सुखाने संसार करू शकली असती?

चंद्रलेखेच्या आत्महत्येने अनेक प्रश्न सुटणार होते. विलासिनी फक्त निमित्तमात्र झाली होती.

विलासिनी

दुसऱ्या दिवशी राजधानीवर शोककळा पसरली. राजकन्या चंद्रलेखेने आत्महत्या केली होती. त्या बातमीने विलासराजही सैरभैर झाला होता. थोड्याच वेळात राजधानी हादरवणारी बातमी येऊन थडकली. गावाबाहेर मंदिरात कुणीतरी भद्रपालाचा खून केला होता. त्याचे शिर धडापासून वेगळे तुटून पडले होते. खून कपटाने झाला होता हे उघडच होते; कारण समोरासमोरील युद्धात भद्रपालाला हरवणारा योद्धा अख्ख्या पंचक्रोशीत नव्हता. शिवाय हल्ल्याची जरादेखील चाहूल त्याला लागली असती, तरी त्याने नक्कीच प्रतिकार केला असता. त्याच्या अंगावर काही जखमाही नव्हत्या. म्हणजे त्याच्या शत्रूने त्याला आडवेळेला तिकडे बोलावून त्याचा घात केला असावा, नाहीतर तो तिथे का गेला असता?

मी सुन्न झाले होते. भद्रपाल ना माझ्या नशिबात होता, ना चंद्रलेखेच्या. मी एक दिवस जरी धीर धरला असता तर? चंद्रलेखेच्या खुनाचे पातक मला लागले नसते. चंद्रलेखाच्या खुनाची बोच मनाला लागून राहिली होती. त्यामुळे चंद्रलेखेच्या अंत्यदर्शनासाठी वाड्यावर जायचा मला धीरच होत नव्हता; पण न जाऊन चालण्यासारखे नव्हते. उपचार म्हणून मला जाणे भागच होते; म्हणून मी आणि आई तिकडे गेलो.

चंद्रलेखेचे कलेवर मंचावर ठेवलेले होते. दोन्ही हात तिच्या बाजूंना समांतर ठेवलेले होते. मला कसा धीर झाला कुणास ठाऊक! पण तिथे गेल्यावर मी मंचाजवळ बसले. तिचा हात हातात घेतला आणि मनातल्या मनात म्हणाले,

''चंद्रलेखे, मीच तुझा खून केला आहे. ही बोच मला जन्मभर राहील. चंद्रलेखे, या जन्मी नाही तरी पुढच्या जन्मी तरी तुला भेटण्यासाठीच

भद्रपालही या जगातून निघून गेला आहे. भद्रपाल आणि तुझे मिलन पुढील जन्मी तरी होऊ दे. मला क्षमा कर.''

माझ्या अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांतूनही चंद्रलेखेच्या हातावरची गोंदवलेली सर्पाकृती मला ठळकपणे दिसत होती. विष अंगात भिनल्यामुळे ते गोंदण अधिकच ठळक झाले होते.

श्यामकांत

मी मंदिरात शिरलो, तेव्हा एक बैरागी धुनीसमोर बसलेला दिसला. त्यानं मला समोरच्या मृगाजिनावर बसायला

सांगितलं. त्यानंतर त्यानं मला ज्या गोष्टी सांगितल्या त्या ऐकून मी स्तिमितच झालो. त्यानं मला अंघोळ करून यायला सांगितलं. त्यानंतर कुठलासा रस प्यायला दिला आणि एका वतुर्ळात बसायला सांगितलं. मला त्याचं नाव पण माहीत नाही, तरी पण त्यानं सांगितलेली प्रत्येक गोष्ट मी बिनतक्रार करत होतो. मी त्याला धुनीबाबा असं नाव ठेवलं आहे. त्यानंतर तो कुठे निघून गेला. तो बोलत होता ते सर्व मला ऐकू येत होतं; पण त्यानं सांगितल्याप्रमाणे माझी सर्व हालचाल गोठली होती. जणू काही श्वास घेणारा पुतळाच. मला त्याची प्रत्येक हालचाल दिसते आहे. आता स्नान करून त्यानं धुनी प्रज्वलित केली आहे. तोही एका मोठ्या वर्तुळात बसला आहे; पण ते वर्तुळ दरवाज्याच्या दिशेनं उघडं आहे.

मांडामांड करता करता तो मध्येच थांबला आणि म्हणाला, ''होय, तू सुमनच आहेस.'' त्याच वेळी मला सुमन दिसली. तिच्या आजूबाजूचं वातावरण किंवा खोली एखाद्या हॉस्पिटलसारखं दिसत होतं. तेथील कॉटवर सुमन शांतपणे झोपली होती, तरी माझ्या नाहीसं होण्याचा ताण तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. मला वाटत होतं, की धुनीबाबांना विचारावं, की तिला काय झालं आहे? ती हॉस्पिटलमध्ये का आहे?'' पण मी गोठून गेलो होतो. धुनीबाबा सुमनशी बोलत होते. ते संपल्यावर त्यांनी माझ्याकडे रोखून पाहिलं. हळूहळू माझ्या जाणिवा अस्पष्ट होत चालल्या. मला भास होऊ लागला.

मी त्याच मंदिराकडे चालत येत होतो. मघाशी आलो तेव्हा संधिप्रकाश होता. आता गर्द काळोख पसरला होता.

आजूबाजूला रान होतं आणि त्या वेळी माझ्या हातात सज्ज असलेली तलवार पण होती. मी मंदिरात येऊन एका खांबाआड लपून कोणाचीतरी वाट पाहत बसलो होतो.

भद्रपाल

मी केव्हापासून मंदिरात वाट पाहत बसलो होतो. विलासराजची वाट पाहत होतो. इतक्या रात्री त्यानं मला या टेकडीवरच्या मंदिरात गुप्तपणे बोलवण्याचं प्रयोजन माझ्या लक्षात येत नव्हतं. आम्ही तसे रोजच भेटत होतो. जे बोलायचं होतं ते तो कधीही बोलू शकला असता. त्यासाठी इतक्या रात्री आडबाजूच्या देवळात बोलवण्याचं कारणच काय होतं?

''भद्रपाल आत आहेस का?'' बाहेरून विलासराजचा आवाज आला.

''हो, मी इथंच आहे.'' मी उत्तर दिलं.

''तिथेच थांब. मी आत येतो,'' विलासराज म्हणाला.

मी त्याची आत येण्याची वाट पाहत उभा राहिलो. तो आत माझ्याजवळ आला. त्याच्या हातात नंगी तलवार होती. अशा वेळी इतक्या आड जागी येणं म्हणजे श्वापदांची भीती होती. मी पण तशीच तलवार हातात घेऊन आलो नव्हतो का? पण मंदिरात शिरल्यावर मी ती बाजूला ठेवली होती. मी बेसावध असताना माझ्यावर तलवारीचा वार झाला होता. वार प्राणघातक असला तरी मी सरकल्यानं तो प्राणघातक ठरला नाही. मी ओरडलो, ''विलासराज, मी भद्रपाल आहे.'' पण पाठोपाठ दुसरा पण वार झाला. तो मी चुकवू शकलो नाही. मी घायाळ होऊन खाली पडलो. विलासराज माझ्यावर तलवार रोखून उभा होता. माझी शुद्ध जाता जाता मी एवढंच ऐकलं, ''भद्रपाल, चंद्रलेखा माझीच होणार आहे. आता माझा मार्ग मोकळा झाला आहे.''

राजकुमारी चंद्रलेखा आणि मी एकमेकांवर प्रेम करत होतो हे खरं आहे. तसं तिनं मला प्रत्यक्षात सांगितलंही होतं; पण मला कळत होतं की आमचा विवाह शक्य नव्हता. म्हणून मी तिला म्हणालो होतो, ''चंद्रलेखे, तू एक राजकुमारी आहेस. मी मात्र आज कुणीच नाहीये. मी सेनापती झाल्यावर मीच महाराजांकडे तुझा हात मागेन. थोडा धीर धर.'' पण चंद्रलेखेला तेवढा धीर नव्हता. तिनं विलासिनीकडे आपलं मन मोकळं केलं. विलासिनी आपल्या भावाकडे विलासराजकडे बोलली असणार. चंद्रलेखेनं एक गोष्ट विलासिनीला सांगण्याचं टाळले असेल, की महाराजांच्या मनात चंद्रलेखेसाठी विलासराज होता, मी नव्हतो; पण त्यामुळे विलासराज मात्र मला त्याचा प्रतिस्पर्धी समजत होता. त्याचा गैरसमज दूर करण्याची मला संधीच मिळाली नाही. त्याच्या उतावळेपणाचा व गैरसमजाचा बळी मी ठरलो होतो. शुद्ध हरपता हरपता माझी शेवटची आठवण हीच होती की, मी चंद्रलेखाचा हात हातात घेतला आहे आणि तिला वचन देतो आहे, ''चंद्रलेखे, या जन्मी मला शक्य झालं नाही; पण पुढच्या जन्मी आपलं मिलन नक्कीच होईल.'' क्षणातच माझं शिर धडावेगळं झालं होतं.

सुमन

''अहो, उठता का? इन्स्पेक्टर तयार आहेत.'' नर्स मला उठवत होती. इन्स्पेक्टर मुत्तेवार तयार झाले होते; सब इन्स्पेक्टर पाटीलही तयार होते. मी ज्यूलीची चौकशी केली. रात्री दोन वाजायच्या सुमारास तिच्या सर्व क्रिया मंदावल्या होत्या. जणू काही कलेवरच उरलं होतं; पण डॉक्टरांनी प्रयत्न चालूच ठेवले होते. मी दिलेल्या रक्ताचाही उपयोग झाला होता. पहाटे पहाटे ज्यूलीच्या सर्व शरीरक्रिया पूर्ववत झाल्या होत्या. डॉक्टरांना आश्चर्य वाटत होतं, की ज्यूलीची प्रकृती इतकी झपाट्यानं खालावूनसुद्धा इतक्या कमी वेळात पूर्ववत कशी झाली? एक-दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर ती आता घरी जाऊ शकली असती. मी तिच्या खोलीत गेले तेव्हाही तिच्या हातावर सलाईन लावलं होतं आणि हातावरची सर्पाकृती उठून दिसत होती. त्या सर्पाकृतीची खूण मला पटली होती. मी तिच्या हातावरून हात फिरवला. ज्यूलीनं डोळे उघडून माझ्याकडे पाहिलं आणि क्षीण आवाजात मला म्हणाली, ''विलासिनी, झालं गेलं विसरून जा. श्यामकांतांना सांग मी कृतार्थ झाले आहे. मुक्त झाले आहे. तुम्ही दोघं सुखानं संसार करा.'' एवढं बोलून तिनं परत डोळे मिटून घेतले.

माझं सुमन हे नाव तिला माहीत असेल किंवा नसेलें, मला माहीत नाही; पण तिनं मला विलासिनी म्हणून हाक मारली होती, की माझ्याच मनाचे खेळ होते? चंद्रलेखेच्या व ज्यूलीच्या हातावरील सर्पाकृतीची संगती कशी लावायची? स्वप्नातील साधूबाबांनी सकाळी भेट होईल तेव्हा सर्व खुलासा होईल असं म्हटलं होतं. श्यामकांत पण तिथेच भेटणार होते; पण ते कोणत्या अवस्थेत असतील याची काळजी वाटत होती. म्हणून ज्यूलीची भेट आवरती घेऊन मी लगेच निघाले.

आम्ही जीपनं निघालो. पाटलांना ती टेकडी माहीत होती. तिथे कुणी 'धुनीबाबा' राहतो, असं पण ऐकलं होतं. आम्ही तिथं पाहोचलो तेव्हा देवळाच्या पायऱ्यांपाशीच श्यामकांतांचे बूट काढून ठेवलेले दिसले. इन्स्पेक्टर मुत्तेवारांना मी तसं सांगितलंही. वर गेलो तर साधूबाबा आवराआवर करताना दिसले. काही काळापूर्वीच होमहवन केल्याच्या खुणा दिसत होत्या. श्यामकांत एका बाजूला शांतपणे झोपले होते. आता ते वर्तुळात नव्हते. मी श्यामकांतांकडे झेपावले तेव्हा धुनीबाबा म्हणाले, ''थांबा. ते आत्ताच झोपले आहेत. इतक्यात त्यांना जागं करू नका.'' मी तिथंच थांबले आणि इन्स्पेक्टर मुत्तेवारांकडे पाहिलं.

इन्स्पेक्टर मुत्तेवार जेव्हा चौकशीसाठी पुढे सरसावले, तेव्हा धुनीबाबांनी त्यांना एवढंच सांगितलं, की त्यांचा मुक्काम याच देवळात असतो. काल संध्याकाळी हे गृहस्थ इथे आले. त्यांची गाडी चुकली म्हणून त्यांनी त्यांना वस्तीला इथेच ठेवून घेतले होते. उजाडल्यावर त्यांना गावात पोचवणारच होतो; पण रात्री बराच वेळ बोलत बसल्याने त्यांना पहाटेच झोप लागली.

त्यानंतर धुनीबाबांनी खासगीत फक्त माझ्याशीच बोलण्याची परवानगी मागितली. इन्स्पेक्टर मुत्तेवारांनी माझ्याकडे पाहिलं. मला तेच हवं होतं. मला माझ्या शंकांचं निरसन करून घ्यायचं होतं; पण ते तिऱ्हाइतासमोर नको होतं. मी लगेच मान डोलावली आणि त्यांना जरा बाहेर उभं राहायला सांगितलं. त्यांना जरा विचित्र वाटलं असेल; पण ते काही न बोलता बाहेर गेले. धुनीबाबांनी मला हाक मारली, ''विलासिनी,'' मी चमकलेच.

''विलासिनी, चमकू नकोस. मला वाटतं की आतापर्यंतच्या अनुभवामुळे तू गोंधळून गेली असशील. म्हणून मी आता काय सांगतो ते नीट ऐकून घे. श्यामकांत सुरक्षित आहे. आपलं बोलणं संपल्यावर त्याला उठवू या.

''काल तू अनुभवलेली ती स्वप्नं नव्हती तर तो एक इतिहास आहे. सहाशे वर्षांपूर्वी याच मार्गशीर्ष अमावास्येला राजकन्या चंद्रलेखा आणि भद्रपालाची हत्या झाली होती. त्यांच्या इच्छा अतृप्त राहिल्या होत्या, तर विलासिनी आणि विलासराज यांचे आत्मे पश्चात्तापामुळे भटकत राहिले होते.

कालही मार्गशीर्ष अमावस्याच होती. हे अतृप्त आत्म्यांचं घातचक्र भेदण्याची हीच वेळ होती. ती टळली असती तर आणखी ६००वर्षं ते आत्मे तसेच भटकत राहिले असते.

ज्यूली हीच राजकन्या चंद्रलेखा आहे आणि श्यामकांत हा पूर्वीचा भद्रपाल आहे. प्रत्येक आत्म्याचे भोग वेगळे असतात. त्यामुळे चंद्रलेखा आणि भद्रपालचा विवाह किंवा शारीरिक मिलन शक्य झालंच नसतं. त्यामुळेच ज्यूलीच्या आत्म्याला काही काळ इथं बोलावून घेतलं होतं. श्यामकांतचा आत्माही काही काळ शरीरावेगळा झाला होता. मी स्वतःच त्यांचं लग्न लावून दिलं आहे. म्हणूनच ज्यूली म्हणाली, की ती आता मुक्त झाली आहे.

तुझ्या लक्षात आलंच असेल, की तुझ्यात विलासिनीचा आत्मा आहे. तुझ्या उत्कट प्रेमामुळेच तुझा विवाह श्यामकांतांशी म्हणजेच भद्रपालाशी झालेला आहे. ज्यूलीला, म्हणजे चंद्रलेखेला रक्त देऊन तू पण तिची उतराई झाली आहेस.

आता माझ्या सहभागाबद्दल सांगतो. मी तुझा भाऊ विलासराज. निव्वळ मत्सरापायी मीच भद्रपालाचा खून केला होता. त्या पापाचं निरसन मला करायचं होतं. गेली ६०० वर्षं मी या सिद्धीच्या मागे आहे. माझ्या सिद्धीमुळेच मी आज हे सारं घडवून आणू शकलो.

विलासिनी, आता भद्रपालाबरोबर सुखानं संसार कर. माझी वेळ झाली की मी पण जगाचा निरोप घेईन. मला विसरून जाण्यातच तुम्हा सगळ्यांचं हित आहे. तेव्हा हा रस पिऊन टाक. म्हणजे पूर्वजन्मीच्या स्मृती तुला सतावणार नाहीत. श्यामकांतला पण मी हा रस पूर्वीच दिलेला आहे.

''आता त्याला जागं करू या.''

श्यामकांत जागे झाले तेव्हा आम्ही दोघंही धुनीबाबांच्या पाया पडलो.

इन्स्पेक्टर मुत्तेवारांना आत बोलावलं. धुनीबाबाबद्दल आमची काहीच तक्रार नव्हती. श्यामकांतांचा अतिसाहसीपणा आणि विक्षिप्तपणा समजून हे प्रकरण मिटलं होतं.

जीपमधून परत फिरताना इन्स्पेक्टर मुत्तेवारांनी हॉस्पिटलवरून जीप घ्यायची का, असं विचारलं. मी त्यांना 'नाही' म्हणाले; कारण ज्यूली परेरा हे प्रकरण आता कायमचं मिटलं होतं. दृष्टिआड होईपर्यंत मी त्या मंदिराकडे पाहत होते. विलासराज आता परत भेटण्याची शक्यता नव्हती.

जमशेदपूरहून परत येताना ते मंदिर केव्हा आलं आणि कधी गेलं याच्याकडे ना माझं लक्ष होतं ना त्यांचं. ते मंदिर आता आमच्या दृष्टीनं इतर सर्वसाधारण मंदिरांसारखंच मंदिर होतं. फक्त नागपूर रेल्वे स्टेशनच्या रेल्वे डायरीमध्येच त्याची नोंद असेल, श्यामकांत या विक्षिप्त माणसाच्या संदर्भात.

svkale39@gmail.com

❖

खुनी घड्याळाचे रहस्य

समीर वेंगुर्लेकर

अवी आणि निशा यांचं नुकतंच लग्न झालं होतं. सुरवातीला घरच्यांचा विरोध होता; परंतु नंतर मात्र दोघांचं प्रेम पाहून त्यांनी लग्नाला परवानगी दिली होती. अवीचे आई-वडील काही वर्षांपूर्वी मृत्यू पावले होते. अवी आणि निशा दोघंही अवीच्या वडिलांच्या नवीन फ्लॅटमध्ये राहायला गेले. दिवसभर त्यांनी खूप मौजमजा केली. संध्याकाळी सर्व सामानाची आवराआवर होईस्तोवर रात्र झाली.

रात्री अवी आणि निशा टीव्ही पाहत बसले होते. टीव्ही पाहता पाहता त्यांचा कधी डोळा लागला त्यांचं त्यांनाच कळलं नाही. अचानक निशाला काहीतरी आवाज ऐकू आला आणि निशाचे डोळे उघडले. त्या वेळी रात्रीचे बारा वाजले होते. निशा हलकेच उठून बाहेर आली. कुणाच्यातरी रडण्याचा व कण्हण्याचा आवाज ऐकू येत होता. निशानं आजूबाजूला पाहिलं; परंतु तिला काहीच दिसलं नाही. निशा घाबरली. तिनं अवीला उठवलं. अवीनंही बाहेर जाऊन सर्वत्र शोध घेतला; मात्र तिथे कुणीच आढळलं नाही; मात्र दूरवरून धूर आलेला दिसत होता. आकाश निरभ्र होतं. सगळीकडे भयाण शांतता होती. दूरवर पुसट सावल्यांचा खेळ चालला होता. अवी आणि निशा परत येऊन आपल्या जागी झोपले.

दुसरा दिवस उजाडला. अवी आणि निशा दोघंही कामाला जाण्याच्या तयारीला लागले. अवीनं निशाला तिच्या ऑफिसमध्ये सोडलं अन् तो पुढे जायला निघाला. गाडी अगदी चांगली चालत होती अन् अचानक एका उतारावर अवीच्या गाडीचे ब्रेकच लागेनासे झाले. समोरून गाडी येत होती. त्याच्या गाडीवर आता ती गाडी आदळणार एवढ्यात अवीनं कशीबशी गाडी थांबवली; परंतु ती जाऊन एका झाडावर आदळली. सुदैवानं अवीला फार काही लागलं नाही; परंतु त्याचा उजवा हात फ्रॅक्चर झाला.

अचानकपणे गाडीचे ब्रेक फेल होणं हा निव्वळ अपघात नव्हता. कुणीतरी जाणूनबुजून हे कार्य केलं होतं; कारण गाडी आदल्या दिवशी तर ठीकठाक होती अन् अचानक असं व्हावं? काहीतरी विपरीत घडतंय असं अवीला वाटू लागलं. अवीनं पोलिसांत जाऊन याविषयी तक्रार दिली. अवी आता निर्धास्त होता. रात्रीच्या वेळी तो कामावरून घरी परतला, तेव्हा निशा त्याची अंगणात वाट पाहत बसली होती. खूप रात्र झाल्यानं दोघंही खोलीत जाऊन झोपली, तोच अचानक जोराचा वारा वाहू लागला. अवीचे डोळे उघडले. तो घराच्या बाहेर आला; परंतु बाहेर येताक्षणीच अचानकपणे वाऱ्याचा जोर आणखीनच वाढत गेला. रात्रीचं ते वातावरण खूपच भयावह होतं. रात्रीचे ठीक बाराचे ठोके पडले. चोहो बाजूचा अंधार अधिकच गडद झाला. दूरवरून एक मंद उजेडाचा झोत अवीच्या घराकडे येत होता. पलीकडून कुणाची तरी सावली हलल्याचा भास होत होता. अवी थोडा पुढे जाताच वरून निशाची किंकाळी त्याला ऐकू आली. अवी पळतच वर गेला. पाहतो तो काय, समोरच्या भिंतीवर रक्ताचे डाग पडले होते आणि बाजूचा किचनचा दरवाजा अर्धवट उघडला होता. रक्ताचे डाग भिंतीवरून थेट आतपर्यंत गेले होते. अवीने सर्वत्र शोध घेतला; परंतु त्याला तिथं काहीच आढळलं नाही. अवी आणि निशा या प्रकारानं मात्र खूपच घाबरले. दोघंही रात्रभर जागेच राहिले. घरात नक्कीच कुणीतरी आलं होतं, असं अवीला राहून राहून वाटू लागलं.

दुसऱ्या दिवशी दोघंही जवळच्या पोलीस चौकीत गेले आणि त्यांनी घडलेल्या प्रकाराची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी चौकशीचं आश्वासन दिलं. अवी आणि निशानं दुसरीकडे जाण्याचा निर्णय घेतला. सर्व सामानाची आवराआवर करून ते दुसरा फ्लॅट पाहू लागले. आपल्या कंत्राटदाराच्या मदतीनं त्यांनी दुसरा फ्लॅट विकत घेतला. दुसरा फ्लॅट अतिशय शानदार होता आणि त्याच्याभोवती असणारा बगीचाही अतिशय शानदार व ऐसपैस होता. फ्लॅटमध्ये एकूण चार खोल्या होत्या; परंतु यातली एक खोली मात्र कायमची बंद असायची. त्या खोलीच्या बाहेर एक विचित्र आकाराची दगडाची मूर्ती ठेवलेली होती. अवी अणि निशानं याबाबत चौकशी केली, तेव्हा त्या मूर्तीचा काहीही त्रास नसल्याचं सांगितलं गेलं.

अवी अणि निशाच्या मनातील भीतीचं सावट आता काहीसं दूर होऊ लागलं होतं. अवी आणि निशा निर्धास्तपणे त्या घरात राहू लागले. दोन दिवस काहीही घडलं नाही. आता अवीची भीती कायमची मिटली होती; मात्र त्या रात्रीचा तो प्रसंग अत्यंत भयानक असाच होता. रात्रीची वेळ होती, अमावस्या असल्यानं अतिशय गर्द काळोख होता आणि अचानक ते प्रकार याही फ्लॅटमध्ये होऊ लागले. अवी व निशा झोपले असताना अचानक कण्हण्याचा व रडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. हवेत काहीतरी चालत असल्याचा भास होऊ लागला. अवी आणि निशा बाहेर सर्वत्र शोध घेऊ लागले. शेजारीपाजारी कुणीच नव्हतं, त्यामुळे तर त्यांना अधिकच भीती वाटत होती. अवीनं तातडीनं पोलिसांना फोन केला. आवाज वाढतच होते.

आवाज कुठून येत होते, हे कळायला मार्ग नव्हता. पोलीस येईस्तोवर अवी आणि निशा तिथंच बसून राहिले. एवढ्यात अचानकपणे कुणाच्यातरी प्रच्छन्नपणे हसण्याचा आवाज आला. पुन्हा हवेतून चित्रविचित्र आवाज येऊ लागले. अवी आणि निशाला काही काळ काय घडतंय तेच समजत नव्हतं. दोघंही घाबरून गेले. आवाज वाढतच होते. अवीनं आवाजाच्या दिशेनं विजेरीचा झोत टाकला अन् अचानक निशा अवीच्या समोर उभी राहिली आणि चालायला लागली. अवी तिला हाका मारत होता; परंतु ती झपाटल्यागत चालतच होती. अवीनं प्रयत्नांती तिला गाठलं व तिचा हात पकडला. निशानं वळून पाहताच मात्र अवीची बोबडीच वळली. निशाचा चेहरा अतिशय विद्रूप व भयानक दिसत होता.



निशाच्या डोळ्यांत खुनशीपणा दिसत होता, तिचे डोळे तांबडेभडक झाले होते. निशानं जळजळीत नजरेनं अवीकडे पाहिलं अन् आता ती अवीला मारणार एवढ्यात अवीनं 'निशा' अशी साद घातली. निशाचं ते भयानक रूप अचानक नाहीसं झालं, तेवढ्यात पोलीस तिथं पोहोचले. अवीनं घडलेली सर्व हकिगत पोलिसांना सांगितली. पोलिसांचा प्रथमतः अवीच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही; परंतु अवीनं खात्री पटवून दिल्यावर पोलिसांनी या प्रकरणी चौकशीचं आश्वासन दिलं.

आदल्या रात्रीच्या घटनेनं अवी पुरता भांबावून गेला. काही केल्या त्याच्या नजरेसमोरून निशाचा तो भयानक चेहरा दूर होत नव्हता. अवी त्या घटना विसरण्याचा प्रयत्न करत होता, अन् काही दिवसांनी अवीला कळलं की निशा गरोदर आहे. अवीला हे समजल्यावर त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. अवीनं आपल्या काकाला सांगितलं. अवीच्या वडिलांच्या मृत्यूनंतर अवीला त्यांचाच आधार होता. पुढे बरेच दिवस नंतर त्या वाईट घटना घडल्या नाहीत. निशाला बाळ होणार आहे, हे घरच्यांना माहिती झालेलं होतं. घरच्यांनी अवी आणि निशाला हवापालट करण्यासाठी लोणावळ्याला पाठवलं. लोणावळ्यात एका रिसॉर्टमध्ये ते थांबले होते. अवी आणि निशा लोणावळ्याच्या त्या रम्य वातावरणात खूपच रमले. आपल्या सुखी आयुष्याची स्वप्नं पाहत काही दिवस ते तिथेच राहिले. ते निर्धास्त होते. त्यांना फ्लॅटमध्ये घडलेल्या घटनांचा विसर पडला होता; परंतु नियतीच्या मनात काय आहे ते कुणालाच माहीत नसतं; एके रात्री पुन्हा एकदा अवी आणि निशाला त्या भयानक प्रसंगांना सामोरं जावं लागलं. ते रात्रीच्या थंड हवेत अंगणात बसले होते. दोघांच्या गप्पागोष्टी रंगात आलेल्या होत्या. अचानकपणे बाजूच्या दरीतून सुसाट वारा वाहू लागला. कोल्हेकुईचा आवाज ऐकू येऊ लागला. ते जरा पुढे जाऊन पाहायला लागले. दरीतून कोणीतरी कोणाला तरी मारण्याचा आवाज येत होता, तसंच कुणीतरी काहीतरी हत्यार चालवत असल्याचाही आवाज येत होता. अचानकपणे अंधारात कुणाचीतरी पुसटशी किंकाळी ऐकू आली. आता मात्र ते घाबरले.

अवी आणि निशा घरात गेले; परंतु आवाज अधिकच वेगाने वाढू लागले. एवढा वेळ निशाला धीर देणारा अवी आता मात्र घाबरून निशाला त्या रिसॉर्टमधून जाण्याविषयी सांगू लागला. निशाही तयार झाली. दोघांनीही घरात जाऊन सामानाची आवराआवर करायला सुरवात केली. सामानाची आवराआवर सुरू असताना अचानक वीज गेली. ऐन वेळी अवी आणि निशाला तिथं दिवा वा मेणबत्ती काहीच सापडेना. अखेर छोट्या विजेरीचा आधार घेत त्यांनी सामान आवरायला घेतलं. अचानक जोरजोरात बुटांचा आवाज येऊ लागला. संपूर्ण घरच जणू हलत असल्यासारखं वाटू लागलं. अवीनं पाहायचा प्रयत्न केला; परंतु त्याला अंधारामुळे काहीच दिसलं नाही. अचानक वीज आली. निशानं सामान आवरायला घेतलं आणि अचानक तिच्या तोंडून किंकाळी बाहेर पडली. अवी धावतच तिथे आला. पाहतो तो काय, समोर एक रक्ताळलेले कापड अन् बाजूला खिळे टोचून कुणीतरी लिंबू ठेवलं होतं. बाजूला कवटी व हाडं ठेवलेली होती. अवी आणि निशा ते पाहून सुन्न झाले. मघाशी कुणीतरी आलं होतं हे नक्की. अवी बाहेर जाऊन तपासणी करू लागला. त्याला काहीही आढळलं नाही. दोघंही काळोखातच घराबाहेर पडले. आपल्या गाडीत सामान ठेवून ते दोघंही गाडीत बसले. अवीनं गाडी चालू केली. तिथून बाहेर पडल्यावर दोघांच्या जिवात जीव आला. अवी आता शांतपणे गाडी चालवत होता. निशा त्याच्या बाजूलाच बसली होती. अचानक अवीच्या गाडीचे ब्रेकच लागेनासे झाले. अवीनं गाडी थांबवण्याचा बराच प्रयत्न केला. गाडी इकडे- तिकडे जाऊ लागली. खूप वेळानं अवीने ती गाडी आपल्या ताब्यात आणली. अवीनं एकवार निशाकडे पाहिलं. निशा अगदी गुपचूप बसून होती. जणू काहीच घडलं नाही असेच भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होते. अवीनं निशाला साद घातली; परंतु निशा त्याला प्रतिसाद देईना. त्यानं अचानकपणे निशाच्या अंगाला हात लावला. त्याला चटका बसला. निशाचं संपूर्ण शरीर आगीसारखं तप्त झालं होतं. तिला मात्र याची काहीच जाणीव असल्याचं दिसत नव्हतं. ती खूपच शांत बसली होती. त्याला काहीच उमजेना. अचानक हे काय होतंय, तेच त्याला समजत नव्हतं. तो घाबरला. त्यानं जवळ कुठे हॉस्पिटल आहे का, याचा शोध घेतला. सुदैवानं जवळच एक हॉस्पिटल होतं. अवीनं ताबडतोब निशाला तिथे ॲडमिट केलं.

अवी आता खूप घाबरला. तो निशाच्या बरं होण्याची वाट पाहू लागला. अवीला हे काय घडतंय ते समजायला मार्ग नव्हता. थोड्या वेळानं तिथे डॉक्टर आले. त्यांनी अवीला निशा शुद्धीवर आल्याचं सांगितलं. तो धावतच निशाच्या खोलीत गेला. ती कॉटवर बसली होती. तो तिच्याजवळ गेला. तिला मिठीत घेऊन तो ढसढसा रडू लागला. ते दोघं गाडीत येऊन बसले. त्यानं गाडी चालू केली. दोघांनीही घरचा रस्ता धरला.

अचानक अवीचा मोबाईल खणाणला. पलीकडच्या माणसाने सांगितलेली बातमी ऐकून त्याच्या हातातील मोबाईल खाली गळून पडला. निशा एकटक अवीकडे पाहत राहिली. त्याला ती सारखं विचारू लागली. ते घरी पोहोचले. घराच्या सभोवती लोक एकत्र जमले होते. बऱ्याच बायका रडत होत्या. निशाला काहीच माहीत नव्हतं. अवी अतिशय दुःखी अंतःकरणानं पुढे जाऊ लागला. निशाही त्याच्या मागोमाग होती. अवी हमसाहमशी रडू लागला; पण धीर करून पुढे सरकला. समोरचं दृश्य पाहून निशानं किंकाळीच फोडली. अवी डोक्यावर हात ठेवून रडू लागला. समोर सर्वत्र रक्ताचा सडा पडला होता. आजूबाजूला घरच्यांचे मृतदेह पाहून तो चांगलाच हादरला. त्यानं पोलिसांना सर्व हकिगत विचारली. पोलिसांचा तपास सुरूच होता. त्याने स्वतः आजूबाजूला चौकशी केली; मात्र काहीच धागादोरा सापडत नव्हता. पोलिसांनी चहूबाजूंनी घराची नीट पाहणी केली. शेजाऱ्यांची बरीच चौकशी केली. पोलिसांनी त्या रात्री आपले दोन सुरक्षा जवान अवीच्या घराच्या सुरक्षिततेसाठी ठेवले. अवी व निशाला त्या रात्री शांत झोप लागली नाही. अवीवर आता मोठी जबाबदारी येऊन पडली होती, ती म्हणजे काकांचं अस्थिविसर्जन करण्याची. वडील गेल्यावर काकाच त्याला वडिलांच्या जागेवर होते. अवीनं पोलीस अधिकाऱ्यांकडून अस्थिविसर्जनाला जाण्याची अनुमती घेतली.

दुसऱ्या दिवशी तो आपल्या मामाला बरोबर घेऊन नृसिंहवाडीला अस्थिविसर्जनाला निघाला. अतिशय दुःखी मनानं त्यानं निशाचा निरोप घेतला. मामाबरोबर तो गाडीत बसला. तो खूपच विचारात होता. काही

अध्यात्मिक, ऐतिहासिक पात्रांना
शेलका साज चढविणारे

शिवाजी सावंत

यांची विलक्षण पुस्तके

मृत्युंजय



छावा

युगंधर



कांचनकण

मोरावळा



अशी मने असे नमुने



शेलका साज

सर्व पुस्तके eBooks स्वरूपात उपलब्ध

नवं कोरं

खुसखुशीत गोष्टी, हलकंफुलकं विवेचन...
निर्भेळ आनंद देणारं **प्रा. श्याम भुर्के** यांचं लेखन



पेशवाईतल्या समृद्धीनं घडली याची ओळख
नव्या शतकात शिक्षणसंस्कृती होत गेली ठळक
या अंगतपंगत शहराचा आहे बाजच वेगळा
पुस्तकाच्या पानांमधून कळेल त्याचा चेहरा...

पुणं एक साठवण

पृष्ठसंख्या : १७६ । किंमत : १८०/-

Book Available

पुल एक आनंदयात्रा

विवंचनेला पिटाळून लावणारा शंभर नंबरी
हास्याचा उतारा म्हणजे 'पुलं'..
पु. लं.च्या अद्‌भुत किश्श्यांची ही नवी आनंदयात्रा

Book Available

पृष्ठसंख्या : १२८ । किंमत : १३०/-

अत्र्यांच्या खुमासदारपणाची नवी ओळख
घडविणारं पुस्तक

खुमासदार अत्रे

पृष्ठसंख्या : १३६ । किंमत : १५०/-

Book Available

गोष्टींचं एटीएम

मनावरचा ताण क्षणात कमी करणारं
हलक्याफुलक्या गोष्टींचं
ऑल टाईम मंनोरंजन

Book Available

पृष्ठसंख्या : १३६ । किंमत : १५०/-

अंतरावर गेल्यावर त्याच्या कानात अचानक हवेचा सूं सूं असा आवाज येऊ लागला. आश्चर्य म्हणजे तो आवाज फक्त त्यालाच ऐकू येत होता. काही वेळानं त्याच्या कानात एका भयानक किंकाळीचा आवाज घुमला. तो भयभीत होऊन इकडेतिकडे पाहू लागला. मामाला त्याची अवस्था पाहवत नव्हती. त्यानं अवीला बराच धीर दिला.

अवी व मामा नृसिंहवाडीला पोचले. ब्राह्मणाला बोलावून त्यानं अस्थिविसर्जनाविषयी सांगितलं. तो व मामा नदीवर जात असताना, बाजूलाच काही ब्राह्मण त्यांना वेदपठण करताना दिसले. अवी त्यांच्याकडे पाहत जात होता, तोच त्यांच्यातील एक ब्राह्मण उठला. तो अवीच्या जवळ येऊ लागला. अवीला क्षणभर काहीच समजेना. ब्राह्मण अवीकडे अतिशय रागानं पाहत होता. ब्राह्मणाच्या हातात मंत्र म्हणताना वापरात येणारी काठी होती. अवी आजूबाजूला पाहू लागला. त्याला मामा कुठेच दिसेना. सभोवतालीही सर्वत्र सामसूम होती. ब्राह्मण मात्र तोंडाने सारखे कसलेतरी मंत्र पुटपुटत होता. अवीच्या आजूबाजूला काळोख दाटू लागला होता. त्याच्या हातातील अस्थिकलश हलू लागला होता. काय घडतंय तेच त्याला कळत नव्हतं. त्यानं ब्राह्मणाच्या चेहऱ्याकडे पाहिलं. ब्राह्मणाचा चेहरा संपूर्ण विचित्र व जळालेला असा होता.अवीच्या समोर त्याचं भयंकर वेगानं मंत्रपठण चालू होतं. अवी ओरडला व तिथून घाबरून दूर जाऊ लागला. सर्व जमीन मात्र थरथर हलत होती. अवीला आपल्याला हे भास होतायेत की सत्य घडतंय ते कळायच्या आत आजूबाजूचा काळोख कमी कमी होऊ लागला. सर्व शांत झालं. अवीनं पाहिलं की सोबत मामा आहे. अवीच्या जिवात जीव आला. तो आजूबाजूला पाहू लागला. त्याच्यासमोर मघाशी उभा राहून मंत्र म्हणणारा तो ब्राह्मण मरून गेला होता. अवी खूप घाबरला. तरीही अस्थिविर्सजन करून तो मामाबरोबर गाडीत जाऊन बसला. त्याला आजचा प्रकार खूपच विचित्र वाटला.

घरी आल्यावर तो याच गोष्टीवर विचार करू लागला. निशाला त्यानं घडलेली सारी हकिगत सांगितली. निशानं त्याला मांत्रिकाकडे जाण्याचा सल्ला दिला. त्यानं मात्र त्याकडे दुर्लक्ष केलं. त्याला राहून राहून यामागे कुणीतरी माणूस असल्याचं सारखं वाटत होतं. त्याला आता या प्रकरणाचा छडा लावायचाच होता. आता तो वेगानं तपासाला लागला. शेजारचे लोक मात्र अवी व निशाला वाईट समजत होते. त्यांच्यामुळेच त्या ठिकाणी असे प्रकार घडू लागले, असं त्यांचं म्हणणं होतं. अवी व निशा सर्व सहन करीत होते.

निशा मात्र लोकांचं ऐकून ऐकून खूप कंटाळली होती. हे घर सोडून देऊ, असं तिनं अवीला सांगून पाहिलं; परंतु तो नमला नाही. शेवटी दोघंही समाजाशी लढा द्यायला तयार झाले. त्यांच्या घरात खूप दिवसांनी पुन्हा एकदा आनंद येणार होता. त्यांचं बाळ येणार होतं. ते दोघं येणाऱ्या बाळाकडे डोळे लावून होते.

अवीनं त्या दिवशी फ्लॅटची पूर्ण पाहणी केली. त्याला संशयास्पद काहीच आढळलं नाही. पोलिसांचंही लक्ष होतंच; परंतु तेही कोणत्याही ठोस निष्कर्षापर्यंत पोचू शकत नव्हते. अवी तपास करतच होता. निशाही त्याला पाठिंबा देत होती. दोघांनाही एकमेकांचा आधार होता. ते आपल्या बाळाचं स्वप्न पाहत दिवस घालवत होते. अवीला मात्र घडणाऱ्या घटनांचा तपास लावायचाच होता. एके दिवशी तो रात्रीचा बाहेरच्या गॅलरीत बसला होता. अचानक आजूबाजूचा काळोख अधिकच गडद झाला. अचानक भयानक किंकाळीचा आवाज येऊ लागला. त्यानं मान वळवून इकडेतिकडे पाहिलं. तो उठला. आज त्याला या घटनांचा छडा लावायचाच होता. वातावरण भयाण बनत चाललं होतं. आजूबाजूला नीरव शांतता होती. आकाशात वीज चमकू लागली होती. मागच्या बाजूच्या कब्रस्तानातून भयानक आवाज येत होते.

अवीला आजूबाजूला काहीतरी वावरत असल्याचा भास होत होता. तरीही तो पुढे जाऊ लागला. त्याला कुणीतरी आपला पाय मागं खेचतंय असं वाटत होतं. झटसरशी त्याच्या हातातील विजेरीही पडली. चहू बाजूंचा अंधार अधिकच गडद झाला. किंकाळ्यांचा आवाज पुन्हा येऊ लागला. त्यानं खाली पडलेली विजेरी उचलली. विजेरी पेटवून तो इकडेतिकडे पाहू लागला. अचानक समोरच्या झाडावर त्याची नजर गेली. समोर एका माणसाचा मृतदेह टांगून ठेवण्यात आला होता. अवी घाबरला, तरीही पुढे जाऊन त्यानं पाहिलं. तो एका पोलिसाचा मृतदेह होता. अवी मागे मागे जाऊ लागला, तोपर्यंत निशाही तिथं पोचली होती. पोलिसाच्या मृतदेहातून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. त्याचे डोळे तांबडेभडक झाले होते. अवी ते पाहत असताना अचानकपणे अंधारात काहीतरी हलल्याचा आवाज आला. अवी व निशा त्या आवाजाच्या दिशेनं जाऊ लागले. अवी पुढे पुढे जात एका दलदलीच्या जागी आला, तिथे सर्वत्र चिखल होता. तो जसा पुढे सरकला, तसा चिखलातून बुडबुड असा आवाज ऐकू येऊ लागला. थोड्या वेळाने जोराचा वाराही सुरू झाला. घरातील विजेचा खेळ सुरू झाला. थोड्या वेळाने वरून काहीतरी खाली गळत असल्याचा आवाज येऊ लागला. निशाच्या अंगावर काहीतरी पडत होतं. निशानं वळून वर पाहिलं. निशा ओरडलीच. एक विचित्र अवस्थेतील मृतदेह त्या झाडावर टांगला होता. अर्धवट जळालेला व कुजलेला असा तो मृतदेह होता. अचानकपणे तो अवी व निशाच्या समोर येऊन पडला. ते दोघं आता खूपच घाबरले. दोघंही मागे फिरत असताना अचानक भयानक भुतं हसत असण्याचा आवाज येऊ लागला. घराच्या बाहेर असलेल्या पुतळ्याच्या डोळ्यात जाळ उठला. त्याचे डोळे चमकू लागले. पुतळा जिवंत असल्यासारखं वाटू लागलं. अवी व निशा पळतच घरात गेले. पोलिसांना फोन लावून ते घरातच बसून राहिले. पोलीस तिथे आले. पोलिसांनी जागेची पाहणी केली. इतरत्र सर्वत्र शोध घेतला. काही सुगावा लागल्यास पुन्हा येऊच, असं आश्वासन देऊन ते निघून गेले.

निशा हमसून हमसून रडायला लागली. ते घर आपण सोडून देऊ, असं अवीला परत एकदा विनवू लागली. अवीला मात्र शोध घ्यायचाच होता. निशाचं बोलणं थोडं टाळून तो दुसऱ्या विषयाकडे वळला. निशाला आपलं कुंकू प्यारं होतं; पण अवीला मात्र घर वाचवायचं होतं. अवी रात्रभर तोच विचार करत झोपी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळीच त्याला पोलिसांचा फोन आला. पोलिसांनी त्याला शवागारात बोलावलं होतं. तो शवागारात पोचताच पोलिसांनी त्याला त्या मृतदेहाचा पंचनामा दाखवला. पोलिसांच्या सांगण्यावरून अवीला समजलं की, तो मृतदेह अंदाजे सहा-सात वर्षं जुना आहे व त्या माणसाचा मृत्यू हा विष प्यायल्यामुळे झाला

आहे. त्याचं वय हे साधारण ३०-३५ वर्षं इतकं असावं. मृतदेह खूपच सडलेला असल्यानं तो कुणाचा हे शोधणं पोलिसांना कठीण जात होतं. पोलिसांच्या माहितीवरून त्याने एवढाच निष्कर्ष काढला, की घडणाऱ्या सर्व घटनांमागे कुणीतरी माणूसच आहे. पोलिसांकडून अधिक तपासाचं आश्वासन घेऊन अवी घरी परतला. निशा त्याची वाट पाहत होती. तो येताच ती त्याच्या जवळ आली. आज रोजच्यापेक्षा ती अधिकच सुंदर दिसत होती. अवी मात्र आपल्याच विचारात होता. त्याने निशाकडे पाहिलंसुद्धा नाही. निशानं अवीकडे बाहेर फिरायला जाण्याविषयी आग्रह करायला सुरुवात केली. त्याचं तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. अखेर त्याचं व निशाचं यावरून कडाक्याचं भांडण झालं. दोघंही एकमेकांबरोबर बोलायचे बंद झाले.

काही दिवसांनी अचानक निशाच्या पोटात कळा उठू लागल्या. निशा वेदनेनं कळवळू लागली. अवीला तिचं हे कळवळणं पाहवेना. आपला राग विसरून त्यानं निशाला हॉस्पिटलमध्ये नेलं. डॉक्टरांनी तिला प्रसूती विभागात दाखल केलं. अवी देवाची प्रार्थना करत होता. काही वेळानं प्रसूती विभागातून मुलाच्या रडण्याचा आवाज आला. तो आनंदानं आत जाणार, एवढ्यात मागोमाग निशाची किंकाळी ऐकू आली. अवी व डॉक्टर धावतच आत गेले. पाहतात तो काय, बिछान्यावर ते मूल होतं. निशा त्याच्या बाजूला बसून होती. अवीने मुलाकडे पाहिलं अन् त्याला भोवळ येऊ लागली. मुलाचा चेहरा विद्रूप बनत चालला होता. चेहरा सारखा बदलत होता. मूल अचानक प्रच्छन्नपणे मोठ्या माणसाच्या आवाजात हसू लागलं. डॉक्टरांसह सगळेच बुचकळ्यात पडले. हॉस्पिटलमधील इतर लोकही तिथे जमले होते. जो तो देवाची आळवणी करत होता. डॉक्टरही आपल्याकडून प्रयत्न करत होते. निशा बाळाला सावरण्याचा प्रयत्न करत होती. हळूहळू अचानक ते बाळ तडफडू लागलं. अवी व निशा ओरडले. बाळ आक्रस्ताळेपणानं हात-पाय झाडू लागलं. डॉक्टरांना हा काय प्रकार आहे तेच उमजत नव्हतं. अखेरपर्यंत प्रयत्न करूनसुद्धा ते बाळाला वाचवू शकले नाहीत. अवी व निशावर आभाळच कोसळलं. त्यांचा संपूर्ण संसारच उद्ध्वस्त झाला. निशा तर आपली शुद्धच हरवून बसली. तीन-चार दिवस ती थिजून गेली होती. अवी हतबल झाला होता. त्याचा धीर खचत चालला होता. त्याला आता आपल्या घरात भुताटकी असल्याची पूर्ण जाणीव झाली. त्याला आपला मित्र रवीची आठवण झाली..त्यानं ताबडतोब रवीला फोन करून बोलावून घेतलं. अवीची सर्व हकिगत ऐकून तो लागलीच तिथे निघून आला.

रवी एक जादूगार होता. त्याचं अघोरी विद्या, तंत्रमंत्राबाबत बरंच शिक्षण झालं होतं. या कामी त्याची मदत महत्त्वाची होती. अवी व रवी दोघंही बालपणीचे मित्र होते. अवीच्या बाबतीत घडत असणाऱ्या या घटना ऐकून रवीला धक्काच बसला. रवीने अवीला धीर दिला. रवीच्या प्रयत्नांनी निशा शुद्धीवर आली. अवीनं तिला जवळ घेतलं. याबाबत तपास करण्याचं आश्वासन रवीनं दिलं. रवी हा जादू विद्या जाणत असे. त्यानं असं एक विलक्षण शास्त्र आत्मसात केलं होतं. अवी व रवीने ती रात्र जागून काढली.

दुसरा दिवस उजाडला. अवी कामाला जाण्याच्या तयारीला लागला. त्याच्या मनातील बाळाची आठवण अजून ताजीच होती, तरीही निशासाठी त्याला जाणं भाग होतं. निशानं त्याला अडवायचा प्रयत्न केला; मात्र त्याने निशाला समजावलं अन् तिला धीर दिला. अवीबरोबर रवीही बाहेर पडला. दोघंही गेटबाहेर येतानाच जवळच्या झाडीत त्यांना काहीतरी हलल्याचा भास झाला. दोघंही पुढे सरसावले. झाडीजवळ पोचल्यावर अवी व रवीला एक जबरदस्त धक्का बसला. झाडावर कुणीतरी काळ्या बाहुल्या टांगून ठेवलेल्या होत्या. बाजूलाच एक लिंबू टांगून ठेवलेलं होतं. करणीचाच हा एक प्रकार होता. जमिनीवर काहीतरी प्राकृत भाषेत कोरलेलं होतं. अवी व रवी आजूबाजूला पाहत होते, तोच त्यांना एक माणूस दिसला. तो संशयास्पद वाटत होता. त्या दोघांनी धावत जाऊन त्याला पकडलं. त्यांनी त्याच्याकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला; मात्र तो काही बोलत नाही असे पाहून त्याला पोलीस ठाण्यात नेलं. संध्याकाळी ते पोलीस ठाण्यात गेले अन् त्यांना अनपेक्षितपणे अजून एक धक्का बसला. पोलीस हतबल उभे होते आणि लॉकअपमध्ये तोच कैदी मेला होता. त्या दोघांनी पोलिसांना याचं कारण विचारलं; परंतु पोलिसांना हे असं कसं घडलं हेच समजत नव्हतं. ते दोघं हैराण झाले. धडधाकट असलेला माणूस अचानकपणे एकदम मरण कसा पावला, हेच त्यांना उमजत नव्हते.

अवी व रवी पुन्हा त्या झाडीकडे गेले. रवी तिथल्या जमिनीवर कोरलेल्या अक्षरांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करायला लागला. रवीला त्या अक्षरांचा अर्थ उमजत नव्हता. बाजूलाच पानांवर रक्ताचे डाग पडलेले होते. त्यांनी ते रक्ताचे डाग तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले. रवी त्या कोरलेल्या अक्षरांचा विचार करायला लागतो आणि अखेर त्याला त्याचा नेमका अर्थ उमजला. जिथे कुणीच नाही तिथेच मी आहे, असा त्या अक्षरांमागचा अर्थ असतो. अवी व रवीला या वाक्याचा अर्थबोध झाला नाही.

ते दोघं निशाबरोबर अंगणात बसलेले असताना, पुन्हा तसे आवाज त्यांना ऐकू येतात. रवी धावत जाऊन घरातून आपलं मंत्रांचं पुस्तक बाहेर घेऊन येतो. एवढ्यात अचानक जंगलातून कुणाची तरी किंकाळी ऐकू येते. ते दचकतात. विजेरी घेऊन ते जंगलाच्या दिशेनं जातात. सावधपणे पावलं टाकत असतात. रातकिड्यांचा व घुबडांच्या चित्कारण्याचा आवाज येत असतो. ते जंगलात थोडे पुढे जाताच एका झाडापाशी त्यांना तीन थडगी एकत्र ठेवलेली आढळतात. थडग्यांवर रक्त सांडत असतं. ते वर पाहतात. झाडावर कुणाचं प्रेत लटकत असल्याचा त्यांना भास होतो. रवी मंत्रपठण करतो, तसा तो भास नष्ट होतो. ते थडग्यांच्या ठिकाणी शोध घेऊ लागतात. बाजूच्या चिखलातून बुडबुड्यांचा आवाज येऊ लागतो. अचानक त्या चिखलातून एक हात अर्धवट बाहेर येतो. अवी किंचाळतो. रवी लगेच मंत्रपठण करतो, तसा तो भासही नष्ट होतो. निशा घरी एकटी आहे याची त्यांना आठवण येताच ते मागे सरकतात. पुन्हा ते त्या थडग्यांपाशी येतात. एक विचित्र असा दिसणारा माणूस तिथेच बसून थडग्यांवर पडलेलं रक्त चाटत असतो. अवी व रवी थोडे पुढं सरकताच तो माणूस उठून त्यांच्याजवळ येतो. माणसाचा चेहरा अतिशय विद्रूप असतो. त्याच्या नाकातून, तसेच तोंडातून रक्ताच्या चिळकांड्या उडत असतात. रवी पुन्हा मंत्रोच्चार करतो, तसा तो माणूसही गायब होतो. ते

धावतच घरी जातात. ते जेव्हा अंगणात पोचतात, तेव्हा तिथे निशा नसते. ते निशाला शोधत असतात. अचानक आजूबाजूला अदृश्य वाटणाऱ्या सावल्या पसरतात. अचानक सावलीचा एक भयाण चेहरा तयार होतो. दोन लखलखणारे डोळे अवी व रवीला पाहत असतात. अवी व रवी सावलीचा पाठलाग करतात. पाठलाग करता करता ते घराच्या मागच्या बाजूला पोचतात. ते तिथे शोध घेऊ लागतात. आजूबाजूला पाहत असताना अवी एका भिंतीला टेकून उभा राहतो. अचानक त्या भिंतीतून कुणाचे तरी हात हळूच अवीच्या मानेभोवती लपेटले जातात. त्याच्या मानेवर थंड स्पर्श होतो. तो दचकतो. रवी मंत्रोच्चारण करू लागतो, तशी हाताची पकड सैल होते. त्या दोघांना पुन्हा त्या सावलीचा भास होतो. ते तिचा पाठलाग करतात. सावलीचा घूं घूं असा आवाज येत असतो. अचानक अवी पंधरा फूट लांब जाऊन पडतो. रवी त्याच्या मागून तिथे पोचतो.

अवी जिथे पडला होता, त्या ठिकाणी एक खाच पडलेली असते. ते ती खाच उघडण्याचा प्रयत्न करतात. खाचेच्या आत एक प्रकारचा कुबट वास येत असतो. ते धीर करून आत उतरतात. ते पाहतात, की ती एक गुहा आहे. ते आजूबाजूला पाहत जात असतात. अचानक रवीची नजर गुहेतील एका जागेवर पडते. गुहेच्या त्या जागेवर वायर्सचं कनेक्शन केलेलं असतं. बाजूलाच एक डिजिटल कॅमेरा बसवलेला असतो. अवी व रवीच्या हा सारा प्रकार लक्षात येतो. वायरींचा माग काढत काढत ते एका विचित्र उपकरणाजवळ पोचतात. ते पाहतात, की ते उपकरण भिंतीत बसवलं आहे. उपकरणामध्ये एक प्रकारचं मशिन जोडलेलं असतं ज्याच्याद्वारा आपल्याला पाहिजे त्या व्यक्तीवर नजर ठेवता येत असते. अवी व रवी पाहतात, की ते उपकरण म्हणजे एक प्रकारचे कृत्रिम घड्याळच आहे. घड्याळात विचित्र आवाज निर्माण करणारं यंत्र बसवलेलं होतं ज्याद्वारा विविध आवाज निर्माण केले जात. घड्याळामधील काटे वेगानं फिरणारे होते. विशिष्ट वेळेला ते सुरू होत असे व आपल्या भक्ष्याचा पिच्छा करत असे. उपकरणाचं वैशिष्ट्य म्हणजे, ज्या व्यक्तीला भक्ष्य बनविण्यासाठी हे चालू केलं जाई, तो कुठेही का असेना त्याला सुटता येत नसे. अवी व रवीनं पोलिसांना फोन लावला. काही वेळात पोलीस तिथं पोचले. त्यांनी पोलिसांना घडलेली सर्व घटना सांगितली. पोलिसांनी ते उपकरण ताब्यात घेतलं.

अवी व रवी घरी पोचले, तर अंगणात निशा बसलेली असते. अवी धावत जाऊन निशाला मिठी मारतो. दोघंही एकमेकांना घट्ट पकडून राहतात. रवीला मात्र त्या उपकरणाचं रहस्य जाणून घ्यायचं असतं. दुसऱ्या दिवशी अवी व रवी पोलीस ठाण्यात पोचतात. पोलिसांकडून त्यांना समजतं की, ते अतिशय दुर्मिळ असं उपकरण असून, त्याच्याद्वारा बसल्या जागेवरून खून घडवता येऊ शकतात. उपकरण रिमोटवर चालणारं असतं. पोलीस हेही सांगतात, की अशा प्रकारचं उपकरण भारतात सापडत नाही. अवी व रवीला ही माहिती नवीन असते. पोलिसांनी शोध घेतला असता तेथे त्यांना विशिष्ट प्रकारच्या तीन मूर्ती सापडतात. अवी व रवी त्या निरखून पाहत असतात. त्या मूर्तींवर प्राकृत देवनागरी लिपीमध्ये काहीतरी लिहिलेलं असतं. रवीला त्यातून असा अर्थबोध होतो की, त्या मूर्तींचा वापर करून सुमारे २००० वर्षांपूर्वी माणसांना मारलं जायचं. अवी व रवीला पुढे हेही समजतं की, गुहेत सापडलेलं ते उपकरणसुद्धा माणसं मारण्यासाठी वापरलं जायचं. उपकरणामध्ये बाण बसवले जात व आपल्या भक्ष्याला लक्ष्य केलं जाई. अवी व रवीला पुन्हा एकदा त्या उपकरणाचा छडा लावायचा असतो.

निशाला मात्र या सर्व घटना कधी संपतात, असं वाटत असतं. निशाने खूप सहन केलेलं असतं. अगोदर तिचे आई-वडील, नंतर तिचे सासू-सासरे आणि नंतर तिचे बाळ या सर्वांना तिनं गमावलेलं असतं. अवी हाच आता तिच्यासाठी एकमेव आधार असतो. अवी निशाला जवळ घेऊन धीर देतो. अवी व रवीला काहीही करून गुन्हेगाराचा तपास लावायचा असतो.

अचानक अवी व रवीला पुन्हा त्या सावलीचा आभास होतो. अवी व रवी त्या सावलीचा पाठलाग करतात. रवी आपलं मंत्रांचं पुस्तक बरोबर घेतो. सावलीचा पाठलाग करत ते एका जुन्या खिंडारीत घुसतात. खिंडारीच्या दरवाज्यावर एक भयाण दिसणारी मूर्ती असते. अवीला आपल्या घराबाहेरच्या मूर्तीची आठवण येते. सावली पुन्हा अवी व रवीला सामोरी जाते. रवी पुन्हा आपले मंत्र पुटपुटतो, त्यासरशी ती सावली गायब होत गुहेत एका भिंतीत घुसते. अवी व रवी पुढे सरकतात, त्याबरोबर गुहेत मोठा आवाज होतो. भिंतीला एक भगदाड पडतं. भगदाडामध्ये अवी व रवीला एक लखोटा सापडतो. रवी त्याच्यावरील अक्षरं मोठ्यानं वाचण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा दोन बाण अचानक सुटून अवी व रवीच्या दिशेनं येऊ लागतात. अवी व रवी बाणांचा नेम चुकवतात. रवीला त्या अक्षरांचा अर्थ समजतो.

जादूगार एका तीन पाषाणांच्या विचित्र मूर्ती ठेवलेल्या भिंतीच्या मागे आहे, असा त्या अक्षरांचा अर्थ असतो. अवी व रवी सावधपणे त्या भिंतीचा व मूर्तींचा शोध घेऊ लागतात. अवी व रवीला पुढे जात असताना चित्रविचित्र आवाज ऐकू येऊ लागतात. रवी अवीला हा सर्व जादूगाराचा खेळ असल्यचं सांगतो. अचानक एके ठिकाणी अवी व रवीला त्या पाषाणाच्या तीन मूर्ती सापडतात. अवी व रवी त्या मूर्तींजवळ पोचतात. अचानकपणे कुणाच्यातरी भयानक हसण्याचा आवाज अवी व रवीच्या कानावर पडतो. अवी व रवी दचकून पाहतात. एक भलाभक्कम माणूस त्यांच्यासमोर उभा असतो. त्याच्या हातात माणसाची कवटी व हाड असते. जसे एखाद्या मांत्रिक बाबाच्या हातात असावे तसे. अवी व रवी समजतात, की ती व्यक्तीच जादूगार आहे. जादूगार अतिशय भयानक दिसत असतो. विखारी नजरेने तो अवी व रवीला रोखून पाहतो. आजूबाजूचा अंधार अधिकच गडद होत जातो. अचानक कुबट वास संपूर्ण गुहेत पसरतो. रवी सावधपणे आपल्या मंत्रांच्या पुस्तकातील मंत्र उच्चारतो. अचानक तो वास येणं बंद होतं. जादूगार दचकतो. त्याच्यापेक्षाही कुणीतरी मोठा जादूगार असल्याचा त्याला भास होतो. रवीकडे तो रोखून पाहतो. रवी व त्या जादूगारामध्ये विलक्षण अशा जादुई युद्धाला सुरवात होते. दोघंही आपल्याकडील पूर्ण शक्ती पणाला लावतात. रवी जादूगाराच्या शक्तीसमोर हतबल होतो. रवीचं मंत्रांचं पुस्तक त्याच्या हातातून दूर जाऊन पडतं.

जादूगार बऱ्याच जादुई विद्या जाणणारा असतो. तो रवीकडे नजर फिरवणार इतक्यात अवी एक आव आणतो. तो जादूगाराच्या पायावर

लोटांगण घालतो. जादूगाराला काहीच उमजत नाही. अवीने शरणागती पत्कारली, असं वाटून तो अवीला सांगायला सुरवात करतो, की अवीच्या आयुष्यात आतापर्यंत घडलेल्या सर्व वाईट घटना त्याच्याच जादूमुळे घडल्या आहेत. अवी निश्चल असतो. एरवी जादूवर विश्वास न ठेवणारा अवी या वेळी मात्र जादूगाराच्या बोलण्यावर विश्वास ठेवतो. अवी हळूच रवीला खुणावत असतो. जादूगार मोठ्यानं हसतो. हीच संधी साधून रवी धावत जाऊन मंत्रांचं पुस्तक उचलतो. जादूगार सावध होण्याआधीच तो त्या पुस्तकातील अखेरचा व सर्वांत भयानक असा विनाशक कालमंत्र उच्चारतो. मंत्राच्या उच्चाराबरोबर संपूर्ण गुहा हलू लागते. सर्व गुहा कोसळायला सुरवात होते. जादूगाराची ताकद या वेळी मात्र क्षीण पडते. तो जमिनीवर पडतो. त्याची सर्व शक्ती ही बाहेरच्या मूर्तीच्या डोळ्यांत जाते. रवी देवाचे नाव घेऊन त्या मूर्तीच्या छातीत त्रिशूल खुपसतो. जादूगार पूर्णपणे एक सामान्य माणूस बनतो. तो अजून जिवंत असतो. अवी व रवी धावत जादूगाराजवळ जाऊन उभे राहतात. तो आपली कहाणी सांगायला सुरुवात करतो. त्याचे नाव राका असते. तो त्या गुहेत जादूविद्या व तंत्रविद्या यांचा अभ्यास करत असतो. जादुई विद्येत तो खूप प्रवीण झाला होता. आपल्या जादूमुळे त्याला विलक्षण असं नाव प्राप्त झालं होतं. लोक खूप दूरवरून त्याच्याकडे येत असत.तो कमी किमतीत त्यांची कामं करून देत असे. त्याच्याजवळ अशी एक विलक्षण शक्ती होती, ज्याद्वारा तो बसल्या जागेवरून कुठंही जादू घडवून आणू शकत असे. एके दिवशी त्याच्या गुहेत असा एक माणूस येतो, जो त्याला अवी व निशाला घाबरवून सोडायला सांगतो. जादूगाराकरवी त्या माणसाला एका माणसाचा काटा काढायचा असतो. अवीला जादूगार जे नाव सांगतो ते ऐकून तर अवीच्या तळपायाची आग मस्तकात जाते. जादूगाराने खून केलेला माणूस दुसरा तिसरा कुणीही नसतो तर प्रत्यक्षात अवीचे वडील असतात. जादूगारानं त्यांना मारून एवढी वर्षं अवीच्या घराबाहेर टांगून ठेवलेलं असतं. अवीला जादूगाराचा भयंकर संताप येतो. रवी अवीला समजावतो की, जादूगाराला त्याच्या करणीची शिक्षा मिळाली आहे. जादूगार पुढे काही बोलायच्या आतच जादूगाराचा मृत्यू होतो.

अवी व रवी हतबलतेनं बसून राहतात. खरंतर जादूगाराच्या मृत्यूनं एका भयाण पर्वाचा अंत झालेला असतो. अवी व रवीला आता खऱ्या सूत्रधाराचा तपास लावायचा असतो. सूत्रधारानं जादूगारालाच हाताशी का घेतलं याचाही छडा त्यांना लावायचा होता. अवी व रवी तसेच घरी परततात. घरी निशा एका अनोळखी माणसाबरोबर बोलत बसलेली अवी व रवीला दिसते. अवी व रवीनं त्या माणसाला प्रथम कधीच पाहिलेलं नसतं. ते त्या माणसाला विचारायला सुरवात करतात. त्यांना समजतं, की तो माणूस अवीचा खंड्याळाचा भावोजी आहे. अवीला आश्चर्य वाटतं. बाबांनी कधीही या माणसाचा उल्लेख आपल्या बोलण्यातून केला नव्हता. त्याला मोठा प्रश्न पडतो. तो त्या माणसाकडे पाहतो. त्या माणसाच्या डोळ्यांत त्याला खुनशीपणाची लकेर दिसते. अवीला राहून राहून वाटतं, की ती व्यक्तीच खरा गुन्हेगार असेल. निशाच्या आग्रहाखातर मात्र त्याला त्या माणसाला आपल्या घरी ठेवावं लागलं होतं. अवीला तरीही शंका वाटत होती. रवीनं त्याची समजूत काढून त्याला गप्प बसवलं.

खूप दिवसांनी अवी व निशा खूश होते. मागच्या सर्व आठवणी विसरून जाऊन त्यांना उरलेलं आयुष्य व्यतीत करायचं होतं. एके दिवशी सर्व जण सहलीला जातात. सहलीला ते दिवसभर खूप मौजमजा करतात. संध्याकाळी जेव्हा ते घरी परततात, तेव्हा त्यांना एक माणूस त्यांच्या घरातून वेगानं बाहेर पडताना दिसतो. अवी व रवी त्याला पकडायचा प्रयत्न करतात; परंतु तो सापडत नाही. ते शेजाऱ्यांकडे चौकशी करतात. घरातल्या वस्तू जशाच्या तशा असतात. अवी व रवीला काहीच उमजत नाही. पोलिसांना फोन लावून ते सर्व माहिती देतात. पोलीस आता बरेच सावध झालेले असतात. अवीच्या घरी सशस्त्र पोलीस पाळतीवर ठेवले जातात. अवी व रवी रात्रभर घरात शिरलेल्या त्या व्यक्तीचा विचार करत असतात. विचार करता करता ते झोपी जातात.

रात्रीचे बाराचे ठोके पडतात. अचानक घराच्या मागच्या बाजूचा दरवाजा उघडतो. कुणीतरी बाहेर जात असल्याचा आवाज येत असतो. अवीला जाग येते. तो रवीला उठवतो. अवी व रवी शोध घेऊ लागतात. शोधता शोधता ते गच्चीवर पोचतात. गच्चीवर त्यांना एका माणसाची सावली दिसते. अवी व रवी सावलीचा माग काढतात. धावत जाऊन ते त्या माणसाला पकडतात. अवी व रवी पाहतात,की तो माणूस काल आलेला अवीचा भावोजीच होता. अवी व रवीला तो माणूस एवढ्या रात्री गच्चीवर काय करत होता, तेच कळत नव्हतं. अवी व रवी ताबडतोब पोलिसांना फोन करून सर्व घटना सांगतात. पोलिस येऊन त्या माणसाला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात घेऊन जातात. अवी व रवी पुन्हा येऊन आपल्या जागी झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच अवी व रवी पोलीस ठाण्यात जातात. पोलिसांच्या सांगण्यानं ते अवाक होतात. काल रात्री त्यांनी पकडलेला तो भावोजी हा अवीचा खरोखरीचा भावोजी असतो. खूप दिवसांनी भेट झाली नाही म्हणून तो मुद्दाम अवीकडे आला होता. अवीच्या त्या भावोजीला झोपेत चालायची सवय होती. अवी व रवी पुन्हा चिंतेत पडतात. संशयाने पुन्हा अवी व रवीला ग्रासलं होतं. अवी व रवीला त्या दिवशी त्यांच्या घराजवळून जाणारी प्रत्येक व्यक्ती संशयास्पद वाटत होती. जो तो अवी व रवीकडे संशयाच्या नजरेने पाहत होता. अचानक एखाद्या गाडीतून तो खरा गुन्हेगार येऊन आपल्याला गोळी घालेल तर... या विचारानंच अवी एकदम हैराण झाला होता. संकटाला धैर्यानं तोंड द्यायचं असं ठरवून, तो मार्गक्रमण करत होता. जादूगाराच्या मृत्यूनं त्याच्या एका सत्याचा जय झाला होता की, जगात भूतप्रेत किंवा तसा काही प्रकार नसतो. खरंतर एखादा माणूसच सर्व करीत असतो. अवी या विश्वासावर होता की केव्हा ना केव्हा तो खरा अपराधी त्यांच्या ताब्यात येईलच.

अवीची काहीच खबरबात नाही म्हणून अवीचा मामा त्यांच्याकडे राहायला आला होता. निशा तर एकदम आनंदून गेली होती. खूप दिवसांनी घरात पै-पाहुण्यांचे आगमन झालं होतं. निशाचं हळवं मन आदरातिथ्य करायला उतावीळ होतं. अवीला आपल्या मामावर पूर्ण विश्वास होता; कारण काकांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी मामानंच त्याला बरीच मदत केली होती. अवी व रवी घरावर लक्ष ठेवूनच होते. बरेच दिवस काहीच घडलं नाही. अवी व रवीला पुन्हा चिंता वाटू लागली. एके रात्री अवी व रवी गच्चीवर गप्पा मारत बसले होते. अचानक मागच्या बाजूनं दरवाजा उघडल्याचा आवाज आला. कदाचित निशा असेल म्हणून

ते गप्प बसले; परंतु काही वेळानं घरात काहीतरी फुटल्याचा आवाज आला. अवी व रवी निशाला साद घालत खाली धावले. अवी व रवीनं पाहिलं, की मागच्या खोलीचा दरवाजा उघडला होता. अचानक अवी व रवीला कुणाचीतरी सावली झळकल्याचा भास झाला. ते धावतच बाहेर आले, तोपर्यंत ती व्यक्ती नाहीशी झाली होती. निशाही तोपर्यंत बाहेर आली होती. निशाला पाहून अवीच्या जिवात जीव आला. सर्व जण पुन्हा गच्चीवर बसले. गप्पा ऐन रंगात आल्या असताना सुमारे साडेअकराच्या सुमारास गच्चीच्या खालच्या बाजूला असलेल्या झाडीत काहीतरी सळसळल्याचा आवाज आला. अवी व रवीनं उठून पाहिलं, तिथे काहीच नव्हतं. आपल्याला भास झाला असेल या विचारानं ते परत आपल्या जागेवर बसले. काही वेळानं हळुवार पावले टाकून एक व्यक्ती त्या झाडीत लपून बसते. झाडीमागून ती अवीच्या डोक्याचा नेम घेत असते. अवी बरोबर निशाण्यामध्ये आल्यावर ती व्यक्ती अवीवर गोळी झाडते. सुदैवाने अवी खाली वाकतो, त्यामुळे गोळी अवीला चाटून जाते. गोळीचा आवाज ऐकताक्षणीच अवी व रवी खाली धावत आले. झाडीतून एक व्यक्ती वेगानं पळत असल्याचं अवी व रवीला दिसतं. अवी व रवी पाठलाग करून त्या व्यक्तीला पकडतात. निशा तोवर पोलिसांना फोन लावते. पोलीस तेथवर पोचलेले असतात. पोलीस पळत येऊन त्या व्यक्तीला आपल्या ताब्यात घेतात. त्या व्यक्तीच्या हातात एक मोठी रायफल असते. पोलिसांना त्याच्याकडे एक मायक्रो कॅमेराही सापडतो. अचानक गाडीतून येऊन एक व्यक्ती त्या व्यक्तीवर गोळीबार करते. पोलीस सावध होतात. पटकन ते आपल्या गाडीत जाऊन गाडी सुरू करतात. अवी व रवी निशाबरोबर दुसऱ्या गाडीनं पोलिसांच्या मागोमाग येतात. आज त्यांना त्या खऱ्या गुन्हेगाराचा छडा लावायचाच असतो. पोलीस आपली जीप भरधाव नेत असतात. एके ठिकाणी ती गाडी थांबलेली दिसते. पोलीस आपल्या गाडीतून उतरून त्या ठिकाणी सावधपणे शोध घेतात. अवी, रवी व निशाही आपल्या गाडीतून उतरतात. अचानक गाडी सुरू झाल्याचा आवाज येतो. पोलीस, तसेच अवी, रवी व निशा दचकतात. त्वरित जाऊन ते सर्व आपापल्या गाडीत बसतात. ज्या दिशेनं गाडी गेली त्या दिशेला पोलिसांची गाडी जात असते. अचानक मध्येच एका ठिकाणी त्यांना ती गाडी थांबलेली दिसते. सर्व जण हळूच उतरून त्या गाडीकडे जाऊन शोध घेऊ लागतात. पोलीस जवळच्या ठिकाणी शोध घेत असतात. अचानक पोलिसांची नजर एका बंदिस्त घरावर पडते. पोलीस त्या घराजवळ पोचतात. अथक प्रयत्नांनी त्या घराचं कुलूप तोडतात. पोलीस त्या घरात शोध घ्यायला सुरवात करतात. घरात काहीतरी कुजल्याचा अतिशय कुबट वास येत असतो. पोलीस सर्वत्र शोध घेतात. अचानक त्यांची नजर किचनकडे वळते. पोलीस आत जातात. विजेरीच्या साहाय्यानं तिथे शोध घेतला असता पोलिसांना तिथे छिन्नविच्छिन्न अवस्थेत एका माणसाचं प्रेत सापडतं. अतिशय कुबट व घाणेरडा असा वास संपूर्ण खोलीत पसरलेला असतो. पोलीस तो मृतदेह ताब्यात घेतात. आजूबाजूला अधिक तपास करता त्यांना जवळच्या टेबलावर एक चिठ्ठी ठेवलेली आढळते, ज्यात तांबड्या शाईनं लिहिलेलं असतं, 'माझं अर्धं काम फत्ते झालं. आता फक्त उरलेलं काम व्हायचं आहे.' पोलीस सावध होतात आणि सर्वत्र शोध घेऊ लागतात. पोलिसांनी मघाशी मिळालेला तो मायक्रो कॅमेरा पाहिलेला असतो, ज्यात त्यांनी एका माणसाला खून करताना पाहिलेलं असतं. कॅमेऱ्यात तो माणूस दुसऱ्या व्यक्तीला ठार करून त्याचं रक्त चाटत होता. ते पाहून अवी व निशा यांच्या मनात भीती निर्माण होते. पोलिसांनी या खुनाकरता त्या वेळी एका माणसाला अटक केलेली असते, मात्र कोर्टानं त्याला वेडा ठरवलेलं असतं.

पोलीस त्या ठिकाणी पुन्हा कसून शोध घेतात. अचानक अंधारात निशाचा हात अवीच्या हातातून सुटतो. निशा इकडेतिकडे रेंगाळत राहते. एवढ्यात अचानकपणे तो खुनी निशाच्या पाठीमागे येऊन उभा राहतो. निशा मागं वळून पाहते. तिच्या तोंडातून जोराची किंकाळी बाहेर पडते. अवी व रवी पोलिसांबरोबर त्या ठिकाणी धावत जातात. पोलीस त्या माणसाभोवती कडं करून उभे राहतात. निशा अवीला कवटाळून उभी राहते. आज अवी व रवीला त्या खऱ्या गुन्हेगाराचा चेहरा समजणार असतो. पोलीस सावधपणे त्या खुन्याच्या तोंडावरचा बुरखा बाजूला करतात. खुन्याचा चेहरा सर्वांच्या समोर येतो. अवी व रवी तो चेहरा पाहून हादरतात. निशाही जवळ जवळ बेशुद्ध होण्याच्या मार्गावर असते. अवी व रवीच्या समोर उभी असलेली ती व्यक्ती दुसरी तिसरी कुणीही नसते, तर खुद्द अवीचे काकाच असतात. अवीचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही. अवी प्रश्नांकित मुद्रेनं काकाकडे पाहतो. पोलिसांनी धमकावल्यावर काकाच त्यांना स्वतःची कहाणी सांगायला सुरुवात करतात.

काकाचं खरं नाव श्रीपाद शंकर त्रिपाठी. काकानं पाच वर्षांपूर्वी पैसे मिळवण्यासाठी स्वतःचा एक पाच जणांचा क्लब बनवला होता. काका या क्लबद्वारा बनावट रिअल इस्टेट एजंट बनून लोकांना फसवत असे. त्यांच्याकडून पैसे उकळत असे. काकाचा हा धंदा सर्रास चालला होता. बनावट कागदपत्रे अगदी हुबेहूब बनवण्यात तो तरबेज होता. पोलिसांना काही केल्या तो सापडत नव्हता. एके दिवशी मात्र सापळा रचून पोलीस काकाच्या साथीदारांना पकडतात. पोलिसांच्या तावडीतून मात्र काका व त्याचा जवळचा एक मित्र- ज्याला त्यानं मारून टाकलं तो- पळून जाण्यात यशस्वी होतात. पोलिसांपासून सुटका करण्यासाठी ते एका गुप्त ठिकाणी लपून बसतात. काकांनी आपला वेश पालटलेला असतो. आपली ओळखही लपवलेली असते. काका ज्या ठिकाणी लपलेला असतो, त्याच्यापासून जवळच एक आलिशान बंगला असतो. काकाच्या मनाला त्या बंगल्याची भुरळ पडलेली असते. बंगला कसा हस्तगत करावा याचे तो मनसुबे आखत असतो. बंगल्यावर काकाचे येणे-जाणे सुरू होते. काका सुरवातीला एक स्वंयपाकी म्हणून त्या बंगल्यावर राहायला येतो. बंगल्यावर काकाची ओळख अवंतिकाशी होते. अवंतिका अवीच्या वडिलांनी मानलेली मुलगी असते. सख्ख्या मुलीपेक्षाही अवीच्या वडिलांनी अवंतिकावर प्रेम केलं होतं. अवंतिका अवीच्या वडिलांनाही तेवढाच मान देत असे. काका मात्र हळूहळू अवंतिकाला आपल्या जाळ्यात ओढून घेतो. लग्नाचं आमिष दाखवून तो तिचा मनसोक्त उपयोग करून घेत असतो. अवीच्या वडिलांना मात्र एक दिवस काकाचं खरं रूप समजलेलं असतं. अवीचे वडील पोलिसांना फोन करायला जाण्यापूर्वीच काका गुपचूप त्यांचा खेळ संपवतो. कालांतराने

अवंतिकालाही काकाचं खरं रूप समजलेलं असतं. अवंतिका ते दाखवत नाही; मात्र ती त्या दिवसापासून काकापासून दूर जात असते. काकाचं खरोखरच अवंतिकावर प्रेम जडलेलं असतं, त्यामुळे त्याला अवंतिकाला सोडायचं नसतं. काका तिला ओढत लग्नमंडपात घेऊन गेलेला असतो. अवंतिका काकाला झिडकारते, याचा काकाला राग आलेला असतो. संतापाच्या भरात काका अवंतिकालाही ठार करून टाकतो. काही वेळानं अवंतिकाला आपणच संपवल्याचं लक्षात येताच तो वेडापिसा होतो. अवंतिकाला उचलून तो तिला त्या बंगल्याच्या तळघरात पुरून टाकतो. काकानं त्या ठिकाणी पुरलेला खजिना पाहिलेला असतो. काकाला तो खजिना हस्तगत करायचा असतो; मात्र त्या अगोदर काकाला पोलिसांची चाहूल लागते. काका छुप्या रस्त्यानं त्या बंगल्यातून बाहेर पडतो. काकाला आता तो बंगला मिळवायचा असतो. काका व त्याचा मित्र जर्मनीमध्ये पळून जातात. काका त्या ठिकाणी राहून असं एक उपकरण तयार करतो, ज्याद्वारा कुणालाही कधीही बसल्या जागेवरून निशाणा बनवणं शक्य होतं. एके दिवशी काकाला समजतं की, अवी खूप दिवसांनी आपल्या पत्नीसमवेत त्या बंगल्यात राहायला येणार आहे. काकाला हीच संधी योग्य आहे, असं वाटतं. काका व त्याचा मित्र भारतात येतात. काका आपल्या मित्राचाही भारतात पोचल्यावर खून करतो. कुणालाही थांगपत्ता लागू न देता काका ते खुनी उपकरण अवीच्या बंगल्यात एका भिंतीत पुरून ठेवतो. काकाला समजतं की, जवळच्या जंगलात एक अतिशय प्रसिद्ध जादूगार आलेला आहे. काकाला एक कल्पना सुचते. जादूगाराच्या बळाचा वापर करून त्याला अवी व निशाला घाबरवायचे असते. काका हा विचार करतो की, जादूमुळे घडत असणाऱ्या घटनांना अवी भुताटकी समजेल व तो बंगला सोडून तेथून निघून जाईल किंवा अवी व निशा भीतीमुळे ठार होतील व पोलिसांचा आपल्यावर संशय राहणार नाही. जादूगार आपले काम ठीकठाक करीत असतो. जिथं जिथं अवी जाई, जादूगार तिथे पोचत असे. आपल्या मंत्राच्या शक्तीने व त्या खुनी उपकरणाने तो अवी व निशाला घाबरवायचं काम करत होता. एकदोनदा काकानं त्या खुनी उपकरणाद्वारा अवीवर हल्लाही केला होता. अवी व निशानं रवीला सोबत घेऊन धैर्यानं या सर्व परिस्थितीचा सामना केलेला होता. काकाचा चेहरा त्यांनी सर्वांसमोर आणला होता.

काका आपली कहाणी सांगून पूर्ण करतो, तसं पोलीस त्याला पकडून घेऊन जातात. काकाच्या मनात मात्र वेगळेच विचार सुरू असतात. त्याला तो बंगला आपल्या हातातून घालवायचा नसतो. अचानक तो निशाला पकडतो. निशाच्या डोक्याला गन लावून तो पुढे जात राहतो. पोलिसांचीही एक योजना असते. काका निशाला घेऊन एका निर्जन ठिकाणी येतो, ज्या ठिकाणी पोलिसांनी ते खुनी घड्याळ लावून ठेवलेलं असतं. काका बरोबर त्या घड्याळाच्या कक्षेत येतो. अचानक एक गोळी सुटून काकाच्या डोक्याचा नेम घेते. निशाच्या मानेवरची काकाची पकड सैल होते. काका जोराने किंचाळतो व जमिनीवर पडतो. अवी व पोलीस धावत जाऊन पाहतात. पोलीस बंदुका रोखून पाहतात. काका तिथेच ठार झालेला असतो. अखेर एक शिकारी आपल्याच जाळ्यात फसलेला असतो. अवीच्या धैर्याचा व निशाच्या प्रेमाचा विजय झालेला असतो.

अवी व निशाला झाल्या गोष्टी विसरायच्या असतात. मधल्या काळात त्यांनी खूप सहन केलेलं असतं. अवी व निशाला आता एकमेकांचा आधार असतो. अवी व निशाला आता जगायच असतं फक्त एकमेकांसाठी.

ssameervengurlekar@gmail.com

❖

नवं कोरं

संसार आणि संन्यासाच्या संभ्रमात अडकलेल्या गौतमच्या आत्मशोधाचा लक्षणीय प्रवास...

कालपुरुष

लेखक : दिनकर जोषी । **अनुवाद :** सुषमा शाळिग्राम

पृष्ठसंख्या : १६० । किंमत : १८०/- Book Available

मेहता पब्लिशिंग हाऊसची रहस्यमय पुस्तके

रत्नाकर मतकरी

अॅडम
स्वप्नातील चांदणे
खेकडा
फाशी बखळ
निजधाम
एक दिवा विझताना
संभ्रमाच्या लाटा
कबंध
निर्मनुष्य
मध्यरात्रीचे पडघम
संदेह
मृत्युंजयी
रंगांधळा

शुभदा गोगटे

घर

जयश्री कुलकर्णी

विषवल्ली
मांजराची सावली

स्नेहल जोशी

प्लँचेट

मायकेल क्रायटन

स्टेट ऑफ फिअर : डॉ. प्रमोद जोगळेकर
पायरेट लॅटिट्यूड्स : डॉ. प्रमोद जोगळेकर

मारिओ पुझो

ओमेर्ता : अनिल काळे

ॲलिस्टर मॅक्लीन

द गोल्डन रॉन्देव्हू : अशोक पाध्ये
द लास्ट फ्रन्टियर : अशोक पाध्ये
द गन्स ऑफ नॅव्हरॉन : अशोक पाध्ये

जॉन ग्रिशॅम

द पेलिकन ब्रीफ : रवींद्र गुर्जर
द क्लायंट : माधव कर्वे
द टेस्टामेंट : विश्वनाथ केळकर
द रेनमेकर : अनिल काळे
द रनअवे ज्यूरी : अनिल काळे
द फर्म : अनिल काळे
द असोशिएट : अशोक पाथरकर
द लास्ट ज्यूरर : विभाकर शेंडे
द चेम्बर : विश्वनाथ केळकर
द स्ट्रीट लॉयर : शीला कारखानीस
द पार्टनर : विभाकर शेंडे
अ टाइम टू किल : बाळ भागवत

आयर्विंग वॅलेस

सेकंड लेडी : रवींद्र गुर्जर
द सेव्हन्थ सिक्रेट : विजय देवधर
द गेस्ट ऑफ ऑनर : लीना सोहोनी
द मिरॅकल : जयवंत चुनेकर

डॅन ब्राऊन

द दा विंची कोड : अजित ठाकूर
एन्जल्स ॲण्ड डेमन्स : बाळ भागवत
डिसेप्शन पॉईंट : अशोक पाध्ये
डिजिटल फॉर्ट्रेस : अशोक पाध्ये
द लॉस्ट सिम्बॉल : अशोक पाध्ये
इन्फर्नो : अशोक पाध्ये

रॉबिन कुक

कोमा : रवींद्र गुर्जर
टॉक्सिन :डॉ. प्रमोद जोगळेकर
कन्टेजन : डॉ. प्रमोद जोगळेकर
सीज्र : डॉ. प्रमोद जोगळेकर
क्रायसिस : डॉ. प्रमोद जोगळेकर
क्रिटिकल : डॉ. प्रमोद जोगळेकर
मार्कर : अनिल काळे
क्रोमोझोम ६ : वैशाली जोशी

जेफ्री आर्चर

नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस : अंजनी नरवणे
सन्स ऑफ फॉर्च्यून : अजित ठाकूर
फॉल्स इम्प्रेशन : सुधाकर लवाटे
पाथ्स ऑफ ग्लॉरी : सुभाष जोशी
अ प्रिझनर ऑफ बर्थ : लीना सोहोनी
केन अँड एबल : लीना सोहोनी
ओन्ली टाइम विल टेल : लीना सोहोनी
द सिन्स ऑफ द फादर : लीना सोहोनी
बेस्ट केप्ट सिक्रेट : लीना सोहोनी
बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर : लीना सोहोनी
कॅट ओ' नाइन टेल्स : लीना सोहोनी
टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट : लीना सोहोनी
ॲण्ड देअरबाय हँग्ज अ टेल : डॉ. देवदत्त केतकर

फ्रेडरिक फॉर्सिथ

द अफगाण : बाळ भागवत
नो कम बॅक्स : विजय देवधर

ली चाइल्ड

वन शॉट : बाळ भागवत
नथिंग टू लूज : उदय कुलकर्णी

कोडी मॅकफॅदियेन

शॅडो मॅन : उदय भिडे
द फेस ऑफ डेथ : अमोल कपोले
द डार्कर साइड : प्रकाश जोशी

❖

गिनिपिग व बुद्धाचा चेहरा

श्रीकांत पवार



बुद्धाच्या चेहऱ्यावरील शांतता किती गूढ असते! आपण भौतिक सुख मिळवलं, तरी बुद्धाच्या चेहऱ्यावर असणारी तृप्ती आपल्या चेहऱ्यावर कधीच दिसली नाही किंवा जाणवली नाही याची खंत डॉ. अहर्निश यांना सतत जाणवत होती. कॉपी-पेस्ट करण्याएवढे शांततेचे भाव चेहऱ्यावर चिकटविणे सोपे नसते. खूप दिवसापासून दूरवरचा प्रवास करावा, असं मनात येत होतं. अशाच पद्धतीचा शांतीचा शोध घ्यावा, असं त्यांनी ठरवलं होतं.

डॉ. अहर्निश यांनी त्यासाठी गूगलवर सर्च करायला सुरवात केली. एक लिंक दिसत होती. वेबसाईटवर लिहिलं होतं... सहलीचे सुवर्णक्षण फक्त आमच्यासोबत...! कोकणातील त्या रम्य स्थळाचं वर्णन वाचूनच त्यांनी बुकिंग करायचं ठरवलं.



वेबसाईटवरील फोन नंबरवर फोन लागला एकदाचा...! आवाजातील चढ-उतारावरून समोरची व्यक्ती खूप फास्ट बोलत होती. त्याच्या माहितीवरून कोकणातील एका रम्य अशा गावात त्यांनी पिकनिक स्पॉट निर्माण केला होता. लॉकरूम डेस्टिनेशन हे त्या स्पॉटचं नाव होतं. कुणीही सोम्यागोम्या त्या ठिकाणी जाऊ शकत नव्हता, तर त्यासाठी मेंबर्सचा पास मिळवणं आवश्यक होतं. त्या वेबसाईटवर व्यक्तीचं नाव व व्यवसाय निवडलं की एका प्रश्नाचा पर्याय देण्यात आला होता. संगणकावर प्रश्न विचारण्यात आला होता. फीट येऊ नये यासाठी काय उपाय आहे? डॉक्टरांनी भरभर टाईप केलं. चांगलं औषध व डॉक्टर किती आवश्यक आहे हे त्यांनी चांगल्या पद्धतीनं मांडलं. स्वतःच्या हुशारीचं त्यांना कौतुक वाटू लागलं. काही सेकंदांतच मेंबर्सचा लॉग इन पासवर्ड दिसू लागला.

लॉकरूम डेस्टिनेशन हे ठिकाण फक्त खास लोकांसाठीच होतं. घरात आठ दिवस राहता येणार होतं. राहण्यासाठी उत्तम सुविधा होत्या. घराशेजारीच असणाऱ्या तलावात मासे पकडणं व संध्याकाळी चांदण्यात फिरता येणं शक्य होणार होतं. घराचा आकार एका विशाल मगरीच्या जबड्यासारखा होता. घरात गेल्यावर त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यासाठी खास महिला होत्या. त्या घरात आल्यापासून त्यांना फ्रेश वाटू लागलं. रोजचे तेच आणि तेच ते आयुष्य जगणं कंटाळवाणं होऊ लागलं, की माणूस नकळत अद्‌भुत आणि रहस्यमय प्रसंगाची वाट पाहू लागतो.

निसर्ग पर्यटनात एक बरं असतं. सतत माणसाला वाकुल्या दाखविणाऱ्या व त्याच्या क्षुद्रत्वाची जाणीव करून देणाऱ्या उंच इमारती नसतात. तसंच माणसाला रुक्ष व निष्काळजी करणारी मशिन्सही नसतात. अन्यथा एरवी मशिनमय झालेल्या माणसाला जिवंत, रसरशीत व तजेलदार निसर्ग एवढा भावला नसता. हिरवागार निसर्ग व गार वाऱ्याची मंद झुळूक म्हणजे चित्रपटातील अभिनेता अभिनेत्रीला राजी करण्यासाठी गाणंच म्हणत आहे, असंच त्यांच्या मनाला क्षणभर वाटलं.

सकाळचे सात वाजले होते. थंड वाऱ्याची झुळूक अंगावर घेत कधी त्या उबदार मखमली बिछान्यात झोप लागली, हे समजलंही नव्हतं. सकाळच्या वेळी एक मुलगा चहा घेऊन आला. शाल पांघरून आलेल्या त्या मुलाचं सर्व शरीर झाकलेलं होतं. अंथरुणात बेड-टी घेण्याची सवय नव्हती; परंतु आजचा दिवस आपण बेड-टी घेतला, तर काय हरकत आहे, म्हणून त्यांनी चहा घेतला.

त्या मुलाच्या चेहऱ्यावरील काळसरपणा कुठे पाहिला होता? मॉडर्न चित्रातील काळसरपणा तो खचितच नव्हता. स्मृतिकप्प्यातून जुन्या डायरीतील पानं पलटावीत तशी एक एक आठवण उलगडू लागली. उलगडताना तो दिवस डोळ्यांसमोरून एखाद्या चित्रपटाप्रमाणे जाऊ लागला. एका बहुराष्ट्रीय कंपनीचा एमआर नुकताच येऊन गेला. १५ मार्चचा तो दिवस! फीट्सवर त्यांचं नवं उत्पादन बाजारात येणार होतं. त्यासाठी प्रयोग करावे लागणारे गिनिपिग हवे होते त्याला. त्यासाठी लाखभर रुपये डॉक्टरला मिळणार होते. रग्गड पैसा कमवण्यासाठी चांगलीच संधी मिळाली होती.

दुसऱ्याच दिवशी खेडेगावातून एक २२ वर्षांचा मुलगा उपचारासाठी आला होता. फीट आली होती त्याला. मुलगा बेशुद्ध झाला होता. 'डॉक्टर साहेब, काय पण करा; पण पोराला एकदाचं बरं करा. सारखं झटकं येत्यात.' डॉक्टरनं तपासायला सुरुवात केली, तसे त्यांच्या डोक्यात कालच्या एमआरच्या भेटीचे विचार तरळू लागले. त्या मुलाला शुद्ध येताच त्यांनी त्या कंपनीचं औषध दिलं. मुलाचं शरीर काही दिवसांनी काळंठिक्कर पडलं. त्याची वाचा गेली. त्याचं शरीर संतुलनच ढासळलं. त्याचे बिच्चारे वडील नशिबालाच दोष देत राहिले. त्या चहा घेऊन आलेल्या मुलाच्या शरीरावरील काळसरपणा थेट त्या आजारी पडलेल्या मुलासारखाच जाणवू लागला होता. त्याच्या चेहऱ्यावर नीरव शांतता होती.

तो सुमंत होता. सुमंत हुशार व कष्टाळू होता. परिस्थितीमुळे शिक्षण घेणं शक्य झालं नाही. वयाची विशी उलटूनही केवळ फीट्सवर उपचार करणं शक्य नसल्यामुळे सुमंत शेतात राबत होता.

पुण्या-मुंबईत उपचार करण्याएवढा पैसा कमवणं शक्य होतं; पण कधी कधी येणाऱ्या फीट्समुळे त्याची माय त्याला शहरात काम करायला सोडत नव्हती. न जाणो काम करताना फीट आली आणि कुणीच लक्ष दिलं नाही तर अनर्थ ओढवायचा.

परंतु सुमंतच्या वडिलांचं मत याउलट होतं. शहरात याच वयात त्यानं काम केलं तर चांगलीच लिंक लागेल. नवीन चार गोष्टी शिकता येतील. पाऊस-पाण्यावर शेती अवलंबून असल्यानं सगळं आयुष्य शेतीच्या जिवावर जगणं शक्यच नव्हतं. काम केल्याशिवाय आपलं पोट भरणार आहे का? काम करतच मरायचं आणि जगण्यासाठी लढाई करायची... तुझ्या फीट्सवर उपचार करू आणि लवकरच तुला बरं करू... उपचार केल्यानंतर काही दिवसांत सुमंत पुण्यात काम करण्यासाठी गेला; परंतु काही दिवसांतच अहर्निशच्या औषधांचा साईड इफेक्ट सुरू झाला आणि आयुष्यावरच कुऱ्हाड कोसळली. सुमंतच्या वडिलांनी त्याला दवाखान्यात आणल्यानंतर सगळं संपलेलं होतं...

अहर्निशला प्रवासाचा तो दिवस आठवू लागला. डॉक्टरनी ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली. प्रवासात तो आज एकटाच निघाला होता. पत्नी रीतालाही सेमिनारला जातोय एवढंच सांगून ट्रीपला निघाला. ओव्हरलोडमुळे कंटेनर उलटला होता. नेहमीप्रमाणे घाटात ट्रॅफिक चांगलंच जाम झालं होतं. अहर्निश जाम वैतागला होता. ड्रायव्हरनं कसा तरी मार्ग काढीत गाडी ट्रॅफिकमधून बाहेर काढली. गाडीतून जात असताना काचेतून त्यानं मान बाहेर काढून पाहिलं. रस्त्यावर एका तरुणाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. सुरुवातीला प्रॅक्टिस करताना अपघातात जखमी झालेले रुग्ण पाहिले, की त्यांच्या जखमा व रक्त पाहूनच त्याला मनात चिंता व भय नाहीसे झाले. तरीही घाटातील तरुणाचा चेहरा त्याच्या डोळ्यांसमोरून जाईनासा झाला.

''किती निष्काळजीपणे गाडी चालवतात. यांना रस्त्यावर गाडी चालविण्यासाठी परवाना कोण देतं?'' अहर्निश रागानं ड्रायव्हरकडे पाहत म्हणाला.

ड्रायव्हर सहजपणे म्हणाला, ''साहेब, जाऊ द्या. मरण यायचं असलं म्हणजे माणूस कसातरी ओढला जातो.''

त्याचं हे वाक्य अहर्निशच्या मस्तकात शिरलं. मृत्यू हा अज्ञात प्रदेश आहे. तो कोणालाच माहीत नसतो; पण तरीही प्रवेश करावा लागतो. 'अज्ञात प्रदेश वगैरे काही नसतं,' असं अहर्निश स्वतःशीच म्हणाला.

''गाडी शिस्तीनं, सावकाश चालव. कोणाला उगाच कुत्र्या-मांजरासारखं मरण येणार नाहीं,'' अहर्निश काहीसा रागाने म्हणाला.

''होय सर, चालवतो गाडी सावकाशपणे.''

पावसाच्या सरी चालू झाल्या... बाहेर गडद अंधार... वायपरच्या आवाजानं शांततेचा भंग होत होता... अहर्निशच्या मनात आज मृत्यूबाबतचे विचार आदळायला लागले. अहर्निशला बालपणीचा प्रसंग आठवू लागला. पोहायला शिकत असताना तो पाण्याच्या तळाशी गेला होता. गारगार पाणी व त्याचा ओढून घेणारा तळ त्यानं अनुभवला. पोहायला शिकवत असताना प्रशिक्षकाला एकाच वेळी तीन-चार विद्यार्थ्यांकडे लक्ष द्यावं लागत होतं. प्रशिक्षकानं गडबडीत अहर्निशकडे थोडं कमी लक्ष दिलं. अहर्निश पाण्यात बुडाला होता. पाण्यात गटांगळ्या खाऊ लागला, तेव्हा स्वीमिंग पूलच्या बाहेर असणाऱ्या लोकांनी ओरडून अहर्निश बुडत असल्याचं सांगितलं. तेव्हा कसंबसं प्रशिक्षकानं पाण्यात सूर मारून बुडणाऱ्या अहर्निशला वाचवलं. नाका-तोंडात पाणी गेल्यानं अहर्निश धापा टाकत होता. श्वास कमी पडू नये म्हणून त्याला कृत्रिम श्वास देण्यात आला.

पुढे महिनाभर डोळे झाकले तर अहर्निशला पाण्याच्या डोहात बुडत आहोत, असा भास होत असे. मरणाच्या दारात जाऊन आलो; पण त्याचं भय मात्र मानगुटीवर बसल्याचं शल्य बोचत होतं. पोहणं शिकल्यानं पाण्याची भीती केव्हाच विरून गेली. एमबीबीएसचं शिक्षण पूर्ण केल्यावर हे भय काहीसं कमी झालं; परंतु रस्त्यावरील अपघात पाहिले की त्याचं मन चर्र होत असे.

पावसाचा जोर ओसरल्यानं वायपरचा होणारा आवाज कमी झाला होता. ड्रायव्हर काळजीनं वाहन चालविताना मंद आवाजात गुणगुणत होता. किशोरकुमारचं जुनं गाणं गुणगुणत असताना त्याच्या आवाजात कमालीचा दुःखी भाव जाणवत होता.

''सर, तुम्हाला एक मनमोकळेपणानं सांगू का?''

''बोल नाथू! मनमोकळेपणानं बोल,'' अहर्निश कॉलरची घडी नीट करत म्हणाला.

''अनेक माणसं शहरात हरवतात, गायब होतात. ती कुठे जात असावीत?'' ड्रायव्हर काहीसा संथ आवाजात म्हणाला.

अहर्निश म्हणाला, ''हीच माणसं भिकारी बनून, तर कधी आजारी पडून, तर कधी वेडी होऊन हिंडत असतात.''

ड्रायव्हर कपाळावर आठ्या चढवत म्हणाला, ''पण काही माणसं कायमचीच गायब होतात. त्यांचा शोध कधीच लागत नाही.''

मध्यरात्रीची वेळ... रात्रीचे बारा वाजले... खिडकीतून बाहेर डॉक्टरांची नजर पाण्याच्या टँकरवर गेली. त्या लोखंडातून एक आकार तयार होऊ लागला. माणसाचा तो आकार होता... ट्रॅकसूट घातलेल्या त्या माणसाचा चेहरा सपाट होता. त्याला नाक, डोळे नव्हते. डॉक्टरांची भीतीनं गाळण उडाली. एक-दोन मिनिटं ती भयंकर व्यक्ती डॉक्टरांकडे टक लावून पाहत होती. छे! तो भास नव्हता! आपण अशा निर्जन ठिकाणी एकटेच राहतोय, या विचारानं त्यांना आणखीनच भीती वाटू लागली. त्यांची झोप आता उडाली होती. मध्यरात्रीची वेळ संपतच नाही, असं वाटू लागलं.

अचानक खोलीच्या बाहेरून किंकाळ्यांचा आवाज येऊ लागला. समोर फेर धरत ते सगळे जीव नाचू लागले. काही जणांच्या चेहऱ्यावर जखमेच्या खुणा होत्या; तर कुणाचे पाय तुटलेले, तर

कुणाचे हात तुटलेले... त्या रक्तबंबाळ झालेल्या जिवांना किंकाळ्या फोडत असताना पाहून अहर्निश थरथर कापू लागला. समोरील जमिनीतून विवर निर्माण झाले होते. त्या विवरातून डोळे लख्ख करणारा प्रकाशझोत येऊ लागला. दोन काळवंडलेले हात जमिनीतून आले होते. अहर्निशला ते रस्त्यावरील अपघातात मरण पावलेले असंख्य मृतात्मे विवराकडे ढकलू लागले. अहर्निश विरोध करू इच्छित होता. तरीही तो मनानं खचला.

त्याला आठवू लागलं. अपघातात जखमी, मरणाच्या दारात आलेल्या पेशंटला उपचार करण्यास त्यानी नकार दिला होता. विवरातून तो खाली डोकावला तेव्हा तिथे हजारो जीव तडफडत होते. ते गिनिपिग होते. विविध कंपन्यांनी केलेल्या प्रयोगामुळे त्यांच्या शरीराला चित्र-विचित्र आकार आलेले होते. ते अहर्निशच्या पायांना विवरामधून ओढत होते. अहर्निश त्या विवरात खेचला गेला... त्याच्या डोळ्यांपुढे अंधार दिसू लागला... मध्येच लख्ख प्रकाशाचा झोत येऊ लागला... हृदय पिळवटून टाकणाऱ्या किंकाळ्या ऐकू येत होत्या... त्या किंकाळ्यांमधून शरीरावरील जखमांच्या वेदनाच शब्द बनून सांडत होत्या... आपण मृत्यूनंतरचं जीवन अनुभवणार या जाणिवेनंच शरीर अधिक जोरात विवरात फेकलं जात होतं...त्याच्या शरीराला असंख्य प्रेतात्मे बोचकारे काढत होते...

अचानक त्याला सगळीकडे सामसूम दिसू लागली. डोळे उघडण्याचा प्रयत्न करूनही डोळे उघडत नव्हते. सगळीकडे अंधारच दिसत होता. तो स्वतःचं शरीर चाचपडू लागला. त्याला आश्चर्याचा धक्का बसला. शरीर अजूनही जागेवरच होतं. तो कॉटवरच होता. त्या रिसॉर्टवरचे लाईट गेल्यानं सर्वत्र अंधार दिसत होता. थोड्याच वेळानं लाईट आले.

भिंतीवरील एक मॉडर्न आर्ट पाहून अहर्निश सुन्न झाला. शांतता असलेल्या बुद्धाच्या मूर्तीभोवती दोन काळवंडलेले हात दिसत होते. विवरात भेटलेल्या असंख्य गिनिपिग्सच्या आठवणी दिसू लागल्या. काही वेळेस सत्य कल्पनेहून भयंकर असतं. स्वार्थासाठी केलेल्या व्यवसायामुळेच तो पापी गुहेत नकळत ढकलला गेला होता. त्या गिनिपिग करणाऱ्या कंपन्यांची दर्जाहीन औषधांची विक्री रोखायची, असा विचार करत त्याचे दोन्ही हात बुद्धाच्या अंगुलीमुद्रेप्रमाणे नकळत वळले.

shrikantpawar15@gmail.com

❖



नवं कोरं

मनातील सजग जाणिवांचे प्रकटीकरण असलेल्या वाचनीय तसेच अंतर्मुख करणाऱ्या कथा.

निःशब्दाचे मौन

दिप्ती जोशी

पृष्ठसंख्या : १२० । किंमत : १४०/- Book Available

मर्सीडिश

सुरेंद्र पाथरकर



डॉक्टर राजन सुधाकर माने. शहरातीलनामांकित डॉक्टर. अत्यंत अद्ययावत, आधुनिक उपकरणांनी सज्ज असे दोन मजली हॉस्पिटल. आकर्षक डिजिटल बोर्डामुळे हाय वेवरून जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांचे लक्ष वेधून घेत होते. रात्रीचे १० वाजले होते. सर्वच वॉर्डांत शांतता दिसत असली तरी इमर्जन्सी वॉर्डीतून वेदनेचे, तळमळण्याचे आवाज येत होते. सिस्टर्स, असिस्टंट डॉक्टर्स प्रत्येक पेशंटजवळ येऊन त्यांना औषधं, इंजक्शनं देण्यात मग्न होते.

साधारण रात्रीचे १० वाजून ४५ मिनिटे झाली असतील. हॉस्पिटलच्या आवारात ॲम्ब्युलन्सने मोठ्याने सायरन वाजवत प्रवेश केला. हॉस्पिटलमधीलहजर असलेल्या सर्व स्टाफने ॲम्ब्युलन्समधून आणलेल्या पेशंटला स्ट्रेचरवर ठेवण्यास सुरवात केली. असिस्टंट डॉक्टर सामंत यांनी पेशंटची नाडी तपासली. पेशंट २२ वर्षांची तरुण मुलगी होती. अंगावरचे कपडे पूर्णपणे जळून अंगाला चिकटलेले होते. डॉक्टर सामंतांनी त्वरित डॉक्टर राजन यांना फोन करून तातडीने बोलावले व पेशंटला इमर्जन्सी वॉर्डात दाखलकरून घेतले. पोलिसांना फोन करून घटनेची माहिती दिली. पेशंटबरोबर गावातले तीन लोक व मुलीचे ६५वर्षीय काका शंकरराव आलेले होते. शंकररावांनी हॉस्पिटलच्या काउंटरवर जाऊन सिस्टरने दिलेला फॉर्म तिच्याच मदतीने भरण्यास सुरवात केली. पेशंटचे नाव : कुमारी माधवी, वय २२ वर्षे, शिक्षण १०वी पास. जळीत घटना.

दुर्घटनेचे सविस्तर वर्णन : ३० किलोमीटर अंतरावर असलेले तळेगाव. गावातीलरमेश पाटलांच्या मुलाच्या लग्नाची वरात संध्याकाळी ७ वाजता निघाली होती. वरातीला गावातल्या लोकांनी बरीच गर्दी केली होती. गावात आठ तासांचे लोडशेडिंग असल्यामुळे पाटलांनी दहा पेट्रोमॅक्सची ऑर्डर दिली होती. पेट्रोमॅक्सच्या उजेडात व बॅन्डच्या तालात गावातीलतरुण, तरुणी नाचत होते. वरातीतीलघोड्याजवळ काही लहान मुले पण नाचत होती. अचानक घोड्याच्या पायांमध्ये पाच वर्षांचा राहुलनावाचा मुलगा आल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी, जवळ चालत असलेल्या नानांनी गडबडीने मुलाला घोड्याच्या पायांमधून ओढून बाहेर काढले. बायकांच्या गर्दीतल्या राहुलच्या आईने ही घटना दुरून बघितली व त्या दिशेने धाव घेतली. धावत येताना तिचा धक्का एका ६० वर्षांच्या वृद्ध बाईस लागला व ती आजी धडपडून पेट्रोमॅक्स डोक्यावर घेतलेल्या माणसाच्या अंगावर आदळली. बाजूनेच माधवी आपल्या मैत्रिणीबरोबर उत्साहाने चालत होती. तिच्या अगदी जवळ पेट्रामॅक्स उलटला व मोठा भडका उडाला. माधवीच्या किंकाळ्यांनी वरातीतीललोक सैरभैर झाले. काहींनी त्वरित आगीतून माधवीला बाजूला ओढून काढले व आग विझवण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू केला. पाटलांनी ताबडतोब फोन करून फायरबिग्रेड, ॲम्ब्युलन्स, पोलीस यांना घटनेची माहिती दिली.

ही घटना बघताच माधवीचे काका शंकरराव चक्कर येऊन पडले व बेशुद्ध झाले. गावातीलतरुण डॉक्टर तामणकर यांनी त्वरित प्रथमोपचार करून त्यांना शुद्धीवर आणले. फायरब्रिगेड, ॲम्ब्युलन्स, पोलीस घटना-स्थळी पोचले होते व स्थिती सामान्य करण्यास सुरुवात केली होती.

पाटलांनी त्वरित जळीत माधवीला व तिच्या काकांना ॲम्ब्युलन्स-मध्ये घातले. गावातीलतीन समजदार, सुशिक्षित लोक बरोबर देऊन डॉ. राजन सुधाकर माने यांच्या हॉस्पिटलमध्ये उपचरासाठी रवाना केले. वऱ्हाडी मंडळींना, प्रतिष्ठित पाहुण्यांना शांततेचे आवाहन करून स्वतः लग्नमंडपाकडे कार्य पार पडण्यासाठी रवाना झाले.

शंकरराव व त्यांच्या सोबत आलेले गावातीललोक गणू, मधू व तात्या इमर्जन्सी वॉर्डीच्या काचेतून जळीत माधवीवर होत असलेल्या उपचारांकडे बघत होते. शंकररावांच्या डोळ्यांतीलअश्रू आटून गेले होते. खिडकीचा आधार घेऊन थरथर कापत उभे होते. माधवीला सफेद जाळीदार कपड्यांत पोकळ आवरणा- खाली ठेवण्यात आले होते. तिला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्याची सर्व स्टाफची लगबग चालू होती. इतक्यात डॉक्टर राजन यांनी त्यांच्या केबिनमध्ये प्रवेश केला. केसची माहिती घेतल्यानंतर मुंबईचे नावाजलेले डॉक्टर नरेन्द्र पोतनीस यांना विनंती करून बोलावून घेतले.

पहाटे २ वाजून ५० मिनिटांनी डॉ. राजन ऑपरेशन थिएटर-मधून बाहेर आले. थकलेले दिसत होते. धाडकन केबिनचा दरवाजा उघडून बाहेर आले व आरामखुर्चीत बसून डोळे मिटून घेतले. दुर्दैवी माधवीचे जळीत शरीर डोळ्यांसमोरून फिरत होते. माधवी ६८ टक्के जळाली होती. प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतर माधवीचा श्वासोच्छ्वास नियंत्रित झाल्यामुळे आशेचे किरण दिसत होते. डॉक्टरांनी शंकररावांना केबिनमध्ये बोलावून घेतलं.

डॉक्टरांनी शंकररावांना फ्रिजमधीलगार पाणी पिण्यास दिलं. शंकरराव थोडेसे सावरल्यावर डॉक्टरांनी गंभीर होत बोलण्यास सुरवात

केली. 'काका, दुर्दैवाने माधवीबरोबर झालेली जळीत घटना भयंकर आहे; पण डॉक्टर म्हणून मला तुम्हाला केसबाबत सविस्तर कल्पना देणे जरुरी आहे. माधवी ६८ टक्के जळाली आहे. हृदय व मेंदूकडीलरक्तपुरवठा अनियमित होत आहे. व्हेन्टिलेटरची व्यवस्था ताबडतोब केलेली आहे. कमरेखालच्या शरीराची बरीचशी स्कीन जळून बोन्सला चिकटली आहे. शरीरातीलब्लड सर्क्युलेशनची व्यवस्था कोलमडली आहे; पण सर्व आशा संपली, असे प्लीज समजू नका. मी प्रयत्न करणारच आहे. माझ्या प्रयत्नांना यश देण्यास दत्तगुरू समर्थ आहेतच.

'गावच्या लोकांनी त्वरित माधवीला हॉस्पिटलमध्ये आणण्यास जी मदत केली त्यामुळेच ताबडतोब उपचार चालू करता आले. मी मुंबईचे नावाजलेले डॉ. नरेन्द्र पोतनीस यांना विनंती करून बोलावून घेतले आहे. तरीपण अजून पुढचे ४८ तास फारच अवघड आहेत. शरीराने उपचारांना साथ देणे गरजेचे आहे. त्यासाठी शांतपणे देवाची प्रार्थना करा. मी इथेच केबिनमध्ये माधवीची देखभालकरण्यासाठी थांबणार आहे. या आता.'

शंकररावांनी बरोबर आलेल्या गणू, मधू व तात्याबरोबर हॉस्पिटल-च्या आवारातीलझाडाखाली पथारी पसरली. कोंबडा आरवायला थोडाच वेळ बाकी होता. गणू, मधू व तात्या यांनी घोरण्यास सुरवात केली; पण शंकरराव डोळे सताड उघडे ठेवून विचारात बुडून गेले. माधवी त्यांची पुतणी. त्यांच्या लहान भावाची लेक; पण लहान भाऊ गणपा व त्याची बायको सुनंदा यांचा अपघाती मृत्यू झाला होता. माधवी तेव्हा तीन वर्षांची होती. शंकररावांनी व त्यांच्या पत्नीने मूलबाळ होण्यासाठी बरेच औषधोपचार केले; पण कूस उजवलीच नाही. तेव्हा दोघांनी ठरवले, की माधवीलाच आपली मुलगी मानून तिचा सांभाळ करायचा. तिला शिकवायचे, मोठे करायचे व चांगले स्थळ बघून लग्न करून द्यायचे; परंतु माधवी नववीत शिकत असताना शंकररावांच्या पत्नीचा कॅन्सर आटोक्याबाहेर गेला व तिचा अत्यंत हलाखीत मृत्यू झाला. एकुलता एक जीवन जगण्याचा आधार माधवी आता दुर्दैवाने मृत्यूशी झुंज देत होती.

सकाळी ११ वाजता मुंबईचे नावाजलेले डॉक्टर नरेन्द्र पोतनीस यांच्या पांढऱ्याशुभ्र इनोव्हा कारने हॉस्पिटलच्या आवारात प्रवेश केला. डॉक्टर नरेन्द्र पोतनीस व डॉक्टर राजन यांनी त्वरेने ऑपरेशन थिएटरमध्ये प्रवेश केल्याबरोबर तीन ज्युनियर लेडी डॉक्टर व दोन नर्सेस होत्या. ऑपरेशन थिएटरचा दरवाजा बंद झाला. लाललाईटच्या प्रकाशाने डोळे दिपत होते. शंकरराव, गणू, मधू व तात्या बाहेरच्या बाकावर तहान-भूक विसरून ऑपरेशन थिएटरच्या बंद दरवाज्याकडे टक लावून बघत बसले होते. सर्व डॉक्टरांची टीम दुपारी ३ वाजून ४० मिनिटांनी ऑपरेशन थिएटरच्या बाहेर आली. डॉक्टर राजन यांच्या केबिनमध्ये सर्वांना कोल्ड्रिंक देण्यात आले. डॉक्टर पोतनिसांनी इग्लंडला असलेला त्यांचा मित्र डॉक्टर जॉन्सन याच्याबरोबर माधवीच्या जळीत केससंदर्भात चर्चा केली व पुढच्या ट्रीटमेंटची नोंद आपल्या डायरीत करून घेतली.

पुढचे १५ दिवस सर्व टीम दिवस-रात्र माधवीला सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार उपलब्ध करून, आपापले कौशल्य पणाला लावून माधवीच्या शरीरातीलरक्ताभिसरणाचे कार्य सुरळीत चालू होण्यासाठी प्रयत्न करीत होते. माधवीने आतापर्यंतच्या उपचारांना ३० टक्के प्रतिसाद दिला होता. हृदय व मेंदूच्या कार्यात अनियमितता आढळून आली होती. माधवी कोमात गेली होती. नळीने पातळ द्रवपदार्थ अन्नाला पर्याय म्हणून देण्यात येत होते.

शंकररावांच्या बरोबर आलेली गावातील मंडळी गणू, मधू व तात्या त्यांच्या आग्रहाखातर गावाला निघून गेली होती. गावातील पाटलांनी त्यांचा नोकर हणमंत याला शंकररावांच्या बरोबर मदतीसाठी हॉस्पिटलमध्ये राहण्यास पाठवले. झाडाखाली लाकडाच्या चुलीवर पिठलं-भात/भाकरी करून दोघे दिवस काढत होते. हॉस्पिटलमधील नर्सकडून माधवीची प्रगती समजत होती. आशेचे किरण मृगजळासारखे का होईना दिसत असल्यामुळे शंकररावांना या वयातसुद्धा जगण्याचे कारण मिळाले होते. शंकररावांनी गावच्या सावकाराकडे पाच पैकी दोन एकर जमीन माधवीच्या हॉस्पिटलमधील खर्चासाठी गहाण टाकली होती. दिवस उजाडत होता. मावळत होता. दिवस, महिने मागे पडत होते. माधवीला हॉस्पिटलमध्ये दाखल करून पाच महिने उलटले होते. शंकर-रावांच्या जवळचे पैसे संपण्याच्या मार्गावर होते. माधवीने डोळे उघडले नसले तरी अस्पष्ट, अडखळत बोलण्या इतकी प्रगती केली होती.

माधवीला आई, वडील आठवत नव्हते; पण शंकररावांवर तिचे जीव की प्राण प्रेम होते. जगात त्यांच्याशिवाय तिला कोणी नातेवाईक नव्हते. अर्धं अंग जळीत वेदनेनं तडफडत होतं. सर्व शरीराशी संपर्क नसल्यासारखं वाटत होतं. औषधांच्या परिणामांमुळे तीव्र वेदना होत होत्या. माधवीचं मन मात्र विचार करू लागलं. नशिबाला दोष देण्याखेरीज काहीच सुचत नव्हतं. कोणीही मुद्दाम तिला जाळण्याचा प्रयत्न केला नव्हता. अचानक, अकल्पित घडलेली घटना. याचंच जास्त वाईट वाटत होतं, की काकांना या वयात आपल्या दुर्दैवी अपघातानं दुःखाच्या खाईत लोटलं आहे. सगळ्याच स्वप्नांचा चक्काचूर झालाय. काकांच्या उतार-वयात त्यांची काळजी घेणारंही कोणी नाही. आपल्याला पूर्वीसारखं सर्वसाधारण आयुष्य जगणं शक्य होणार नाही, हा विचार माधवीच्या मनात पक्का होत होता. आत्महत्या करण्याचे विचार अधूनमधून मनात येत होते; पण हिंमत होत नव्हती.

डॉक्टर राजन हॉस्पिटलच्या रोजच्या व्यापात बिझी झालेले दिसत असले तरी माधवीच्या केसचे विचार त्यांचा सारखा पाठपुरावा करत होते. माधवी कधीच पूर्णपणे बरी होऊ शकणार नाही, याची त्यांना पूर्ण कल्पना आलेली होती. उमलत असलेल्या कळीचं फूल होण्याआधीच सुकून जावं, तसंच माधवीच्या बाबतीत झालं होतं. तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच हे जग सोडून जाण्याची दुर्दैवी वेळ नक्कीच येणार होती. फक्त ही घटना किती दिवसांनी, महिन्यांनी अथवा वर्षांनी होईलयाचा काहीच अंदाज लागणं शक्य नव्हतं. त्याचबरोबर शंकररावांना वृद्धापकाळात कुठल्या कुठल्या दिव्यांना सामोरं जावं लागत असेल, याची कल्पना डॉक्टरांना होती. समाजबांधीलकी हा डॉक्टरी व्यवसायाचा अविभाज्य भाग डॉक्टर मानत आले होते.

डॉक्टरांनी आपल्या बंगल्याच्या आवारातील आऊट हाऊस नोकरां-कडून स्वच्छ करून घेतलं. दोन बेड, वीज, पाणी व सर्व सोईंनी युक्त खोली होती ती. एके दिवशी सकाळी डॉक्टर स्वतः शंकररावांना त्यांची समजूत काढून आऊटहाऊस- मध्ये घेऊन आले. त्यांना आराम करायला सांगून, माधवीला दोन तासांत इथं शिफ्ट करीत असल्याचं सागितलं व हॉस्पिटलकडे निघून गेले. अचानक होत असलेल्या बदलांमुळे शंकररावांना काहीच समजेनासं झालं होतं. डॉक्टरांवरील विश्वास व

माधवी उपचारांना देत असलेला रिस्पॉन्स समोर दिसत असताना डॉक्टरांनी आपल्याला व माधवीला इथं का शिफ्ट केलं असावं, हे शंकररावांना समजत नव्हतं. हॉस्पिटलमधीलआय.सी.यू.पेक्षा ही जागा फारच आरामदायक व सुखसोईंनी युक्त होती. घडत असलेल्या घटना कोणाजवळ तरी बोलून मन हलकं करावं, असं त्यांना मनापासून वाटत होतं; पण तशी जिवाभावाची कोणीच व्यक्ती आयुष्यात आता उरली नव्हती. प्रत्येक क्षणाला, समोर आलेल्या प्रसंगाला सामोरं जाण्याशिवाय पर्याय उरला नव्हता.

दुपार टळून सूर्य मावळायला थोडाच अवधी बाकी असताना हॉस्पिटलची ॲम्ब्युलन्स माधवीला घेऊन आली. बेशुद्ध माधवीला कॉटवर ठेवून बाजूला सर्व जीवरक्षणासाठी उपयुक्त उपकरणं ठेवण्यात आली. बरोबर आलेल्या सहकारी डॉक्टरांनी मनासारखी व्यवस्था झाल्यावर नर्सला योग्य सूचना दिल्या व दुसरी नर्स येईपर्यंत माधवीच्या जवळपास राहून तिची देखभालकरण्यास सांगितलं; कारण माधवी २४ तास ऑब्झर्वेशनखाली राहणार होती. शंकररावांना सर्व हालचाली निमूटपणे पाहत राहण्यापलीकडे काही सुचत नव्हतं नर्सनं खिडक्यांचे पडदे ओढून घेतले व फॅनचा स्पीड कमी केला. बरोबर आणलेलं चहाचं सामान काढून शंकररावांसाठी चहाचं आधण ठेवलं.

रात्री शंकररावांचा कधी डोळा लागला समजलंच नाही. सकाळी डॉक्टरांनीच त्यांना उठवलं. माधवीला तपासून डॉक्टर खुर्चीत बसले. शंकररावांच्या मलूल चेहऱ्याकडे बघवत नव्हतं. कशी व कुठून सुरवात करावी या विचारात डॉक्टर पडले होते. 'तुम्हाला मी 'काकाच' म्हणणार आहे,' डॉक्टरांनी अधिकारानं शंकररावांचा हात हातात घेऊन गंभीरपणे बोलण्यास सुरवात केली. माधवी तुमची पुतणी. तुम्हाला दोघांना कोणीच नातवाईक नाहीत याची मला कल्पना आहे. तुमची आर्थिक परिस्थिती हलाखीची नसली तरी सुस्थितीत आहे, असं वाटत नाही; कारण माधवीला प्रोलाँग उपचारांची आवश्यकता आहे. सध्या माधवी कोमात आहे. अशा पेशंटची रिकव्हरी होतच नाही असं नाही; पण त्याला किती वेळ लागेल, याचा अंदाज नसतो. तुम्ही मन घट्ट करून सावरलं पाहिजे. माधवीला होत असलेल्या यातनांचा विचार करणंसुद्धा अनुभवाखेरीज शक्य नाही; पण तुम्हाला माहीत नसलेली एक गोष्ट जी मी दडवून ठेवली होती, ती आता सांगावीच लागणार आहे. ६८ टक्के भाजल्यामुळे उत्तमातीलउत्तम उपचारांनंतरसुद्धा माधवी पूर्णपणे बरी होण्याची शक्यता नसल्यात जमा आहे. दोन दिवसांपूर्वी माधवीने उपचार चालू असताना व थोडीशी बोलण्याच्या अवस्थेत असताना माझ्याजवळ अत्यंत अडखळत तिच्या मनातीलएक इच्छा व्यक्त केली आहे...' डॉक्टरांनी पुढे बोलण्याआधी जवळच्या ग्लासमधीलदोन घोट पाणी पोटात ढकललं. पुढचे शब्द ओठांवर येण्यास तयार नव्हते. शंकरराव पूर्णपणे गर्भगळीत होऊन डॉक्टरांकडे बघत होते.

डॉक्टरांनी त्वरेने मध्येच उठून माधवीला लावलेल्या सलाईनमध्ये एक इंजेक्शन इन्सर्ट केलं. नर्सला लक्ष ठेवण्यास सांगून परत खुर्चीवर येऊन बसले.

'शंकरराव, तुम्ही तुमचं मन घट्ट केलं पाहिजे. मी तुम्हाला घाबरवण्यासाठी काहीही सांगत नाहीये. प्राप्त परिस्थितीत काही मार्ग निघतो का, हे पाहण्यासाठी तुमच्याशी बोलतो आहे. माधवीनं अत्यंत करुणपणे मला सांगितलं, की तिला मृत्यू हवा आहे. सहन करण्याच्या पलीकडे होत असलेल्या वेदनांपासून कायमची सुटका पाहिजे आहे. माझ्या काकांना मी उरलेलं आयुष्य वेदनेनं तळमळत काढणं कधीच आवडणार नाही. ज्याप्रमाणे कोणाचाही जीव वाचवणं हे फार मोठं पुण्य मानलं जातं, त्याचप्रमाणे एखाद्याला नॉर्मलजीवन जगणं अशक्य असल्यास त्याला मृत्यूला कवटाळण्याची परवानगी मिळावी, एवढीच माझी विनंती आहे. याचा अर्थ मी कुठल्याही वाईट कृत्याला घाबरून आत्महत्या करण्याची परवानगी मागत आहे, असं नाही. तर माझ्यावर दया करून माझे होत असलेले हालथांबवावेत व मला मृत्यूची भीक द्यावी, अशी नम्र विनंती ... पुढचे शब्द बोलण्याचे त्राण माधवीला उरले नाहीत. माझीही मनःस्थिती विचित्र झाली होती. नर्सला माधवीकडे लक्ष ठेवण्यास सांगून मी केबिनमध्ये जाऊन बसलो. डोळ्यांतून येणारे अश्रू आवरत नव्हते.'

शंकररावांना आपण कुठलंतरी वाईट स्वप्न पाहत आहोत, असं वाटत होतं. कानांवर विश्वासच बसत नव्हता. डॉक्टरांबद्दलअसलेली आदर भावना जाऊन अत्यंत क्रोध येत होता. असे विचार माधवीच्या मनात येतातच कसे याचं त्यांना आश्चर्य वाटत होतं. माझ्या जगण्याचं एकमेव कारण फक्त माधवीच आहे, याची माधवीला चांगलीच कल्पना आहे. डॉक्टरांनी हलवल्यावर शंकरराव भानावर आले. अविश्वासानं, हतबलहोऊन ते डॉक्टरांच्या मांडीवर डोकं ठेवून धाय मोकलून रडू लागले. शंकररावांना शांत करणं डॉक्टरांना शक्य होतं; पण त्यांनी तसं न करता शंकररावांना मानसिक ताणातून नॉर्मलहोऊ देण्याचा मार्ग स्वीकारला. बराच वेळ शंकरराव हुंदके देत होते. नर्सनं पाण्याचा ग्लास त्यांच्या हातात दिला व डॉक्टरांनी दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे चहा बनवण्यास सुरवात केली. शंकरराव थोडेसे सावरल्यावर डॉक्टरांनी परत सावधपणे बोलण्यास सुरवात केली-

'शंकरराव, तुम्ही सांगा- मनुष्याचा जीवन जगण्याचा उद्देश काय असतो? जीवनात आनंद असणं. यात दोन गोष्टी आल्या- एक आपण स्वतः जीवनात आनंदी असणं, त्याचबरोबर आपण दुसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण करण्यास कारणीभूत असणं. स्वतःचं जीवन कसं आनंदात जाईल, असा प्रयत्न सगळेच कसोशीनं करताना दिसतील, त्यातच जीवनाचं सार्थक मानताना दिसतील; पण कधी दुसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास असा अनुभव येईल, की आपल्याला अपरिमित आनंद नक्कीच मिळतो व दुसऱ्याला झालेल्या आनंदाच्या अनुभूतीनं आपला स्वतःचा आनंद द्विगुणित होतो.

'आता आपण दुसऱ्याला कसा आनंद देऊ शकतो, हे त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबून असू शकतं. कधी कधी आपण दुसऱ्यापासून दूर गेल्यानं त्यांना आनंद मिळू शकतो. यालाच आपण सॅक्रीफाईस म्हणतो. आपल्याला अत्यंत प्रिय, आवश्यक असलेली गोष्ट दुसऱ्याच्या आनंदासाठी सोडून देणं, आपण त्या गोष्टीचा त्याग करणं, त्यासाठी स्वतःचं मन मारणं हेच सॅक्रीफाईस आहे. म्हणून एखाद्यानं स्वतःला दुःखातून कायमची मुक्तता मिळण्यासाठी मृत्यूची मागणी केली तर त्यात गैर काय आहे?'

हे सगळं बोलणं शंकररावांच्या डोक्यावरून जात होतं. परिस्थितीनं त्यांना कोंडीत पकडलं होतं. आताच्या परिस्थितीत काय बरोबर, काय

चूक हे समजणं शक्य नव्हतं. डोक्यात विचारांचं थैमान होतं.

माधवीला व शंकररावांना आउटहाउसमध्ये येऊन आज एक वर्ष, दोन महिने पूर्ण झाले होते. माधवी कोमातच होती. अन्न-पाणी नळीवाटे देण्यात येत होतं. दिवस उजाडत होता. मावळत होता. शंकरराव थकलेले दिसत होते. जेवणावरची वासना उडून गेली होती. मृत्यू आता आपल्याला कधीही गाठू शकतो या विचारांनी बोटावर दिवस मोजत होते. डॉक्टर नरेन्द्र पोतनीस यांची आज डॉक्टर राजन यांच्या हॉस्पिटलला व्हिझिट होती. दुपारी १२.३० वाजता डॉक्टर नरेन्द्र आले. सर्व वॉर्डांतून रूटीन व्हिझिट झाल्यावर त्यांची डॉक्टर राजन यांच्याशी भेट झाली. 'हाय-हॅलो 'झाल्यानंतर दोघंही एकमेकांशी पेशंट्सचे अनुभव शेअर करू लागले. डॉक्टर नरेन्द्रनी सांगितलं, की मुंबईला त्यांच्या नर्सिंग होममध्ये एका लोकलट्रेनमुळे झालेल्या अपघाताची केस आली. ३५ वर्षांचा नरोत्तम नावाचा माणूस रेल्वे रूळ क्रॉस करत होता. हा त्याचा नक्कीच अपराध होता, याची त्याला जाणीव पण होती; परंतु वडिलांना छातीत प्रचंड वेदना झाल्यामुळे दवाखान्यात दाखलकेलं होतं व त्यांना भेटण्यास नरोत्तम घाईघाईनं ऑफिसमध्ये रजा टाकून दवाखान्याकडे चालला होता. दुर्दैवानं समोरून कल्याणला जाणारी फास्ट लोकलआली व क्षणार्धात नरोत्तम लोकलखाली सापडला. त्याचे दोन्ही पाय गुडघ्याखाली तुटून वेगळे झाले होते. दवाखान्यात आणेपर्यंत त्याची जगण्याची आशा काहीच नव्हती; परंतु सुदैवानं देवाच्या कृपेनं व सर्व डॉक्टरांनी घेतलेल्या अथक परिश्रमांनी त्याचे प्राण वाचले; पण आता त्याच्या दुःखाची खरी सुरवात झाली होती. वडिलांचा दवाखान्यात मृत्यू झाला होता. पत्नी व एकुलती एक दहा वर्षांची मुलगी उश्याजवळ बसून होत्या. नरोत्तम कोमातच होता. मोठा भाऊ व त्याचा परिवार नाशिकला राहत होता. बाकी नातेवाईक असून नसल्यासारखे होते. नरोत्तम अजूनही आय.सी.यू.मध्येच आहे.

सर्व घटना ऐकल्यावर डॉक्टर राजन यांनी सुस्कारा सोडला. माधवीची व नरोत्तमची केस एका समान पातळीवर येऊन थांबली होती. डॉक्टर राजन यांनी डॉक्टर नरेन्द्र यांचं लक्ष वेधून घेत बोलण्यास सुरवात केली. 'सर, मर्सी डेथ ही कल्पना परदेशात मान्य आहे. काही देशांत ही कल्पना मान्यतेच्या दिशेने वाटचालकरीत आहे. याबाबत भारतात अजून विचारांची प्रगल्भता अपेक्षित आहे. मर्सी डेथचे सर्वसाधारणपणे दोन प्रकार मानतात. इच्छामरण- जे एखाद्या व्यक्तीनं होत असलेल्या मरणप्राय यातनांतून कायमची सुटका होण्यासाठी समाजाला, कायद्याला केलेली विनंती. त्याच प्रकारे एखाद्या व्यक्तीला मरणप्राय यातना होत असतील व त्या कोणाजवळही व्यक्त करण्यास ती व्यक्ती असमर्थ असेल; पण त्याची जाणीव इतरांना होत असेल, तर समाजानं, कायद्यानं मिळून त्या व्यक्तीची मरणप्राय यातनांमधून सहमतीनं, कायद्यानं कायमची मुक्तता करणं म्हणजे दयामरण. या दोन्ही संकल्पना भारतात रुजायला अजून अनेक वर्षं लागू शकतील.

'आपण आता चर्चा करीत असलेले दोन्ही मुद्दे फारच गंभीर व संवेदनशील आहेत. मर्सी डेथचा प्रयोग भारतात करणं फारच रिस्की आहे. त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता फारच आहे. एखाद्याची संपत्ती मिळवण्यासाठी किंवा एखाद्याशी वैयक्तिक वैर असेलतर अशा प्रकारच्या कायद्याचा समाजकंटकांकडून दुरुपयोग होऊ शकतो; पण असा कायदा झाल्यास फक्त सर्व नातेवाइकांच्या सहमतीनंच नाही तर अशी इच्छामरणाची मागणी करणाऱ्या व्यक्तीची इच्छा, वरिष्ठ पोलीस अधिकारी, सरकारी वकील, न्यायाधीश, सरकारमान्य डॉक्टर व समाजातील आवश्यक मान्यवर यांच्या चमूसमोर सार्वजनिकरीत्या सगळ्यांसमोर पूर्ण केली पाहिजे. अशा व्यक्तीला सगळ्यांसमोर, ठरलेल्या वेळी, सगळ्यांच्या उपस्थितीत योग्य डॉक्टरांकडून स्लो पॉइझनचे इन्जेक्शन देण्यात येते. कुठल्याही प्रकारच्या यातना न होता ती व्यक्ती मृत होते. अशीच प्रक्रिया दयामरणाच्या बाबतीत करणं जरुरी आहे. अशा परिस्थितीत संबंधित व्यक्ती कुठल्याही पापात सहभागी आहेत, अशी भावना मनात येणं चूक आहे. एखाद्या व्यक्तीची भयंकर यातनांमधून सुटका करणं फार मोठं पुण्याचं काम आहे, हे विसरून चालणार नाही.'

खूपच गंभीर विषयावर चर्चा होत असल्यानं डॉक्टर नरेन्द्र यांना कॉफी पिण्याची गरज वाटली. त्यांनी डॉक्टर राजन यांना कॉफीची व्यवस्था करण्यास सांगितलं. बराच वेळ कॉलबेलला नर्सनं प्रतिसाद न दिल्यानं डॉक्टर स्वतः उठून पॅसेजमध्ये आले. तेवढ्यात समोरून माधवीला जिथं ठेवलं होतं, त्या आउटहाउसचा वॉर्डबॉय सायकलउभी करून अतिशय वेगानं येताना दिसला. डॉक्टरांच्या मनात शंकेची पालचुकचुकली. वॉर्डबॉयनं निरोप आणला, की माधवीची प्रकृती गंभीर झाली आहे. डोळे पांढरे करत आहे. तिच्याजवळ असलेली नर्स माधवीला सावध करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. क्षणाचाही विलंब न करता डॉक्टर राजन, डॉक्टर नरेन्द्र यांच्या कारमध्ये बसून आउटहाउसकडे रवाना झाले.

दोन्ही डॉक्टर घाईघाईनं आउटहाउसच्या आवारात कारमधून उतरले. बाहेरच्या गर्दीमधून वाट काढून माधवीच्या रूमकडे धावले. नर्स कोपऱ्यात खाली मान घालून उभी होती. सगळं संपलं होतं. तरीपण दोन्ही डॉक्टरांनी माधवीला परत तपासलं. उघडे डोळे बंद केले. तोंडावर चादर ओढून, लढाईत हरलेल्या सैनिकासारखे रूममधून बाहेर पडले. न बोलता कारमध्ये बसून निघून गेले.

काळ कोणासाठीच थांबत नसतो. तीन आठवडे उलटले असतील. डॉक्टर राजन यांना डॉक्टर नरेन्द्र यांचा मुंबईहून फोन आला. उत्सुकतेनं डॉक्टर राजन यांनी फोन उचलला. डॉक्टर नरेन्द्र यांनी त्यांना मुंबईला एका केसच्या संदर्भात बोलावले आणि एक खूशखबर पण सांगितली की, नरोत्तमला मागच्या आठवड्यात आर्टिफिशिअलपायांचं रोपण करण्यात आलं आहे व त्याचा नुसता जीवच वाचला नाही, तर प्रकृती झपाट्यानं सुधारत आहे.

patharkar.sp@gmail.com

❖

बेस्ट सेलर्स

घराघरांतील स्वयंपाक
रुचकर करणाऱ्या
दहा लाखांहून अधिक गृहिणींची
प्रेमळ सासू

श्रीमती कमलाबाई ओगले

रुचिरा

भाग १ व २

प्रत्येकी किंमत
रु.२२५/-





नवं कोरं



फोर्ड मोटार कंपनी आणि क्रायस्लरचे माजी अध्यक्ष 'ली आयकोका' या यशस्वी उद्योजकाचे प्रेरणादायक आत्मचरित्र

आयकोका

लेखक : ली आयकोका
सहलेखक : विल्यम नोव्हाक
अनुवाद : अशोक पाथरकर

पृष्ठसंख्या : ३७६ । किंमत : ४००/-

आर्थिक घडामोडी, उद्योग, तंत्रज्ञान, समाजव्यवस्था व त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यांचा परामर्श घेणारे माहितीपूर्ण लेख

सी.ई.ओ.च्या केबिनमधून...

डॉ. गिरीश वालावलकर

Book Available

पृष्ठसंख्या : १७६ । किंमत : १९५/-

अफगाणिस्तानातील तालिबानी बंडखोरीचा त्यांचेच नेते 'मुल्ला झैफ'नी मांडलेला लेखाजोखा... तालिबानची अनभिज्ञ बाजू मांडणारं आत्मकथन

माझे तालिबानी दिवस!

लेखक : अब्दुल सलाम झैफ
अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर

पृष्ठसंख्या : ३५२ । किंमत : ३६०/-

काबूलमधील स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या अफगाण मुलांची जिगरबाज आणि खिळवून ठेवणारी सत्यकथा

द तालिबान क्रिकेट क्लब

लेखक : तिमिरी एन. मुरारी
अनुवाद : अमृता दुर्वे



पृष्ठसंख्या : ३०४ । किंमत : ३२०/-

नवं कोरं

आनंदाचा झरा...
मिरासदारी साहित्य....



शिवाजी महाराज पत्रकारांशी बोलतात...
टगेवाडी फेस्टिव्हल... यांसारख्या
धमाल कथांचा हास्यस्फोटक कथासंग्रह

फुक्कट

पृष्ठसंख्या : १२० । किंमत : १२०/- Book Available

द. मा. मिरासदारांच्या खुमासदार
लेखणीतून उतरलेले
खुसखुशीत ललित लेख

अंगतपंगत

पृष्ठसंख्या : १५२ । किंमत : १६०/- Book Available

गेस्टहाउस

डॉ. संजय ढोले

पावसाळी वातावरण होतं.. हवेत गारठा होता. ढग तुरळक असले तरी रिपरिप चालूच होती. या अशा वातावरणानं कॉलेज परिसरही प्रफुल्लित वाटत होता. कॉलेजला प्रशस्त मैदान असल्याने त्यावर काही विद्यार्थी फुटबॉल खेळत होते. पावसात ते भिजत होते. एकंदरीत वातावरण शांत व गूढ वाटत होतं. पदार्थ विज्ञानावर दोन दिवसीय चर्चासत्र सुरू होतं. त्यातील सहभागी प्राध्यापक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची वर्दळ होती.

पाच वाजून गेले होते. दिवसभर वेगवगळी व्याख्यानं झाली होती. डॉ. भगवान भटकर, विद्यापीठातील पदार्थ विज्ञानाचे प्राध्यापक व नावाजलेले विज्ञानकथाकार हे संपूर्ण दिवस चर्चा सत्रातील एकूण एक व्याख्यानं ऐकत होते. खरंतर त्यांच्याच हस्ते चर्चासत्राचं उद्‌घाटन होऊन, बीजभाषण झालं होतं. त्यात त्यांनी 'किरण आणि कर्करोग' याविषयी सुंदर विवेचन केलं होतं. प्राध्यापक व विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले होते. पदार्थ विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. शेटे व प्रा. येवले हे त्यांचे स्नेहीजन असल्याने त्यांनी डॉ. भटकरांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केलं होतं.

सकाळी पुण्याहून लवकरच ते स्वतः ड्राइव्ह करीत निघाले होते. पुणे ते कोपरगाव पाच तासांचं अंतर; पण पावसाची संततधार असल्यानं त्यांना सहा तास लागले होते आणि लागलीच उद्‌घाटन करून व्याख्यान दिलं होतं. पुढे दिवसभर ते सभागृहात बसून होते. काही कंटाळवाण्या व्याख्यानांच्या दरम्यान त्यांच्या डोक्यात विज्ञान-कथांची बीजं रोवली गेली होती. हा त्यांचा छंद होता. अलीकडे ते गूढकथाही लिहायला लागले होते. वेगळ्या नावानं; कारण विज्ञानकथाकार म्हणूनच ते प्रचलित असल्यानं, गूढ व रहस्य-कथांसाठी त्यांनी टोपणनाव धारण केलं होतं. ते नावही तेवढंच गूढ होतं. 'अदृश्य अनामिक' हे ते टोपण नाव. ते स्वतः या नावानं गूढकथा लिहितात हे कुणालाही ठाऊक नव्हतं.

दिवसभर बसून शीण आला होता. थकवा जाणवत होता. त्यांनी समोरच संयोजनाच्या कार्यात व्यस्त असलेल्या प्रा. येवलेंना हाक मारली,

''येवले सर!''

ऐकताच येवले व शेटे दोघंही त्यांच्याजवळ आले. येवले म्हणाले,

''काय सर, काही हवं का?''

''काही नको! मी इथल्या कॅन्टीनमध्ये चहा पिऊन येतो.'' डॉ.भटकर उत्तरले.

''सर! इथंच मागवतो ना!'' शेटेंनी आग्रह केला.

''नको... नको! मी स्वतः तिकडे जातो. थोडा शीणही बाहेर पडेल.'' डॉ. भटकर निग्रहाने म्हणाले.

''ठीक आहे सर! आम्हीही इथलं आवरतो आणि तुमची बॅग घेऊन जॉइन होतो आणि तिकडेच तुम्हाला गेस्टहाउसमध्ये सोडतो.'' शेटेंनी सांगितलं.

''गेस्टहाउस चालेल ना, सर!... की हॉटेलमध्ये व्यवस्था करू?'' येवलेंनी विचारलं.

''नको!.. मला तुमचं गेस्टहाउस आवडतं. छोटंसं, पण छान आहे. झाडंझुडपं आहेत. पलीकडे नदीचं पात्र आहे. मार्व्हलस. मला तिथे राहायला नेहमीच आवडतं. नो प्रॉब्लेम. मी निघू?'' डॉ. भटकरांनी आवड जोपासतच विचारलं.

''ठीक आहे सर, आम्ही दहा मिनिटांत आलोच,'' शेटेंनी सांगितलं.

डॉ. भटकर उठले व सभागृहाबाहेर पडले. त्यांचं व्यक्तिमत्त्व कमालीचं आकर्षक व गूढहोतं. पन्नाशीचे; पण शरीराची ठेवण मात्र तारुण्यमय होती. धीम्या चालीनं ते कँटीनकडे जाऊ लागले.

कॅन्टीनमध्ये शिरताच, एक दोघं विद्यार्थी चहा पित होते. पाऊस थांबला होता. डॉ. भटकर एका कोपऱ्यातील टेबलाजवळील खुर्चीवर विसावले. आजूबाजूला पाहिलं. त्यांनी सिगारेटचं पाकीट काढलं. एक सिगारेट ओठांमध्ये पकडीत लाइटरनं पेटवली. लाइटरच्या क्षणिक ज्योतीनं त्यांचा चेहरा उजळून निघाला. लाइटर खिशात ठेवला. एक प्रदीर्घ झुरका त्यांनी घेतला... व आजूबाजूला धुराचं वलय उठलं व त्यात त्यांचं शिर पूर्ण झाकलं गेलं. फक्त धड मात्र दिसत होतं. याचं वेळी पार्श्वभागी 'कही दिप जले कही दिल। जरा देख ले आकर परवाने ऽऽ'' हे गीत हळू आवाजात ओलावलेलं वातावरण चिरत होतं. धुराचं वलय विरळ होताच, त्यांचा चेहरा स्पष्ट झाला. या वेळी एक प्रदीर्घ श्वास त्यांनी घेतला. समोर वेटर होता. त्यांनी त्याला एक कप चहा आणण्याची खूण केली. तसा वेटर माघारी फिरला. डॉ. भटकर वलयांकित झुरके वातावरणात फेकू लागले.

चहा येताच, एक घोट चहा व एक झुरका याचं अप्रतिम मिश्रण करू लागले. या वेळी त्यांना उत्साहित वाटत होतं. चित्तवृत्ती जाग्या झाल्या.

तेवढ्यात शेटे व येवले बॅग घेऊन आले. स्थानापन्न होताच, वेटरनं पुढ्यात चहा आणून ठेवला. डॉ. भटकर म्हणाले,

''शेटे सर, चहा उत्तम आहे. तरतरी आली बघा.''

''होय सर, हा कॅन्टीनवाला खूपच छान आहे.'' येवलेंनी पुष्टी जोडली.

त्याच वेळी चार-पाच विद्यार्थी-विद्यार्थिनींनी डॉ. भटकरांच्या भोवती घोळका केला. त्यांनीही सर्वांना उत्साहानं ऑटोग्राफ दिला. एक विद्यार्थिनी म्हणाली

''सर, आजचं तुमचं व्याख्यान खूपच सुंदर होतं. अदृश्य किरणांनी विषारी पेशींचा नायनाट करणं अद्‌भुतच आहे.''

यावर डॉ. भटकरांनी नुसतंच स्मित केलं; कारण अदृश्य किरणांनी ते स्वतः कमालीचे प्रभावित होते. दुसरा विद्यार्थी म्हणाला,

''तुमच्या विज्ञानकथाही आम्हाला खूप आवडतात. 'अघटित' ही विज्ञानकथा तर अंगावर काटा आणणारी आहे, सर. मी तर रात्रभर झोपू शकलो नाही.''

यावर डॉ. भटकर नुसतेच खळखळून हसले. त्यात येवले व शेटेही सामील झाले. विद्यार्थी ऑटोग्राफ घेऊन परतले.

दरम्यान, तिघांनी चहा संपवला व गेस्टहाउसकडे निघाले. गेस्ट हाउस जवळच होतं. या वेळी सायंकाळचे सहा वाजून गेले होते. संधिप्रकाश सरून अंधारायला आलं होतं. डॉ. भटकर येणार म्हटल्यावर गेस्टहाउस चकाचक करून ठेवलं होतं. व्ही.आय.पी रूममध्ये येताच, त्यांना बरं वाटलं. क्वचितच वापर होत असल्याने, तिथे कुणीही अन्टेडन्ट नव्हता. या वेळी ते एकटेच गेस्टहाउसमध्ये राहणार होते. आजूबाजूला तीन खोल्या होत्या. त्याही रिकाम्या होत्या. खाली छोटेखानी दिवाणखाना होता व किचन होतं. आणि पहिल्या मजल्यावर चार खोल्या होत्या. त्यातलीच एक व्ही.आय.पी. रूम होती आणि तिथेच डॉ. भटकरांची व्यवस्था करण्यात आली होती. शेटे म्हणाले,

''सर, आता सव्वासहा वाजलेत. थकला असाल तुम्ही. थोडा आराम करून घ्या. आम्ही साडेसात वाजता येतो. बाहेर येवल्याला जेवायला जाऊ यात.''

''ठीक आहे. मी साडेसातला तयार राहतो.'' डॉ. भटकरांनी पुष्टी जोडली.

शेटे व येवले बाहेर पडले.

डॉ. भटकरांनी रूम न्याहाळून घेतली. शांत वातावरण. रूम अंगावर आल्यासारखी वाटत होती. ओलावा असल्यानं एक वेगळा दर्प रूममध्ये होता. त्यामुळे त्यांनी फॅन ऑन केला. फॅनही कट् कट् आवाज करीत होता. यापूर्वीही ते इथं राहिले होते; पण या वेळी मात्र त्यांना बदल जाणवत होता. कपडे बदलून, डॉ. भटकर फ्रेश झाले व बिछान्यावर अंग टाकलं. टी.व्ही लावला; पण नेहमीप्रमाणे चालला नाही. म्हणून ते डोक्याखाली हात घेऊन छताकडे पाहू लागले.

बाहेर अंधार पडला होता. त्यांनी हळूच खिडकीचा पडदा बाजूला केला. ठार अंधार होता. झाडं होती. किर्र किर्रऽऽ आवाज येत होता. ते पुनश्च पलंगावर पहुडले व विचार करू लागले. या अशा गूढवातावरणातील एक गूढकथा त्यांच्या डोक्यात रुंजी घालू लागली. आकृतिबंध तयार झाला.

तेवढ्यात बेल वाजली. त्यांची विचारशृंखला तुटली. त्यांनी

घड्याळात पाहिलं. साडेसात वाजून गेले होते. विचारात वेळ कुठं गेला हेच त्यांना कळलं नव्हतं. त्यांच्या डोक्यात गूढकथेनं एक वलय तयार केलं होतं आणि या वेळी ते वलय गडद होत गेलं. अशातच बेल वाजली. त्यांनी दार उघडलं. समोर शेटे सर होते. ते म्हणाले,

''सर, तुम्ही तयार व्हा. आम्ही खाली दिवाणखान्यात बसलेलो आहोत.''

''ओ.के.. दोनच मिनिटांत मी खाली आलो.'' डॉ. भटकर उत्तरले.

शेटे खाली जाताच, डॉ.भटकरांनी अंगात टी शर्ट चढवला आणि क्षणात तयार झाले. लॉक करून खाली आले आणि म्हणाले,

''चला जाऊ या.''

बाहेर पडताच येवल्याच्या दिशेनं कार धावू लागली. या वेळी त्यांचे रसायनशास्त्राचे सहकारी प्रा. शिंदेही बरोबर होते. तेच ड्राइव्ह करीत होते. प्रा. शिंदे उत्साही व हसतमुख होते.

डॉ. भटकरांनी सावजी मटणावर यथेच्छ ताव मारला. या वेळी प्रा. शेटे, प्रा. येवले व प्रा. शिंदे यांनी विज्ञानातील विचारलेल्या एकूण एक प्रश्नांची चर्चा डॉ. भटकरांनी केली. नैसर्गिक उकल केली. पुढे विज्ञानकथांवरून गूढकथांवरही सखोल चर्चा केली. डॉ. भटकरांनी एक संक्षिप्त गूढकथा सांगून शेटे, येवले व शिंदेंच्या अंगावर रोमांच उभे केले. तिघंही निःशब्द झाले होते.

जेवण आटोपताच, कोपरगावला परतीचा प्रवास सुरू झाला. बाहेर रिपरिप सुरू होती. कुणीही बोलत नव्हतं. गूढकथा अजूनही प्रत्येकाच्याच डोक्यात होती. शांत वातावरणात वायपरचा आवाज भेसूरता निर्माण करीत होता.

अर्ध्या तासातच ते सगळे गेस्टहाउसला पोहोचले. शेटे, येवले व प्रा. शिंदेंनी खालीच दिवाणखान्यात निरोप घेतला. जाताना शेटे म्हणाले,

''सर, खालचा हा दरवाजा नीट लावून घ्या, म्हणजे कुणीही येणार नाही. आम्ही सकाळी आठ वाजता येतोच.''

''ठीक आहे. गुड नाईट.''

''गुड नाईटऽऽ सर...''

शेटे, येवले, शिंदे परतले. या वेळी रात्रीचे साडेदहा वाजले. शिंदेंच्या कारचा आवाज क्षीण होत गेला. डॉ. भटकरांनी दारातूनच आजूबाजूला पाहिलं. ठार अंधार होता. रातकिड्यांच्या आवाजात एक लय होती. त्यांनी मुख्य दार लावून घेतलं. इतर दारंही तपासली व लावून घेतली. पुन्हा पुन्हा खात्री करून घेतली; कारण ते एकटेच होते. आजूबाजूला कुणीही नव्हतं.

वर येताच त्यांनी रूमचंही दार लावून घेतलं. ट्रॅकसूट घातला. जेवण बऱ्यापैकी झालं होतं. डोळ्यांवर झोपेचा अंमल होता; पण त्याच वेळी डोक्यात गूढकथा होती. एका दिवाळी अंकास द्यायची होती, म्हणून डॉ. भटकर निकराने कागद-पेन घेऊन खुर्चीत बसले. खोलीत एकवार पुन्हा नजर फिरवली. त्यांना वातावरण काहीसं भारावलेलं जाणवलं. ते पुन्हा उठले व खिडकीचा पडदा किलकिला केला. ठार अंधार अंगावर येताच ते शहारले व पडदा पुनश्च लावून घेतला. ते खुर्चीत बसताच, गूढकथेचं शीर्षक व लेखकाचं नाव लिहिलं. 'गेस्ट हाऊस' आणि लेखक 'अदृश्य अनामिक' आणि कथा सुरुवातीपासूनच वेग घेऊ लागली.

''नायक हा स्वत: लेखक असतो. गेस्टहाउसमधील बंदिस्त खोलीमध्ये बसलेला असतो. वातावरण रहस्यमय व गूढ. दूरवर कुठेही मनुष्यच नाही. प्राणिमात्र नाही. ते एकमेव गेस्टहाउस आणि त्यात तो नायक. गेस्ट हाउस चहूबाजूंनी बंद. मध्ये फक्त नायक. एक मंद प्रकाश खोलीत त्याचंच अस्तित्व दर्शविणारा.''

डॉ.भटकर भान हरपून लिहित होते. कथेत गुंतत चालले होते. तेवढ्यात त्यांचं लक्ष एका कोपऱ्यात गेलं. तिथं ती होती. पाल. वलय घेऊन बसलेली. पाल पाहताच डॉ. भटकर अस्वस्थ झाले. खोलीत पाल असली म्हणजे त्यांना झोप येत नसे. त्यांनी तिला चुचकारून पाहिलं; पण ती निगरगट्ट होती. हललीच नाही. त्याच लक्ष थोडं विचलित झालं. तरीही कथेचा अंमल त्यांच्यावर होताच. ते प्रवाहात होते. पालीच्या क्लॅक् क्लॅक् आवाजानं त्यांची विचारशृंखला मध्येच तुटली. पाल तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देत होती. अशा असंख्य पाली त्यांच्या आजूबाजूला क्लॅक्ऽ क्लॅक्ऽ करीत असल्याचा भास त्यांना होत होता. त्यामुळे ते शहारत असत. कधी पाल तर कधी कथा, या द्वंद्वात ते होते. पालीचं अस्तित्व त्यांना नकोसं होतं. ती जाचक ठरत होती. शिवाय तिचा आवाज वातावरणात भेसूरता निर्माण करीत होता. डॉ. भटकर निकराने पुढे कथा लिहू लागले. बराच वेळ झाला. एका अत्युच्च बिंदूवर येऊन ते थांबले. कथेचा उत्कर्षबिंदू होता तो.

''...हळूहळू धीम्या पावलांचा आवाज. अतिशय धीमा. फक्त सावजाला जाणवणारा... आणि दाराची बेल वाजली किण्ऽ किण्ऽ करत. नायक विचारतंद्रीतून बाहेर आला आणि पाहतो तर त्याच्याच दाराची बेल वाजलेली. तो शहारतो. अंगावर रोमांच उभे राहतात. हृदय धडधडायला लागतं; कारण सर्व दरवाजे बंद असताना, आत रूमची बेल कोण वाजवतंय? कोण असेल?''

कथेशी समरस झालेल्या डॉ. भटकरांचं भानच हरपलं होतं. त्यांना हेही लक्षात आलं नाही, की त्यांचीही बेल वाजत होती. त्यांची विचारशृंखला तुटली. ते वास्तवात आले. वस्तुस्थितीची जाणीव झाली. ते नखशिखान्त हादरले. घड्याळात पाहिलं. रात्रीचे बारा वाजले होते. कधी घड्याळाकडे तर कधी दाराकडे ते सुन्न होऊन पाहू लागले. खाली तर आपण स्वतः दार बंद केलं होतं; मग आत कोण

आलं, या विचारानंच त्यांचं अंग थरथरलं. या वेळी त्यांनी कोपऱ्यात पाहिलं. तिथं पालही नव्हती. या वेळी ती सोबतीला हवी होती, हे प्रकर्षानं जाणवलं. त्यांनी तिला शोधलं; पण ती नव्हती. बेल वाजतच होती. डॉ. भटकरांच्या हृदयाचे ठोकेही वाढू लागले. कोण असेल? त्यांच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. पाय जड झाले. थोड्या वेळानं बेल वाजणं बंद झालं. त्याच वेळी खाली पावलांचा क्षीण आवाज मात्र त्यांनी ऐकला. तो आवाजही त्यांना नकोसा झाला. ते हळूच उठले. खिडकीचा पडदा किलकिला केला. बाहेर प्राणिमात्र ठप्प होते. एका वेगळ्या अस्तित्वाची जाणीव त्यांना झाली. ते निकरानं पुढे झाले. मनाच्या इच्छेविरुद्ध त्यांनी खोलीचं दार उघडलं. समोर कुणीही नव्हतं. वातावरणात मात्र कुबटपणा होताच. ..आणि एक वेगळा दर्पही होता. तो त्यांना नकोसा वाटत होता.

ते जड पावलांनी खाली जिना उतरू लागले. एका वेगळ्या अगतिकतेनं. खाली दिवाणखान्यात डोकावलं आणि ते पाहतच राहिले. जागच्या जागी थिजले. पाषाण झाले.

समोर दिवाणखान्यात ओळीनं सात-आठ जण बसले होते. चार स्त्रिया व चार पुरुष. स्त्रियांचा घूँघट होता, तर पुरुषांच्या डोक्यावर पांढरा स्कार्फ होता. चेहरा कुणाचाही दिसत नव्हता. घूँघटच्या पलीकडे काय होतं, हे कळत नव्हतं.

डॉ. भटकर प्रचंड घाबरले. कोण हे? आणि आत कसे? ते परत रूममध्ये जाऊ लागले; पण त्यांचे पाय उचलले गेले नाही. त्यांच्यात त्राणच राहिलं नाही. परत रूममध्ये जाऊन कडी लावावी, ही ऊर्मी दाटून आली; पण पुढे जाता येतच नव्हतं. वातावरण अतिशय भारावलेलं होतं. गूढता दाटून आली होती. मध्येच बांगड्यांचा किणकिण आवाज होत होता. त्यामुळे वातावरण अजूनच अद्‌भुत होत होतं. डॉ. भटकर शहारत होते. त्या स्त्रियांची हालचाल होत होती. त्यातील एकीनं हळूच जिन्याकडे पाहिलं. डॉ. भटकरांची आणि तिची नजरानजर होताच, ते बांधले गेले. स्तब्ध झाले. आभूषणांनी नटलेली ती स्त्री होती. कपाळावर मोठा टिळा, नाकात नथनी, कानात झुमके, गळ्यात चितांग. ती रहस्यमय हसली आणि काळवंडलेले दात पुढे आले. ते पाहून डॉ. भटकरांच्या पापण्या पडत नव्हत्या. एका वेगळ्या प्रेरणेनं ते खाली उतरले. ते स्वतः नाही. अगदी मनाविरुद्ध; पण ते उतरले आणि दिवाणखान्याच्या मधोमध आले. दार अजून बंद असलेलं पाहून ते शहारले. कोण हे?

त्यातला एक पुरुष उठला आणि हळूच त्यांच्या खांद्यावर हात ठेवत डोक्यावरचा स्कार्फ बाजूला केला. डॉ. भटकरांचे डोळे मोठे होत गेले. चेहऱ्याची ती खोबणीच होती. डोळे खोलवर असून नसल्यासारखे. चेहऱ्यावरची हाडं वरती आलेली. त्वचा फक्त चिकटलेलीच होती. चेहऱ्यावर फक्त अंधार.

स्पर्श होताच डॉ. भटकरांच्या शरीरात एक वेगळंच अनामिक बळ संचारलं. अदैवी असं. समजण्यापलीकडचं. आणि ते स्थिर झाले. त्यांचा मेंदू पूर्णपणे परावलंबी झाला. ते स्वतःचे राहिलेच नाहीत.

त्यातले तीन पुरुष व चौघी बायका उठल्या. डॉ. भटकरांच्या आजूबाजूला घोळका केला आणि सगळ्यांनी एकाच वेळी घूँघट व स्कार्फ बाजूला केले आणि त्यांच्यावर खोबण्या रोखल्या गेल्या. डॉ. भटकरांनी डोळे गच्च बंद करून घेतले. क्षणभरच. दुसऱ्या क्षणी ते चालू लागले. दाराची कडी आपोआप गळून पडली.

पाऊस बंद होता. बाराची वेळ टळली होती आणि नेमकी तीच वेळ त्यांनी साधली होती.

आजूबाजूला चौघं पुरुष. पुढे दोन व मागे दोन स्त्रिया. मध्ये डॉ. भटकर. जाणिवांपलीकडचे. वेगळ्याच विश्वात वावरणारे. लय-बद्धपणे हा घोळका पुढे जात होता. अंधार नसला तरी परावर्तित प्रकाश होता. हळूहळू ते जात होते. एका ठराविक दिशेनं. डॉ. भटकर नकळत ओढले जात होते.

एका वळणावर हळूच ते उचलले गेले. चौघांनी त्यांना उचललं होतं आणि चालण्याचा वेग वाढवला होता. पुढे इतका वाढला, की डॉ. भटकरांची शुद्ध हरपली. या वेळी पुरुषांचे धपापे व स्त्रियांची किणकिण या मिश्रणामुळे भेसूर आवाज येत होता. पुरुषांची पांढरी कापडं नुसतीच हलत होती तर स्त्रियांचे पदर झुळझुळत होते.

क्षणातच ते नदीकिनारी आले. तेथे काही चिता जळत होत्या. धगधगत होत्या. एक चिता तर नुकतीच फोफावत होती. त्यातील एक कवटी फुटली होती. धगधगत्या चितेच्या प्रकाशातच ते येऊन थांबले. डॉ. भटकर पुनश्च भानावर आले. त्यांच्या लक्षात आलं ती स्मशानभूमी होती. असंख्य चिता जळत असल्याचा भास त्यांना झाला व त्यातीलच एक स्वतःची चिता त्यांना दिसत होती. धगधगणारी.

तेवढ्यात त्यांनी डॉ.भटकरांना एका चितेशेजारी बसवलं. ती चिता चांगलीच धगधगत होती. तिचा प्रकाश व ज्वाला आसमंतात व परिसरात भिरभिरत होत्या.

त्यातल्या स्त्रिया तत्काळ विवस्त्र झाल्या आणि पुरुषांनी स्कार्फ बाजूला केला. स्त्रियांचं ओंगळ स्वरूप पाहून डॉ. भटकरांना किळस वाटली. चारही स्त्रिया त्यांच्या बाजूला बसून चितेत समिधा, गुलाल, कुंकू उधळू लागल्या. डॉ. भटकरांना फासू लागल्या. पुरुषांनी मात्र एक लयबद्ध ठेका धरला होता. हा प्रकार सुमारे एक तास चालला. त्या सगळ्यांनी मिळून एकाच वेळी धावा केला. तो धावा फक्त अमानवी व समंध लोकांनाच ऐकू येत होता.

...आणि हळूहळू संपूर्ण स्मशानच जागं झालं. एकेका चितेतून व थडग्यातून समंध बाहेर येऊ लागले. पांढऱ्याशुभ्र व सौंदर्यानं

नटलेल्या नग्न स्त्रिया. डॉ. भटकरांचा श्वास रोखला गेला. त्यांचं शरीर थिजलं होतं. फक्त डोळे उघडे होते.

त्यांच्या आजूबाजूचा घोळका मोठा होऊ लागला. हळूहळू तो वाढतच गेला. इतका की जनसमुदाय दिसू लागला. या वेळी इतर गावांतील स्मशानभूमीही जागी झाली. अख्खी अमानवी सृष्टी जागी झाली. आज या सगळ्यांनाच मानवसृष्टीतील मानवाच्या रक्ताचा एक थेंब चाखायला मिळणार होता. ही अमानवी सृष्टी त्यासाठीच चटावलेली होती. सगळे जिभल्या चाटत होते. सुरवात फक्त त्या आठ जणांनी करायची होती.

ती वेळ आली. प्रथम त्या नग्न स्त्रियांनी डॉ. भटकरांचा ताबा घेतला. एकाच वेळी चौघी त्यांच्या मानेला लागल्या. सुळे बाहेर येऊन मानेत रुतले आणि डॉ. भटकर शिथिल होत गेले. नंतर इतर चौघांनी ताबा घेतला. थेंबाथेंबानं शरीरातील रक्त कमी होत होतं...आणि इशारा मिळताच, सर्व अमानवी सृष्टी डॉ. भटकरांवर तुटून पडली... शेवटचा रक्ताचा थेंब संपेपर्यंत.

हळूहळू सर्व जण परतू लागले. पुनश्च निश्चल होण्यासाठी. शेवटी ते आठ जणच उरले आणि डॉ. भटकर. डॉ. भटकर निश्चल पडले होते. शरीर पिशवीसारखं झालं होतं. डोळे निस्तेज होते. प्रत्येकानं त्यांच्या चेहऱ्यावर हात फिरवला आणि ते उठून उभे राहिले. या वेळी वेगळं वाटत होतं. आता ते त्यांच्यातले झाले होते. त्यांच्याही डोळ्यांच्या खोबण्या झाल्या होत्या. शरीर किडकिडं झालं होतं. पांढरी वस्त्रं अंगावर आली. डोक्यावर स्कार्फ आला. आठव्यात नवव्याची भर पडली. वेळ टळण्याआधी ते सगळे लुप्त झाले. चिता मात्र या वेळी तृप्त होऊन धगधगत होत्या; पण ती धग मात्र कमी होती.

दुसऱ्या दिवशी रात्री बारा वाजण्याचा सुमार. संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या गेस्टहाउसमध्ये कुणीतरी प्रथितयश लेखक अतिथी म्हणून उतरले होते. या वेळी त्या आठही जणांचा मोर्चा तिकडे वळला होता; पण ते आठ नव्हते, तर नऊ जण होते. पुढे ते आणि त्यांच्या मागे ते आठही स्त्री व पुरुष होते. ते म्हणजे डॉ. भटकर होते. या वेळी या आठ जणांचं नेतृत्व मात्र त्यांच्याकडे होतं. रक्ताला चटावलेल्या असंख्य जिभल्या मात्र येणाऱ्या पाहुण्याची वाट पाहू लागल्या... शिवाय नऊही जणांची चटक जबरदस्त होती... मुख्यत्वे डॉ.भटकरांची... हळूच ते सगळे लिव्हिंग रूममध्ये आले...आणि त्यातून डॉ.भटकर पुढे गेले. एका रूमसमोर उभे राहिले आणि बेल वाजवली. कर्णकर्कश आवाज वातावरण भेदत गेला. या वेळी रात्रीचे बारा वाजले होते.

sddhole@gmail.com

❖



नवं कोरं

मेंदूविषयी परिपूर्ण विवेचन वाचून आपल्या लक्षात येईल की, निरोगी प्रकृतीसाठी जीवनशैलीत काय बदल करणे आवश्यक आहे

अफलातून मेंदू

डॉ. अनिल गांधी

पृष्ठसंख्या : २०० । किंमत : २२०/- Book Available

मला आज नेहमीसारखी झोप येत नव्हती. मी घड्याळाकडे बघितलं. रात्रीचे साडे बारा वाजले होते. मी तसाच बिछान्यावर लोळत पडलो होतो, पंख्याकडे बघत!

मग मोबाईल घेतला, फेसबुकवर पस्तीस फ्रेंड्स ऑनलाईन होते. हो, मी मोजले. तेवढाच टाईमपास; पण मी कोणाला मेसेज केला नाही. मागच्या आठवड्यात ऑनलाईन असलेल्या मोजून दहा लोकांना 'हाय' असा मेसेज पाठवला तर चार जणांनी रिप्लायच दिला नाही. बाकीच्या दोघांनी 'बिझी आहे' असा रिप्लाय दिला, तर उरलेल्या चार लोकांनी मला ब्लॉक केलं! त्यानंतर कोणाला मेसेज करायचं धाडस आणि हट्टहास केला नाही.

मग इन्स्टाग्राम, व्हाट्सॲपवर डोकावून बघितलं... तिथं पण गप्पा मारायला, नाही.. साधं बोलायला सुद्धा कोणी नव्हतं. जितकी मी झोपेची वाट बघत होतो, तितकी मी कधी माझ्या ऑफिसच्या पगाराचीसुद्धा वाट बघितली नसेल; पण या झोपेनं माझ्याच खाटेवर माझी वाट लावली होती.

मला या झोपेचं काहीतरी करावं लागणार होतं. मी कित्येक दिवसांत नीट झोपलो नव्हतो. त्यामुळे मी सदैव दमलेला, थकलेला असायचो. दिवसा काही करावंसं वाटत नसे आणि रात्री झोप येत नसे.

मला स्वतःशीच बोलण्याचा आजार? नाही, आजार नाही, सवय किंवा व्यसन लागलं होतं, त्यामुळे मी जास्त कोणाशी बोलत नसे आणि कोणी माझ्याशी! शेवटचं कोणाशी बोललो होतो बरं? अरे हां, त्या 'एचआर मॅनेजर' बरोबर, जेव्हा मला नोकरीवरून काढून टाकलं.. नाही...बडतर्फ केलं.. नाही...जेव्हा मी नोकरीचा राजीनामा दिला होता, तेव्हा हा 'एचआर मॅनेजर' मला म्हणाला, 'आदित्य, यार, चांगला जॉब घालवलास!' त्याचं हे बोलणं ऐकून मी जरा मोठ्यानं हसायला लागलो आणि विनाकारण तोही माझ्याबरोबर हसायला लागला.

मी तसाच पंख्याकडे बघत बसलो होतो. माझी चुळबुळ चालूच होती; पण तेवढ्यात, नेहमीचा आवाज आला... ओळखीचा आवाज... पायांचा आवाज... जिन्यावरून चढताना होणार पायांचा आवाज. मी टुणकन उडी मारून उभा राहिलो, एका उडीत माझ्या खोलीच्या दरवाज्याकडे गेलो. दरवाज्याच्या 'आय होल' मधून बाहेर बघू लागलो. ती मुलगी, ती रोजची मुलगी, आज नेहमीप्रमाणे घरी आली होती. तिनं नेहमीप्रमाणे डोअरबेलच्या पाठीमागे लपवलेली चावी बाहेर काढली, दरवाज्याचं कुलूप उघडलं आणि आत गेली. तिची नेहमीची येण्याची वेळ होती, रात्री साडे बारा, एकच्या सुमारास आणि सकाळी अगदी सातला नाहीतर सहालाच घराबाहेर पडायची. मला कसं माहीत? मी सकाळी सहालासुद्धा जागाच असायचो ना!

कुठं मी
आणि कुठं ही
मुलगी- जी फक्त
पाच-सहा तास
झोपून परत
कामावर जायची.
तिच्या
पोषाखावरून मी
अंदाज केला
होता की, ती
कदाचित एअरपोर्ट
ग्राऊंड ड्यूटीवर काम
करत असेल.

मी नेहमीसारखा दुपारी एक-दोन वाजता उठलो. झोप तशी पूर्ण झाली नव्हती; पण उठावं लागणारच होतं; कारण भूक लागली होती. मग जवळच्या हॉटेलमध्ये जाऊन जेवण केलं आणि परत खोलीकडे निघालो.

खोलीचं दार उघडताना, मनात एक प्रश्न आला, आता काय करायचं? परत झोपायचं? झोप तर येणार नाही. करायलाही काही नव्हतं. मी तसाच दारापाशी उभा राहिलो. माझ्या खोलीच्या समोर अजून एकच खोली होती, त्या मुलीची. प्रत्येक मजल्यावर फक्त दोन खोल्या होत्या, अशी आमची पाच मजल्यांची सोसायटी होती. एकूण दहा फ्लॅट्स. मी त्या खोलीच्या दरवाज्याकडे बघितलं. दरवाज्यावर 'संयुक्ता' असं नाव लिहिलं होतं. फक्त नाव! आडनाव किंवा मिस, सौ. अशी काही लेबल्स त्या नावाला जोडलेली नव्हती.

मी त्या संयुक्ताच्या खोलीच्या बंद दरवाज्याकडे बघितलं, कुलपाकडे बघितलं, मग डोअर बेलकडे बघितलं, आजही जाताना तिनं चावी डोअरबेलच्या मागे लपवली असेलका? मी हळूच डोअरबेलच्या मागे शोधलं. चावी सापडली!

आत जाऊ का नको? आत जाऊन काय करू? कशाला जाऊ? असाच जाऊ, टाईमपास; पण मग कोणी आलं तर? कोण येणार आहे? ही मुलगी रात्री येते. मी चावीकडे बघत हा सगळा विचार करत होतो.

तेवढ्यात वरच्या मजल्यावरून कोणीतरी खाली येत होतं...

मी पटकन कुलूप काढून, दरवाजा उघडला आणि आत गेलो.

मी त्या दाराची कडी आतून लावली. शांत उभा राहिलो. तुम्ही कधी गेला आहात का, असे नकळत कोणाच्या तरी खोलीत, चोरून! चोरायचं तर काही नव्हतं; पण मला नाही माहीत मी आत

निदानाशा

चैतन्य रासकर

का आलो... आलो असाच. फक्त दोन खोल्या होत्या. किचन आणि हॉल. बस्स! काही बघण्यासारखं नव्हतं. पूर्ण पसारा होता. बऱ्याच दिवसांपासून कोणी झाडूही फिरवला नव्हता. बरीच झुरळं फिरत होती. हॉलमध्ये एक बेड होता, एक जुना सोफा होता, त्याचा कापूस बाहेर आला होता. मी सोफ्यावर बसलो. समोर एक छोटा टीव्ही होता. माझ्याकडे टीव्ही नव्हता, त्यामुळे बरेच महिने मी टीव्ही बघितला नव्हता. मी टीव्हीचा रिमोट शोधला. मला तो रिमोट सोफ्याच्या खाली सापडला; पण टीव्ही काही लागला नाही. म्हणजे लागला; पण स्क्रीनवर सगळ्या मुंग्या आल्या. मी तसाच त्या टीव्हीकडे बघत बसलो.

मला त्या सोफ्यावर कधी झोप लागली ते कळलं नाही; पण मस्त झोप लागली. अगदी शांत. एक स्वप्न नाही, की कधी दचकून जागा झालो नाही. ती गाढ झोप म्हणतात ना, अगदी तशी झोप. मस्त मेल्यासारखा झोपलो!

मी जेव्हा उठलो, तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. मी उठलो. माझ्या समोरच्या टीव्हीवर आता फक्त एक ब्लॅंक स्क्रीन दिसत होता. मुंग्या गेल्या होत्या. माझ्या हातातला रिमोट खाली पडला होता. मी रिमोट उचलून टीव्ही बंद केला. मला एकदम भान आलं. मी कुठे आहे, हे माझ्या लक्षात आलं. मी लगेच खोलीच्या बाहेर आलो. परत कुलूप लावलं आणि चावी त्या डोअरबेलच्या मागे पहिल्यासारखी लपवून ठेवली.

मी माझ्या खोलीत जेव्हा परत आलो, तेव्हा माझ्या लक्षात आलं, कित्येक महिन्यांनंतर आपण इतके मेल्यासारखे झोपलो होतो. मला एकदम फ्रेश, मस्त वाटत होतं. काहीतरी जादू होती त्या सोफ्यामध्ये किंवा त्या खोलीमध्ये. बसल्या बसल्या झोप लागली.

मी माझं जेवण स्वतः बनवलं आणि मस्त जेवलो. बऱ्याच दिवसांनंतर काही तरी काम केलं. मग मी माझा सीव्ही अपडेट केला. नवीन जॉब शोधायला लागलो. एक छान झोप मिळाली की माणूस किती ताजातवाना होतो!

मग मी रोज त्या खोलीत जायला लागलो. आरामात झोपत होतो. शांत, गाढझोप. अशा झोपेची मला खूप गरज होती. ती मला मिळत होती. मी दुपारी जेवण केल्यावर झोपायला जायचो आणि रात्री नऊपर्यंत मस्त झोपायचो. ती मुलगी साडेबारा- एकला घरी परत यायची आणि सकाळी सातच्या आधी निघून जायची.

मी तिच्या खोलीतली एकसुद्धा गोष्ट हलवली नव्हती. त्यामुळे तिला कधी कळलं नाही, की मी रोज असा चोरून तिथं झोपायला जातोय; पण खरंच त्या जागेत काहीतरी जादू होती. अशा काही वास्तू असतात ना, ज्या तुम्हाला शांत करतात, तशी ही खोली मला शांत झोपवत होती.

त्या दिवशी मी नेहमीसारखा झोपलो होतो. जाग आली. मोबाईलमध्ये बघितलं तर रात्रीचे सव्वा बारा वाजले होते. बाप रे! आपण इतका वेळ कसे काय झोपलो? मी पटकन उठलो, खोलीचं दार उघडून बाहेर आलो. खिशातून चावी काढून कुलूप लावणार... तेवढ्यात...एक मुलगी खालच्या मजल्यावरून चढून वर आली. तिनं मला बघितलं. मी चावी हातात घेऊन कुलूप लावत होतो. मी तिच्याकडे बघितलं, ही तर तीच मुलगी! मी तिच्या रोजच्या पोषाखावरून तिला ओळखलं. ती मला बघून तशीच स्तब्ध उभी राहिली. तिला झाला प्रकार कळायला तीन-चार सेकद गेले आणि ती तिथून पळाली.

ती जशी पळाली, तसं मी काय करावं ते मला कळेना. मी तिला हाक मारून थांबवण्याचा प्रयत्न केला; पण मला तिचं नाव पण माहीत नव्हतं. काय करू आता? ती तक्रार करेल. आपण जेलमध्ये जाऊ. काय करू?

मी पटकन चावी फिरवली. कुलूप लावलं. पळत त्या मुलीच्या मागे गेलो; पण तोपर्यंत ती मुलगी निघून गेली होती. मी रस्त्यावर येऊन बघितलं. इकडे-तिकडे बघितलं; पण ती मुलगी मला दिसली नाही.

मी एका जागी खाली बसलो.

एक मिनिट, तिला माहितेय का मी तिच्या समोरच्या फ्लॅटमध्ये राहतो? तिनं मला आधी कधी बघितलं नव्हतं. आज पहिल्यांदा मी तिला आणि तिनं मला बघितलं. तेही दोन-तीन सेकंदं. तिला मी नक्कीच चोर वाटलो असेन; पण माझ्या हातात तर काहीच नव्हतं; मी कधी काही चोरलं पण नव्हतं.

पण तिनं मला कधीतरी बघितलं असेलतर? तिला माहीत असेल, की मी तिचा शेजारी आहे? ती पोलिसांत गेली तर? आपण तर गेलोच! मग पोलीस येतील. मारतीलका? जेलहोईलका? ती मुलगी केस करेल? जेलझाली की मग कधी परत जॉब नाही मिळणार. मग कमवणार काय? खाणार काय? काय करणार? काय करू?

त्या थंडीच्या दिवसांत पण मला घाम फुटला.

मी दोन्ही हातांनी डोकं पकडलं. तसाच बसलो; पण पटकन उठलो. माझ्या खोलीच्या दिशेनं धावत गेलो. एक शक्यता होती. ती जर पोलिसांकडे गेली असेल, तर ती पोलिसांना घेऊन लगेच इकडे येऊ शकते.

मी माझा फोन स्विच ऑफ केला. सिम कार्ड बाहेर काढून ठेवलं. मी माझ्या खोलीच्या दिशेनं धावलो. पटकन बॅग भरली. दिसतीलते कपडे भरले. माझ्या खोलीला कुलूप लावलं. तशी बॅग धरून धावतच रस्त्यापर्यंत आलो आणि स्टेशनसाठी रिक्षा पकडली.

मी घरी, गावी आलो. तिथंच दहा दिवस राहिलो. माझा फोन स्विच ऑफ केला होता; पण मला शोधत पोलीस येतील, असं सारखं वाटत होतं; मी पुरता घाबरलो. माझी झोप नेहमीसारखी उडाली होती.

पण तसं काही झालं नाही. कदाचित ती मुलगी परत आली असेल. घरातून काही चोरीला गेलं नाही, यावरून तिनं तक्रार केली नसेलकिंवा तक्रार मागे घेतली असेल. ती अजून तिथं राहत असेल? का खोली सोडली असेल?

मी दहा दिवस गावी राहिल्यावर, परत माझ्या खोलीकडे आलो. कदाचित पोलीस माझ्या घरी परत येण्याची वाट बघत असतील. दबा धरून बसले असतील. मी आलो, की मला पकडतील. सगळ्या शक्यता होत्या; पण देवाच्या कृपेनं तसं काही झालं नाही. मी दुपारी खोलीकडे आलो. माझ्या समोरच्या खोलीला नेहमीसारखं कुलूप होतं.

मी माझ्या खोलीत शिरलो; पण त्यानंतरचे चार-पाच दिवस भयानक होते. पोलीस येतील, मला घेऊन जातीलअशी भीती माझ्या मनात बसली होती. त्यामुळे माझी झोप पूर्णपणे उडाली होती; पण ती मुलगी परत कधी आली नाही. रोज रात्री साडे बारा- एक वाजता ती यायची. मला लगेच पावलांचा आवाज यायचा; पण ती कधी परत आली नाही.

कदाचित वैतागून तिनं खोली सोडून दिली असेलका?

काय माहीत! पण पोलीस काही आले नाहीत. कोणी मला त्याबद्दल विचारलं सुद्धा नाही. त्यामुळे जसे दिवस जात होते, तशी माझी भीती कमी होत होती. मी दुपारी माझ्या खोलीवर असताना, माझ्या खोलीची बेलवाजली. पोलीस तर नसतीलना? मी घाबरत दरवाजा उघडला.

एक बाई होती. तिनं हसून मला 'हाय' म्हटलं. मीसुद्धा दरवाजा उघडून दारात उभा राहिलो.

'मी संयुक्ता. हा समोरचा फ्लॅट माझाच आहे,' ती बाई म्हणाली.

पण ही ती मुलगी नव्हती. ती मुलगी लहान होती. त्यापेक्षा ही बाई वयानं बरीच मोठी वाटत होती.

'मी आदित्य,' मी म्हणालो.

'मी, या फ्लॅटसाठी भाडेकरू शोधतेय. तुमच्या ओळखीचं कोणी...'

'हो नक्की सांगेन.' मी तिचं वाक्य पूर्ण केलं.

'तुम्ही ओनर आहात का?'

'नाही. मी, मी भाडेकरू आहे.' मी उत्तर दिलं.

'अच्छा, प्लीज बघा ना या खोलीसाठी कोणी भाडेकरू! तुमचा कोणी मित्र असेलतर. गेलं एक वर्ष फ्लॅट असाच बंद आहे.'

'ओके, आधीचे भाडेकरू आताच सोडून गेले का?' मी अंदाज घेत म्हणालो.

'आधी मी आणि माझे मिस्टर राहत होतो. मग आम्ही परदेशात गेलो. मागच्या आठवड्यात परत आलोय. माझ्या आईकडे राहतोय. मला ब्रोकरकडे अजिबात जायचं नाहीये...'

'म्हणजे वर्षभर इथं कोणीच राहत नव्हतं?' मी चक्रावलो.

'नाही. रिकामाच होता.'

'कोणाला एका-दोन महिन्यांसाठी दिला होतात का?' मी परत विचारलं.

'नाही. आम्ही मागच्या वर्षी जर्मनीला गेलो, त्यानंतर आता परत येतोय. खोली आहे तशीच आहे. कोणाला कधी दिली नाही.'

मी त्या दाराकडे एकटक बघत उभा होतो. मला झालेला प्रकार जरा उलगडू लागला होता.

संयुक्ता मॅडमनं त्यांचा फोन नंबर मला दिला. त्या निघून गेल्यानंतर, मी परत माझ्या समोरच्या खोलीकडे बघितलं. मी डोअरबेलच्या मागची चावी बाहेर काढली. चावी अजून तिथं तशीच होती.

त्या मुलीला माहीत होतं, की या खोलीची चावी इथं, डोअरबेलच्या मागे लपवून ठेवली आहे. तिला हे कसं माहीत होतं, हे मला कधी कळणार नव्हतं. तिला हेही माहीत होतं, की घराची मालकीण, संयुक्ता मॅडम, या जर्मनीमध्ये आहेत. त्यामुळे या खोलीत कोणी अचानक येण्याची शक्यता कमीच होती. कोणाला संशय येऊ नये म्हणून, ही मुलगी रात्री उशिरा येत असे आणि सकाळी लवकर जात असे!

त्यामुळे त्या रात्री मला बघून ती घाबरली. तिला वाटलं- घराचे खरे मालक परत आले आणि पळून गेली.

आता मी त्या खोलीत राहतोय. एक महिना झाला. मी संयुक्ता मॅडमच्या खोलीचा रीतसर भाडेकरू झालोय आणि त्या सोफ्यावर रोज रात्री आरामात झोपतोय!

chaitanyaras@gmail.com

❖

वियोग

सरिता आठवले

सकाळपासून गायत्री निरंजनच्या फोनची वाट पाहत होती. गायत्रीचा- वागण्या-बोलण्यात तरतरीत, अभ्यासात तेज निरंजन कॉलेजलाइफमध्ये रंगून गेला आहे. शाळेत असताना निरंजन सतत आईच्या अवतीभोवती असायचा; पण कॉलेजात गेल्यावर त्याला पंख फुटले. समवयस्कांमध्ये रमण्याचे फुलपंखी दिवस. गायत्री मात्र आता तो सतत डोळ्यांसमोर नसल्याने त्याच्या काळजीत बुडालेली आहे. निरंजनचे बाबा अरविंद त्यांच्या व्यवसायात आणि निरंजन त्याच्या व्यापात, त्यामुळे गायत्री जरा एकटी एकटी झाली आहे.

आताही गायत्रीने निरंजनला त्याच्या मित्रांसमवेत बाईक घेऊन ट्रिपला जायला नाइलाजानेच परवानगी दिली होती. आज तो ट्रिपहून परतणार होता. दुपारी गायत्रीचा डोळा लागला आणि काहीतरी चित्रविचित्र स्वप्न पडून ती घाबरून जागी झाली. त्याच वेळी निरंजनचा फोन आला. त्याला ट्रिपहून परतायला संध्याकाळ होणार, हे ऐकून तिचा जीव धास्तावला.

त्यातच गायत्रीचा मूड सकाळपासून बिघडला होता. सकाळी एक पाल सारखी चुकचुकत होती. तिला हुसर्कीवून लावताना ती अंगावर पडली होती. रात्री एक कुत्रेही गळा काढून रडत होते. ही कुठल्या अशुभाची चाहूल तर नाही ना, अशी तिला हुरहूर लागली होती. दुपारच्या चहाच्या वेळी शेजारीणबाई- हेमाताईंनी ट्रिपला गेलेल्या निरंजनची चौकशी केली. तो परत कधी येणार ते विचारले. तो संध्याकाळी परत येणार असल्याचे गायत्री सांगत असतानाच पुन्हा एकदा कुत्रे ओरडले. गायत्री खूप अस्वस्थ झाली. हेमाताईही गंभीर झाल्या; पण वातावरण रिलॅक्स करण्यासाठी 'तू खूप पझेसिव्ह आहेस; त्यामुळेच तू काळजी करतेस. काळजी करण्या-सारखे काही नाही. जरा नॉर्मल वाग,' असेही तिला हेमाताईंनी सुनावले. हेमाताईंनी तिला धीर दिला आणि गजानन महाराजांची प्रार्थनाही केली.

अरविंदराव ऑफिसमधून घरी आले. गायत्रीची स्वयंपाकाची गडबड सुरू होती. कामावरून आल्यावर चहाच्याही आधी गायत्रीने अरविंदना अंगारा लावला. त्यामुळे चहा घेताना अरविंदरावांनी गायत्रीची, तिच्या अंधश्रद्धेची थट्टा केली. त्यांच्या थट्टेने तिचे टेन्शन कमी होण्याऐवजी आणखी वाढले. ट्रिपला गेलेला निरंजन आज परत येणार होता; पण संध्याकाळ सरत आली तरी अजून आलेला नव्हता. तिने देवासमोरच्या समया लावल्या. त्या प्रकाशल्या आणि लगेच विझल्या. वारा सुटला होता. गायत्रीने घाईघाईने देवासमोरचा विजेचा दिवा लावला; पण दिवेच गेले. गायत्रीचा जीव कासावीस झाला. तेवढ्यात पुन्हा दिवे आलेही. अस्वस्थ मनाने स्वामींच्या फोटोला हात जोडत असताना फोन आला. फोनवर सह्याद्री हॉस्पिटलच्या एका नर्सने तिला तिच्या ट्रिपला गेलेल्या मुलाच्या-निरंजनच्या अपघाताची बातमी सांगितली. अपघात किरकोळच होता; पण प्रिकॉशन म्हणून सगळे मित्र परस्पर हॉस्पिटलमध्ये गेले होते. त्या नर्सने निरंजन सुखरूप असल्याचे सांगितले होतेच; पण गायत्रीचा जीव काळजीने अर्धा झाला.

गायत्रीने हॉस्पिटलकडे धाव घेतली. तिला रिक्षा मिळाली नाही. हॉस्पिटलकडे धावत पळत जाताना तिचा महामृत्युंजय मंत्राचा जप अखंड सुरू होता. हॉस्पिटलमध्ये गेल्यावर निरंजनला डिस्चार्ज मिळाल्याचे कळले. मुलगा सुखरूप असल्याचे बघून गायत्रीच्या मनावरचा ताण कमी झाला. तिने मनापासून देवाचे आभार मानले. तेवढ्यात निरंजन व त्याचे मित्र हॉस्पिटलच्या पलीकडच्या दरवाज्यातून बाहेर पडताना गायत्रीला दिसले. तिने हाक मारून त्यांना थांबवायचा प्रयत्नही केला. निरंजन थबकला. मान वळवून त्याने तिच्या दिशेने बघितलेही; पण त्याच्या मित्राने त्याला खेचून बाहेर नेले. त्यांना बहुधा तिची हाक ऐकूच गेली नाही. मुलाची आणि आपली चुकामूक झाली, असे म्हणून गायत्री घरी जायला निघाली. हॉस्पिटलमधून निघाल्यावर गायत्रीला विचित्र फीलिंग येऊ लागलं. रस्त्यावरची गर्दी संपलेली होती. रहदारी नव्हती आणि प्रचंड शांतता होती; पण दिव्यांचा प्रकाश भयानक दिसत होता.

गायत्री घरी पोचली. जिन्यात आणि घराच्या दारात खूप लोक उभे होते. हेमाताईंच्या दारात हेमाताई आणि माणिक उभ्या होत्या.

'सकाळपासूनच गायत्री अस्वस्थ होती आणि तिला अपशकुन होत होते. निरंजनची तिला खूप काळजी वाटत होती आणि नेमका फोन आला.'

असंच काहीसं त्या दबक्या आवाजात बोलत होत्या. जिन्यातल्या गर्दीला निरंजनची चाहूल लागली. तो आला असल्याची कुजबूज झाली. निरंजन आणि त्याचे मित्र घाईघाईने वर आले. निरंजनने हेमाताईंकडे प्रश्नार्थक नजरेने बघितले. त्यांनी त्याला घरात जायची खूण केली. निरंजनला लोकांनी वाट दिली. तो घरात शिरला. पाठोपाठ गायत्रीही गेली.

बाबा सोफ्यावरून उठून पुढे आले. निरंजन थबकला. दचकला. दारात उभ्या असलेल्या गायत्रीकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. गायत्री घरात शिरली. समोर तिचा मुलगा वडिलांच्या खांद्यावर डोके ठेवून रडत होता. 'हा का रडतो आहे?' हे बघण्यासाठी गायत्री पुढे गेली.

जमिनीवर तिचाच मृतदेह ठेवलेला होता. बाबा निरंजनला म्हणत होते,' तुझा अपघात झाल्याचा फोन आला आणि त्या धक्क्याने आई बेशुद्ध पडली आणि काही उपचारांपूर्वीच...'

sarita.athavale@gmail.com

❖

सूड नावाची डिश

निलेश मालवणकर

'डॅम इट!' मीरचंदानीने रागाने आपल्या समोरच्या टेबलावर मूठ आदळली. समोरच त्याचा पीए बांगरे काहीसा थरथरत उभा होता.

'पुन्हा या मखिजानं माझ्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. या साल्याला मी असा सोडणार नाही. बघून घेईन एक दिवस. एक दिवस माझासुद्धा येईल, तेव्हा कळेलया मखिजाला माझ्याशी पंगा घेणं किती महागात पडतं ते. तुम्ही इंग्लिश मूव्हीज बघता का बांगरे?'

बांगरेंनी नकारार्थी मान हलवली. अचानक सुडावरून साहेबाची गाडी इंग्लिश मूव्हीजकडे कशी काय सरकली, हे त्याला कळलं नाही.

'एके काळी मी बघायचो, बांगरे. आवडायच्या आपल्याला इंग्रजी मूव्हीज . 'गॉडफादर' नावाची एक प्रसिद्ध मूव्ही आहे बांगरे. बघा कधी मिळाली तर. त्यातला तो डॉन - मार्लन ब्रॅन्डोने केला होता तो रोल- तर तो डॉन म्हणतो, 'रिव्हेंज इज अ डिश दॅट टेस्ट्स बेस्ट व्हेन सर्व्हड कोल्ड' - याचा अर्थ माहीत आहे बांगरे?' बांगरेंनी नकारार्थी मान हलवली. 'एवढं इंग्रजी आपल्याला कळत असतं तर अशा नोकरीत कशाला खितपत पडलो असतो,' असा प्रश्न त्यांच्या मनाला चाटून गेला.

'त्याचा अर्थ असा आहे बांगरे,' मीरचंदानी म्हणाला, 'सूड ही अशी डिश आहे, जी थंड करून खाण्यात खरी मजा आहे. सारं काही निवळलं आहे, असं प्रतिस्पर्ध्याला वाटून तो जेव्हा पुरता निर्धास्त होतो, तेव्हाच त्याच्या वर्मी घाव घालायचा. सूड घेतल्याचं खरं समाधान तेव्हा मिळतं.'

बांगरे ते ऐकून शहारले; पण त्यांना त्यात आश्चर्य वाटलं नाही. आपला मालक केवढा पोचलेला आहे हे त्यांना व्यवस्थित ठाऊक होतं. सध्या जरी त्याला मखिजानं निष्प्रभ केल्यासारखं वाटत असलं, तरी भविष्यात केव्हा ना केव्हा तरी मखिजाला तो चांगलाच चमकावणार, यात त्यांना तिळमात्र संशय नव्हता.

आपला मालक किती निर्दयी आणि आतल्या गाठीचा आहे, हे त्यांना चांगलंच ठाऊक होतं; पण सध्या मखिजाचं पारडं जड होतं. त्याचा फायदा घेऊन मखिजा मीरचंदानीच्या प्रत्येक प्रोजेक्टमध्ये काही ना काही



अडथळे आणत होता. काही भरघोस मलई खायची संधी असलेले गृहनिर्माण प्रकल्प मखिजानं मीरचंदानीच्या हातातून हिरावून घेतले होते. त्यामुळे आधीच खुनशी स्वभावाचा मीरचंदानी भडकला होता, त्यात काही नवलनव्हतं.

मीरचंदानीनं हातानंच बांगरेंना केबिनच्या बाहेर जायची खूण केली. बांगरे बाहेर आले. त्यांनी सुटकेचा श्वास सोडला आणि ते आपल्या जागेवर जाऊन बसले. समोरच्या कागदांमध्ये त्यांनी आपलं डोकं खुपसलं.

मीरचंदानीला हे असे पराभव पचवायची सवय नव्हती. आज बिल्डर व्यवसायात त्याला जवळपास पंचवीस वर्षं झाली होती. झोपडपट्टी दादा ते मुंबईतीलएक आघाडीचा बिल्डर अशी त्याची प्रगती होती. सुरवातीला एका लोकलबिल्डरला त्यानं झोपडपट्टी खाली करून दिली होती. त्या वेळी तिथं राहणारा एक फाटका युनियन लीडर- राजाभाऊ त्याला विरोध करायला आडवा आला होता. मीरचंदानी त्याला विसरणं शक्य नव्हतं; कारण मीरचंदानीच्या आयुष्यातला तो पहिला खून होता. राजाभाऊची बायको आणि त्याची दोन लहान मुलं- एक मुलगा आणि एक मुलगी - यांच्यासमोर त्यानं राजाभाऊचा भर दुपारी झोपडपट्टीत साऱ्यांच्या समोर कोथळा काढला होता. रक्तबंबाळ अवस्थेत राजाभाऊ तिथंच कोसळला. राजाभाऊंचा मित्र शंभू मीरचंदानीला बोलायला पुढे आला; पण त्यापूर्वीच मीरचंदानीच्या साथीदारांनी त्याला तिथंच सर्वांसमोर लाथाबुक्क्यांनी तुडवायला सुरवात केली. मग मात्र इतर कुणीही पुढे आलं नाही. मीरचंदानी आणि त्यांचे गुंड साथीदार सगळ्यांना धमकी देऊन तिथून निघून गेले. मागे उरला राजाभाऊच्या बायकोचा कानाचे पडदे फाडणारा तो आक्रोश. थिजलेल्या नजरेनं ते भीषण कृत्य बघणारी राजाभाऊंची दोन मुलं. झोपडपट्टीतला कुणीही मीरचंदानीविरुद्ध साक्ष द्यायला पुढे आला नाही. जिवाच्या भीतीनं राजाभाऊची बायको तिच्या मुलांना घेऊन झोपडपट्टी सोडून गेली. त्या व्यवहारात मीरचंदानीला भरपूर फायदा झाला. त्याचं भरपूर 'नाव' झालं. त्या यशानंतर मीरचंदानी अगदी मोकाट सुटला; पण मग असं दुसऱ्यासाठी का म्हणून काम करायचं, म्हणून मग तो स्वतःच बिल्डर व्यवसायात घुसला आणि त्यात प्रचंड यशस्वी ठरला. तर असा हा मीरचंदानी. त्याच्या या निर्दयी स्वभावाच्या जोरावर वेळप्रसंगी लोकांना धाकदपटशा दाखवत, तर वेळप्रसंगी काटा काढत काही वर्षांतच मीरचंदानीने फार मोठी मजलमारली होती. या सगळ्याचा कधी कधी कंटाळा आला, की मीरचंदानी रॉक्सीला जाऊन बसत असे. तिकडे कायम इंग्रजी चित्रपट लागत. मीरचंदानीला त्या चित्रपटांमधल्या गोऱ्या-चिट्ट्या नायिका आणि ते डॅशिंग हिरो जाम आवडायचे.

नंतर तो आपल्या घरीच डीव्हीडी प्लेअरवर इंग्रजी चित्रपट पाहू लागला. विशेषतः जुने इंग्रजी चित्रपट. गॉडफादर पाहून तो अगदी वेडा-पिसा झाला होता. मार्लन ब्रँडोने तर त्याला इतकं झपाटून टाकलं, की तो स्वतःला गॉडफादर - Don Vito Corleone - समजू लागला. एखाद्या झोपडपट्टीत जागा खाली वगैरे करायची असली, की तो समोरच्याला सांगे- ' आय विल मेक हिम ॲन ऑफर; ही कान्ट रिफ्यूज.'

पण सगळेच दिवस सारखे नसतात. मीरचंदानीच्या या अनिर्बंध घोडदौडीला लगाम घातला होता मखिजाने. मीरचंदानी शेर असेलतर मखिजा सव्वाशेर होता. त्याला राजकारण्यांचा आशीर्वाद होता आणि याच गोष्टीमुळे मीरचंदानी आजकालआतल्या आत धुमसत होता. मखिजावर सूड उगवण्यासाठी काय करता येईल, याचा तो विचार करत होता. दारावर टकटक झाली तसं मीरचंदानीनं डोकं वर केलं. दारात बांगरे होते.

'साहेब, ते मागे आपलं बोलणं झालं होतं, तो तरुण आला आहे.'

'अनिलका काय तो?'

'हो साहेब.'

'ठीक आहे. पाठवून द्या त्याला आत.'

थोड्या वेळाने दार पुन्हा उघडलं. एक तजेलदार आणि तरतरीत तरुण दारात उभा होता. साधारण तिशीचा असेल. चेहऱ्यावर बुद्धिमतेची झाक दिसत होती.

'मी आत येऊ का सर?' त्याने विचारलं.

'ये.'

तो तरुण आत येऊन समोर उभा राहिला.

मीरचंदानीनं त्याला समोरच्या खुर्चीत बसायला सांगितलं.

'माझ्या मुलानं- समीरनं तुझ्याबद्दलसांगितलं मला. तू काहीतरी महत्त्वाचं संशोधन करतो आहेस आणि त्या संदर्भात तुला माझी भेट हवी आहे म्हणून,' मीरचंदानी म्हणाला. 'असं काय संशोधन आहे? मी पडलो बिल्डर माणूस. मला या असल्या गोष्टींशी काही देणं-घेणं नाही. बाय द वे, समीरशी तुझी ओळख कशी?'

'समीरशी माझी ओळख फेसबुकवर झाली. त्याचा आणि माझा एक कॉमन मित्र निघाला. आपापसात फेसबुकवर गप्पा मारतामारता ओळख वाढली. तेव्हा मी त्याला या संशोधनाबद्दलसांगितलं.'

'काय, नेमकं काय संशोधन आहे आणि आम्हाला काय त्याचा उपयोग?' 'सांगतो. मी एका विशिष्ट प्रकारच्या रिइन्फोर्स्ड प्लॅस्टिकवर काम करतो आहे आणि ते पूर्ण व्हायच्या मार्गावर आहे.'

'बरं मग?'

'हे प्लॅस्टिक बांधकाम क्षेत्रात फार मोठी क्रांती घडवून आणेल. बांधकामात बऱ्याच ठिकाणी तुम्ही वापरात असलेल्या धातूंऐवजी तुम्ही या प्लॅस्टिकचा वापर करू शकता.'

'पण असं मी का करावं?'

'हे प्लॅस्टिक सध्या वापरण्यात येणाऱ्या धातूंइतकंच मजबूत, पण त्यापेक्षा प्रचंड स्वस्त पडेल. माझ्या आकडेमोडीप्रमाणे हे प्लॅस्टिक वापरल्याने तुमचा बांधकाम खर्च कमीत कमी ४० टक्क्यांनी कमी होईल.' 'काय सांगतोस काय? आर यू शुअर?' मीरचंदानी थक्क झाला.

'हो सर,' अनिलठामपणे म्हणाला.

मीरचंदानी विचारात पडला. कारण बांधकाम खर्च कमीत कमी ४० टक्क्यांनी कमी म्हणजे विचार करण्यासारखीच गोष्ट होती.

'पण मग जर असं असलं तरी बाकी लोकसुद्धा ते प्लॅस्टिक वापरतील. मग मला त्यात काय फायदा?' मीरचंदानीनं मुद्द्याला हात घातला.

'त्यासाठीच तर मी तुम्हाला भेटायला आलो आहे, सर,' अनिल हसून म्हणाला.

माणूसपणाच्या अद्‌भुत गोष्टींचा

सुधा मूर्ती यांचा खजिना...



गोष्टी माणसांच्या

वाइज अँड अदरवाइज

आयुष्याचे धडे गिरवताना



परीघ

महाश्वेता



सुकेशिनी

बकुळा

आजीच्या पोतडीतल्या गोष्टी



थैलीभर गोष्टी



पुण्यभूमी भारत

स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं..

हरवलेल्या मंदिराचे रहस्य

सामान्यांतले असामान्य



डॉलर बहू

अस्तित्व



पितृऋण

सर्व पुस्तके eBooks स्वरूपात उपलब्ध

नवं कोरं

एक बंडखोर राजकन्या ते मृत्यूला चकवा देणारी जपानची गुप्तहेर...तब्बल ३९ वर्षे अज्ञातवासात राहिलेल्या योशिको कावाशिमाची वादळी कहाणी

वादळफूल

लेखक : रेई किमुरा

अनुवाद : वासंती घोसपूरकर



Book Available

पृष्ठसंख्या : २७२ । किंमत : ३००/-

नवं कोरं

स्त्रीमुक्तीचं बाळकडू कोळून प्यायलेल्या समर्थ स्त्रीची कविता...

मरी मरी जाय सरीर

योजना यादव

पृष्ठसंख्या : ११२ । किंमत : १४०/-

Book Available

'म्हणजे?'

'सर, हे संशोधन शेवटच्या टप्प्यात आहे; पण काही लाख रुपये कमी पडताहेत. जर तुम्ही मदत केलीत तर..'

'तर काय?'

'मी हे तंत्रज्ञान तुम्हाला विकेन. त्याचं पेटंट घ्यायचं. म्हणजे बाजारात तुमच्याशिवाय इतर कुणीही हे तंत्रज्ञान वापरू शकणार नाही. कुणाला वापरायचं असेल तर त्याची फी त्यांना तुम्हाला द्यावी लागेल.'

मीरचंदानीचे डोळे आनंदानं विस्फारले.

मखिजावर सूड कसा उगवायचा हाच विचार तो करत होता. नेमकी या संशोधनाच्या रूपानं ती संधी त्याच्यापुढे चालून आली होती. काही लाख रुपये या संशोधनासाठी द्यायचे म्हणजे त्याच्यासाठी काही मोठी गोष्ट नव्हती. ते प्लॅस्टिक वापरून बांधकाम खर्च कमी होणार होता. म्हणजे तो स्वस्त कोटेशन्सच्या जोरावर हमखास मखिजाकडून मुंबईतले मोक्याचे प्रकल्प हिसकून घेऊ शकत होता.

'पण हे संशोधन अयशस्वी तर नाही ना ठरणार?'

'नाही सर. त्याची काळजी नको. आमच्या प्राथमिक चाचण्या पूर्णपणे यशस्वी ठरल्या आहेत.'

'गुड. बेस्ट लक.'

मीरचंदानीचा निरोप घेऊन अनिल तिथून निघाला.

* * *

पुढचे सहा महिने धावपळीचे गेले. दर आठवड्याला अनिल त्याच्या संशोधनातील प्रगतीची माहिती मीरचंदानीला देत होता. अखेरीस संशोधन पूर्ण झालं. दरम्यान मीरचंदानीनं दुसऱ्या एका प्रयोगशाळेत या नवीन प्रकारच्या प्लॅस्टिकचं परीक्षण करवलं. त्याचे निष्कर्ष अनिलच्या परीक्षणाशी मिळतेजुळते आणि उत्साहवर्धक निघाले. मीरचंदानीच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यानं मखिजाला कोंडीत पकडण्याची तयारी चालू केली. अपेक्षेप्रमाणेच त्यानं कोटेशन्स कमी ठेवल्यामुळे सगळीकडे मखिजाच्या नाकावर टिच्चून गृहनिर्माणाची ती सारी महत्त्वाची कंत्राटं मीरचंदानीला मिळाली. महत्त्वाची कंत्राटं अचानक हातातून गेल्यामुळे- तेसुद्धा मीरचंदानीकडे- तिकडे मखिजाच्या गोटात प्रचंड खळबळ उडाली.

'सर, आपण या महत्त्वाच्या शोधाची घोषणा एखाद्या खास समारंभात करायची का?' अनिलने मीरचंदानीला विचारलं.

'ते कशासाठी?'

'अहो तिथे तुमच्या सगळ्या प्रतिस्पर्ध्यांना बोलवायचं आणि ही घोषणा केल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बघून किती धमालयेईल.'

मीरचंदानीचे डोळे आनंदाने लकाकले. या शोधाची घोषणा जेव्हा होईल, त्या वेळी मखिजाच्या चेहऱ्यावर काय भाव येतीलया कल्पनेनं मीरचंदानीला मनातल्या मनात गुदगुल्या झाल्या. त्याचा काळवंडलेला चेहरा पाहू तेव्हाच आपल्याला सुडाचं खरं समाधान मिळेल, हे त्याला जाणवलं. त्यानं ती सूचना मान्य केली.

* * *

कार्यक्रमाचा दिवस उजाडला. कार्यक्रमात काहीतरी महत्त्वाची घोषणा होणार, हे एव्हाना साऱ्यांना कळलं होतं; पण नेमकी कोणती घोषणा, हे कुणाला ठाऊक नव्हतं. त्यामुळे साऱ्यांची उत्सुकता अगदी शिगेला पोहोचली होती. सारे निमंत्रित लोक जमू लागले. बांगरे साऱ्यांचं जातीनं स्वागत करत होते. मध्येच एक इंपोर्टेड गाडी आली. त्यातून मखिजा उतरला. आपल्या खास प्रतिस्पर्ध्याचं स्वागत करण्यासाठी स्वतः मीरचंदानी तिथे अवतरला. वरकरणी मानभावीपणे हसून दोघांनी एकमेकांकडे पाहिलं आणि हात जोडून नमस्कार केला.

पत्रकार मंडळीसुद्धा जमा झाली होती.

समारंभाची वेळ झाली तरी अजून अनिलचा पत्ता नव्हता. मीरचंदानीने त्याला फोन लावला.

'अरे अनिल आहेस कुठे?'

'लॅबमध्ये,' पटकन अनिल बोलून गेला.

'काय? अरे, अजून लॅबमध्येच आहेस? अरे मग तू इथे पोहोचणार कसा? दहाच मिनिटं राहिलीत कार्यक्रमाला.'

'सॉरी! सॉरी! चुकून बोललो. लॅबमध्ये नाही. मी वाटेतच आहे. पोहोचेन तिथे पाचच मिनिटांत.'

'हुश्श!' मीरचंदानीने सुटकेचा निःश्वास टाकला आणि म्हणाला, 'बाबा रे, असा धक्का देऊ नकोस. पचवता येणार नाही मला. हृदय नाजूक झालंय माझं वयोमानानुसार.'

'नाही सर. हा मी पोहोचलोच पाच मिनिटांत.' आणि बोलल्याप्रमाणे पाच मिनिटांत अनिल गेटपाशी हजर होता. त्याला पाहताच मीरचंदानीनं त्याला आत येण्याची खूण केली आणि ते आत मंचावर आपल्या खुर्चीवर जाऊन बसले. अनिलबरोबर दिसायला बऱ्यापैकी पण चुणचुणीत वाटणारी एक मुलगी देखील होती; पण घाईत असल्यानं तिच्याबद्दल विचारायला मीरचंदानी थांबला नाही.

त्याच्या पाठोपाठ थोड्याच वेळात अनिल त्या तरुणीसह आत आला आणि मंचाकडे जाऊन आपल्या खुर्चीवर बसला. ती तरुणी खाली उपस्थितांमध्ये एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन बसली.

कार्यक्रमाला सुरवात झाली. मीरचंदानी माईकसमोर आला. आता तो अशी नेमकी काय घोषणा करणार हे जाणून घेण्यासाठी साऱ्या उपस्थितांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सुरुवातीला मीरचंदानीनं सर्व उपस्थित मंडळींचे (विशेषतः बिल्डर मंडळींचे) आभार मानले. आपण बिल्डर लोक जनतेला कसं छप्पर मिळवून देतो, त्यांची स्वप्नं पूर्ण करतो वगैरे फालतू पोपटपंची केल्यानंतर तो वळला मुख्य घोषणेकडे. आपल्या संशोधक चमूनं कसा एका नवीन प्रकारच्या प्लॅस्टिकचा शोध लावला आणि त्यामुळे गृहनिर्माण क्षेत्रात कशी क्रांती घडून येणार याचं रसभरीत वर्णन तो करू लागला. या शोधाच्या जोरावर 'मीरचंदानी कन्स्ट्रक्शन्स' ही प्रतिस्पर्ध्यांच्या नाकावर टिच्चून कशी अग्रगण्य गृहनिर्माण कंपनी बनणार, याचं वर्णन तो करू लागला. बोलताना त्याची नजर उपस्थितांमध्ये समोरच्या रांगेत बसलेल्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर- विशेषतः मखिजावर होती. त्या सर्वांचे चेहरे रागाने धुमसत होते. ते पाहून मीरचंदानीला भाषण करता करता अजूनच आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. आता उद्या आपल्या सर्व प्रतिस्पर्धी कंपन्यांच्या शेअर्सची शेअर

बाजारात काय धुळधाण उडणार, या कल्पनेनं त्याला गुदगुल्या होत होत्या. आपलं बोलून झाल्यावर या शोधाविषयी सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत या शोधाची माहिती सांगण्यासाठी त्यानं अनिलला बोलावलं.

अनिलनं सर्वांना कळेल अशा प्रकारे या शोधाचं गृहनिर्माण क्षेत्रात असलेलं महत्त्व विशद केलं. वर्तमानपत्रांच्या, न्यूज चॅनेलच्या वार्ताहरां- सकट सर्व उपस्थित मंडळींनी- मीरचंदानीच्या प्रतिस्पर्ध्यांचा अपवाद वगळता - टाळ्यांचा कडकडाट केला. सर्वांचे आभार मानून अनिल आपल्या खुर्चीच्या दिशेनं निघाला; पण मग मध्येच थांबला आणि मागे परतला.

'अरे हो, या अशा महत्त्वाच्या दिवशी मी एक छोटासा करमणुकीचा कार्यक्रम सादर करू इच्छितो.'

साऱ्यांनी- विशेषतः मीरचंदानीनं- कुतूहलानं त्याच्याकडे पाहिलं.

अनिलनं आयोजकांना खूण केली. त्याबरोबर साधारण सहा फूट उंचीचे दोन लाकडी पेटारे मंचावर आणण्यात आले. ते दोन्ही पेटारे एकमेकांपासून दूर मंचाच्या विरुद्ध टोकांना ठेवण्यात आले. मघाशी अनिलबरोबर आलेली ती तरुणी मंचावर आली. तिनं मंचाच्या डावीकडे असलेल्या पेटाऱ्याचा दरवाजा उघडला आणि ती आत गेली. तिने दरवाजा बंद करून घेतला.

अनिलने प्रेक्षकांना विचारलं, 'आताच तुम्ही पाहिलेली मुलगी कुठल्या पेटाऱ्यात गेली?' सर्वांनी एकमुखाने मंचाच्या डावीकडच्या पेटाऱ्याकडे बोट दाखवलं.

अनिल हसला. त्यानं हातांनी टाळी वाजवली. त्यासरशी मंचाच्या उजवीकडच्या पेटाऱ्याचं दार उघडलं आणि काय आश्चर्य, मघाशी डाव्या पेटाऱ्यात शिरलेली ती तरुणी त्या उजवीकडच्या पेटाऱ्यातून बाहेर आली. त्याबरोबर टाळ्यांचा मोठा कडकडाट झाला.

अनिलनं हसून प्रेक्षकांना विचारलं, 'तुम्हाला काय वाटतं? हे काय होतं?' 'जादू,' एका सुरात अनेक आवाज उमटले. 'नाही मंडळी. ही जादू नाही,' अनिल म्हणाला. त्याचा चेहरा गंभीर होता.

'ही जादू नाही. तर हे प्रत्यक्षात घडलं. ही आहे विज्ञानाची किमया. मी आणि माझी बहीण- अनिता आम्ही दोघांनी मिळून लावलेला नवा शोध. आमची गेल्या दहा वर्षांची मेहनत. याचा वापर करून केवळ काही क्षणांत तुम्ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करू शकता. इंग्रजीत सांगायचं झालं तर- टेलेपोर्टेशन- किंवा टेलेट्रान्स्पोर्टेशन. मराठीत आपण याला 'दिव्य संचार तंत्रज्ञान' म्हणू या.'

सारे जण डोळे फाडून अनिलकडे पाहत होते.

तेवढ्यात एक पत्रकार उभा राहिला.

'पण हे तंत्रज्ञान लांब अंतराचा प्रवास करण्यासाठी वापरता येईल का?' त्यानं विचारलं.

'हो,' अनिल आत्मविश्वासपूर्वक म्हणाला.

'किती लांब? आणि कशावरून हे तंत्रज्ञान निर्धोक आहे?'

अनिलहसून म्हणाला, 'हो! हे तंत्रज्ञान निर्धोक आहे आणि नुकताच मी हे तंत्रज्ञान वापरून चाळीस किलोमीटर्सचा प्रवास केला. ही परिषद सुरू होण्यापूर्वी केवळ पाच मिनिट आधी मी येथून चाळीस किलोमीटर दूर माझ्या प्रयोगशाळेत होतो. खोटं वाटलं तर मीरचंदानी सरांना विचारा. त्यांनी फोन केला होता मला. त्यानंतर केवळ पाच मिनिटांच्या आत मी या परिषदेच्या स्थानाच्या जवळ येऊन पोहोचलो होतो.'

मीरचंदानी थक्क होऊन अनिलकडे पाहत होता. परिषदेत कुजबूज सुरू झाली होती.

'बरं! पण या तंत्रज्ञानाचा आणखी काय फायदा होऊ शकेल?' आणखी एका पत्रकारानं विचारलं.

'इतर फायदे तर बरेच होतील; पण मला विचारालतर सर्वांत महत्त्वाचा फायदा मुंबईतल्या प्रवासाला, महागड्या घरांसाठी काढलेल्या कर्जाच्या डोंगराखाली दबलेल्या, बिल्डर्सच्या मनमानीला गांजून गेलेल्या, पिचलेल्या सर्वसामान्य नोकरदार वर्गाला याचा फायदा होईल. लक्षात घ्या, त्यांना ऑफिसपासून जवळ महागडी - बिल्डर्सनी फुगवलेल्या किमतीतली घरं घ्यायची गरज नाही. ते ऑफिसपासून लांब स्वस्त घरं निवडू शकतात आणि घर ऑफिसपासून कितीही दूर असलं तरी दिव्य संचार तंत्रज्ञानानं काही मिनिटांत दूर अंतरावरीलआपल्या ऑफिसला हजर होऊ शकतात.'

परिषदेतली कुजबूज आता वाढली होती. सर्वसामान्य मंडळींचे चेहरे उजळले होते, तर बिल्डर समूहातीलबऱ्याच मंडळींचे चेहरे काळवंडले होते. स्वतः मीरचंदानी क्रुद्ध नजरेने अनिलकडे पाहत होता. त्यानं नुकतेच अनिलच्या भरवशावर बऱ्याच महागड्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये कोट्यवधी रुपये गुंतवले होते. आपल्या छातीचे ठोके जलद पडत असल्यासारखं त्याला वाटू लागलं.

'पण हे सारं तुम्हाला का करावंसं वाटलं?' कुणीतरी विचारलं.

अनिल खिन्नपणे हसला. 'याला कारण म्हणजे या बिल्डर जमातीत असलेले, पैशाला हपापलेले, पैशासाठी स्वतःच्या आईलाही विकतील असे काही लोक. कुठल्याही थराला जाणारे नीच, हरामखोर लोक.'

अनिल आपल्याकडेच पाहत बोलत आहे हे मीरचंदानीला जाणवलं.

मीरचंदानीकडेच पाहत तो पुढे म्हणाला, 'माझी ओळख करून देतो. मी अनिल सावंत एक संशोधक म्हणून तुम्हाला ठाऊक आहे; पण माझी दुसरी ओळख म्हणजे पंचवीस वर्षांपूर्वी एका बिल्डरने आपल्या हव्यासापायी दिवसाढवळ्या ज्या प्रसिद्ध जननेत्याची हत्या केली होती त्या राजाभाऊंचा मी मुलगा आणि ही माझी बहीण- अनिता. आणि हा शोध म्हणजे आम्ही त्या बिल्डरवर उगवलेला सूड.'

मीरचंदानी थक्क होऊन अनिलकडे पाहत होता. त्याला अनिलआणि अनिताच्या जागेवर पंचवीस वर्षांपूर्वी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या राजाभाऊंची मुलं दिसू लागली. अचानक चित्र पुन्हा धूसर झालं आणि अनिलच्या जागी त्याला गॉडफादर - Don Vito Corleone दिसला. तो थंड नजरेनं मीरचंदानीकडे पाहत म्हणाला, 'सूड ही अशी डिश आहे, जी थंड करून खाण्यात खरी मजा आहे.'

आपल्या छातीतून एक जोरदार कळ गेल्याचं मीरचंदानीला जाणवलं आणि खुर्चीतून उठताउठता तो खुर्चीत कोसळला ते पुन्हा कधीही न उठण्यासाठी.

nnmalvankar@gmail.com

❖

नवं कोरं

नवी पुस्तकं, नवं ज्ञान...
सोप्या पद्धतीत शिका विज्ञान...

डी.एस. इटोकर



दैनंदिन जीवनात आणि काही कारणाने वापरल्या जाणाऱ्या यंत्रांची रचना, कार्य आणि उपयुक्तता सांगणारे पुस्तक.

साधी यंत्रे

पृष्ठसंख्या : ७६ । किंमत : ९०/- Book Available

प्रयोग
वनस्पती विज्ञानाचे

पोमॅटोचे झाड, पांढरे फूल रंगीत बनविणे अशा रंजक प्रयोगांची माहिती देणारे पुस्तक.

पृष्ठसंख्या : १०० । किंमत : १२०/- Book Available

बाटलीतील कारंजे... झोका घेणारे पुस्तक...
डोलणारी पेन्सिल...
विज्ञानातील रंजकता सप्रयोग अधोरेखित करणारे पुस्तक.

विज्ञानातील गमतीजमती

पृष्ठसंख्या : ९२ । किंमत : ११०/- Book Available

विज्ञानातील रंजकता

डोलणारा ससा...डोलणारा पक्षी...
उडणारे बूच... विज्ञानातील रंजकता
सप्रयोग अधोरेखित करणारे पुस्तक.

पृष्ठसंख्या : ८४ । किंमत : १००/- Book Available

एका बँक दरोड्याचा तपास

सुरेश देशपांडे

बराच वेळ अजय त्या बोळाच्या टोकाशी उभा होता . आता रात्रीचे १२ वाजून गेले होते. रहदारी जवळ जवळ बंदच झाली होती. कुणी एखादा उशिरा जाणारा-येणारा असलाच तर किंवा एखादी टॅक्सी म्हणा, प्रायव्हेट कार गेली तरच तेवढीच जाग, बाकी सामसूम. आजूबाजूची दुकाने, ऑफिसेस, हॉटेल्स, पानटपऱ्या सगळे काही बंद झाले होते. दिव्याचे उभे खांब रोगट पिवळा प्रकाश फेकत आपले अस्तित्व जपत होते.

अजय ज्या अरुंद बोळाच्या टोकाशी उभा होता तो बोळ मुख्य रस्त्यापासून तिरका असा आता गेला होता. त्या बोळात रहदारी नव्हती. असेलच कशी? कारण त्या बोळात दोन्हीकडच्या इमारतींच्या मागच्या बाजू येत होत्या. त्यामुळे त्या बोळात खूप घाण होती. दोन्हीकडच्या इमारतींतील माणसांनी फेकलेला कचरा, घाण त्या बोळात साठली होती. कधीमधी गुरंढोरं किंवा कचरा वेचणारी मुलं, बायका तिथे येत असत आणि आता रात्रीच्या या वेळेस कोण कशाला मरायला येतंय तिथे?

अजयनं मागच्या भिंतीला टेकवलेलं उजवं पाऊलखाली घेतलं. तास दीड तासापेक्षा जास्त वेळ तो तिथे उभा होता. त्यामुळे उभं राहून पाय दुखायला लागले की कधी उजवा तर कधी डावा पाय भिंतीला टेकून तो आधार घेत असे. सिगारेटचा शेवटचा कश त्यानं मारला आणि थोटूक विझवून बाजूच्याच गल्लीत फेकलं.

'चला अजयराव, कामगिरीला सुरुवात करा!' स्वतःशीच पुटपुटत अजयनं आपल्या खांद्यावरची सॅक नीट केली. सॅकमधली हत्यारं बाहेरूनच एकदा चाचपडून बघितली. इकडे-तिकडे पाहत भराभर पावलं उचलत तो त्या अंधाऱ्या बोळात शिरला. डाव्या हाताच्या शेवटच्या इमारतीच्या बरोबर मागे तो थांबला. 'हीच ती इमारत' त्यानं स्वतःच्या मनाशी खात्री करून घेतली. एकदा वर बघून घेतलं. पहिल्या मजल्यावरच्या उभट खिडकीमधून अंधूकसा प्रकाश बाहेर झिरपत होता. 'यस, हीच खिडकी,' असं मनाला समजावत त्यानं आपल्या सॅकमधून प्लॅस्टिकचा चार फुटी रॉड बाहेर काढला. या रॉडच्या आत एकात एक बसतील असे आणखीन तीन रॉड होते. ते सर्व रॉड जुळविले की अठरा-वीस फूट लांबीचे होत असत.

अजयनं मग सॅकमधून प्लॅस्टिकच्या जाड दोऱ्याची शिडी बाहेर काढली. त्या शिडीच्या पुढच्या दोन्ही टोकांना लोखंडी हूक होते. प्लॅस्टिक रॉडच्या साहाय्यानं त्यानं ते शिडीचे दोन्ही हूक वरच्या, सोळा फुटांवरच्या, अंधूक प्रकाश येणाऱ्या खिडकीच्या चौकटीला लागून असलेल्या आडव्या भिंतीवर अडकवले. मग प्लॅस्टिक रॉडचे भाग वेगवेगळे करून पुन्हा एकात एक घालून अत्यंत काळजीपूर्वक सॅकमध्ये ठेवले. वर अडकलेली शिडीची दोन्ही टोके ओढून हूक व्यवस्थित अडकल्याची खात्री करून घेतली. एकदा इकडे-तिकडे बघत त्यानं दोरीच्या शिडीवरून वर चढण्यास सुरुवात केली.

खिडकीपर्यंत पोचल्यावर खिडकीच्या लाकडी चौकटीत, तिरक्या खाचांत बसविलेल्या काचा एक एक करून काढल्या आणि सॅकमध्ये ठेवल्या. मग मोकळ्या झालेल्या जागेतून, अंग आक्रसून घेत तो खिडकीच्या आत उतरला आणि काचा परत लावून ठेवल्या.

तो उतरला ती बाथरूम होती. बाथरूमचा दरवाजा उघडून, सावधगिरी बाळगत तो बाहेरच्या पॅसेजमध्ये आला आणि तिथून बँकेच्या प्रशस्त हॉलमध्ये आला. दिवसा गर्दीनं फुलून जाणारी बँक आता रात्री एकच्या सुमारास सुनीसुनी दिसत होती. हॉल, मॅनेजरची केबिन, कॅश काऊंटर्स ,निर्जीव इंडिकेटर्स, कस्टमर्सकरिता असलेले सोफे...सगळं कसं शांत शांत..!

अजयनं स्वतःला सावरलं. आपल्या कामावर लक्ष केंद्रित केलं. मॅनेजरच्या केबिनच्या बाजूनं तळघरात जाणारा जिना होता. सेफ डिपॉझिट व्हॉल्टही तिथेच होते आणि कॅशची भरभक्कम तिजोरीही तिथेच होती. अजयनं प्रथम अलगद खाली बसत सिक्युरिटी सिस्टमचा नाईट मोड बदलून डे मोड केला. नंतर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचं बटन ऑफ केलं. तत्पूर्वी काळजी म्हणून त्यानं नाका-तोंडावरून रुमाल बांधला होता. डोळ्यांवर ब्राऊन गॉगल होता. डोक्यावर हॅट होती. त्यामुळे आणखीन कुठला सीसीटीव्ही सुरू असलाच तरी त्याचा चेहरा दिसला नसता.

सर्व काळजी घेतल्यावर अजय जिना उतरून तळघरात गेला. सेफ डिपॉझिट व्हॉल्ट आणि तिजोरीच्या भागात प्रवेश करण्यापूर्वी एक मोठा पोलादी दरवाजा होता; पण अजयला त्याची अजिबात काळजी नव्हती. सॅकमधून त्यानं की वॉलेट काढलं. त्यातल्या किल्ल्यांवरचे नंबर्स बघून त्यानं आधी पोलादी दरवाजा उघडला. मग आतलं लोखंडी ग्रील्सचं दार उघडलं. अजय आता तिजोरीसमोर उभा होता. तिजोरीच्या चारही चाव्या त्याच्याकडे होत्या. अत्यंत सावकाशपणे एकएक करीत चारही चाव्या लावून तिजोरीचा जड दरवाजा हँडलफिरवून उघडला.

अजयला अजिबात घाई नव्हती. बँकेत शिरल्यापासून आतापर्यंत फक्त वीसच मिनिटं झाली होती. त्यानं तिजोरीतल्या कॅशकडे बघितलं. क्षणभर त्याला आठ-दहा वर्षांपूर्वीचे दिवस आठवले. त्याही वेळेस अशाच पद्धतीनं तो तिजोरी उघडत असे आणि बंद करीत असे. कॅश काढताना आणि ठेवताना रजिस्टरमध्ये नोंद करायची, त्यासमोर सही करायची आणि पुन्हा रजिस्टर आतमध्ये ठेवून दरवाजा बंद करायचा; पण त्यानंतर पुलाखालून किती पाणी वाहून गेलं! क्षणभर गत आठवणीत तो रमला; पण मग सगळे विचार त्यानं मागे सारले.

दोन हजार पाचशे रुपयांची बंडलं मोजून त्यानं पन्नास लाख रुपये आपल्या सॅकमध्ये भरले. तिजोरी बंद करण्यापूर्वी पूर्वीच्याच सवयीनुसार रजिस्टरमध्ये नोंद करायला घेतली; पण लगेच सावध झाला. 'अरे, आपण काय करीत होतो? आपल्या हस्ताक्षरावरून संशय येऊ शकेल! छे, छे ! असं व्हायला नको,' असं म्हणत त्यानं त्याच्या काळातीलनोंदी आहेत का हे पाहण्यासाठी सहज म्हणून एक जुनं रजिस्टर चाळून बघितलं. त्याच्या काळातील, त्याच्या हस्ताक्षरातील नोंदी त्याला दिसल्या. ते रजिस्टर त्यानं बंद करून ठेवलं. तिजोरीत त्यानं दिसेल अशा ठिकाणी एक कागद ठेवला. वर्तमानपत्रातील वेगवेगळे शब्द कापून ते एका कागदावर चिकटवून त्यानं चिठ्ठी तयार केली होती. 'या तिजोरीतील पन्नास लाख रुपये गायब झाले असून, त्याबद्दल बँकेतील कोणालाही जबाबदार धरू नये...आपला विश्वासू' असा मजकूर त्या चिठ्ठीत होता. चिठ्ठी ठेवल्यावर त्याला काय वाटलं कुणास ठाऊक! त्यानं त्याच्या पुढे तारीख टाकली. कदाचित पूर्वीची सवय अजून गेली नसावी. हस्ताक्षरावरून आपण ओळखले जाऊ नये ही आधीची खबरदारी तो विसरला. ही चिठ्ठी ठेवताना त्याला हसू आलं. विशेषतः 'आपला विश्वासू' या शब्दांवर!

विश्वासू माणूस कधी चोरी करतो का? हसत हसत त्यानं तिजोरी बंद केली आणि ज्या क्रमानं दरवाजे उघडले होते त्याच क्रमानं दरवाजे बंद करून तो बँकेच्या हॉलमध्ये आला. आपण अत्यंत हुशारीनं केलेल्या या चोरीचा शोध कोणालाही लागणार नाही, अशी त्याची पूर्ण खात्री होती. तो अजिबात उत्तेजित झाला नव्हता. त्याच्या छातीचे ठोकेही वाढले नव्हते. कोणताही पुरावा त्यानं मागे ठेवला नव्हता. पुन्हा पुन्हा त्याबद्दल त्यानं खात्री करून घेतली होती. तो शांतपणे हॉलमधल्या सोफ्यावर बसला. सॅक बाजूला ठेवली आणि तो आडवा झाला.

'चला अजयराव, आता आठपर्यंत झोपायचं,' असं म्हणत काही क्षणांत तो झोपलादेखील. बहुधा उद्या सकाळी काय होईल, याचं स्वप्न त्याला पडत असावं. सकाळी आठला तो उठला. बाथरूममध्ये जाऊन फ्रेश होऊन आला. साडेआठला रामदास वॉचमन येईल. बाहेरचं शटर, मग लोखंडी दरवाजा, त्यानंतर हा भलामोठा लाकडी दरवाजा उघडून आत येईल. हा सगळा क्रम अजयला माहीत होता.

८.२५ला अजय लाकडी दरवाजाच्या बाजूच्या भिंतीला टेकून शांतपणे उभा राहिला. ८.३०ला बाहेरचं शटर करकर करत उघडल्याचा आवाज आला. मग लोखंडी दरवाजा सरकविल्याचा खडखडाट ऐकायला आला. मग भल्यामोठ्या लाकडी दरवाजाच्या कुलपात चावी फिरविल्याचा आवाज... सोबत वॉचमनचं गुणगुणणं... हे सर्व ऐकत अजय तयारीत उभा होता. वॉचमननं लाकडी दरवाजाची झापं आत ढकलली. अजय उजव्या झाप्यामागे झाकला गेला म्हणून वॉचमनला दिसू शकला नाही. वॉचमन सरळ आत गेला. एसी यंत्रणा सुरू करण्यासाठी जिना उतरून तो तळघरात गेला...आणि इथं अजय शांतपणे दरवाजाआडून पुढे आला आणि राजरोस बँकेच्या बाहेर पडला. आता तो मेनरोडवर होता. त्यानं टॅक्सीला हात केला.

***

सकाळी दहा वाजता बँकेत हाहाकार उडाला होता. बँकेचे सर्व अधिकारी, सर्व कर्मचारी 'हे कसं घडलं' याबद्दल दबक्या आवाजात चर्चा करीत होते. हेडऑफिसला फोन गेला होता. सिक्युरिटी,पोलीस, व्हिजिलन्स काही क्षणांत येऊन पोचणार होते. पोलीस स्टेशनवरून प्रेसवाल्यांना बातमी कळल्यामुळे वार्ताहर, फोटोग्राफर, टीव्हीवाले सगळेच बँकेत धावत आले. १०.५० ला पहिली ब्रेकिंग न्यूज झळकली...'मुंबईत बँकेवर पन्नास लाखांचा दरोडा...!'

पोलिसांनी सर्वांनाच हॉलमध्ये एकत्र करून प्रश्न विचारायला सुरुवात केली. पहिली सरबत्ती अर्थातच वॉचमनवर. 'साहेब, मी बरोबर ८.३०ला आलो. एसी सुरू करण्यासाठी बेसमेंटमध्ये गेलो, तेव्हा माझ्या लक्षात आलं की अलार्म सिस्टम नाईट मोडवरून डे मोडवर केली आहे. आधी मला वाटलं, की काल संध्याकाळचा वॉचमन मोड चेंज करायला विसरला असेल; पण तसं झालं असतं तर रात्री सायरन वाजला असता. याचाच अर्थ ज्यानं चोरी केली आहे, त्याला या सिस्टमची माहिती असणार आणि ही गोष्ट मी लगेच साहेबांना पण सांगितली.' वॉचमननं आपण कशी काळजी घेतली आणि आपला कसा दोष नाही त्याचा खुलासा केला.

''आणि सीसीटीव्हीचं काय?'' पोलिसांचा पुढचा प्रश्न.

''चोरी लक्षात आल्यावर सीसीटीव्ही फुटेज बघण्यासाठी आम्ही गेलो तर सीसीटीव्ही ऑफ होता,'' मॅनेजर म्हणाले.

तिजोरीत सापडलेली चिठ्ठी पोलिसांनी ताब्यात घेतली. कुठे काही ठसे वगैरे मिळतात का, तेही शोधलं; पण कुठेच काही माग नव्हता. मॅनेजर, कॅशिअर, अकाउंटंट सर्वांच्या जबान्या घेऊन झाल्या. कोणावरही संशय घेण्यासारखं काही नव्हतं. हेड ऑफिसचे लोक आले. त्यांनी त्यांच्या परीनं चौकशी केली. दिवसभर टीव्ही चॅनेल्सनी तीच तीच बातमी सातत्यानं दाखवून सनसनाटी निर्माण केली. यापूर्वी बँकांवर पडलेल्या दरोड्यांच्या कथा सांगितल्या. पोलिसांचे, शासनाचे सुरक्षा व्यवस्थेवर कसं लक्ष नाही यावर चर्चा घडवून आणल्या आणि शेवटी लोकांचे हे पन्नास लाख रुपये पोलीस कसे मिळविणार, हा पन्नास लाखांचा प्रश्न उपस्थित

केला. बँक आणि सुरक्षा याविषयी काही तज्ज्ञांच्या मुलाखतीही घेतल्या गेल्या.

***

पोलिसांनी आणि बँक अधिकाऱ्यांनी जंगजंग पछाडूनही चोरी नेमकी कशी झाली ते कळत नव्हतं. तिजोरी उघडण्यापूर्वी शर्विलकानं तीन दरवाजे उघडले होते, याचाच अर्थ असा की त्याच्याकडे या सर्व दरवाजांच्या चाव्या होत्या; पण हा हुशार चोर आत आला कसा? बरं, तो चोर बँक बंद होण्याच्या वेळेस आत लपून बसला होता असं म्हणावं, तर त्या वेळेस सीसीटीव्ही सुरू होते. कुठे ना कुठे तो दिसलाच असता. आत येण्याचे सगळे संभाव्य मार्ग तपासून झाले. अगदी बाथरूमच्या ज्या खिडकीतून अजय आत आला होता, ती खिडकीही पाहून झाली. कुठल्याही काचा फुटल्या नव्हत्या. कुठेही चपलांचे, बुटांचे, हाताचे, पावलांचे ठसे आढळले नव्हते. तिजोरीत सापडलेली चिठ्ठी, वर्तमानपत्रांतून शब्द कातरून तयार केलेली... याचाच अर्थ चोरानं आपली ओळख अगदी हस्ताक्षरावरूनदेखील लक्षात येऊ नये इतक्या टोकापर्यंत काळजी घेतली होती. चोर खूप हुशार आणि चाणाक्ष होता, यात शंकाच नव्हती. त्याचं आत येणं, बाहेर जाणं, हेही एक गूढच होतं.

***

इकडे अजय आपल्या खोलीत नोटांनी भरलेली सॅक व्यवस्थित ठेवून, समोरच्या टीपॉयवर पाय पसरून, टीव्हीवरची तीच तीच दृश्यं पाहून स्वतःची करमणूक करून घेत होता. 'आम्हाला चोराचा माग मिळाला असून, लवकरच त्याला पकडू' ही इन्स्पेक्टर चव्हाणांची वल्गना ऐकून तर त्याला खूपच हसू आलं.

***

इन्स्पेक्टर चव्हाण हताश होऊन, निराश होऊन आपल्या चौकीत बसले होते. आज १५ दिवस झाले तरी तपास एक पैसादेखील पुढे सरकला नव्हता. काहीच क्लू मिळत नव्हता. कमिशनर, गृहमंत्री यांच्याकडून सतत विचारणा होत होती. मीडिया तर हात धुऊन मागे लागला होता. प्रिंट मीडियातून तर 'यांच्यापर्यंत मालपोचला असणार,' अशी शंका व्यक्त होत होती.

टेबलाखाली पाय पसरून, डोक्यामागे हाताचे तळवे एकमेकांत अडकवून चव्हाण डोळे मिटून शांतपणे बसले होते. विचार पन्नास लाखांच्या दरोड्याचाच! काय करावं सुचत नव्हतं.

''काय चव्हाण साहेब , काय म्हणतेय प्रगती?'' पंडित शिरोमणी चव्हाणांच्या समोरच्या खुर्चीत बसत म्हणाला.

''ये बाबा, आलास का तू! तूच एक विचारायचा बाकी राहिला होतास,'' कपाळावर आठ्या घालत चव्हाण म्हणाले.

''असं वैतागून कसं चालेल? डोकं शांत ठेवा. सगळ्या अँगलनं घटनेकडे पाहा; म्हणजे एखादं टोक मिळेल. मग तुम्ही चोरापर्यंत पोचाल,'' शिरोमणी म्हणाला.

''हे बघ शिरोमणी, मी सगळ्या बाजनं विचार केला. ज्या अर्थी लोखंडी ग्रिल,पोलादी दरवाजा, तिजोरी हे सर्व उघडलं गेलं म्हणजेच चोराकडे चाव्या होत्या. त्याला सिक्युरिटीची माहिती होती. त्या अर्थी चोर बँकेशी संबंधित आहे, यात शंकाच नाही,'' चव्हाण म्हणाले.

''हो, पण एवढा साधा निष्कर्ष तर कोणीही काढेल. त्यात तुम्ही नवीन काय सांगितलं?'' शिरोमणी म्हणाला, ''पण एक नक्की सांगतो, हा जो हुशार चोर आहे ना, हा मुख्य दरवाजा उघडून आला नाही हे नक्की ; पण तो बाहेर पडला ते मात्र पुढच्याच दरवाज्यानं.''

''कशावरून?'' चव्हाण काहीशा उत्सुकतेनं म्हणाले.

''अहो, बाहेरचं दहा फूट रुंद आणि अठरा फूट उंच शटर उघडताना खूप आवाज होतो आणि वेळही लागतो. आता ऐन मध्यरात्री समजा त्यानं शटर उघडलं असतं, तर प्रचंड आवाज झाला नसता का? आणि साहजिकच या आवाजानं आजूबाजूच्या बिल्डिंगमध्ये जाग आली असती.''

''तुझ्या बोलण्यात तथ्य आहे,'' चव्हाण म्हणाले.

''हो, पण तो मुख्य दरवाज्यातून कसा बाहेर पडला ते तुम्हाला बघायचंय का? चला माझ्याबरोबर. मी दाखवतो,'' शिरोमणी म्हणाला, तसे इन्स्पेक्टर चव्हाण लगेच तयार झाले. काहीतरी मार्ग दिसतोय या विचाराने ते उत्तेजित झाले .

''चल, लगेच निघू,'' असं म्हणत चव्हाण साहेबांनी कॅप उचलली. दोघंही बाहेर पडले. काही मिनिटांतच ते बँकेत पोचले.

''मॅनेजर साहेब,'' शिरोमणी म्हणाला, ''हा तुमचा मुख्य दरवाजा एकदा बंद करून पुन्हा उघडून दाखवाल का?''

''हो, हो, का नाही?'' असं म्हणत त्यांनी लगेच वॉचमनला हाक मारली आणि दरवाजा बंद करून पुन्हा उघडायला सांगितलं. वॉचमननं दरवाजाची दोन्ही झापं बंद करून घेतली. आता आतमध्ये मॅनेजरसह शिरोमणी, इन्स्पेक्टर चव्हाण होते. शिरोमणी पटकन दरवाजाच्या डाव्या बाजूच्या भिंतीला टेकून उभा राहिला. वॉचमननं हळूहळू दार उघडलं. त्याला समोर फक्त मॅनेजर आणि इन्स्पेक्टर चव्हाण दिसले. वॉचमन मॅनेजर साहेबांशी काही बोलणार एवढ्यात शिरोमणी वॉचमनच्या नकळत त्याच्या मागून बाहेर पडला. त्याची ती कृती पाहून इन्स्पेक्टर चव्हाण यांची खात्री पटली, की शर्विलक अशाच पद्धतीनं बाहेर पडला असावा.

शिरोमणी आतमध्ये येऊन म्हणाला, ''चोरानं रात्री चोरी केली असेल आणि मग अतिशय शांतपणे इथंच झोपला असेल. वॉचमन यायच्या आधी मी जसा आता दरवाजाच्या मागे उभा राहिलो, तसा लपून राहिला असेल आणि वॉचमन पुढे गेल्यावर मी जसा बाहेर पडलो तसाच बाहेर पडला असेल. आता चोर आतमध्ये कसा आला हे शोधलं पाहिजे.' एवढं बोलून इन्स्पेक्टर चव्हाणांचा निरोप घेत शिरोमणी गेलासुद्धा.

प्रगती शून्य!

कमिशनर साहेबांनी इन्स्पेक्टर चव्हाणांना दोनदा बोलावून झापलं होतं. बँकेनंदेखील चोर शोधणाऱ्यास बक्षीस जाहीर केलं होतं. शेवटी इन्स्पेक्टर चव्हाणांनी कमिशनर साहेबांना सांगितलं, की येत्या तीस दिवसांत चोराला पकडीन किंवा राजीनामा देईन.

आणि आजपर्यंत प्रगती शून्य! चोर हवेत विरून गेला ... शिरोमणी गायब झालाय .. पण त्यांचं अंतर्मन सांगत होतं, की हा शिरोमणी काही गप्प बसला नसेल; काहीतरी त्यानं शोधलंच असेल.

इन्स्पेक्टर चव्हाणांचा जीव वर-खाली होत होता. सगळे प्रयत्न करून झाले होते. बँकेची रचना आतून-बाहेरून पाहून झाली होती. अंडर-वर्ल्डमध्ये छापे मारून झाले होते. सराईत चोरांना बदडून काढलं होतं. चोर या पैशांवर मजा मारणार असा अंदाज बांधून त्यांनी शहरातील लेडिजबार, दारूगुत्ते, वेश्यांचे अड्डे पालथे घातले होते. खबऱ्यांना पिटाळलं होतं; पण प्रगती शून्यच!

त्यांचं डोकं भणभणायला लागलं. आता तो चोरीचा विषय सोडून द्यायचं त्यांनी ठरवलं. फारतर राजीनामा द्यावा लागेलएवढंच...! मग झकासपैकी हात ताणून आळस दिला. टेबलावरच्या ग्लासमधलं पाणी प्यायलं. शिपायाला कडक चहाची ऑर्डर दिली. टेबलाखाली पाय

पसरून, डोळे मिटून घेतले. शांत शांत वाटलं त्यांना. रिलॅक्स अवस्थेत बरं वाटलं. चहा आला. चहाचा आनंद घेत घोट घोट चहा घेतला. त्याची चव जिभेवर रेंगाळत असतानाच त्यांनी आपल्या चांदीच्या डबीतून सातारी जर्दा डाव्या हाताच्या तळव्यावर, डबीच्या मागच्या बाजूनं टकटक करत घेतला, त्यात प्युअर १२०/३०० तंबाखू मिक्स केला. छान सुगंध पसरला; मग डबी उलटी करून डबीच्या मागच्या खणातून,अंगठ्याच्या नखाने सुगंधी, गुलाबी चुना उकरला. डाव्या हातातीलतंबाखूत मिसळून, तर्जनीनं तंबाखू मस्त मळली, फक्की तोंडात टाकली.. व्वा ! काय मस्त जमलीय ! याला म्हणतात सुख. मरो ते ५० लाख!! जमलेली पिंक खिडकीबाहेर टाकून इन्स्पेक्टर चव्हाण खुर्चीत रेलून बसले. एक अर्धा तास मस्तपैकी झोप काढायची अशा सुखदायी विचाराची तंद्री लागली असतानाच टेबलावर टकटक झाली. इन्स्पेक्टर चव्हाणांना फारसं काही ऐकायला गेलं नाही. पुन्हा टकटक झाली तरी त्यांची तंद्री भंग पावली नाही. मग शेवटी त्या व्यक्तीनं चव्हाणांच्याच छडीनं त्यांच्या पायावर हलकेच चापट्या मारल्या. आता मात्र चव्हाण ताडकन उठले. बघतात तर समोर शिरोमणी! चव्हाण एकदम भडकलेच. एकतर छान लागलेल्या झोपेचं खोबरं केलं...आणि मागील२५ दिवसांत प्रगती शून्य..! आपलं सगळं फ्रस्ट्रेशन त्याच्यावर काढत ते जवळ जवळ ओरडलेच-

''भल्या गृहस्था, मला राजीनामा द्यायची वेळ आलीय आणि तू गायब? आता उगवतोयस? माझ्या अंगावरचा युनिफॉर्म उतरलेला बघण्यात तुला आनंदच होईलना?''

''अरे , हो हो, किती रागवाल? शांत होताय की जाऊ?'' शिरोमणी मिस्कीलहसत म्हणाला.

''जा!जा! तुझ्या मदतीची मला गरज नाही,'' चव्हाण अजूनही रागातच होते.

''ओके! मला वाटलं तुम्हाला गुड न्यूज सांगावी, तर तुम्ही मला हाकलता,'' शिरोमणी कृतक रोषानं बोलला आणि जाण्यासाठी वळला. झटक्यात इन्स्पेक्टर चव्हाणांची ट्यूब पेटली. ''अरे ! शिरोमणीकडे न्यूज आहे?'' ते टेबलामागून धावतच पुढे आले.

''अरे, थांब, थांब !'' त्याचे दोन्ही खांदे प्रेमाने दाबत ते म्हणाले, ''बस, बस इथे! सांग तुझी ती गुड न्यूज.''

''सांगतो; पण आधी चहा सांगा. मग १२०/३०० पण मागवा,'' शिरोमणी म्हणाला.

''माझ्या बापाचं लग्न आहे का ?'' असं ते म्हणाले; पण त्यांनी शिपायाला ऑर्डर दिली.

आपल्या सुटकेची वेळ जवळ आलीय हे त्यांच्या लक्षात आलं.

''बोलना रे बाबा आता. सांग तुझी ती गुड न्यूज.''

''चव्हाण साहेब, चोर मिळाला,'' एक एक शब्दावर जोर देत शिरोमणी म्हणाला.

''काय?'' इन्स्पेक्टर चव्हाणांचा आपल्या कानांवर विश्वासच बसत नव्हता. ''चोर मिळालाय?''

''कुठं? कसा? कोण आहे तो?'' त्यांच्या आवाजातीलउत्सुकता लपत नव्हती.

''सांगतो ना; पण आधी चहा तर येऊ दे ना! मी काय त्याला खिशात घेऊन फिरतो की काय?'' शिरोमणी मुद्दाम उशीर करत होता.

***

इन्स्पेक्टर चव्हाण आणि पंडित शिरोमणी दोघंही चालतच निघाले. पोलीस स्टेशनपासून दहाच मिनिटांच्या अंतरावर एक पाच मजली चाळ होती. लिफ्टनं चौथ्या मजल्यावरच्या कोपऱ्यातल्या अगदी शेवटच्या खोलीजवळ आल्यावर शिरोमणीनं दारावर हलकेच टकटक केलं.

टीव्ही पाहण्यात मग्न असलेला अजय दचकला. आपल्याकडे या वेळेस कोण आलंय, असा विचार करत त्यानं दार उघडलं. समोर अनोळखी माणसांना बघून तो गोंधळात पडला.

''मी पंडित शिरोमणी,'' स्वतःची ओळख करून देत शिरोमणी म्हणाला, ''आणि हे इन्स्पेक्टर चव्हाण साहेब. यांना तू ओळखत असशीलच ना अजय? खूप वेळा यांचा चेहरा बघितला असशीलतू टीव्हीवर. हो ना ?''

''हो! पण माझ्याकडे काय काम?'' अजयचा अजूनही विश्वास बसत नव्हता की पोलीस आपल्यापर्यंत येऊन पोचलेत.

''तुझ्याकडे माझं काहीच काम नाही. काम आहे ते इन्स्पेक्टर चव्हाणांचं. चव्हाण साहेब, हाच तो पन्नास लाखांची चोरी करणारा चोर! पकडा त्याला!'' शिरोमणी म्हणाला.

शिरोमणीनं वाटेत इन्स्पेक्टर चव्हाणांना काहीच सांगितलं नव्हतं. फक्त एवढंच म्हणाला होता, की मी दाखवीन त्या माणसाला पकडायचं. आणि इन्स्पेक्टर चव्हाणांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता. इन्स्पेक्टर चव्हाण लगेच पुढे झाले. अजय आत वळला. इन्स्पेक्टर चव्हाण आणि शिरोमणी दोघंही त्याच्या पाठोपाठ आत गेले. इन्स्पेक्टर चव्हाण म्हणाले,

''मि. अजय, मी तुला पन्नास लाखांच्या चोरीबद्दलअटक करीत आहे. तू जर माझ्याबरोबर सरळ पोलीस स्टेशनवर आलास तर ठीक; नाहीतर मला फोर्सला बोलावून तुला हातकड्या घालून न्यावं लागेल.''

काही मिनिटांतच कमिशनर, गृहमंत्री, बँक सर्वांना फोन गेले आणि काही क्षणांतच टीव्ही चॅनेल्सचे प्रतिनिधी कॅमेऱ्यासह आले. पंधरा मिनिटांत चोराच्या म्हणजेच अजयच्या फोटोसह सगळी माहिती देशभर पसरली. इन्स्पेक्टर चव्हाणांना प्रमोशन मिळालं.

***

''मला आता तू हे सगळं समजून सांग; कारण कमिशनर आणि गृहमंत्री मला नक्की विचारतील,'' इन्स्पेक्टर चव्हाण शिरोमणीला म्हणाले.

''सांगतो; पण ते पान, चहा ...?'' शिरोमणी डोळे मिचकावत म्हणाला. ''देतो ना बाबा, पण सांग तर खरं!' इन्स्पेक्टर चव्हाण अधीर झाले होते.

''काय आहे ना चव्हाण साहेब, चोर बँकेशी संबंधित असणार हे तर उघडच होतं. मी त्याच्या पुढे गेलो. बँकेच्या चाव्या कोणाकडे असतात अशी चौकशी केल्यावर कळलं, की कॅशिअर आणि अकाउंटंट यांच्याकडेच सर्व चाव्या असतात. होतं काय, की सकाळी तिजोरीतून पैसे काढताना आवश्यक तेवढेच पैसे काढले जातात. नंतर जसजशी आवश्यकता पडेलतेव्हा पुन्हा तिजोरी उघडली जाते. अर्थात प्रत्येक वेळेस कॅशिअरबरोबर अकाउंटंटलही त्याची चावी लावावी लागते. म्हणजे तसा नियमच आहे. पण रोजच्या व्यवहारात काय होतं, अकाउंटंट आपली चावी कॅशिअरकडे देऊन ठेवतो. याचं कारण त्यांना वारंवार तिजोरी उघडण्यासाठी जाण्याकरिता वेळ नसतो. पैसे काढताना आणि ठेवताना प्रत्येक वेळी रजिस्टरमध्ये नोंद करावी लागते. त्या नोंदीसमोर सहीसुद्धा करावी लागते. याचा अर्थ असा, की तिजोरीच्या तसेच सेफ डिपॉझिट व्हॉल्टच्या सर्व चाव्या दिवसभर कॅशिअरकडेच असतात. कामकाज संपलं, की चाव्या परत अकाउंटंटकडे दिल्या जातात. म्हणजेच जर डुप्लिकेट चाव्या बनविण्याची संधी असलीच तर ती कॅशियरला आहे, हे

हळुवार भावना आणि
जीवनमूल्यांचं अनोखं विश्लेषण
मांडणारी अद्वैत शैली म्हणजे **व.पु.**

चतुर्भुज

वलय

कर्मचारी

का रे भुललासी

वन फॉर द रोड

वपुर्झा

ऐक सखे

सखी

रंग मनाचे

माणसं

महोत्सव

दोस्त

तप्तपदी

आपण सारे अर्जुन

मी माणूस शोधतोय

ही वाट एकटीची


दुनिया तुला विसरेल

मायाबाजार

सर्व पुस्तके eBooks स्वरूपात उपलब्ध

New Books

A real drama of vehement and sincere efforts, unbound zealousness, extreme faith, genuine wish, impeccable intelligence, supreme wisdom, ultimate perseverance, fierce attempts, commendable hold and gifted spirituality; possessed by the Super Hero Netaji Subhas Chandra Bose;

Mahanayak

Vishwas Patil

Translated from the original Marathi by Keerti Ramachandra

Book Available

Pages : 784 । Rs : 695/-



A lady, well ahead of her times… a benevolent leader… a visionary who brought unprecedented growth in commerce and trade, in times of peace, and etched unparalleled stories of bravery, in times of war… despite a life fraught with innumerable personal tragedies…

KARMAYOGINI

LIFE OF AHILYABAI HOLKAR

Vijaya Jahagirdar

Translated from the original Marathi by Sangita Soman

Pages : 240 । Rs : 350/-

Book Available

As a road-map for a successful life, this book will appeal to a wide audience of teachers, students, travelers and above all, to people with curiosity and zest for life.

Living Dreams

Exhilarating Journey, Destination Unknown

Dan Mayur



Pages : 404 । Rs : 495/-

माझ्या लक्षात आलं.

''मग मी अशा डुप्लिकेट चाव्या कोणी बनविल्या आहेत का, याचा शोध घेतला. अर्थात ही चौकशी बँकेच्या आसपास जे चाव्या बनविणारे आहेत त्यांच्याकडेच करावी लागणार हे उघड आहे; कारण कॅशियरकडे हे काम करायला वेळ कमी असणार. कामावर असतानाच हे शक्य होते. अशा वेळेस कॅशिअर आपल्या शाखेपासून फार दूर जाऊ शकत नाही. म्हणून बँकेच्या आसपास असणाऱ्या चावीवाल्यांकडे चौकशी केल्यावर आणि थोड्या पैशांच्या मोबदल्यात अब्दुलचावीवाला म्हणाला, की काही वर्षांपूर्वी एक माणूस खूप मोठ्या चाव्यांच्या डुप्लिकेट चाव्या बनविण्यासाठी आला होता. चाव्यांच्या आकारावरून त्या चाव्या बँकेच्याच असाव्यात असं त्याला वाटलं होतं; पण त्यानं विचारलं नाही. कारण अब्दुलला खूप पैसे मिळाले होते. तो माणूस रोज एक-दोन चाव्या आणायचा आणि चार-पाच दिवसांत अब्दुलनं सर्व चाव्यांच्या डुप्लिकेट करून दिल्या होत्या.''

शिरोमणी थोडा थांबला. पाणी प्यायला आणि पुढे म्हणाला,

''बँकेच्या रेकॉर्डवर असलेले मागीलआठ-दहा वर्षांपूर्वीच्या कॅशिअरचे फोटो मी अब्दुलला दाखविले. त्यानं अंदाजानं अजयचा फोटो ओळखला.

''मी अजयच्या नकळत त्याची चौकशी करायला लागलो. अजयनं स्वेच्छानिवृत्ती घेतली होती; खरंतर त्याला ती घ्यावी लागली होती; कारण अजयला प्रथमपासून जुगार आणि रेसकोर्सचा नाद होता. त्यापायी त्याला खूप कर्ज झालं होतं आणि एकदोनदा त्यानं बँकेच्या कॅशमध्येही गडबड केली होती. त्याची इन्क्रिमेंट्स थांबवून बँकेनं त्याला शिक्षाही दिली होती. शेवटी त्याला जावं लागलं.

''त्याची बायको देखील त्याला सोडून गेली. मानहानी झाल्यामुळे तो बँकेवर सूड उगवायच्या विचारात असणार आणि पुन्हा पैशांची गरज पडणारच, हा दूरदृष्टिकोन ठेवून बँक सोडण्यापूर्वीच त्यानं चाव्या बनवून ठेवल्या होत्या. पुढे-मागे या चाव्यांचा उपयोग करायचा, हे त्यानं त्याच वेळेस ठरवलं होतं.

''अर्थात डुप्लिकेट चाव्या बनविल्या म्हणजे तोच चोर आहे असं म्हणता येणार नाही. आणखीन काही पुरावा आवश्यक होता. चव्हाणसाहेब तिजोरीत 'बँकेतीलकोणालाही जबाबदार धरू नये,' ही शब्द कातरून बनविलेली चिठ्ठी तुम्ही बघितली होती. त्याखाली तारीख होती, ती हातानं लिहिली होती.

''हा अजयचा अतिशहाणपणा त्याला नडला. आधी फक्त शब्द कातरून चिठ्ठी बनविली होती; पण ऐन वेळेस त्याला तारीख हातानं लिहिण्याची दुर्बुद्धी झाली.

''मी अजय कामावर असताना त्याचे रजेचे काही अर्ज बघितले. त्यातीलतारखेचे आकडे आणि या चिठ्ठीतीलआकडे एकाच व्यक्तीचे आहेत, हे हस्ताक्षर तज्ज्ञाकडून तपासून घेतले. शिवाय अजयची तारीख लिहायची एक विशिष्ट पद्धत होती, ती म्हणजे तो आधी साललिहितो, नंतर तारीख टाकतो आणि त्यानंतर महिना तो आकड्यांऐवजी अक्षरांत लिहितो. त्याच्या जुन्या अर्जांवरून सहज लक्षात येईल.

''आता आणखीन एक महत्त्वाचं म्हणजे तिजोरीतून पैसे काढले/ठेवले या नोंदी रजिस्टरमध्ये असतात. मी ते रजिस्टर चेक केलं. अजयनं सहज कुतूहलम्हणून तो ज्या वेळेस बँकेत होता, त्या वेळच्या नोंदी रजिस्टरमध्ये बघितल्या आणि रजिस्टर बंद करताना नेमकं तेच पान दुमडलं गेलं होतं.'' शिरोमणी बोलत होता आणि इन्स्पेक्टर चव्हाण कौतुकानं त्याच्याकडे पाहत होते.

''आता मुख्य प्रश्न असा, की तो आत कसा आला?' पण त्याचंही उत्तर आहे. अलार्म सिस्टमचा कंट्रोलबाथरूमच्या भिंतीवर आहे. मुख्य दरवाजा उघडून कोणी आत आलं तर ती व्यक्ती अलार्म सिस्टमच्या प्रभाव क्षेत्रात येऊन लगेच अलार्म वाजेल.'

''मग वॉचमन रोज आत येतो तेव्हा अलार्म का वाजत नाही?''

''बरोबर आहे. अलार्मची वेळ आहे सकाळी ८.२० ची. वॉचमन ८.२० नंतर येतो, त्या वेळेस अलार्मच्या फ्रिक्वेन्सी बंद होतात.''

''आणि इतर वेळेस म्हणजे अनेक माणसं बँकेत असतात तेव्हा किंवा समजा कधी मध्यरात्री यायची वेळ झाल्यास, त्या वेळेस अलार्म का वाजत नाही?''

''त्याचं काय आहे, डे मोडवर अलार्म असताना तो वाजणार नाही. फक्त कॅश काऊंटर्सच्या इथली सिस्टम चालू असते. तिथे जर चोरीचा प्रयत्न झाला तर तिथे बसणाऱ्या व्यक्तीच्या पायाशी बटन असतं, ते दाबलं, की अलार्म वाजतो. अचानक कधी मध्यरात्री यायचं झाल्यास अलार्मचं प्रभाव क्षेत्र टाळून यावं लागतं.''

''मग अजय?''

''अजयनं बाथरूमच्या खिडकीतून प्रवेश केला,'' शिरोमणी म्हणाला.

''पण आम्ही तर ते सगळं चेक केलं होतं,'' इन्स्पेक्टर चव्हाण म्हणाले.

''अहो, तुम्ही खिडकीच्या काचा तपासल्या नव्हत्या. मी बघितलं तेव्हा काचा सहज निघाल्या. एरवी काचा घट्ट बसतात. म्हणून मग मी मागच्या बोळात गेलो. तिथे मला भिंतीवर दोन सरळ रेषा मध्ये तुटक झालेल्या दिसल्या. याचाच अर्थ कोणीतरी दोरीची शिडी लावली असण्याची शक्यता होती.

'' अजयवर माझा संशय नक्की झाल्यावर मी त्याच्या घरावर नजर ठेवली. आता पाच-सात दिवसांपूर्वीच अजयनं प्लॅस्टिकची शिडी गुंडाळून कचऱ्यात टाकली होती. मी ती घेतली. पुरावा म्हणून ती उपयोगी पडेल.''

'' अरे! तू तर माझं काम अधिकच सोपं केलंस,'' इन्स्पेक्टर चव्हाण म्हणाले. '' पण मग अजयनं ते पैसे खर्च का नाही केले?''

''अहो, अजय खूप हुशार आहे. त्याचे सावकार त्याच्या मागे लागले होते म्हणून आधी त्याने त्यांचे पैसे दिले. आता तो जर पैसे उडवायला लागला असता तर तुमच्यासारखा हुशार इन्स्पेक्टर त्याच्या मागे लागला असता, याची त्याला कल्पना होती. म्हणून मग शांतपणे पैसे उडवू असं त्यानं ठरवलं होतं; पण सगळी काळजी घेऊनही आपल्या अतिशहाणपणानं तो अडकला गेला. चोर काहीतरी माग ठेवून जातो असं म्हणतात ते खरं आहे.''

''आणि तो माग शोधण्याचं काम तुझ्यासारखा चाणाक्ष डिटेक्टिव्हच करू शकतो,'' इन्स्पेक्टर चव्हाण कौतुकानं म्हणाले.

अजयनं चोरी कबूलकेली. चव्हाणांना प्रमोशन तर मिळालंच; पण बक्षीसही मिळालं आणि अर्थात ते पंडित शिरोमणीकडे आलं, हे सांगायलाच नको...!

scd2000@gmail.com

❖

डॉक्टर

जयश्री कुलकर्णी

बाळाभटजी वारले! या बातमीने अख्खा गाव हळहळत होता. ''गेला बिचारा म्हातारा! अक्षी देव माणूस बघा!'' असं म्हणत जो तो डोळ्यांतून टिपं गाळीत होता. बाळाभटजींच्या जुन्या वाड्याचं भलं थोरलं अंगण माणसांनी फुलून गेलं होतं. उसासत, चुकचुकत सारेजण भटजींच्या अंत्ययात्रेसाठी तिष्ठत बसले होते. साहजिकच होतं ते. बाळाभटजींची सच्छील वागणूक साऱ्यांच्याच प्रेमाला आणि आदराला पात्र झाली होती. त्यांच्यावाचून गावाचं पानही हलत नसे. साऱ्या गावाला त्यांच्याविषयी आणि त्यांना गावाविषयी विलक्षण प्रेम होतं. तसाच त्यांचा गावावर वचकही दांडगा होता. अडचणीच्या वेळी माणसं सल्ल्यासाठी बाळाभटजींकडेच धाव घ्यायची. गावातलं प्रत्येक धार्मिक कार्य त्यांच्याच हातून होत असे. दाट वस्तीपासून थोडंसं विलगच असलेल्या त्यांच्या घरी माणसांचा सारखा राबता असायचा. बाळाभटजींनाही त्यामुळे बरं वाटायचं. नाही तर एवढ्या थोरल्या वाड्यात भुतासारखं एकटं राहायचं त्यांना कठीणच गेलं असतं. बाळाजी तसे एकटेच होते. पत्नी निवर्तली होती आणि पोराला शिक्षणासाठी शहरात ठेवलं होतं. लहानपणापासून त्याला भिक्षुकीत फारसा रस नव्हताच. थोडंफार संस्कृत त्याच्या गळी उतरवताना बाळाजी मेटाकुटीला आले होते. तेव्हाच त्यांनी ठरवलं, याला भिक्षुकीत घालायचा नाही. नाहीतरी दिवस आता बदलत चाललेत. धार्मिक गोष्टींबद्दलची लोकांची आस्था कमी व्हायला लागलीय. तेव्हा नुसत्या भिक्षुकीवरच विसंबून चालण्याजोगं नव्हतं. पोरगा शहरात राहून चार बुकं शिकला तर नशीब काढील अशी त्यांची धारणा होती.

निघायची वेळ झाली तशी त्यांच्या मुलाला, दिगूला उमाळा आला. त्याचे शरीर हुंदक्यांनी गदगदू लागले. त्याच्याभोवती असलेल्या गावाच्या प्रतिष्ठित मंडळींनी त्याला आवरलं. आपले अश्रू पुसत त्याची कशीबशी समजूत घातली आणि मग उदास अंत:करणाने बाळाजींचा पार्थिव देह उचलून सारेजण वाड्याबाहेर पडले.

दिवसगत झाल्यावर दिगूने पुन्हा शहरात परतण्याचा प्रस्ताव मांडला. शहराची चटक लागलेल्या त्याच्यासारख्या तरुणाचं त्या गावंढ्या गावात मन लागणं शक्यच नव्हतं. दूरच्या नातलगाकडे ठेवलेल्या आपल्या या दिवट्या पोराचे शिक्षणाच्या नावाखाली काय-काय उद्योग चालतात हे जर बाळाजींना आधीच कळलं असतं तर नुसत्या त्या धक्क्यानेच त्यांची प्राणज्योत मालवली असती.

दु:खाचा कढ थोडा ओसरल्यावर दिगू पुन्हा आपल्या उद्योगात रमण्यासाठी आतुर झाला. गावातली चार वडिलधारी मंडळी या काळात रोजच त्याच्यापाशी येऊन घटकाभर बसत असत. दिगूचा पुन्हा शहरात जाण्याचा मानस कळताच पाटलांनी वडीलकीच्या नात्याने त्याला समजावलं, ''पोरा आता तू काही शहरात जायचं नाव काढू नकोस. भटजींचं आहे हे सारं तुझंच आहे. ते असं वाऱ्यावर सोडून जाऊ नकोस. इथंच राहा. वाटलं तर भिक्षुकी कर नाहीतर धंदा कर छोटासा. पण बाळाजींच्या घरात दिवा लागू दे रोजचा.''''

''हो आणि हे लक्षात ठेव पोरा तुझ्यावर वाईट परिस्थिती आली तरी गाव पाठीराखा राहील. तुला टाकून कुणीच घास पोटात ढकलायचा नाही.'' जहागीरदारांनी त्यांना दुजोरा देत म्हटलं.

''बाळाजींची दांडगी पुण्याई आहे बाबा तुझ्या पाठीशी, तू आपला इथेच राहा.'' विश्वनाथपंतांनी त्याच मुद्याला पुष्टी दिली.

खाली मान घालून गंभीरपणे बसलेला दिगू थोडा वेळ काहीच बोलला नाही. त्याच्या अंतर्यामी खळबळ चालली होती. शहराची ओढकितीही जबरदस्त असली तरी आता पैशाचा प्रश्न मोठा होता. बाप होता तेव्हा प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन पैसे धाडीत होता. म्हातारपणी पोरगा आधाराला येईल या आशेवर काटकसरीने जगत होता. आणि त्यामुळे हवी तेवढी चैन करणं दिगूला शक्य होत होतं. पण आता बाप नसल्याने शहरात राह्यचं कुठं हाही प्रश्न होता. फुकटात त्याला ठेवून घ्यायला कुणीही तयार होणार नाही हे त्याला माहीत होतं. शिवाय गावात त्याला आणखीही एक आशेचा किरण कालच दिसला होता.

संध्याकाळी तो सहज पाय मोकळे करण्यासाठी बाहेर पडला असताना नदीवरून पाण्याची घागर भरून घेऊन येत असलेली तेल्याची गंगू त्याला दिसली होती. दु:खात चूर असल्याचं नाटक करण्यासाठी त्याने मान खाली घातली होती. तरीही तिचा गोंडस चेहरा आणि यौवनाने मुसमुसलेलं शरीर त्याच्या डोळ्यांत भरल्याशिवाय राहिलं नव्हतं. क्षणभरच झालेली नजरानजर! पण त्यातही तिच्या नजरेतलं आव्हान त्याच्या तीक्ष्ण दृष्टीनं टिपलं होतं.

गंगूची आठवण येताच दिगूच्या मनाने पुन्हा उचल खाल्ली.

''तुम्हा वडिलधाऱ्यांचा मान मी राखायलाच पाहिजे. ठीक आहे. मी इथेच राहून आबांचा वारसा चालवायचा असं ठरवतो.'' त्याने असं म्हणताच पाटलांनी त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप मारत हसून म्हटलं, ''आता कसं! शहाण्यासारखं बोललास बघ पोरा. बरं मग येऊ आम्ही आता? काही लागलं सवरलं तर विनासंकोच सांगत जा.'' असं म्हणून मंडळी उठलीच.

पहिले काही दिवस सुतासारखे सरळ गेले. दिगूने बापाची गाडगी-मडकी धुंडाळून चार पैसे जमवले आणि त्यातून गोळ्या-बिस्किटं, नित्योपयोगी वस्तू यांचं एक छोटंसं दुकान टाकलं.

मोठ्या दरवाज्याच्या डाव्या बाजूला असलेल्या ओसरीवजा खोलीतच त्याने दुकान थाटलं आणि त्या खोलीच्या रस्त्यावर उघडणाऱ्या पूर्ण उंचीच्या खिडकीचं दरवाजात रूपांतर केलं. आता दिगूचा वेळ छान जाऊ लागला. किरकोळ खरेदीसाठी लहान-थोर गिऱ्हाईकांची वर्दळ सारखी असायची. उरलेला वेळ रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांना पाहण्यात केव्हाच सरायचा.

पण हे सारं चालू असतानाच दिगू तेल्याच्या गंगूला विसरला नव्हता. तिच्या पाण्याला जाण्याच्या वेळा त्याने अचूक हेरून ठेवल्या होत्या. कोणत्या वेळी त्या बाजूला वर्दळ नसते हेही त्याने माहीत करून घेतलं होतं. त्यावेळी तो काही ना काही निमित्ताने नदीवर जाऊ लागला.

एक दिवस गंगू अशीच पाण्याला आली होती. तिने पाण्यात घागर बुडवली आणि नेमकी तिच्या पाठीमागच्या झाडावरून दिगूने धप्पकन खाली उडी मारली. त्या अचानक झालेल्या आवाजाने गंगू दचकली आणि तिच्या हातून घागर निसटली. डचमळत घागर सुळकन पाण्यात पुढे निघाली. तितक्यात दिगू पाण्यात शिरला आणि त्याने ती घागर पकडली. भरून तिच्या हाती देत त्याने हसून म्हटलं,

''एवढं अगदी भूत बघितल्यागत दचकायला काय झालं होतं?''

गंगूने लाजून तोंड फिरवलं. ती बोलली काहीच नाही. पण तेवढा धागा दिगूला आपलं जाळं पसरायला पुरेसा होता. गोड, गोड बोलून दिगूने गंगूला पुरतं वश करून घेतलं. हळूहळू त्याचं आकर्षण वाढलं. नदीकाठच्या दाट झाडीत त्यांचं प्रेम रंगू लागलं. असेच कितीतरी दिवस गेले आणि एक दिवस अचानक गंगू बेपत्ता झाली. गावात सगळीकडे शोधाशोध झाली. पण गंगूचा पत्ता लागेना.

नदीकाठावर तिची घागर पडली होती. त्यामुळे गंगू पाय घसरून नदीत पडली की काय या शंकेने लोकांनी तिथेही खूप शोध घेतला. पट्टीच्या पोहणाऱ्यांनी बुड्या मारून मारून नदीचा तळ शोधला. पण छे गंगू जणू काही हवेत विरल्यासारखी बेपत्ता झाली होती. गंगूच्या बेपत्ता होण्याने सारा गाव हादरला आणि जसजसे दिवस उलटत गेले तसतसा चुकचुकत, हळहळत शांतही झाला.

या प्रकरणात आपला संशय कुणालाच आलेला नाही हे पाहून दिगूने सुटकेचा श्वास सोडला. धूर्तपणाने आणखी काही दिवस त्याने आपल्या चुळबुळणाऱ्या मनाला लगाम घालून ठेवला, पण या काळात त्याची नजर वारंवार वाड्यात धुणं-भांडी, केरवारे करण्यासाठी येणाऱ्या चमेलीवर जात होती. चमेली चौदा वर्षांचीच होती पण उफाड्याच्या शरीरामुळे चांगली थोराड वाटत होती. दिगू बसल्या जागेवरून अस्वस्थ चित्ताने घरातला तिचा वावर न्याहाळत होता.

हळूहळू त्याचा धीर चेपला. गंगू प्रकरणानंतर बराचसा अवधी गेलेला होता. त्यामुळे आता दुसरा डाव टाकायचं दिगूनं ठरवलं. एक दिवस त्याने चमेलीला काहीतरी वस्तू आणण्याच्या निमित्ताने माडीवरच्या खोलीत पाठवलं आणि मग तिच्या पाठोपाठ दबत्या पायांनी तोही जिना चढला. हॉल पार करून तो त्याच्या लगतच्या छोट्या खोलीत आला. चमेली अद्याप तिथेच होती. दिगूने चटकन दार लावलं आणि चमेलीच्या काही लक्षात येण्यापूर्वीच त्याने तिच्यावर झडप घातली. घाबरलेल्या चमेलीला काहीच प्रतिकार करता आला नाही. काही वेळ तिच्या उसळत्या यौवनाचा मनमुराद उपभोग घेतल्यानंतर त्या विकृत माणसाची बोटं तिच्या गळ्याभोवती लपेटली गेली. आता मात्र चमेली घाबरली आणि जिवाच्या आकांताने त्याला प्रतिकार करू लागली. पण दिगूच्या शरीरात जणू सैतान संचारला होता. त्याची बोटांची पकड अधिकच घट्ट झाली. कामवासनेने पिसाट बनलेलं त्याचं मन अखेर चमेली गतप्राण झाल्यावरच भानावर आलं. तिच्या शरीरापासून बाजूला झाल्यावर नशा उतरावी तसं त्याचं पिसाळलेलं मन ताळ्यावर आलं आणि आपण काय करून बसलो याची त्याला प्रथमच जाणीव झाली. डोळे विस्फारून तो आपल्या पापी हातांकडे पाहात राहिला. पुन्हा त्याची नजर तिच्या निष्प्राण देहाकडे गेली आणि तो अचानक थरथर कापू लागला. गंगूच्या वेळी झाली तशीच त्याची आताही एखाद्या भेदरलेल्या सशासारखी अवस्था झाली. चारही भिंतींना हजारो डोळे फुटले असल्याचा भास त्याला होऊ लागला. काय करू नि काय नको असं त्याला होऊन गेलं. इतक्यात खालून कुणीतरी हाक मारल्यासारखं त्याला वाटलं. पण त्याचा घसा कोरडा पडला होता. जीभ टाळ्याला चिकटली होती. पण त्याक्षणी स्वत:ला वाचवण्याचा

एकच प्रबळ विचार त्याच्या मनात उसळला आणि मग पुढचं काम त्याने जिवाच्या कराराने चार-दोन क्षणातच उरकून टाकलं. झटकन एक पोतं घेऊन त्याने कसाबसा चमेलीचा देह त्यात कोंबला आणि पोत्याचं तोंड सुतळीनं घट्ट बांधून टाकलं. आतल्या खोलीत जाऊन त्याने माळवदाला शिडी लावली आणि पटापट वर चढून ते पोतं माळ्याच्या अंधाऱ्या कोपऱ्यात सारून दिलं. धुळीचे हात झटकीत त्याने शिडी जागेवर ठेवली आणि कपडे साफ केले. एकवार केसांवरून हात फिरवून त्याने ते ठाकठीक केले आणि मग दाणदाण पायऱ्या उतरीत तो खाली आला.

एव्हाना हाका मारणारा माणूस निघून गेला होता. सुकलेल्या ओठांवरून जीभ फिरवून त्याने एक आवंढा गिळला आणि तो आपला दुकानातल्या खुर्चीवर येऊन बसला. थोडा वेळ गेल्यावर हलके हलके त्याची भीती कमी झाली. आणि तो पूर्वस्थितीवर आला.

संध्याकाळी चमेलीचा बाप तिची चौकशी करीत आला. दिगूला ते अपेक्षितच होतं. त्याने चक्क कानावर हात ठेवले. ''माझं काम उरकून दुपारीच गेली बघा ती.'' त्याने सांगितलं.

''मग गेली कुठं म्हणावं ही कार्टी?'' असं बडबडत चमेलीचा बाप माघारी वळला. निदान त्याक्षणी तरी त्याला कसलाच संशय आलेला नसल्याचं पाहून दिगूला बरं वाटलं, पण गावात इतरत्र कुठेही चमेलीचा शोध लागेना तसा तिचा बाप कातावला. तीन-चार माणसं घेऊन तो पुन्हा दिगूच्या घरात घुसला. मोठ-मोठ्याने हाका घालीत तो थेट पडवीत आला. आता तो चांगलाच पिसाळल्यागत झाला होता.

''दिगू खरं सांग चमेली कुठं आहे ती? इथल्या कामावरून घरी आलीच नाही ती.''

''अहो खरंच माझं काम झाल्यावर गेली ती. वाटलं तर तुम्ही घरात शोधून पाहा.''

''तेच करावं लागेला मला.'' त्याच्याकडे संशयाने पाहत मिशा फिस्कारून चमेलीचा बाप म्हणाला.

त्या चौघाही जणांनी घराचा कोपरा न् कोपरा शोधून काढला पण छे: चमेलीचा कुठेच पत्ता नव्हता. त्यांच्या मागोमाग हिंडणाऱ्या दिगूकडे चमेलीचा बाप संशयाने पाहत होता. दिगूचं आतल्या आत काळजाचं पाणी पाणी होत होतं. पण वरवर तो निर्विकार राहिला होता. चमेली सापडली नाही तशी परत जाताना मिशीला पीळ भरीत त्याने धमकीवजा स्वरातच दिगूला बजावलं,

''चमेलीला शोधून न्हाई काढली तर बापाचं नाव लावणार नाही मी, समजलास?''

त्यानंतर रात्रीपर्यंत दिगूकडे कुणीही फिरकलं नाही. तरी पण त्याला धोक्याची जाणीव झाली होती. चमेलीची विल्हेवाट लवकर लावायला हवी हे त्याच्या आता लक्षात आलं होतं. रात्री २-२॥ वाजेपर्यंत तो तसाच अंथरुणावर तळमळत पडला होता. मग तो हलकेच उठला. माळवदावरचे 'ते' पोते त्याने खाली काढलं. एक विजेरी घेतली आणि तो मुख्य दाराशी आला. मुख्य दार न उघडता छोटा दिंडी दरवाजा उघडून त्याने बाहेर डोकावून पाहिलं. सर्वत्र शुकशुकाट होता. दूर कुठेतरी कुत्रे भुंकल्याचा आवाज येत होता. बाकी सारं स्तब्ध होतं. कुठं चिटपाखरू देखील नाही असं पाहून दिगूने पोतं उचललं आणि तो बाहेर पडला. आपल्यामागे त्याने दार ओढून घेतलं आणि तो झपाट्याने चालू लागला. पायाखालची वाट असल्याने बॅटरी पेटविण्याची त्याला फारशी आवश्यकता वाटत नव्हती. धास्तावलेल्या मनाने तो कसबसा नदीवर पोचला. नदीचं चकाकणारं पाणी पाहताच त्याला हायसं वाटलं. आता फक्त उजव्या बाजूला वळून चढावाच्या रस्त्याला लागायचं आणि तेथे गर्द झाडी असलेल्या एका उंच ठिकाणावरून हातातलं पोतं खाली भिरकावयाचं एवढचं काम शिल्लक होते. त्या ठिकाणी प्रवाहाला चांगला वेग होता. पहाटेपर्यंत त्या पोत्याचा मागूसही लागला नसता. दिगूने एकवार बॅटरी पेटवली आणि तो त्या बाजूला वळला. तो चार पावलं गेला नसेल तोच कुणाचा तरी दरडावणीचा स्वर त्याच्या कानी आला.

''दिग्या, उभा राहा जाग्यावरच. हललास तर खबरदार.'' अभावितपणेच दिगू गर्रकन वळला. थोड्याच अंतरावर चार-पाचजणांचं टोळकं पाहताच त्याच्या तोंडचं पाणी पळालं. तेथून पुढे पळण्यासाठी त्याने पावलं उचलली पण काही क्षणातच त्यांनी त्याला गाठलं. चमेलीच्या बापाच्या राकट हाताचा पंजा त्याच्या मनगटावर घट्ट बसला.

त्यांनी त्याला ओढीतच मोकळ्या जागी आणलं आणि त्याच्या हातातलं पोतं हिसकावून घेतलं. पोतं सोडून बॅटरीचा झोत आत टाकला आणि दुसऱ्याच क्षणी 'चमेली ऽऽ!' असा हंबरडाच तिच्या बापाने फोडला. ते पाहून पाटलाचंही काळीज फाटलं.

''नीच, हलकट ! काय केलंस तू हे !'' असं म्हणून त्यांनी फडाफड त्याच्या मुस्कटात लगावल्या.

''भडव्या, थांब जित्ताच गाडतो तुला.'' अस म्हणत चमेलीचा बापही त्याच्यावर तुटून पडला.

मारीत मारीतच दिगूला त्यांनी पाटलाच्या घराकडे आणलं. आरडाओरड ऐकून सारा गाव गोळा झाला. दिगूने चमेलीला ठार केल्याचं समजताच जो तो चवताळून उठला आणि त्याला मारण्यात हिरीरीने पुढे सरू लागला. दिगू गुरासारखा ओरडत होता. पण कुणाला त्याची दया आली नाही.

''ह्यानंच गंगूलाही मारली असली पाहिजे. चांगलं चेचा त्याला!'' असेच उद्‌गार गर्दीतून निघत होते. अखेर बेदम मार पडल्याने दिगू निश्चेष्ट होऊन खाली पडला तसे साऱ्यांनी हात आवरले. धापा टाकीत, आक्रोश करीत चमेलीच्या बापाने पाटलाच्या पायरीवरच बसकण मारली आणि दिगू भोवतीची गर्दी सहानुभूतीने चुकचुकत त्याच्यापाशी गोळा झाली. रक्तबंबाळ झालेल्या दिगूला कुणीतरी त्याच्या ओसरीवर नेऊन टाकलं. पण कुणीही त्याच्यासाठी डॉक्टरी उपाय करण्याचं मनातही आणलं नाही.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी दुपार होईपर्यंत सारा गाव चमेलीच्या दु:खी कुटुंबाचं सांत्वन करण्यात आणि तिचा अंत्यविधी उरकण्यातच गुरफटला होता. दिगूचं तिकडे काय झालं असेल हा विचारही कुणी मनात आणला नाही. त्यामुळे शुद्धीवर आल्यावर पाण्यासाठी टाहो फोडीतच दिगूने प्राण सोडला. मरताना एकच एक भावना त्याच्या मनात थैमान घालत होती. सूड ! सूड ! साऱ्या गावाचा सूड !

...काळ हा साऱ्याच दुखण्यांवरचा रामबाण उपाय असतो म्हणतात. त्याप्रमाणे गंगू, चमेलीचा खून आणि दिगूचा भयंकर अंत यांनी हादरून गेलेलं गाव हळूहळू शांत होऊ लागलं. रोज सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या याविषयीच्या गरमागरम चर्चा हलके हलके थंडावल्या. हळूहळू ही भयानक कथा कायमची विस्मृतीच्या पडद्याआड गेली असती. पण तसं

व्हायचं नव्हतं.

एक दिवस काही कामानिमित्त तालुक्याच्या गावी गेलेले पाटील अपरात्री घरी परतले. गावात सगळीकडे सामसूम झाली होती. आपल्याच नादात सायकल चालवीत पाटील चालले होते. दिगूच्या घरापाशी ते आले आणि अचानक कुणीतरी त्यांना ''शुक शुक!'' केल्याचा आवाज ऐकू आला. ब्रेक दाबून त्यांनी पाय खाली टेकवला आणि मागे वळून पाहिलं. कुणीसुद्धा नव्हतं. ते पुन्हा पुढे निघणार इतक्यात पुन्हा आवाज आला, ''शुक शुक!'' आवाजाच्या अनुरोधाने त्यांनी उजव्या बाजूला पाहिलं आणि त्यांचं पत्थरासारखं हिंमतवान काळीज जणू गारठूनच गेलं. कारण दिगूच्या वाड्याच्या मुख्य दरवाजापाशी दोन खदिरांगारासारखे डोळे अधांतरीच तरंगत होते. घामाने पाटलांचं अंग थबथबून गेलं. तिथून पळून जावं असं वाटत असूनही त्यांना चटकन् हलता येईना. अखेर सर्व बळ एकवटून त्यांनी पायडल मारलं आणि ते वेगाने पुढे निघाले तरीही आवाज येतच होता. ''शुक शुक!''

एक दिवस जवळच राहाणाऱ्या कुणातरी बाईने दिगूच्या वाड्याच्या भिंतीवर दिवसाच्या वेळी शेण्या थापल्या. मध्यान्हीची वेळ होती ती. आणि मग तिन्ही सांजा झाल्यावर एकाएकीच ती बाई घुमू लागली.

''मला रक्त हवंय. पाणी हवंय.'' असं म्हणत ती खदखदा हसत सुटली. ''सूड घेईन ! सूड ! गावातली प्रत्येक बाई मी धरणार. हा: हा: हा:'' असं किंचाळत ती थैमान घालू लागली. बाप्या माणसांनाही आवरेना. अखेर मांत्रिक, गंडे-दोरे, अंगारे-धुपारे झाले तेव्हा कुठे २-३ दिवसांनी त्या बाईला आराम पडला.

लवकरच या गोष्टी षट्कर्णी झाल्या. दिगू मेला असला तरी समंध होऊन राशीला लागलाय हे साऱ्या गावकऱ्यांना कळून चुकलं. आणि मग या गोष्टी नेहमीच्याच होऊन बसल्या. काही कारणाने किंवा चुकूनमाकून तिकडे गेलेल्या माणसांना आणि या गोष्टीवर विश्वास नसल्याने हटकून रात्री ह्या वाड्यासमोर उभ्या राहिलेल्या तरुण पोरांना खदिरांगारासारखे ते अंधातरी तरंगणारे डोळे दिसले होते. त्याबरोबरच ''शुक शुक, इकडे ये'' अशा दबत्या आवाजात मारलेल्या हाकाही ऐकू आल्या होत्या. त्यामुळे गावकऱ्यांची अगदी पाचावर धारण बसली. लोक त्या बाजूला जायचं टाळू लागले. अवसे-पुनवेला तर दिवसा ढवळ्या देखील कुणी तिकडे फिरकेना.

या गोष्टीची कल्पना नसलेलं एक भिकारी जोडपं वाड्याजवळच्या पिंपळाच्या पारावर चुकून वस्तीला राहिलं होतं. अपरात्री केव्हातरी ती दोघंही जेव्हा ठो...ठो बोंबलत पाटलांच्या वाड्यावर गेली तेव्हा मात्र पाटलांना याबाबतीत काहीतरी करायला हवं असं प्रकर्षाने वाटायला लागलं. त्यांनी दुसऱ्याच दिवशी तालुक्याहून एक नामांकित मांत्रिक बोलावला आणि त्याच्याकडून त्या वाड्याचे 'बंधन' करवलं. साऱ्या वाड्याभोवताली त्याने मंत्र म्हणून एक रेघ मारली. त्याच्या म्हणण्यानुसार त्याने भुताला त्या रेघेच्या आत आता कायमचं बंद केलं होतं. पण तेवढ्याने पाटलांचं समाधान झालं नाही. त्यांनी तो वाडा आणि तेथून जाणारा रस्ता सर्वांनाच कायमचा बहिष्कृत करायला सांगितलं. गावकऱ्यांनी अर्थातच ते मान्य केलं. त्यामुळे म्हणा की मांत्रिकाच्या प्रभावाने म्हणा लोकांना भुताटकीचे अनुभव येणं बंद झालं. झपाटलेल्या वाड्याला वळसा घालून लांबून जाण्या-येण्याची वहिवाट पडली. या रस्त्याचीही कालांतराने लोकांना सवय झाली.

दिवस झपाट्याने सरत होते. अशीच काही वर्ष गेली. गावात सुधारणेचं वारं वाहू लागलं होतं. बसची वाहतूक सुरू झाली होती. तसंच मंडईसाठी गाळे बांधले गेले होते. कुणीतरी सार्वजनिक वाचनालय सुरू केलं आणि एक दिवस तिथे एक तरणाबांड, देखणा डॉक्टरही येऊन दाखल झाला. आजवर गावातली दुखणी-बहाणी गावच्या वैद्यावरच विसंबून निभावून नेली जात.

जास्ती कमी झालं तर बैलगाडीत घालून रोग्याला तालुक्याच्या गावी नेलं जाई. त्यामुळे डॉक्टर येताच गावकरी खूष झाले. जागा भाड्याने घेऊन त्याने आपला दवाखाना थाटला. शिकला- सवरलेला डॉक्टर गावकऱ्यांना देवासारखाच वाटू लागला.

डॉक्टरच्या हाताला गुणही चांगला होता. बघता बघता तो लोकप्रिय झाला. दवाखान्यात कायम वर्दळ राहू लागली. आपला चांगलाच जम बसला असे वाटताच डॉक्टरला त्याठिकाणी एखादं हॉस्पिटल टाकावं असं वाटू लागलं. एक दिवस चार प्रतिष्ठित मंडळी आणि गावातले त्याचे मित्र बनलेले काही तरुण जमवून त्याने हा प्रस्ताव त्यांच्यापुढे मांडला. सगळ्यांनाच त्याची ही कल्पना फार आवडली.

''असं पाहा पाटील, इथं ऑपरेशची किंवा सलाईन, ऑक्सिजन देण्याची काहीच सोय नाही. एखादी बाळंतीणबाई अडली आणि ऑपरेशनची वेळ आली तर काहीच सोय नाही. बाईला तालुक्याला न्यायचं म्हणजे तिच्या जिवाची शाश्वती नाही. आता मागच्या महिन्यातच नाही का त्या शेलारांचा म्हातारा तालुक्याला नेता नेता वाटेतच वारला. वेळेवर सलाईन दिलं गेलं असतं तर त्याला डिहायड्रेशन झालं नसतं.''

''होय होय तुम्ही म्हणता ते खरं आहे. हॉस्पिटल झालं तर अगदी बेश होईल.'' पाटलांनी मान डोलावली.

''पण त्यासाठी जागेची अडचण आहे पाहा. मी गेले आठ–पंधरा दिवस गावात चक्कर मारून जागा कुठे सोयीची दिसते का ते पाहतोय. पण काही जमत नाही.''

''हा. हॉस्पिटलला बाळंतिणीचा वॉर्डही काढायचाच. तेव्हा जागा मोठीच हवी. कारण अद्याप तुम्ही लोक सुईणीवरच अवलंबून आहात.''

सर्वांनी माना डोलावल्या. पण कुणालाच यावर उपाय सुचेना. थोड्या वेळ सारेच गप्प राहिले. मग डॉक्टरांनीच त्या शांततेचा भंग करीत म्हटले,

''मला एक कल्पना सुचलीय. गावात एक ओसाड पडलेला वाडा आहे ना, तो चांगला मोठा आहे. ती जागा पुरू शकेल हॉस्पिटलला.''

त्यांच्या त्या वाक्यासरशी पायाखालून साप गेल्यासारखे सारेच एकदम दचकले.

''छे छे छे ! त्या वाड्याचं नावसुद्धा काढू नका डॉक्टर. अहो झपाटलेला वाडा आहे तो.'' पाटील म्हणाले.

''त्या वाड्याच्या मालकाचं, दिगूचं भूत राहतं त्यात. कुणी तिकडे फिरकत देखील नाही.'' चष्मा सारखा करीत जहागीरदार म्हणाले.

''कसलं भूत घेऊन बसलाय या आधुनिक जगात? माझा तर असल्या थोतांडावर बिलकूल विश्वास नाही.'' डॉक्टर हसत म्हणाले.

''थट्टेवारी नेऊ नका डॉक्टर. मला स्वत:ला अनुभव आलाय त्या जागेचा. त्यापेक्षा असं करा मोकळी जागा घेऊन नवीनच इमारत बांधा.''

''आणि त्यासाठी लाखांनी पैसा लागेल तो कसा उभारायचा?''

''गावकरी करतीलच की थोडीफार आर्थिक मदत.'' जगन्नाथराव

म्हणाले.

''तेवढ्यानेसुद्धा भागायचं नाही. आपण सर्व मिळून ५-१० हजारापर्यंतची रक्कम जमवू शकू. पण इमारतीला त्यापेक्षा कितीतरी जास्त पैसा लागेल. त्यापेक्षा आयता तो भला थोरला वाडा आहेच. त्यात कुणी राहत नाही. मग फुकटात काम होत असेल तर कशाला सोडायचं?'' डॉक्टरांनी सवाल टाकला.

त्यांच्या मित्रांनीही त्याच्याच म्हणण्याला दुजोरा दिला.

''पण तिथल्या दवाखान्यात यायला लोकच तयार होणार नाहीत, त्याचं काय?'' पाटलांनी शंका काढली.

''हे पाहा, असं करा. मी तिथं जाऊन राहतो. मला जर त्या भुताने काही केलं नाही तर मग लोकांना तिथं यायला काही हरकत नाही ना?'' डॉक्टरांनी विचारलं.

साऱ्यांनी एकमेकांकडे पाहिलं आणि माना डोलावल्या.

''पहा बुवा. पण तुम्ही निष्कारण जीव धोक्यात घालता आहात असं माझं मत आहे.'' असं म्हणून पाटील उठले.

तरुण मंडळींपैकी आणखीही एक-दोघे त्यांच्याबरोबर ह्या वाड्यात येण्यास तयार झाले. पण डॉक्टरांनीच त्यांना अडवलं. असं करू या पहिल्या दिवशी मी तिथे एकटाच राहतो. मला काही झालं नाही तरच तुम्ही दुसऱ्या दिवशी तिथे या. साऱ्यांनाच धोका नको.'' ते म्हणाले.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्याच दिवशी डॉक्टर आपल्या मित्रांसमवेत त्या वाड्यावर गेले. कित्येक दिवसांनंतर त्या जुनाट वाड्याची दारं करकरत उघडली गेली. आत धूळ आणि कोळिष्टकांचं साम्राज्य पसरलं होतं. सगळ्यांनी जिवाच्या कराराने आत पाऊल टाकलं. एकट्या डॉक्टरांच्याच मनावर कसलंही दडपण नव्हतं. सर्वांनी मिळून एकदोन खोल्या साफ केल्या. तिथल्याच लाकडी फळ्यांच्या एका कॉटवर डॉक्टरांचा बिछाना घातला गेला. संध्याकाळच्या सुमारास सारेजण तिथून निघून गेले. डॉक्टर एकटेच राहिले.

दुसऱ्या दिवशी लवकर उठून आपापली नित्यकर्मे आटोपून सारेजण झपाटलेल्या वाड्याकडे निघाले.

''गुडमॉर्निंग डॉक्टर.'' यशवंतने आनंदाने म्हटलं.

''गुडमॉर्निंग! बसा हं, आलोच तोंड धुऊन.'' डॉक्टर तोंडात ब्रश असल्याने बोबड्या स्वरात म्हणाले आणि घाईने चौकातल्या पिंपाकडे गेले. तोंड वगैरे धुऊन नॅपकिनने तोंड पुसत ते कॉटवर येऊन बसले, तेव्हा चांगले फ्रेश दिसत होते. जरा वेळ गप्पागोष्टी केल्यावर सारेजण चहासाठी तेथून बाहेर पडले. आणखी आठ-पंधरा दिवस एक दोघा मित्रांना घेऊन डॉक्टर तिथे राहिले. त्या अवधीत कुणालाही कसलाही भीतिदायक अनुभव आला नाही तेव्हा मात्र लोकांची भीड चेपली. प्रथम दबत, दबत धडधडत्या काळजाने का होईना लोक वाड्यात पाऊल टाकू लागले.

डॉक्टरांनी मग पुढच्या कामाला फारसा उशीर लावला नाही. स्वत:चा पैसा आणि थोडीफार गावकऱ्यांकडून वर्गणी घेऊन त्यांनी वाड्याची साफसफाई, डागडुजी करून घेतली. सगळीकडे नवीन पेंट देण्यात आला. हॉस्पिटलला लागणारी सर्व साधन-सामुग्री विकत घेण्यात आली. हे सर्व होईपर्यंत तीन-चार महिने सहज गेले. मग आणखी एक दोन असिस्टंट डॉक्टर्स आणि नर्सेसची नेमणूक डॉक्टरांनी केली. आणि लवकरच धूमधडाक्याने हॉस्पिटलचा उद्घाटन समारंभ झाला. झाडून सारा गाव समारंभाला उपस्थित होता.

थोड्याच दिवसांत हॉस्पिटल व्यवस्थितरीत्या सुरू झालं. आसपासच्या गावातूनही पेशंट्सची गर्दी दवाखान्याकडे धाव घेऊ लागली. जसजसे दिवस जात होते तसतसा लोकांचा विश्वास आणि त्याबरोबरच हॉस्पिटलचा व्याप वाढतच होता. हळूहळू हाताखालच्या डॉक्टर्सवर जास्त जबाबदारी टाकून डॉक्टरांनी स्वत:कडे फक्त व्यवस्थापकीय काम ठेवलं. असिस्टंट डॉक्टर्सची राहण्याची सोयही तेथेच करण्यात आली होती.

एक दिवस डॉक्टर आतापर्यंतच्या साऱ्या घटनांचा विचार करीत आपल्या खोलीत येरझारा घालीत होते. आपल्या कर्तबगारीवर ते अगदी खूष होते. एकाएकीच ते ड्रेसिंग टेबलपाशी थबकले. आरशात पडलेलं देखणं प्रतिबिंब पाहून त्यांच्या ओठांवर हास्य उमललं. त्यांच्या त्या मधुर स्मिताने कित्येक पेशंटना आजवर दिलासा दिला होता. हळूहळू त्यांचा चेहरा कठोर बनला. हास्य कडवट बनलं. ओठांचे कोपरे मुडपत ते स्वत:शीच पुटपुटले–

''इतकी वर्षं मला तुम्ही उपाशीच तळमळत ठेवलंत. रक्तासाठी व्याकूळ होत साऱ्या वाडाभर मला एकट्यालाच सैरभैर हिंडत ठेवलंत! पण आता?... आता माझी रक्ताची सोय मी कायमची करून घेतलीय. हजारोंनी येणाऱ्या या पेशंट्सपैकी कुणाच्या नरडीचा घोट मी घेतला तर या कानाचं त्या कानाला कळणार नाही. इतक्या बायका... एखादीचा उपभोग घेऊन मी गळा घोटला तर कुणाच्या लक्षात येणार? त्या मूर्ख डॉक्टरला इथं येण्याची प्रेरणा मीच दिली. पण तो संपला कधी हे तुम्हा मूर्खांपैकी कुणालाच कधीच कळलं नाही आणि कळणारही नाही. हा: हा: हा:! '' असं म्हणत डॉक्टर क्रूरपणे खदखदा हसत सुटला. एकाएकीच खट्दिशी त्यांचं हसणं थांबलं. त्याच्या चेहऱ्यावर आता मूर्तिमंत क्रौर्य दिसत होतं. दार उघडून तो बाहेर आला आणि एका स्पेशल वॉर्डचं दार त्याने हलकंच ढकललं. चाहूल लागताच आतल्या बाईने मान वर करून दाराकडं पाहिलं. डॉक्टरला उद्देशून ती काहीतरी बोलणार होती पण तिचे शब्द ओठांतच राहिले. डॉक्टरचा भयानक चेहरा आणि ओठांबाहेर डोकावणारे दोन तीक्ष्ण सुळे पाहताच भयाने किंचाळी फोडण्यासाठी तिने तोंड उघडलं. त्याच क्षणी डॉक्टरच्या मजबूत हाताचा पंजा तिच्या तोंडावर आवळला गेला. भयाने विस्फारलेल्या डोळ्यांनी ती त्याच्या विकृत चेहऱ्यावरच्या क्रूर हास्याकडे पाहातच राहिली.

(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित
'विषवल्ली' या पुस्तकातून)

◆

भृगुसंहितेचा बकी

स्नेहल जोशी

जे घडलेय ते सारे इतके चमत्कारिक आहे, की तुमचा त्यावर विश्वासच बसणार नाही. तुम्ही म्हणाल ही निव्वळ सारवासारव आहे, हा निव्वळ बचावाचा प्रयत्न आहे किंवा हा खोटे तरी बोलतोय. पण तसे नाही हो! घडलेय ते सारे खरे आहे.

माझी स्वत:ची तरी अजून कुठे खात्री पटत होती? वाटत होते, हे चमत्कारिक स्वप्नच आहे... लांबलचक... रखडणारे. मी समोरच्या गजांवर चारसहा वेळा डोकेही आपटून घेतलेय. का, तर जाग यावी. पण डोक्याला टेंगूळ येण्यापलीकडे काही घडले नाही. त्या टेंगुळाला हात लावला की सत्य परिस्थितीची जाणीव होते तेवढीच.

तुमचा विश्वास नाही बसणार असे म्हणतोय. पण तरीही तुम्हाला सारे सांगतोय. निव्वळ सहानुभूती नकोय. आणखीही एक काम आहे. कराल? नव्हे, कराच! पण आधी ऐकून तर घ्या.

खरे म्हणजे जे घडले त्याची सुरुवातही अशाच एका चमत्कारिक स्वप्नापासून झाली. 'चमत्कारिक' शब्द मी सारखा वापरतोय ना? माझे डोके फिरलेय असे समजून चमत्कारिक नजरेने असे माझ्याकडे पाहू नका हो! जे घडलेय ते सारे खरेच आहे.

तुम्हाला विनायक बळिभद्राची चाळ माहीत आहे? ह्या चाळीला आम्हा भाडेकरूंच्या दोन पिढ्यांपासून ठेवलेले 'विनायक दळभद्र्याची चाळ' हेच नाव जास्त ओळखीचे आहे. वंशपरंपरागत चालत आलेली ही थट्टा! मध्यमवर्गीय माणसाची सूड उगवायची कुवत याहून काय जास्त असणार?

तर मी विनायक दळभद्र्याच्या चाळीत राहतो. माहीत आहे का तुम्हाला ही चाळ? तसे बघण्यासारखे काही नाही तिथे. काहीच नाही. टंच पोरी नाहीत. असणारच कशा? पांढरपेशा आणि दारिद्र्य ह्या दोन चाकांमध्ये भरडल्या जाणाऱ्या आमच्या पोरी नव्हाळी येतायेताच सुकून जातात. कुठेतरी प्रेम करतात, फसतातही. कुठे किरकोळशी नोकरी धरून बापाचा संसार सावरून धरतात. इथल्या मुलांचीही हीच अवस्था. तारुण्याने रसरसण्याआधीच ती मटका-दारूत मुरतात. हातापायांच्या नसा बाहेर पडलेल्या. नोकरी कुठेतरी कारखान्यात, कंपनीत नाहीतर मिलमध्ये. असेच प्रेम नि मग लग्न. चाळीत विशेष काही घडतही नाही. कधीच घडत नाही.

म्हणूनच म्हणतो, ही चाळ तुम्ही पाहिलेली नसली तरी मुळीच बिघडत नाही. गिरगावातल्या अनेक मोडक्या चाळींसारखी ही एक चाळ दोन बोळांच्या बोळकांडीत उभी आहे. शंभर वर्षांहून जुनी असल्यामुळे जिकडेतिकडे टेंभे लावलेले. मुडदूस झालेल्या मुलाच्या फासळ्या दिसाव्यात तशी प्लॅस्टर जाऊन दिसणारी कॉंक्रिटच्या तारागजांची भगदाडे. जिन्याच्या मागच्या फळ्या जाऊन म्हाताऱ्याच्या तोंडासारखी दिसणारी भगदाडे. सर्वांच्या दारात कोळशाच्या पेट्या. त्यावर रात्री तरुण पोरे झोपतात. मवालीपणाची सुरुवात इथूनच होते. पण घरात बरोबरीच्या बहिणी. त्यामुळे त्यांना आतही झोपवता येत नाही. प्रत्येकाच्या दारात

तुळशीची कुंडी. गुलाबाची कुंडी क्वचितच. म्हाताऱ्या पाध्यांसारख्याच्या कुंडीत पाती चहा आणि दुर्वाच मिळायच्या.

अशा ह्या चाळीत दुसऱ्याच्या दारातला कचरा, सामान आमच्या दारात आले म्हणून, नाहीतर नळाच्या पाण्यावरून भांडत मी जगलो– जवळजवळ अठ्ठावन्न वर्षे. त्या वर्षी मी म्युन्सिपालटीतून निवृत्त होणार होतो. पंचावन्न वर्षांपर्यंत माझे जीवन तसे साधे सरळ गेले. असे कधी भांडण झाले तरच. पण तसा मी चाळीतला भला माणूस म्हणूनच प्रसिद्ध होतो. पण गेल्या तीन वर्षांत माझ्या जीवनाला मिळालेले ते वेगळे वळण... त्याबद्दलच सांगयचेय तुम्हाला.

आमच्या चाळीचा जिना चढून तुम्ही आलात की इतर बिऱ्हाडांतून डोकावत पुढे चला. माझी शेवटची खोली म्हणजे हवा, उजेड भरपूर असे वाटत असेल ना? कसले काय! अहो, खोली संडासाजवळची. खिडक्या असून उपयोग नाही. स्वैंपाकघरातली खिडकी तर बंदच असते. बाहेरच्या खोलीतली उघडी ठेवतो. सवय झालीय आता. चाळीचा नळही इथेच आहे. खालीही आहे. पाण्यासाठी, संडासासाठी इथे वर्दळ भरपूर असते. जवळजवळ साठ बिऱ्हाडे आणि प्रत्येक घरी चार-पाच माणसे. करा हिशेब.

माझी खोली इतर चाळीतल्या खोल्यांसारखीच. एक कॉट, त्यावर गाद्या-उश्यांची थप्पी. कॉटखाली जुने धान्याचे डबे. कधीकाळी काढलेल्या रंगाचे पोपडे गेलेल्या भिंती. भिंतींना मारलेल्या फळ्या, त्यावर बोचकी आणि ती झाकण्यासाठी त्रेतायुगात केलेला, धुळीची पुटे चढलेला पडदा.

आतली खोली ह्याहूनही गोंधळाची. पाण्याची पिंपे, गंजलेले पत्र्याचे डबे, थोडी भांडी, मोरी, ओटा, स्टोव्ह, शेगडी आणि ह्या साऱ्या गर्दीत कोनाड्यात स्थान टिकवून असलेले देव. कोळिष्टके, शेगडीचे काळे. सवयीने हे सारे डोळ्याला खुपत नाही.

हे सारे सांगतोय ते तुम्हाला ह्या घडलेल्या घटनेची पार्श्वभूमी माहीत असावी म्हणून.

ह्या अशा साम्राज्यात कर्त्या पुरुषाची झोपण्याची सोय कॉटवर असते, तशीच माझीही होती. पत्नी आतल्या खोलीत. वयात आलेली कुसुम, धाकटा बाळू कॉटच्या पुढे आणि पंचविशीचा बबन्या बाहेर पेट्यांवर.

त्या दिवशी ते चमत्कारिक स्वप्न पडले ते ह्याच आमच्या राज्यात. आजूबाजूला अठरा विश्वे दारिद्र्य होते आणि मी त्या स्वप्नात रंगलो होतो. त्या स्वप्नातले सारे तपशील मला आठवतायत.

आमच्या त्या खोल्यांना प्लॅस्टिक इमल्शनचा लावलेला आइस्क्रीम कलर. भिंतीवरची बंद कपाटे, फॉल्स सीलिंग, गरगरणारा पंखा, सोफा कम बेड, गोदरेजचे कपाट, कॉटवरच्या नव्या जाड गाद्या, त्यावरची गुलाबी चादर, उश्यांचे पांढरेशुभ्र अभ्रे आणि कॉटजवळच्या खिडकीचा वाऱ्यावर हलणारा पडदा...

आतल्या खोलीतली चकचकीत भांडी, नळ, बाथरूम, उभा ओटा, त्यावर गॅस, खाली बंद कपाट, सारे स्वच्छ, झगझगीत. गुबगुबीत, बायको झुळझुळीत साडीत, हसतमुख, शिऱ्याची बशी घेऊन आलेली. मुलांचे, माझे कपडेही टेरेलिनचे. ऑफिसमध्ये मी हेडक्लार्क. इतके सर्व छान! आणि मग अचानक मी मेट्रो सिनेमाशी उभा असतो. ट्रॅफिक सिग्नलजवळ मला ती ऐटदार मोटार दिसते. तिचा निळा रंग, पांढऱ्याशुभ्र गाद्याही मला आठवतायत. ड्रायव्हिंग करणारा तो माणूस, त्याचा चेहरा, त्या मिशा... आणि बघताबघता सिग्नलशी उभ्या असलेल्या मला पाहून तो चपापतो– झटकन निघतोही; आणि मी त्या मोटारीपुढे उडी घालतो. कर्णकर्कश आवाज... आणि मी स्वप्नातून जागा होतो...

स्वप्नात हे सारे इतके खरे वाटले होते की जागा होताच घरावरून नजर फिरलीच आणि चपराक बसल्यागत वाटले. 'काय विचित्र स्वप्न...' मी तरीही त्याच गुंगीत होतो.

नळावरून येणारे भांड्यांचे आवाज, टमरेलांचे आवाज, वसईवाल्यांच्या बरण्यांचा खडखडाट. पत्नी कण्हतकण्हत म्हणाली, ''अहो उठताय ना? केव्हाची हाका मारतेय. त्या मेल्या बंडू दामल्यानं आज घड्याळ आतल्या खोलीत ठेवलं वाटतं.''

तेव्हा मी ताडकन उठलो. कसले स्वप्न आणि काय? पाणी गरम करून बायकोला दिले. बायकोचे चिकटणारे डोळे उघडण्यासाठी रोजचाच हा कार्यक्रम. दातांवर दंतमंजन फासून बादल्या घेऊन नळावर धावलोच. बाळूच्या पायावर गडबडीत पाय पडला. तो कळवळला तरी बघायला मला वेळ नव्हता.

नळावर नंबर चुकला की आफत. वाटेत बंडू दामल्या पाणी भरताना दिसला. तो मिशीतल्या मिशीत हसला. त्याची ढम्मेली बायको खिदळली. गजराचे घड्याळ आतल्या खोलीत ठेवून त्याने माझी धांदल उडवून दिली होती. चाळीतले हे हेवेदावे असेच. पण मनातून संताप आला. त्या दामल्याच्या तुंदिल पोटावर रट्टा मारावासा वाटत होता.

पण ते शक्य नव्हते. नोकरीची तीन वर्षे बाकी होती. एखादेवेळी असा कुजकेपणा केला तरी नेहमी त्याचे घड्याळ बाहेरच्याच खोलीत असायचे. त्याच्याच गजराने मला जाग येते. लहरीत असला तर बंडू दामले कधीमधी हाकाही मारतो: 'वसंतकाका, उठा!'

हो! बंडू दामल्याचा मला हेवा वाटतो. तसा लाइनीत असलेला मुलगा. बायको नोकरी करणारी. 'हम दो हमारे दो' असा त्यांचा संसार. चाळीतल्या सुखवस्तू कुटुंबात गणना होते त्याची. हेवा वाटणे तसे स्वाभाविकच नव्हे का?

नळाचे पाणी भरताना त्या स्वप्नाची आठवण झाली आणि मनात आले, बंडू दामल्याच्या हेव्यादाव्यातून तर ते स्वप्न पडले नसेल ना? बंडू दामल्याची खोली स्वप्नातल्या खोलीशी मिळतीजुळती जरी नव्हती तरी बरीचशी तशी होती.

काही स्वप्ने अशी आखीवरेखीव असतात, हुबेहूब असतात की त्यांच्या आठवणी मनातून जात नाहीत. ह्या स्वप्नाचेही असेच झाले. आणि म्हणूनच वास्तवतेचा उबग आला होता मला.

रोज लक्षात येत नाही. पण त्या दिवशी पाणी भरताना दमल्यासारखे वाटले होते. दोन हातांत दोन बादल्या धरून बदाबदा पिंपात पाणी ओतीत मी सारा राग काढत होतो. बाहेर पेटीवर ताणून दिलेल्या बबन्याचा राग आला होता. धपाटे घालावेसे वाटत होते, पण पंचविशीच्या पोरांना कुणी मारते का? घरात झोपलेली आमची कुसुम– तिच्या कमरेत लाथ

घालावीशी वाटत होती, पण बाविशीच्या पोरीला धड पोसता येत नव्हते, तिचे लग्न करता येत नव्हते. फक्त लाथ घालणे शोभले असते काय?

त्यातल्या त्यात बाळू लाइनीत, शिकणारा. बारा वर्षांचा पण टी.बी. मुळे लहानखुरा वाटतो. मुसमुसत होता पण जवळ गेलो नाही, समजावले नाही.

पाणी भरून झाले तेव्हा नेहमीपेक्षा उशीरच झाला होता. वाटेत पाणी सांडले होते, त्यावर पाय घसरून आदळलोच. बाळूच्या चेहेऱ्यावर पसरलेले हास्य, कुसुमचे पांघरुणातून हळूच डोकावणे. बायकोनेही बाहेर पाहिले होते. सर्वांवर ओरडलोच, ''हसा भोसडीच्यांनो! बाप मेल्यावरही हसा!''

अपघात तर होणार नाही ना? ही मनात रुखरुख... त्या दिवसाची सुरुवात ही अशी. चहा झाला. शेजारीपाजारी पेपरात डोकावले आणि तेवढ्यात बायकोने स्टोव्ह पुढे आदळला, ''घ्या! पेटत नाही. दुरुस्त करून आणा.''

''आठ वाजता सांगा ही कामं! त्या पोरांना सांगा की! एक दिवसरात्र उनाडतो. दुसरी टिवल्याबावल्या करते.''

आणि तरी स्टोव्ह उचलून चालू लागलो. दिवसाला पनवती लागते ती अशी. पुढे सांगण्यासारखे काही नाही. उशीर झाला होता. नेहेमी मी गिरगावातून चालत जातो. आज बसने निघालो. बसच्या नागमोडी क्यूमध्ये ओळखीचे कुणी दिसले तर तिकीट काढायला लागेल ह्याची मनातून धास्ती वाटत होती. पण केला हिय्या. ठरवून ठेवले, दिसलेच कोणी, तरी शेवटपर्यंत त्यांच्या तिकिटासाठी खिशात हात घालायचाच नाही. बसच्या क्यूमध्ये नाईक, परांजपे, वैद्य ही मंडळी नव्हती. हायसे वाटले.

बस आली. आज तिसरा लेट होता म्हणून घाबरत होतो. पण वेळेवर पोचणार होतो. तिकीटही काढले. जरा आरामात बसलो.

पण आमचे नशीबच असे फुटके! बस मेट्रोपर्यंत गेली आणि बंद पडली. आता सुरू होईल, मग होईल म्हणून वाट पाहिली. कधी नव्हे ते वीस पैसे खर्च केलेले. तावातावाने कंडक्टरकडे गेलो. त्याने खांदे उडवले. माझ्या फाटक्या कॉलरकडे बघूनही असेल.

मग काय, निमूटपणे रांगेत उभा राहिलो. काही माणसे चालत चालली होती. पण मला वीस पैसे वसूल करायचे होते, मी थांबलो. मागाहून येणाऱ्या बसमध्ये चढलो. ऑफिसजवळ पोचलो. धावत जिना चढून वर गेलो तर मस्टर हेडक्लार्क रानड्यांच्या टेबलावर गेलेले.

रानडे साला खडूस आहे. चार पोरी आहेत त्याला. नोकरी करतात. पण एकीचे लग्न होत नाही. त्याचे उट्टे आमच्यावर काढतो. धावपळ करून फक्त त्याचे छद्मी हास्य पदरात. निमूटपणे जिना उतरलो. आता हाफ डे शिवाय मार्ग नव्हता. जावे का घरी? पण काय करायचे घरी जाऊन, सांगा! घरात तरुण पोरे, पोपडे गेलेले घर आणि दमेकरी, डोळ्यांची चिपाडे झालेली बायको. सरळ उठलो आणि समोरच्या आझाद मैदानात फतकल मारून बसलो.

मुलांचे क्रिकेट रंगले होते. बघ्यांची गर्दी होतीच. मी सावलीत बसून होतो. शून्य नजरेने, सुन्न मनाने आजबाजूचे व्यवहार पाहत होतो. रस्त्यावर माणसांची गर्दी नव्हती आता. वाहने मात्र धावत होती. त्या मोटारींची सिग्नलशी थांबलेली रांग बघता बघता मला स्वप्नातली ती निळी मोटार आठवली. त्यांत दिसलेला, मला पाहून घाबरलेला तो मनुष्य... काही चेहेरे उगाचच ओळखीचे वाटतात... तसा आमच्या सारख्या गरिबांचा एवढा मोटारवाला कुठला नातेवाईक असायला? पण स्वप्नातला तो चेहेरा तरीही मनात तरळत होता.

बराच वेळ बसलो. क्रिकेट पाहिले. ही दुपार आयुष्यात महत्त्वाची ठरेल असे वाटले नव्हते. कंटाळा आल्यावर उठलो. चणेवाल्याकडून चणे घेतले, ते खात मेट्रोकडे आलो. थिएटरवर लावलेली कुठल्यातरी sexy सिनेमाची चित्रे पाहिली. 'I am King of all I survey' अशा थाटात सिग्नलशी थांबलो. शाळेतली ही कविता मनात कशी काय घोळत होती कोणास ठाऊक! मनात येत होते, 'शाळेत एवढी हुषारी दाखवून फुकट! आपले करतोय 200-5-EB वगैरे.'

आणि असा उभा असतानाच ती निळी मोटार दिसली. मी वेड्यासारखा पाहतच राहिलो. सिग्नल पडला होता पण मला भान नव्हते. मी पाहत होतो ती निळी मोटार, तिच्या पांढऱ्या गाद्या, तो चालवणारा तोच झुपकेदार मिश्यावाला मनुष्य. स्वप्नात असा उभा असतानाच त्याचे माझ्याकडे लक्ष गेले होते. तो चेहेरा प्रत्यक्ष पाहिल्यावर अगदी नक्कीच कुठेतरी पाहिल्यासारखा वाटत होता आणि मग ती शाळेतली कविता ओठांतच राहिली. कारण एकाएकी ते नाव आठवले होते. तो आमच्या शाळेतला 'हिरालाल शहा' होता. मी बहुधा ते नाव मोठ्याने उच्चारले असावे. बाकी कुणी माझ्याकडे पाहिले नव्हते, पण हिरालालने पाहिले. त्याचा तो घाबरलेला चेहेरा... आणि माझ्या लक्षात आले, हा गाडी सुरू करणार! आणि स्वप्नातल्यासारखाच, डोळ्यांचे पाते लवते न लवते तो मी धावलोच.

बस्स! मग साऱ्या घटना भराभर घडल्या. मोटारींचा कर्णकटू आवाज, बघ्यांची गर्दी आणि मोटारीखाली शरीराचा अर्धा देह गेलेला मी तसा सुरक्षितच; पण घाबरलेला. ग्रीन सिग्नल असतानाच गाडी सुरू केल्याबद्दल लोकांची आरडाओरड आणि अजीजीने हात जोडून उभा असलेला हिरालाल...

'सोडू नका, चोपा!'

'काय समजात हे स्वत:ला?'

'गरीबों को जान ही नही जैसी!'

मी डोळे उघडले तेव्हा हिरालाल मोटार मागे घेत होता आणि लोक मला हात धरून उठवत होते.

लोकांच्या तावडीतून सुटण्यासाठी असेल, हिरालालने आपला पवित्रा बदलला. त्याच्या चेहेऱ्यावर हताश, नाइलाज झाल्याचे भाव होते. पण त्याने मला ओळख दिली, ''केम वसंत भिडेच ना तमे?''

''हट् साला! ओळखही विसरलास. मी एवढा धावलो आणि तू चक्क गाडी सुरू केलीस?'' मी त्याच्या पाठीवर थापा ठोकीत विचारले. आणि बघ्यांच्या लक्षात आले, फुकट तमाशा संपला. ते गेले, ट्रॅफिक जास्त वेळ अडवून धरण्यात अर्थ नव्हता. हिरालालने फ्रन्ट सीटचा दरवाजा उघडला आणि मी झटकन आत शिरलो.

ते पहाटे पडलेले स्वप्न, त्यातली आठवणारी प्रत्येक गोष्ट, भविष्याची सूचक नांदी तर नव्हती ना ती? आणि त्या क्षणीच मला

हिरालालच्या बापाची– मगनलाल शेटची– आठवण झाली. प्रत्येकाच्या जीवनाचे अचूक भविष्य सांगणारे 'भृगुसंहिता' हे अत्यंत जुने दुर्मिळ पुस्तक त्याच्याकडे होते. त्यावर पैसे कमावून तो गब्बर झाला होता. लहानपणी शाळेच्या परीक्षेत नापास होणारा हिरालाल म्हणायचाही, 'काय करायचं लई शिकून? बापानं भविष्य सांगितलंय. आपुन जास्त शिकणार नाय. बापाचा भविष्याचा धंदा आपुन चालविनार!' आणि खरोखरच इंग्लिश दोन-तीन यत्ता झाल्यावर हिरालालने शाळा सोडली.

ह्या साऱ्या जुन्या आठवणींबरोबर मला माझी कुंडलीही आठवली. मला थोडाफार ज्योतिषाचा नाद होताच. घरच्या बिकट परिस्थितीमुळे ग्रह बघण्याचाही नाद होता. पण अचूक कुठले भविष्य कळणार हो?

भविष्य जाणून घेण्याची उत्सुकता कोणाला नसते? हिरालाल बोलत नव्हता फारसा, तरी मीच चौकशा करू लागलो. ''बाबा अजून आहेत का?'' माझा बाप मरून वीस वर्षे झाली होती तर त्याचा त्याच वेळी म्हातारा असलेला बाप कुठला जिवंत असायला? पण माहिती ही कळायलाच हवी होती.

हिरालालने न बोलता बोट वर केले. 'बाप वारला' एवढे तोंडाने बोलण्याचे कष्ट त्याने घेतले नाहीत. श्रीमंत माणसांना गरिबांशी बोलायला आवडत नाही तर असे मोटारीत घालून फिरवायला आवडेल? इतक्या वर्षांनी आम्ही मित्र भेटलो होतो, पण साध्या औपचारिक चौकश्याही नाहीत. पण रागवण्यात अर्थ नव्हता. मला माझा स्वार्थ साधायचा होता. मी चिकाटी सोडली नाही.

''मग भविष्याचा धंदा तूच चालवत असशील! तूच करतोस, मला माहीत आहे. थापा मारून काही फायदा नाही व्हायचा.'' मी जरा जोरातच बोललो.

''करतो बाबा करतो. सूं जाये छे तमे? मी खोटा बी सांगितला तरी इश्वास नाही बसणार. झूट बोलून काय फायदा बी नाय तर कशाला वार्ता करू? भविष्यात जे हाय ते घडणारच. पर एक सांगते ते ध्यानात ठेव. घडायचं ते समदं घडतं मग भविष्य बघायचं कशाला? ह्यो नाद लई वाईट! जुगाराहून बी खराब. म्हून म्हनतो, तू गाडीतून उतर आणि सीधा आपल्या धंद्याला जा.'' त्याच्या स्वरात असलेली ती अजीजी...

पण मी ऐकणार? मी हसलो. ''हे बघ, मला भविष्य ऐकायचंय. मोटार तुझ्या ऑफिसकडे घे.'' मी एवढ्या जरबेने बोलू शकतो आणि ते कोणी ऐकते हे त्या दिवशी कळले. घरात आमचा बबन्या उत्तराला प्रत्युत्तर करतो, पण इथे एवढा मोठा शेठ गोगलगाईसारखा माझे म्हणणे मान्य करीत होता.

त्याचे ऑफिस नेमके कुठे आहे ते मी तुम्हाला सांगत नाही. पण त्याने गाडी फाउंटनशी थांबवली आणि आम्ही पायी चालत हॅन्डलूम हाउसजवळच्या बोळकांडीतून आत शिरलो. तिथल्या एका जुन्या इमारतीचा जिना चढून वर गेलो. बाहेर 'लक्ष्मी ट्रेडिंग कंपनी' अशी पाटी होती, पण आत कसलाही ट्रेड नव्हता. मग लक्षात आले, इथे भविष्याचा ट्रेड चालतो.

मला हिरालालबरोबर येताना पाहून ऑफिसमधल्या माणसाने मला अदबीने सलाम केला. डॉक्टरांच्या दवाखान्यात असते तशी गर्दी तिथे होती. चिन्तातुर पण तरीही उत्सुक चेहरे..

मी हिरालालच्या मागोमाग केबिनमध्ये शिरलो. तिथे असलेल्या कडक बंदोबस्तापेक्षा माझे लक्ष केबिनच्या थाटाकडे होते. एअर कंडिशन्ड केबिन, गुबगुबीत सोफा, गाद्या. मी आरामात बसलो. हिरालाल गटागटा पाणी प्यायला आणि डोके धरून बसला. मी त्यांची समाधी भंग होऊ दिली नाही. जरा वेळाने त्याने नजर वर उचलली. मला तिथे पाहून तो दचकलाच. बाजूची घंटा दाबण्यासाठी गेलेला त्याचा हात मी तसाच वरच्या वर पकडला. इतक्या वर्षांनी भेटलेला दोस्त– ना चौकशी, ना प्रेमाने वास्तपुस्त... आणि वर धक्के मारून घालवून द्यायचा विचार तर नाही ना?

मग थोड्या वेळाने खोल गेलेल्या आवाजात तो मला म्हणाला, ''बैसो. पर तरी बी एकदाचा लास्ट सांगतो. भविष्याच्या नादी लागू नको. भला नाय व्हायचा. त्यावर तुझी मर्जी.''

मी न बोलता माझी कुंडली त्याच्यासमोर कागदावर काढली. अगदी हताश झाल्यागत त्याने ते जुनाट पुस्तक काढले आणि माझ्या कुंडलीसारखी कुंडली पाहून भविष्य पाहायला सुरुवात केली.

भविष्य पाहताना सुरुवातीला असलेले भाव बदलत बदलत गेले. त्याच्या चेहेऱ्यावर भीतीचे, दु:खाचे भाव होते का? काय होते माझे भविष्य? न विचारताच जावे का? पण सकाळचे ते सुबत्तेचे स्वप्न– स्वप्नात दिसलेला हिरालालही प्रत्यक्ष भेटला होता. म्हणजे नक्कीच काहीतरी चांगले होते.

मी त्याला म्हणालोही, ''बोल.''

तो खोल गेलेल्या आवाजात म्हणाला, ''मी असं करतो– माझी तशी अटच आहे– मी भविष्य लिहून देतो; फक्त ते वाचायचं खाली जाऊन. इथे नाही.''

मी ही अट हसतहसत मान्य केली. तो भराभर लिहीत सुटला. तो कागद एका लिफाफ्यात बंद करून त्याने माझ्या हातात दिला आणि केबिनमधून उठून तो मला सोडायला बाहेर आला. वॉचमनला मला व्यवस्थित खाली सोडायला बजावले. तसा रस्ता तर सरळ होता. ह्या हिरालालचे काय डोके फिरलेले होते की काय कुणास ठाऊक? वॉचमनही निमूटपणे खालपर्यंत आला. मला खाली सोडून सलाम ठोकून निघून गेला. आपण कुठल्या दुसऱ्या रस्त्याने आलो इकडेही माझे लक्ष नव्हते. हातातल्या लिफाफ्यात काय असेल ह्याबद्दल उत्सुकता होती. पाय लटलटत होते.

मी समोरच्या हॉटेलात गेलो. चहा मागवला आणि थरथरत्या हाताने लिफाफा उघडला. आणि आनंदातीशयाने मला वाचता वाचता उकळीच फुटली. नशिबाचा मटकाच फुटला होता साला! मनात एकदा शंका आली की जो बबन घरात एक दमडा पैसा देत नाही, उलट मटक्यासाठी आईकडून पैसे घेतो, तो घर सावरणार? काही असो. मी लवकरच हेडक्लार्क होणार होतो. बायकोची प्रकृती सुधारणार होती. बाळूही शाळेत जाऊ लागणार होता. 'त्यानंतरचे वर्ष मात्र खडतर आहे. तरुण मुलगी पळून जाणार नाही ह्याबद्दल दक्षता घ्यावी. बायकोच्या, मुलाच्या प्रकृतीला धोका'... सर्व तारीखवार, पण पुढे मात्र एक-दोन कोरे कागद. सबंध जीवनाचे एवढेच भविष्य?... जाऊ दे. जातोस कुठे? गाठीनच तुला... असे बडबडत मी तिथून बाहेर पडलो.

मी येणाऱ्या वर्षावर खूष होतो. त्या नादात ऑफिसमध्ये गेलो. हाफ डे लीव्हबद्दल नाईकने नेहेमीचा चावट जोक मारला. पण चिडलो नाही. भराभरा काम आपटले. कित्येक दिवसांनी दत्तासाठी हार घेतला, पेढे घेतले आणि लवकरच घरी परतलो.

दाराशी येतोय तो भज्यांचा वास सुटलेला! मी चप्पल काढली. घरात झुळमुळणारी पोरं चिडीचिप! बबनसुद्धा तोंड चुकवीत बाहेर जाऊ लागला. पण त्याच्या अपेक्षेप्रमाणे मी ओरडलो नाही.. 'सगळं तेल संपवून महिन्याच्या शेवटी बोंबला!' वगैरे ऐकवले नाही.

घरात डोकावून मी म्हणालो, ''भजी चालल्येत? वा वा ! बबनराव, आज काय विशेष?''

तो चाचरत म्हणाला, ''नाही, आज जरा पैसे मिळाले होते. आईला सामान आणून दिलं म्हणून तिनं–''

''भजी केली, असंच ना?'' मी त्याचे वाक्य पुरे केले. ''ठीक आहे. मी पण येतो खायला. पण आधी जरा दत्ताला हार, पेढे ठेवू या. मग आपली पोटपूजा. चला रे पोरांनो.''

मी आरती केली. उदबत्तीच्या वासाने बाहेरची खोली दरवळली. चाळीतली माणसे येताजाता डोकावली. मी हसलो मनात. पूजा आटपून प्रसाद दिला. मजेत गप्पा मारीत भजी खाण्याचा कार्यक्रम सुरू झाला. मी बबनला म्हणालोही, ''बबनराव! असेच घरात लक्ष घाला. तुम्ही मोठे चिरंजीव. साऱ्या घराची मदार तुमच्यावर.''

भजी खाताखाता मनात बेत चालले होते. दिवाळी झाली की ह्या वर्षीच कुसुमचे लग्न करून टाकायचे. पुढच्या वर्षीच्या भविष्याची काळजी आताच घ्यायची. बायको, मुलाला डॉक्टरला दाखवायचं. बाजूला बसलेल्या बाळूला गोंजारत मी म्हणालोही, ''ऑफिसचा नवीन डॉक्टर आलाय, त्याला तुला आणि तुझ्या आईला दाखवू या. दोघं खडखडीत बरी व्हाल.''

एवढे बोलून भविष्याच्या दृष्टीने मी निश्चिंत होतो. त्या दिवसापासून आमच्या घराचे स्वरूप बदलले. कुरकुरणारे घर प्रसन्न झाले. सर्वांचे चेहेरे आनंदी दिसू लागले.

बबन पैशाचा हातभार लावू लागला आणि रोजच्या जेवणातही फरक पडला. चांगलेचुंगले होऊ लागले. बायको बबनच्या आवडी जपायची, पण मला राग येत नसे. गजराचे घड्याळ दुरुस्त करायचे म्हणताच बबनने एक जॅपनीज घड्याळ आणून टाकले.

ह्याच दरम्यान मी हेडक्लार्क झालो आणि इच्छा होती, स्वप्नात पाहिले होते, तसे फॉरिन टेरिलीनची पॅन्ट, शर्ट असे– बबनने आणून दिलेल्या कापडाचे– कपडे शिवले. ऑफिसमध्ये गेल्यावर तो इरसाल नाईक मागे लागला. सारेच विचारायचे, म्हणायचे, ''अहो वसंतराव! आम्हाला पण असा पीस मिळाला तर बघा ना!''

मी बबनला म्हटल्यावर तो म्हणाला, ''हात्तेच्या! देईन की. किती हवेत?'' त्याने किमतीचा आकडा सांगितला. मग असे पॅन्ट आणि बुशशर्टचे कापड पुरवणे हा माझा धंदाच सुरू झाला.

हळूहळू आमचे घर बदलत होते. आम्ही बदलत होतो. घरातले सामान, वस्तू वगैरे बदलत होत्या. हे सारे अपेक्षितच होते. मी निश्चिंत होतो. टी.व्ही. वर एखादी खेळलेली क्रिकेट मॅट दाखवली जाते, तिचा रिझल्ट तुम्हाला आधीच माहीत असतो. सुनील शून्यावर बाद झाला तरी वेंगसरकर सेंच्युरी काढणार, चौहान त्याला साथ देणार, बॉलर्स मागे हटणार नाहीत, आपण मॅच जिंकणार आहोत, वगैरे. मी तसाच बेफिकीर होतो.

तसा होण्यासारखेच घडत होते. टेरिलीनची पॅन्ट, बुशशर्ट घालून हेडक्लार्क म्हणून मी ऑफिसमध्ये जात होतो. मस्टरवर सहीसाठी लेट येणाऱ्या लोकांकडे जुन्या हेडक्लार्कसारखे डोळे फाडून पाहत होतो. स्वप्नात पाहिला तोच रंग खोलीला लागला होता. लॉफ्ट, फॉल्स सीलिंग झाले, सोफा कम बेड झाला. खिडकीला झुळझुळीत पडदा आला. बायकोची, बाळूची प्रकृतीही हळूहळू सुधारत होती. आतल्या खोलीत भांडी आली. थोडक्यात आमचे घर चाळीतले एक सुखवस्तू बिऱ्हाड म्हणून गणले जाऊ लागले होते. बंडू दामले, वरच्या मजल्यावरचे साठे, थांबून चौकशी करू लागले होते.

आपले असे चांगले भविष्य माहीत असले की जिवाला हुरहूर नसते. वर्ष कसे गेले समजले नाही. पुढच्या वर्षीच्या दृष्टीने मी काळजी घेत होतो. पण कुसुमचे कुठे जमले नाही. शेवटी बायकोच म्हणाली, ''अहो! लग्न आणि घर हे नशिबातले योग– असतात तेव्हाच घडतात. होईल पुढच्या वर्षी.''

बायकोच्या बोलण्यावर मी निश्चिंत राहिलो आणि नेमका दावा साधला गेला. एकाएकी चालत्या गाडीला खीळ बसावी, नांदत्या घराला दृष्ट लागावी तशाच घटना घडू लागल्या.

कुसुम एक दिवस घरातून नाहीशी झाली. आम्ही जंगजंग पछाडले पण तिचा पत्ता लागेना. हिरालालने वर्तवलेल्या भविष्याचे दुसरे पर्व सुरू झाले होते. ती आता सापडणार नाही हे निश्चितच होते. माझा शांतपणा बघून बायको, मुलगा दोघे माझ्यावर चिडली. बायकोने तर मनाला लावूनच घेतले. चाळीत नाचक्की झाली. कुणी काही, कुणी काही बातम्या आणू लागले. काय बोलणार त्यावर? जे घडायचे होते ते घडून गेले होते.

माझ्याबद्दल प्रवाद सुरू झाले. कोणी म्हणे, 'साधू मनुष्य!' तर कोणी म्हणत, 'काय बाप आहे की कसाई? पोरीचा पत्ता नाही, पण ह्याला काही वाटत नाही.'

ह्या गडबडीत बायको अंथरुणाला खिळली. समजावले, धाक दाखवला पण व्यर्थ. ह्याचा परिणाम तिच्या प्रकृतीवर होऊ लागला. जेवणखाण सुटलेच. पुन्हा शरीर अस्थिपंजर झाले.

हिरालालने वर्तवलेल्या भविष्याचे दुसरे प्रत्यंतर येणार हे हळूहळू ध्यानात येऊ लागले. पण करणार काय? मी सुन्न होऊन गेलो. रात्ररात्र विचारात गढून जायचो. झोपही नाहीशीच झाली. रात्रीबेरात्री बायकोच्या तोंडाकडे टक लावून मी बघत असे. हिरालालने दिलेली तारीख, एक एक कमी होणारा दिवस... माझे मन गोठतच चालले होते.

बायको एकदा म्हणाली, ''सारे झाले. सोन्याच्या गाठणीतल्या मंगळसूत्राची हौस होती. कुसुमच्या लग्नात करणारही होते, पण... ''

एकदा वाटले, तिला मंगळसूत्र करावे. पण पुन्हा विचार केला, मेल्यावर भटाचीच धन करायची, त्यापेक्षा आहे ते काय वाईट? तिचा मृत्यू हा ठरलेलाच असल्यामुळे मी औषधोपचारही पुढे बंद केले. इतकेच नव्हे, पावसाळ्यात सेलमध्ये लागलेली स्वस्तातली हिरवी साडीचोळीही

घेऊन ठेवली. माझा निर्दयपणा बायकोच्याही लक्षात आला होता. ती बडबडायची, ''आता डोळे मिटण्याचीच वाट आहे.''

त्यानंतर महिन्याभरानेच बायको गेली. रोज तिच्या मरणाचा विचार केल्यामुळे माझे मन मुर्दाड झाले होते. डोळ्यांत पाणी आले नाहीच. उलट घरातली सारी तयारी मी पुढे केली. लोकांच्या चर्चेचा मी विषय बनतोय, इकडे माझे लक्षच नव्हते.

बायकोच्या पाठोपाठ बाळू आजारी झाला. त्याची तारीख मला पाठ होती. शाळेतून त्याचे नाव काढले. लोक म्हणत होते, तरी औषधोपचार थांबवले. घरगुती काही चालू होते तेवढेच.

लोक म्हणत, 'स्मगलिंगच्या धंद्यात माझी होणारी चलती संपली म्हणून माझे डोके फिरलेय' वगैरे. माझे वागणे क्रूरपणाचे वाटणे तसे स्वाभाविकच, पण बाळूच्या उशाशी रात्र रात्र जागरणे करीत त्याच्या मरणाचा विचार करीत मी कसा वेळ काढला होता मलाच ठाऊक! एक-एक जाणारा दिवस भयानक वाटायचा आणि मग असे रोज मरण पाहताना प्रत्यक्ष मरण आल्यावर काही वाटण्याइतके मन मृदू उरतच नसे. बाळूही त्या ठरलेल्या तारखेला गेला. भविष्याचे ठोकताळे अगदी अचूक आले होते. पण पुढे काय? पुढचे ते कोरे कागद– काय अर्थ होता त्याचा? विचार करून डोके फुटायची वेळ आली. हरणारी मॅच पाहताना होते तशी अवस्था झाली होती.

मी त्या दिवशी पुन्हा हिरालालला गाठायचे ठरविले. गेले वर्षभर एकामागून एक फटके बसल्यामुळे, भविष्य ठाऊक झाल्यामुळे मन रंजीस आले होते, निरुत्साही झालो होतो. तरी त्या कोऱ्या कागदाचा अर्थ मला उगाच भंडावत राहायचा. नसते तर्ककुतर्क सतावीत राहायचे. त्यामुळे हताशपणा आला होता. बसने मी फाउंटनला उतरलो आणि हँडलूमहाउसकडे निघालो. वाटेत बबनच्या कारखान्यातला दोस्त भेटला. बरोबर हिरव्या साडीतली बायको होती. कधीतरी बबनचेही लग्न करून द्यायला हवे हा विचार त्या जोडगोळीकडे पाहून आला.

प्राथमिक हवापाण्याच्या गप्पा झाल्यावर त्याने बबनची चौकशी केली. ''कुठे नोकरी मिळाली त्याला? दोन वर्षांपूर्वी त्याला नोकरीतून कमी केलं तेव्हापासून गाठभेट नाही.''

मी कसेबसे स्वत:ला सावरले आणि काहीतरी बोलून वेळ निभावली. बबनचे रात्रीबेरात्री बाहेर जाणे, फॉरिनच्या वस्तू, घरात अचानक आलेला पैशाचा ओघ ह्याचा अर्थ आता उमगत होता मला.

मी तसाच घरी परतलो. त्या दिवशी हिरालालची जागा शोधण्याइतकी ताकदच नव्हती मला. घरी आल्यावर टाळके फुटेपर्यंत विचार करीत बसलो. मनात विचार आला, ह्या कोऱ्या कागदाचा अर्थ आपल्यावर स्मगलिंगचा आळ येऊन आपण तुरुंगात खितपत पडणार असा तर नसेल ना? भराभर घर धुंडाळले, फॉरिन वस्तूंचा स्टॉकच केलेला होता पोटमाळ्यावर. फॉल्स सीलिंगवरच्या जागेतही हीच अवस्था. मला दरदरून घाम फुटला.

जीव मुठीत धरून मी आता जगत होतो. शेवटी पुन्हा हिरालालला गाठण्याचा प्रयत्न केला, पण गेलो तर त्या इमारतीत त्या जागी भलतीच पाटी होती. हिरालालची चौकशी केल्यावर वॉचमनही कोरा करकरीत चेहेरा करून उभा.

हिरालालला गाठणे आवश्यक होते. मी आता ऑफिसमध्ये न जाता मेट्रोपाशी थांबून राहू लागलो. येणाऱ्याजाणाऱ्या मोटारी न्याहाळीत. ती निळी मोटार दिसेना. मग मात्र काही दिवसांनी मोटारऐवजी माणसांचे चेहेरे न्याहाळू लागलो.

माझ्या ह्या तपश्चर्येला यश आले. खरे म्हणजे पुन्हा भविष्य पाहण्यात अर्थ नाही हे समजत होते. ह्या भविष्याने जीवनातली सारी गंमत गेली होती, उत्कंठा संपली होती. काहीतरी चांगले घडेल म्हणून अपेक्षेने जीवनाकडे बघणेच संपले होते. हताशपणा, यांत्रिकपणा आलेला होता. पण तरीही त्या कोऱ्या कागदांचा अर्थ मला हवा होता.

त्या दिवशी हिरालालची मोटार दिसली. तिचा रंग आता लाल होता. मी नंबर टिपून घेतला. त्याची नजर गर्दीत कुणाला शोधत होती? मलाच तर नसेल? पण मी मागच्यासारखी त्याला हाक मारली नाही. जाणारी टॅक्सी थांबवून त्या लाल गाडीच्या मागून गेलो.

हिरालालने गाडी व्ही.टी.च्या बाजूने हॅन्डलूम हाउसच्या पिछाडीला घेतली. आरशात बहुधा त्याला मागून येणारी टॅक्सी दिसली होती. त्याने वेग वाढवला. टॅक्सी त्याच्या गाडी पाठोपाठ गेली.

हिरालाल मोटार थांबवून धावत सुटला. तो त्याच इमारतीत शिरला.

अर्थात मी मागचा मूर्खपणा केला नाही. हिरालालची केबिन कुठे आहे, त्याचा मला आठवत असलेला नकाशा मनात तयार केला आणि मागच्या बाजूने त्या इमारतीत शिरलो. त्याच्या केबिनवर हळूच ठोकले आणि दरवाजा उघडताच आत शिरलो. हिरालाल पाहतच राहिला. पण मी शिताफीने दरवाजा बंद केला– मागचा आणि पुढचाही.

मी त्याच्यापुढे भविष्याचे ते कोरे कागद टाकले. ''ह्याचा अर्थ काय?''

पण ह्यावर काही बोलण्याऐवजी तो खिन्नपणे हसला, ''माझा मन आज सांगतच व्हता की तू आज येनार म्हून. बोल, सू जोये छे?''

त्याचा हा शांतपणा! मग मी दिसताच हा पळून का आला होता? मला टाळत का होता?

मी तेवढ्याच शांतपणे त्याला म्हणालो, ''मला पुढचं भविष्य हवंय.''

तो खिन्नपणे हसला, ''बे सालचा भविष्य सांगितला होता ना मी तुला? तरी बी हौस हाय? अरे मानूस हाय की जानवर?''

''हे बघ, मला मागच्यासारखं संदिग्ध भविष्य नकोय. 'मुलगा हातभार लावील संसाराला' असं म्हणालास, पण ते स्मगलिंग करून, हे अध्याहृतच ठेवलं होतंस तू. ते आधी सांगतास तर मी त्याचा बंदोबस्त केला असता.''

''तू काय बी शिकला नाय. असा भविष्य टाळता येते व्हय? व्हायचं ते व्हयाचंच. म्हून तर आज समद्या तयारीनिशी आलोय.''

''ही टंगळमंगळ नको. ह्या कोऱ्या कागदांचा अर्थ सांग.'' मीही हट्टाला पेटलो.

पण तो बोलेना, काही सांगेना. त्याला बोलता करण्यासाठी मी त्याला गदागदा हलवले.

''दोन वर्षांचं भविष्य सांगितलंस तसं हेही सांग. आता ते कळून घेण्याशिवाय मला मार्गच नाही. ते कळून फायद्याचं होत नाही हे मी दोन

वर्षं अनुभवलंच. अरे, लोकांनी काय वाट्टेल ती नावं ठेवली. मुर्दाड, बनेल म्हटलं. पण चांगल्यावाईट घटनांतला प्रत्येक क्षण मी आधी जगलो होतो रे! हे सारं भयानक असतं हे पटतंय, तरीही ह्या कोऱ्या कागदांचा अर्थ मला हवाय. कारण मला भीती वाटतेय. बोल. बोल रे!''

पण तरीही तो शांतच. त्या शांतपणाचा मला संताप आला. ''बोलतोस की नाही साल्या! तुझी भृगुसंहिताच फाडून टाकतो.'' माझे भानच हरपले होते.

शुद्धीवर आलो तेव्हा हिरालालची लुळी पडलेली मान माझ्या हातात होती. तरीही हा मेला असेल असे वाटले नाही. त्याला मी रागाने ढकलले आणि तो बदकन खाली कोसळला तो नेमका घंटेवर– मी त्याला हलवले तेव्हा लक्षात आले की हा मेलाय म्हणून.

दारावर धडका बसत होत्या. मी पेपरवेटच्या खाली ठेवलेले कागद उचलले. मला माझे जीवन नष्ट करणारी ती भृगुसंहिता हवी होती. पण त्या कागदावर माझी नि हिरालालची कुंडली मांडलेली होती आणि त्याखाली भविष्य होते. माझ्या कुंडलीत खुनाचा आरोप आणि त्याच्या कुंडलीत त्याचा होणारा खून– तारीख, वार, वेळसुद्धा अचूक वर्तवलेला होता. हिरालालचे मला घाबरणे, भविष्य सांगण्याविषयी नाराजी दाखवणे ह्यामागचे कारण एवढ्या उशीरा कळत होते, पण काय उपयोग?

एकच इच्छा होती– माणसाचे जीवन भयानक करणारी ती भृगुसंहिता जाळायची.

दरवाजा फोडून लोक आत आले तेव्हा मी तीच धुंडाळत होतो. बैठकीच्या गाद्या, उशा सोफासेट.. सारे फाडले, पुस्तके उलथीपालथी केली, तरी ती सापडली नव्हती.

पुराव्यानिशी मी सापडलो होतो. बचावाचे साधन काही नव्हते. 'कुणी भविष्य सांगितले म्हणून खून होत नाही' म्हणाल, पण हे सारे घडले आहे.

काही लोकांचे म्हणणे, त्या भृगुसंहितेसाठी मी खून केला. ती हिरालालने दिली नाही म्हणून मी त्याचा जीव घेतला. पण नाही हो! खरेच नाही!

वर सांगितले ते सारे खरे आहे. बचावासाठी चाललेली ही सफाई नव्हे. विश्वास नाही ना बसत? माझा तरी कुठे बसलाय? मीच सारे केलेय, तरीही वाटतेय, हे वाईट स्वप्न असेल. खिडकीवर चार वेळा डोके आपटून घेतलेय. टेंगूळ आले तिथे डोके ठणकतेय. म्हणून तर पटतेय की हे स्वप्न नव्हे.

तो पाहा सेन्ट्री आलाय. मला म्हणतोय, ''गप रे भडव्या! दुसऱ्याची मुंडी पिरगळताना लई मजा आली नव्हं? आता तुमचं बी त्येच.'' फाशीची त्याने केलेली खूण...

म्हणूनच म्हणतो, माझे एक काम आहे. हिरालालने आकाशाकडे बोट दाखवून खूण केली होती. त्यालाही ती भृगुसंहिता नष्ट करावीशी वाटत असावी बहुधा. ती कुठे आहे ते मला समजलेय. कराल एवढे? नाहीशी कराल ती? फक्त एवढेच : आपली कुंडली पाहण्याचा मोह आवरा. नाहीतर...

(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित
'प्लँचेट' या पुस्तकातून)

snehaljoshi375@gmail.com

❖



६ वी आवृत्ती

आपल्या सहवासात आलेल्या व्यक्तींचं स्मरण होणं, हे स्वाभाविक आहे. अशा स्वाभाविकतेतून रेखाटल्या गेलेल्या व्यक्तिचित्रांचा संग्रह

अशी मने असे नमुने

शिवाजी सावंत

पृष्ठसंख्या : १५२ । किंमत : १८०/- Book Available

दिनविशेष

१६ ऑक्टोबर - जागतिक अन्न दिवस
रुचिरा भाग १ व २, चला जाणून घेऊ या - शाकाहार, मेक्सिकन कुकिंग, अन्नपुराण : आयुर्वेदिक-आधुनिक, केक्स, मायक्रोवेव्ह ओव्हन, आहार आणि आरोग्य या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १६३५/-
सवलत किंमत : रु. १०७०/-
१६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबरपर्यंत

१७ ऑक्टोबर - इंटरनॅशनल डे फॉर इरॅडिकेशन ऑफ पॉव्हर्टी
वुई आर पुअर बट सो मेनी, आघाडीचे महिला नेतृत्व, स्त्रियांचे सक्षमीकरण, Saris on Scooters, लघुउद्योजकांचा मार्गदर्शक या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १३८०/-
सवलत किंमत : रु. ९५०/-
१७ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबरपर्यंत

२१ ऑक्टोबर - शुभदा विद्वांस यांचा जन्मदिन
शुभदा विद्वांस यांच्या **७** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १६२५/-
सवलत किंमत : रु. ९९९/-
२१ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबरपर्यंत

२१ ऑक्टोबर - आल्फ्रेड नोबेल यांचा जन्मदिन
नोबेल ललना - भाग १ व २ या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ३००/-
सवलत किंमत : रु. १९९/-
२१ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबरपर्यंत

२३ ऑक्टोबर - अशोक पाध्ये यांचा जन्मदिन
अशोक पाध्ये **अनुवादित १८** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ६५७०/-
सवलत किंमत : रु. ३६२०/-
२३ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबरपर्यंत

२३ ऑक्टोबर - मायकेल क्रायटन यांचा जन्मदिन
नेक्स्ट, पायरेट लॅटिट्यूड्स, प्रे, स्टेट ऑफ फिअर या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १४००/-
सवलत किंमत : रु. ८४९/-
२३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबरपर्यंत

२६ ऑक्टोबर - मंजूषा आमडेकर यांचा जन्मदिन
मंजूषा आमडेकर लिखित व अनुवादित **६१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत : रु. ५१२९/-
सवलत किंमत : रु. ३०९९/-
२६ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबरपर्यंत

२९ ऑक्टोबर - ली चाईल्ड यांचा जन्मदिन
नथिंग टू लूज, वन शॉट या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ६९०/-
सवलत किंमत : रु. ३९९/-
२९ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत

२ नोव्हेंबर - कविता भालेराव यांचा जन्मदिन
तंत्रज्ञानाची मुळाक्षरे - भाग १ व २ या पुस्तकांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ३००/-
सवलत किंमत : रु. १९९/-
२ नोव्हेंबर ते ३ नोव्हेंबरपर्यंत

२ नोव्हेंबर - अरुण शौरी यांचा जन्मदिन
अरुण शौरी लिखित **७** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. २७२५/-
सवलत किंमत : रु. १५३०/-
२ नोव्हेंबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत

६ नोव्हेंबर - इंटरनॅशनल डे फॉर प्रिव्हेन्टिंग द एक्सप्लॉयटेशन ऑफ द एन्व्हायर्नमेंट इन वॉर ॲन्ड आर्म्ड कॉन्फ्लिक्ट
इनसाईड द गॅस चेंबर, लेनिनग्राडचा वेढा, २६/११ : मुंबईवरील हल्ला या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ७७०/-
सवलत किंमत : ४९९/-
६ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबरपर्यंत

नवं कोरं

देशाची जडणघडण अनुभवलेल्या सनदी अधिकाऱ्याचे आत्मकथन

माझी वाटचाल

मेटकॉफ हाउस ते राजभवन

(१९५२-१९८९)

राम प्रधान



प्रशासकीय किंवा सनदी अधिकाऱ्याचा देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचा सहभाग असतो. बुद्धिकौशल्य, नेतृत्वगुण, प्रसंगावधान, योग्य निर्णय घेण्याची क्षमता, सचोटी, वक्तशीरपणा, कार्यक्षमता, कोणतीही जबाबदारी स्वीकारण्याची आणि कष्ट करण्याची तयारी, सहनशीलता, बिकट परिस्थितीतही कणखर राहण्याची वृत्ती इ. गुण सनदी अधिकाऱ्याकडे असणे अपेक्षित असते. अशाच गुणांचा समुच्चय असलेले माजी सनदी अधिकारी आणि अरुणाचलचे माजी राज्यपाल राम प्रधान यांचं आत्मचरित्र आहे 'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन (१९५२-१९८९)'. या आत्मचरित्रातून त्यांनी त्यांच्या व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनातील अनुभव कथन केले आहेत. १९५२ ते १९८९ म्हणजे जवळ जवळ सदोतीस वर्षांच्या कालखंडातील हे अनुभव आहेत. त्यांचा जन्म, शिक्षण, आय. ए. एस.चं प्रशिक्षण, नोकरीची सुरुवात ते सेवानिवृत्तीपर्यंतचा त्यांचा जीवनप्रवास त्यांनी सांगितला आहे.
एक कुशल सनदी अधिकारी म्हणून त्यांचा हा अनुभवपट अतिशय विस्तृत आहे.

पृष्ठसंख्या : ४६० । किंमत : ५००/-

Book Available

नवं कोरं

चतुर बिरबलाच्या मनोरंजक गोष्टींचा खजिना

अकबर-बिरबल मालिका
संच १
मंजूषा आमडेकर



अजब आज्ञापालन



कडीवर कडी



बादशाहाचा विचित्र हट्ट



आईची तळमळ



बालहट्ट

पाच पुस्तकांच्या संचाची किंमत रु.३५०/-

अकबर-बिरबल मालिका
संच २
मंजूषा आमडेकर



हा रस्ता कुठे जातो?

बोलकी थैली

कपिलेचा मालक कोण?

मूर्खांचा शोध



शुभ आणि अशुभ

पाच पुस्तकांच्या संचाची किंमत रु.३५०/-

७ नोव्हेंबर - डॉ. रत्नावली दातार यांचा जन्मदिन
डॉ. रत्नावली दातार लिखित **३** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ३००/-
सवलत किंमत : रु. १९९/-
७ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबरपर्यंत

७ नोव्हेंबर - इन्फन्ट प्रोटेक्शन डे
गर्भसंस्कार, हसत-खेळत बालसंगोपन, सुखद बालसंगोपन या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ५६०/-
सवलत किंमत : रु. ३७५/-
७ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबरपर्यंत

७ नोव्हेंबर - वर्ल्ड कॅन्सर अवेअरनेस डे
कॅन्सर केअर ॲन्ड मिस्टरीज ॲन्ड योगा, कॅन्सर रोखू या, इट्स नॉट अबाउट द बाईक या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ७७०/-
सवलत किंमत : रु. ४९९/-
७ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबरपर्यंत

१० नोव्हेंबर - वर्ल्ड सायन्स डे फॉर पीस ॲन्ड डेव्हलपमेंट
प्रेमाचा रेणू, संकरित, कल्पित-अकल्पित, अंतरिक्षाच्या अंतरंगात, पर्यावरण प्रदूषण, ज्ञानदीप, वसुंधरा, दृष्टिभ्रम, खिडकीलाही डोळे असतात... या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १६६५/-
सवलत किंमत : ९७१/-
१० नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत

११ नोव्हेंबर - सुरेखा शहा यांचा जन्मदिन
थेंबभर पाणी अनंत आकाश या पुस्तकावर विशेष सवलत
पुस्तकाची मूळ किंमत : रु. २८०/-
सवलत किंमत : रु. १६०/-
११ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत

११ नोव्हेंबर - राष्ट्रीय शिक्षण दिवस
स्टोन्स इन्टू स्कूल्स, थ्री कप्स ऑफ टी, टू सर विथ लव्ह, अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ११७५/-
सवलत किंमत : रु. ७४०/-
११ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबरपर्यंत

१२ नोव्हेंबर - ख्रिस्तोफर रिच यांचा जन्मदिवस
रुल्स ऑफ डिसेप्शन या पुस्तकावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ४८०/-
सवलत किंमत : रु. २९९/-
१२ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबरपर्यंत

१४ नोव्हेंबर - बालदिन
बालसाहित्यातील **१४५** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ९६२३/-
सवलत किंमत : रु. ५४९९/-
१४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबरपर्यंत

१४ नोव्हेंबर - वर्ल्ड डायबेटीस डे
चला जाणून घेऊ या! -मधुमेह, मधुमेह : एक आव्हान या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. २५०/-
सवलत किंमत : रु. १५९/-
१४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबरपर्यंत

१६ नोव्हेंबर - इंटरनॅशनल डे फॉर टॉलरन्स
नॉट विदाऊट माय डॉटर, क्षितिजापार..., झोंबी, लज्जा, द डायरी ऑफ मेरी बर्ग, ...तरीही जिवंत मी, एका मातेचा लढा, वेदनेची फुले या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १८९०/-
सवलत किंमत : रु. १२९९/-
१६ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबरपर्यंत

१७ नोव्हेंबर - रत्नाकर मतकरी यांचा जन्मदिवस
रत्नाकर मतकरी लिखित **१५** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. २२०५/-
सवलत किंमत : रु. १५२०/-
१७ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबरपर्यंत

१९ नोव्हेंबर - इंटरनॅशनल मेन्स डे
संच १- धीरुभाईझम, इमॅजिनिंग इंडिया, जे. आर. डी. टाटा एक चतुरस्त्र माणूस, की-नोट जे. आर. डी. टाटा,माझी जीवनयात्रा, मायकेल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी, नारायण मूर्ती : मूल्य जपणारं एक अद्वितीय आयुष्य, रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व, स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ, टाटा एक कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती, तेलसम्राट या पुस्तक संचावर सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ३०८५/-
सवलत किंमत : रु. २०९९/-

संच २- आधुनिक भारताचे प्रेषित : स्वामी विवेकानंद, अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम, बंदा रूपाया!, छावा, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, एकलव्य, क्रांतिसूर्य, लेनिनग्राडचा वेढा, राधेय, महाभारतातील पितृवंदना, मृत्युंजय, नेताजी, पावनखिंड, राजा रवी वर्मा, संभाजी, श्रीमान योगी, स्वामी या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ५०५५/-
सवलत किंमत : रु. ३३९९/-

संच ३ अदम्य जिद्द, अमरगीत : बाबा आमटे यांचे जीवनचरित्र, मॅस्वी कान्हेरे, नाथ हा माझा, पितृऋण, टर्निंग पाइंट्स, योध्दा शास्त्रज्ञ राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १२६०/-
सवलत किंमत : रु. ८४९/-

संच ४ अमेरिकी राष्ट्रपती, कॅलिस्टो, चिकन सूप फॉर द फादर्स सोल १ व २, मी कधीही माफी मागणार नाही, मी तिरस्कार करणार नाही, थेंबभर पाणी अनंत आकाश, तो एक पाकिस्तानी या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. २५२०/-
सवलत किंमत : रु. १६९९/-
१९ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबरपर्यंत

२१ नोव्हेंबर - मंजुश्री गोखले यांचा जन्मदिवस
मंजुश्री गोखले लिखित **४** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १११५/-
सवलत किंमत : रु. ८००/-
२१ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबरपर्यंत

२४ नोव्हेंबर - डेल कार्नेगी यांचा जन्मदिवस
डेल कार्नेगी लिखित **३** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ६००/-
सवलत किंमत : रु. ३९९/-
२४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबरपर्यंत

२४ नोव्हेंबर - सुधीर गाडगीळ यांचा जन्मदिवस
सुधीर गाडगीळ लिखित **लाइफ स्टाइल** या पुस्तकावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १५०/-
सवलत किंमत : रु. ९९/-
२४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबरपर्यंत

२५ नोव्हेंबर - इंटरनॅशनल डे फॉर इलिमेंटेशन ऑफ व्हॉइलन्स अगेन्स्ट वुमन
संच १ स्त्रियांचे सक्षमीकरण, परवाना, मयादा : इराकची कन्या, नॉट विदाऊट माय डॉटर, बारबाला, एका मातेचा लढा, मी झारा गहरमानी, अरुणाची गोष्ट, काहूर, एकाकी बंड, डायरी ऑफ ॲन फ्रँक, साम्राज्य बुरख्यामागचे, काबुलीवाल्याची बंगाली बायको, स्पाय प्रिन्सेस, ब्लास्फेमी, हिरॉईन ऑफ द डेझर्ट, माय नेम इज सलमा, तरीही जिवंत मी, वेदनेची फुले, भोगले जे दुःख त्याला..., डिनायल या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ४५८५/-
सवलत किंमत : रु. ३०४९/-

संच २ चिकन सूप फॉर द मदर्स सोल, भाग २ व ३, चिकन सूप फॉर द सोल इंडियन मदर्स, चिकन सूप फॉर द सोल इंडियन वुमन, चिकन सूप फॉर द वुमन्स सोल, चिकन सूप फॉर द वुमन्स सोल भाग २ व ३ या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १६५५/-
सवलत किंमत : रु. १०९९/-
२५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरपर्यंत

२६ नोव्हेंबर - वीणा देव यांचा जन्मदिवस
वीणा देव लिखित 'स्वान्सीतील दिवस' पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत : रु. ३९५/-
सवलत किंमत : रु. २५९/-
२६ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबरपर्यंत

२८ नोव्हेंबर - विश्वास पाटील यांचा जन्मदिवस
विश्वास पाटील लिखित **४** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १३७५/-
सवलत किंमत : रु. १०५९/-
२८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत

३० नोव्हेंबर - आनंद यादव यांचा जन्मदिवस
आनंद यादव लिखित **३३** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ५७४५/-
सवलत किंमत : रु. ४१४९/-
३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबरपर्यंत

३० नोव्हेंबर - संजीव परळीकर यांचा जन्मदिवस
पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र, पुढाकार घ्या : प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे सूत्र, झटपट व्यक्तिमत्त्वाचा विकास, चार शब्द द्यावे-घ्यावे, चार जबरदस्त फंडे, याला जीवन ऐसे नाव, केल्याने होत आहे रे...,

विक्रीकौशल्य शिका या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ७९५/-
सवलत किंमत : रु. ४९९/-
३० नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत

३ डिसेंबर - वर्ल्ड डिसॅबिलिटी डे
चाकाची खुर्ची, द पेशंट, इट्स नॉट अबाऊट द बाइक, एक लढा असाही, वेदनेची फुले, ...तरीही जिवंत मी या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. १३७०/-
सवलत किंमत : रु. ९५९/-
३ डिसेंबर ते ६ डिसेंबरपर्यंत

७ डिसेंबर - इंडियन आर्मी फोर्स फ्लॅग डे
एका सैनिकाचा मृत्यू, परमवीरचक्र या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ४७०/-
सवलत किंमत : रु. २८०/-
७ डिसेंबर ते ८ डिसेंबरपर्यंत

९ डिसेंबर - इंटरनॅशनल अँटी करप्शन डे
अण्णा हजारे, लढा लोकपालचा, भ्रष्टाचाराशी लढा या पुस्तक संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ४९०/-
सवलत किंमत : रु. ३००/-
९ डिसेंबर ते १० डिसेंबरपर्यंत

११ डिसेंबर - ओशो यांचा जन्मदिवस
ओशो लिखित **३० अनुवादित** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत : रु. ४६१५/-
सवलत किंमत : रु. ३०९९/-
११ डिसेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत

❖

जानेवारी असो वा असो डिसेंबर
बारा महिने अनुभवा पुस्तकांचा बहर
महिन्यांच्या नावातलं निवडा आद्याक्षर
बारा महिने मिळवा दमदार ऑफर

O C T O B E R महिना विशेष

'O' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत -२,८२०/-
सवलत किंमत -१,६९२/-
१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर

'C' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - २२,३४०/-
सवलत किंमत - १३,४०४/-
१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर

'T' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ३५,१५४/-
सवलत किंमत - २१,०९२/-
१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर

'B' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - १२,५२५/-
सवलत किंमत - ७,५१५/-
१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर

'E' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ७,३३०/-
सवलत किंमत - ४,७६५/-
१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर

'R' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ४,८४०/-
सवलत किंमत - २,९०४/-
१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर

N O V E M B E R महिना विशेष

'N' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ९,६८५/-
सवलत किंमत - ५,८११/-
१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

'O' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - २,८२०/-
सवलत किंमत - १,६९२/-
१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

'V' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ११,७८०/-
सवलत किंमत - ७,०६८/-
१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

'E' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ७,३३०/-
सवलत किंमत - ४,७६५/-
१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

'M' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - २६,६९०/-
सवलत किंमत - १६,०१४/-
१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

'B' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - १२,५२५/-
सवलत किंमत - ७,५१५/-
१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

'R' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ४,८४०/-
सवलत किंमत - २,९०४/-
१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

D E C E M B E R महिना विशेष

'D' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ११,८०९/-
सवलत किंमत - ७,०८५/-
१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर

'E' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ७,३३०/-
सवलत किंमत - ४,७६५/-
१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर

'C' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - २२,३४०/-
सवलत किंमत - १३,४०४/-
१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर

'M' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - २६,६९०/-
सवलत किंमत - १६,०१४/-
१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर

'B' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - १२,५२५/-
सवलत किंमत - ७,५१५/-
१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर

'R' आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ४,८४०/-
सवलत किंमत - २,९०४/-
१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर

❖

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२

Whats App No. ९४२०५९४६६५

website : www.mehtapublishinghouse.com

रोज सकाळी तीन तासांत दोन हजार शब्द लिहिणं, हा सावधपणे खेळलेला जुगार आहे. पुस्तक पूर्ण होईपर्यंत मी मागे वळून पहात नाही. सगळ्या चुकाही नंतरच सुधारतो. लिहिलेल्या दिवशीच चुकून मागे पाहिलं तर लेखन तिथंच संपून जातं.

- इयान फ्लेमिंग

मला दुसरं काही करावंसं वाटलं, तरी मी स्वतःला ठणकावून लिहायला बसवतो. मी ते खूप वर्षांपूर्वीच साध्य केलंय. मला स्वतःच्या घरातच स्वतःचा स्वतंत्र अवकाश शोधायला लागतो. लेखन सोपं काम नाही. त्यासाठी प्रचंड चिकाटी लागते.

- रॉबिन कुक

पुस्तकं नेहमीच पुनर्लिखित असतात. अगदी तुमचं स्वतःचं पुस्तकही. हे स्वीकारणं कठीण आहे. जेव्हा तुम्ही पुस्तकाचा सातवा खर्डा पुन्हा लिहित असता, तेव्हा तर ते स्वीकारणं आणखी कठीण आहे.

- मायकेल क्रायटन

आयुष्यात प्रत्येकाला स्वतःचा स्वतंत्र आवाज असतो. तो शोधणं म्हणजे सत्याचा शोध आहे. तो गवसला की तुम्ही नायक होता. तुमची गोष्ट ऐकली जाते.

- जॉन ग्रिशॅम

Registered
RNI NO-MAHMAR/2006/2739
Regd.No.: PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso. Pune
Publishing Date : 11 October, 2017. Posting Date : 11 October, 2017.

मेहता
पब्लिशिंग
हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२,
२४४६०३१३, २४४६३०४८
Email: mmgj@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com

जय गणेश ऑफसेट, २०/१ डी /१ अ, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे - ४११ ०११ येथे छापून संचालक, मुद्रक, प्रकाशक: सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे - ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले.